॥ ३० ॥ जैसीप्राक्तनींअसेलगती ॥ तैसेंचघडोनयेईलपुढती ॥ आपणयाचीहळहळचित्तीं ॥ व्यर्थकांसयाकरावी
॥ ३१ ॥ समाधानमानोनिचित्तीं ॥ मायबापांनीधरिलीप्रीती ॥ विद्याभ्याससांगावापुढती ॥ तरीजाईलमागुतीरुसो
नी ॥ ३२ ॥ वधूसत्वरविचारूनिजाण ॥ भानुदासाचेंकेलेंलग्न ॥ ऐसेलोटतांबहुतदिन ॥ करितभजनश्रीहरीचें ॥ ३३ ॥
आयुष्यसरोनिगेलियावरी ॥ मायबापेंनिवर्त्तलींतेअवसरीं ॥ परीभानुदासनिर्भयअंतरीं ॥ प्रपंचव्यवहारींगुंतेना
॥ ३४ ॥ नकरीकोणाचेंउपार्जन ॥ उदीमव्यवसायघेणेंदेण ॥ नकरीकदाराजसेवन ॥ पांडुरंगभजनकरीतसे ॥ ३५ ॥
घरींपाहिजेवस्त्रअन्न ॥ कांतेचेंहळहळीतमन ॥ मुलेंलेंकरेंसर्वअसोन ॥ उदासमनसर्वदा ॥ ३६ ॥ गृहस्थमिळोनिच
वघेजण ॥ भानुदासासिबोलतीवचन ॥ कुटुंबासिपाहिजेवस्त्रअन्न ॥ तुह्मांकारणकळेना ॥ ३७ ॥ मातापिताहोतीं
शिरीं ॥ त्याणींसंसारकेलाआजवरी ॥ पुढेंकैसीहोईलपरी ॥ तुह्मींअंतरींउदास ॥ ३८ ॥ विद्याभ्यासहीफार ॥ तुह्मां
सिनाहींजीसाचार ॥ आतांकांहींसांगतोंविचार ॥ तोपरिसासादरनिजकर्णीं ॥ ३९ ॥ एकशतद्रव्यभांडवलजाण ॥
आह्मींदेतसोंतुह्मांकारण ॥ त्याचेंकापडघेऊन ॥ चाटेपणकरावें ॥ ४० ॥ नफामिळेलतेणेंकरून ॥ कुटुंबासिकरावेंव
स्त्रअन्न ॥ आमुचेंमुद्दलजतनकरून ॥ हळूचदेणस्वइच्छा ॥ ४१ ॥ मगगृहस्थजाऊनिबाजारासी ॥ कापडघेऊनदीध
लेंतयासी ॥ इतरउदमीहोतेत्यांसी ॥ भानुदासासीनिरविलें ॥ ४२ ॥ ह्मणतीतुह्मींजातसांबाजारीं ॥ तेव्हांन्यावेंया
सबरोबरी ॥ बैसवूनिआपुलेशेजारीं ॥ प्रपंचव्यवहारींलावावें ॥ ४३ ॥ गृहस्थांचेंवचनऐकोनिकानीं ॥ मान्यकेलेंव्यव
सायांनीं ॥ मगभानुदासासिसवेंघेऊनी ॥ आपुलेसन्निधबैसविती ॥ ४४ ॥ मुळूंउदांनुअंगुळुऐसी ॥ नंदभाषासांगी
तलीत्यासी ॥ केवळाकाठीपंवित्रूत्यासी ॥ सांगोनियांदीधलें ॥ ४५ ॥ सेलूंपोकूंआणिढकारं ॥ आवांरूखुणसांगती

१ पूर्वजन्माची, दैवाची. २ कष्टाला. ३ कन्या. ४ आर्जव, सेवा. ५ व्यापाऱ्यांनी. ६ पांच. ७ तीन. ८ दहा. ९ एकवीस. १० सात. ११ सहा. १२ चार. १३ हजार. १४ दोन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सखर ॥ कोणतेंकैसेंघ्यावेअंबर ॥ हाहीविचारसांगितला ॥ ४६ ॥ मुद्दलजतनकरूनिजाण ॥ लाभसांगावाविचारून ॥
कोणासिबोलतांसत्यवचन ॥ तरीहोतसेहानानिश्चितीं ॥ ४७ ॥ भानुदासबोलेतयाप्रती ॥ मीअसत्यनवदेंकल्पांतीं ॥
कांहींनमिळोमजप्रती ॥ परीसत्यनिश्चितींटाकीना ॥ ४८ ॥ व्यवसायीहांसतीसकळिक ॥ ह्मणतीयाचेकपाळींलिहि
लीभीक ॥ ह्मणोनिआमुचेंनायकेएक ॥ दरिद्रीदेखयानाव ॥ ४९ ॥ एकह्मणतीलागलियालांचे ॥ मगअसत्यउदंड
बोलेलवाचे ॥ प्रपंचव्यवहारींबोलतांसाचें ॥ कोणिदैवाचेंदिसेना ॥ ५० ॥ जेवींगर्भांधाचेदृष्टीसजाण ॥ अवघेंआंधळें
वाटेजन ॥ कींरोगअसतांशरीराकारण ॥ कडुवटपक्कान्नत्याभासे ॥ ५१ ॥ तेवींआपुलेंअंतरींअसत्यनर ॥ तयासि
नदिसेकोणीखरें ॥ जैसेंजयाचेंअसेलअंतर ॥ तैसेचइतरभासती ॥ ५२ ॥ भानुदासाचेंधैर्यमोठें ॥ प्रपंचव्यवहारींन
बोलेखोटें ॥ सकळलोकांसिनवलवाटे ॥ देखोनिनिकटेंतयासी ॥ ५३ ॥ कोणीगिराईकपुसेअंबर ॥ त्यासिकिंमतसां
गेखरोखर ॥ इतकानफामुदलावर ॥ एकदांउत्तरबोलतसे ॥ ५४ ॥ चित्तासयेईलतरीघेण ॥ नाहींतरिदुसरेदुकानीं
जाण ॥ इतुकेंमात्रबोलोनिवचन ॥ मगनामस्मरणकरीतसे ॥ ५५ ॥ जनींजनार्दनभरिलाजाण ॥ निश्चयकळलासक
ळांकारण ॥ ह्मणतीभानुदासअसत्यवचन ॥ नबोलेचीकल्पांतीं ॥ ५६ ॥ ऐसेंजाणोनिग्राहिक ॥ त्यापासींजातीसक
ळिक ॥ इतरव्यवसायीअकर्मिक ॥ दुरूनकौतुकपाहाती ॥ ५७ ॥ ह्मणतीआपुल्यासवेंलाविलेंयासी ॥ तेंबाधकजा
हलेंआपुल्यासी ॥ मगद्वेषउपजलामानसीं ॥ दुराचारीयांसीतेधवां ॥ ५८ ॥ ह्मणतीआह्मांशेजारींचबैसतो ॥ आणि
ग्राहीकआपणाकडेनेतो ॥ आह्मींतोंडाकडेटकमकापाहतों ॥ पोटींजळतोंउगेची ॥ ५९ ॥ एकह्मणतीघालितोमोहनी ॥
तेणेंचिजनजातीभुलोनी ॥ मागितलेंमोलदेतीटाकोनी ॥ घसघसकोणीकरीना ॥ ६० ॥ एकह्मणतीबैसलाविश्वास ॥

१ वस्त्र. २ गिराईक. ३ व्यापारी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेणेंचिजनभजतीत्यास ॥ आपणअसत्यप्रपंचदास ॥ हेंईश्वरासमानेना ॥ ६१ ॥ एकह्मणतीआतांबोलावेंखरं ॥ दु
जादेतसेप्रतिउत्तर ॥ आपुलाविश्वासकोणीइतर ॥ यथार्थसाचारनमानिती ॥ ६२ ॥ एकदावृत्तिठसावेजैसी ॥ तेचिज
न्मवरचालेतैसी ॥ प्रत्यक्षआपुल्यादृष्टीसी ॥ भानुदासासीघडलीकीं ॥ ६३ ॥ श्वानउगेंचबैसलेंघरीं ॥ आणिमनुष्यें
चोरूननेल्याभाकरी ॥ तरीआळयेईलश्वानावरी ॥ कोणासिअंतरींकळेना ॥ ६४ ॥ व्याघ्रेंधरितांनिजशांतीसी ॥ ह्म
णतीलजपतोमारावयासी ॥ धनलोभीहोतांचिउदासी ॥ ह्मणतीनाडावयासीनिघाला ॥ ६५ ॥ कींजारतीर्थीहिंडतांख
रा ॥ ह्मणतीहाधुंडितोपरदारा ॥ शांतिधरूनिबैसतांमार्जारा ॥ ह्मणतीउंदिरापाहतसे ॥ ६६ ॥ तेवींआपुलाजन्मअ
सत्यबोलतां ॥ गेलाअसेसकळांदेखतां ॥ आतांयथार्थजरीवर्ततां ॥ ह्मणतीलव्यर्थाकपटहें ॥ ६७ ॥ आपुल्यादेखतां
भानुदासाचा ॥ व्यवहारकिंचितकापडाचा ॥ आतांतोथोरभाग्याचा ॥ ईश्वरतयाचासाहकारी ॥ ६८ ॥ आपणउदं
ढकरितांभरोवरी ॥ परिपोटभरनमिळेभाकरी ॥ ऋणकरीयेऊनबैसतीद्वारीं ॥ आतांकैसीपरीकरावी ॥ ६९ ॥ भानुदा
सासिसंगतीसलाविलें ॥ तैंपासोनिआपुलेंनिघालेंदिवाळें ॥ याहीकत्याणेंसकळनेलें ॥ आह्मीतळमळकरितसों ॥७०॥
एकेदिवसींसकळव्यवसायी ॥ बाजारासिगेलेपाहीं ॥ वाटवोसरतांलवलाहीं ॥ देउळींयेऊनराहिले ॥ ७१ ॥ त्यांसवें
भानुदासवैष्णवभक्त ॥ आलेहोतेबाजारांत ॥ त्यांजशेजारींबिऱ्हाडलरित ॥ त्याणेंआणोनीलाविलें ॥ ७२ ॥ तंवत्या
गावांतहरिदासयेऊन ॥ त्याणेंरात्रींमांडिलेंकीर्तन ॥ गावांतफिरतसेबोलावण ॥ कथेसियेणह्मणोनी ॥७३॥ भानुदा
सऐकोनिर्मातऐसी ॥ उल्हासवाटलाचित्तासी ॥ ह्मणेआजसुदिनएकादशी ॥ जावेंकीर्तनऐकावया ॥ ७४ ॥ व्यवसा
यीयांसीह्मणेतेअवसरीं ॥ आतांकीर्तनासीचलावेंसत्वरीं ॥ आळसआणूनिनयालजरी ॥ निजालबिऱ्हाडींसकळिक

१ दुसर लोक. २ खरें. ३ कुत्रा. ४ मन. ५ दुसऱ्याची बायको. ६ माजर. ७ व्यर्थ. ८ प्रकार. ९ व्यापारी. १० सत्वर. ११ वर्तमान. १२ आनंद.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ७५ ॥ तरीमाझेंदुकानरक्षून ॥ तुह्मीआपल्यापासीकराजतन ॥ ऐकोनिभानुदासाचेंवचन ॥ सक्रोधमनतेजाहले ॥ ७६ ॥ ह्मणतीतूंजाहालासिदेवलसी ॥ अखंडसत्यवचनबोलसी ॥ आतांजावेंहरिकथेसी ॥ आपुलेंबिऱ्हाडासीघेऊनी ॥ ७७ ॥ आह्मांसकळांसिआलाटणेंक ॥ आतांनिद्राकरितोंदेख ॥ तरीबिऱ्हाडपाहूनिआणिक ॥ दुकानतेथेंठेविकां ॥ ७८ ॥ येथेंतस्करपडलियापाहीं ॥ तरीआमुचेअंगींशब्दनाहीं ॥ कीर्तनांतपडतेंपदरींकायी ॥ तेंआह्मांसिकांहींकळेना ॥ ७९ ॥ भानुदासउत्तरदेतपहाहो ॥ बिऱ्हाडजावोअथवाराहो ॥ परीपांडुरंगींजडलाभावो ॥ तोमीसर्वथानसोडीं ॥ ८० ॥ ऐसेंबोलोनिवैष्णवभक्त ॥ बिऱ्हाडटाकोनिगेलात्वरित ॥ कीर्तनींबैसलेसाधुसंत ॥ तेथेंत्वरितपातला ॥ ८१ ॥ अतिउल्हासधरूनिमानसीं ॥ नमस्कारकेलाहरिदासांसी ॥ ह्मणेधन्यपर्वकाळएकादशी ॥ क्षेमसंतांसीदीधलें ॥ ८२ ॥ रामकृष्णचरित्रतारकजनीं ॥ वैष्णवगातीप्रेमेंकरूनी ॥ तेंभानुदासआवडीकरूनी ॥ ऐकतीश्रवणींनिजप्रेमें ॥ ८३ ॥ इकडेव्यवसायीदुर्मती ॥ बिऱ्हाडींबैसोनिविचारकरिती ॥ कींभानुदासगेलाकीर्तनाप्रती ॥ बिऱ्हाडनिश्चितींटाकुनी ॥ ८४ ॥ तरीआतांकरूनियांयुक्त ॥ अश्वसोडोनिद्यावात्वरित ॥ दिंडटाकावेंगारींत ॥ तयासिमातनकळतां ॥ ८५ ॥ तोआपणासिपुसेलजर ॥ तरीत्यासिसांगावेंआलेतस्कर ॥ आह्मांसिनिद्रालागलीफार ॥ तोंगेलेसत्वरनकळतां ॥ ८६ ॥ मगतोघरासजाईलपरतोन ॥ आपणकापडघेऊंवांटोन ॥ ऐसाविचारकरूनिदुर्जन ॥ अश्वसोडूनदीधला ॥ ८७ ॥ गर्तापडलीहोतीथोर ॥ त्यामाजीदिंडटाकिलेंसत्वर ॥ टाळियापिटोनियेरयेर ॥ देतीउत्तरएकमेकां ॥ ८८ ॥ भानुदासलागलाआमुचेसंगती ॥ तैंपासोनित्यासिआलीसंपत्ती ॥ ॥ ३ ॥
दरिद्रआलेंआह्मांप्रती ॥ ग्राहीकजातीत्याकडे ॥ ८९ ॥ तेसर्वचिंताआजिनिरसली ॥ औषधावांचोनिखरूजगे

१ साधु. २ त्रास, शीण. ३ चोर. ४ घोडा. ५ शेणाच्या गायरींत. ६ चोर. ७ घोडा. ८ परस्पर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ळी ॥ ऐसीएकमेकांसीबोली ॥ दुर्जनींमांडिलीतेधवां ॥ १० ॥ धर्माचीहिरूनघेतांसंपत्ती ॥ जैसादुर्योधनउल्हासला चित्तीं ॥ तैसेतेव्यवसायीदुर्मती ॥ संतोषमानितीनिजमनीं ॥ ११ ॥ ऐसाअपायदेखोनित्वरित ॥ सत्वरपावलेरुक्मिणीकांत ॥ ह्मणेभानुदासबैसलाकीर्तनांत ॥ निश्चळचित्तकरूनी ॥ १२ ॥ दुर्मतिमिळोनिअवघेजण ॥ गर्तेमाजीटाकिलेंदुकान ॥ आतांविचारकरावाकवण ॥ जगज्जीवनह्मणतसे ॥ १३ ॥ अश्वजाईलएखादीकडे ॥ मगतोपाहीलकोणीकडे ॥ त्याणेंप्रपंचाचीटाकूनिचाडे ॥ लाविलेंवेडेंमज्जनीं ॥ १४ ॥ ऐसेंह्मणोनिपंढरीनाथ ॥ विप्रवेषधरिलात्वरित ॥ अश्वपाहूनिबाजारांत ॥ धरूनिबैसततेधवां ॥ १५ ॥ जोक्षीरसागरींशेषशयन ॥ ज्याचेलक्ष्मीध्यातसेचरण ॥ तोभक्तकैवारीमनमोहन ॥ अश्वधरूनबैसला ॥ १६ ॥ योगीबैसलेसमाधीशीं ॥ त्यांच्यालवकरीनयेध्यानासी ॥ तोभक्तकैवारीहृषीकेशी ॥ धरूनिअश्वासीबैसला ॥ १७ ॥ व्रतेंतीर्थेतपेंयोग ॥ करितांनातुडेश्रीरंग ॥ तोपुंडरीकवरदपांडुरंग ॥ अश्वधरूनबैसला ॥ १८ ॥ जोविरिंचीचानिजजनिता ॥ अनंतब्रह्मांडांचाकर्ता ॥ तोभानुदासाचाअश्वजातां ॥ धरूनिचोहटांबैसला ॥ १९ ॥ व्यवसायीबैसलेदेऊळांत ॥ तेभानुदासाचीनिंदाकरीत ॥ ह्मणतीआतांयेईलअकस्मात ॥ दुकानत्वरितपाहावया ॥ १०० ॥ येथीलवृत्तांतकळतांसकळ ॥ मगकरीतबैसेलतळमळ ॥ ऐसेंपरस्परेंबोलतीखळ ॥ ऐकोनिघननीळकोपला ॥ १०१ ॥ अवकृपाकरितांजगज्जीवन ॥ तोंअकस्माततस्करआलेजाण ॥ व्यवसायांचेंदुकान लुटून ॥ केलेंताडनसकळांसी ॥ २ ॥ सकळघोडींसोडोनिनेलीं ॥ मगरडतबैसलेतयेवेळीं ॥ ह्मणतीभानुदासाचीछळणाकेली ॥ तेप्रचीतदाविलीपांडुरंगें ॥ ३ ॥ एकह्मणतीयेसंधीं ॥ कर्मासारिखीहोतसेबुद्धी ॥ आपणज्ञानहीनत्रिशुद्धी ॥ विचारआधींनकेला ॥ ४ ॥ एकह्मणतीप्राक्तनखोट ॥ ह्मणोनिकर्मधडलेंवोखंट ॥ भानुदासभक्तएकनिष्ठ ॥ केलीकटकट

१ संकट. २ समुद्र. ३ पाय. ४ प्राप्त होतनाहीं. ५ ब्रह्मदेव. ६ उत्पन्न करणारा. ७ चवाठ्याव्र. ८ दुष्ट. ९ दैव. १० वाईट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

व्यर्थतयासी ॥ ५ ॥ दीर्घस्वरें रडतीजाण ॥ कोणीनगरांतूनिनयेधांवून ॥ तोमाथालाघवीरुक्मिणीरमण ॥ घातलेंमोहन
सकळांसी ॥ ६ ॥ इकडेकीर्तनींहोयआनंदगजर ॥ मृदंगविणेवाजतीसुस्वर ॥ तेणेंनादेंकोंदलेंअंबर ॥ होतगजरनामा
चा ॥ ७ ॥ चारघटिकायामिनीउरलीहोती ॥ तेव्हांवैष्णवींकेलीआरती ॥ भावेंवोंवाळूनिरुक्मिणीपति ॥ खिरापतीवां
टिल्या ॥ ८ ॥ नमस्काररूनिहरिदासासी ॥ भानुदासचालिलेबिऱ्हाडासी ॥ तंवएकब्राह्मणअश्वापासीं ॥ धरूनिवाटेसीबैस
ला ॥ ९ ॥ सन्निधचालोनिजातांचिपाहो ॥ अश्वहिंसलातेसमयीं ॥ ह्मणेआपुलाअश्वयेठायीं ॥ कैसाआलाकळेना ॥ १० ॥
तंवत्याचेगळयांतआंगवस्त्रघालून ॥ धरूनिबैसलाएकब्राह्मण ॥ तोभानुदासासिदेखतांचिजाण ॥ अदृश्यझालातेठायीं
॥ ११ ॥ ऐसेंकौतुकदेखोनिसत्वरी ॥ विस्मितझालानिजअंतरीं ॥ मगअश्वधरूनिनिजकरीं ॥ भानुदासबिऱ्हाडींपातले
॥ १२ ॥ तोंव्यवसायीआपुलेसांगाती ॥ दीर्घस्वरेंरुदनकरिती ॥ वृत्तांतपुसतांतयांप्रती ॥ मगतेसांगतीसकळिक ॥ १३ ॥
आह्मींदुर्बुद्धिभाग्यहीन ॥ करूंपातलोंतुझेंछलन ॥ गर्तेमाजीदिंडटाकून ॥ अश्वसोडूनदीधला ॥ १४ ॥ मगदोनप्रह
रभरतांनिशी ॥ तस्करींलुटिलेंआह्मांसी ॥ प्राक्तनाचीगतिऐसी ॥ कोणापासींसांगावें ॥ १५ ॥ घोडींदिंडेंगेलींसमस्त ॥
आणिमारहीबसलाअपरिमित ॥ पुढेंसंसाराचीमात ॥ खुंटलीनिश्चितदिसताहे ॥ १६ ॥ आमुचेंभांडवलबुडोनिगेलें ॥
तुझेंईश्वरेंवांचविलें ॥ पैलगर्तेमाजीटाकिलें ॥ तेंसांभाळिलेंपाहिजे ॥ १७ ॥ ऐसेंवचनऐकूनिसत्वर ॥ भानुदासाचेंह्र
वलेंअंतर ॥ ह्मणेअश्वधरूनिरुक्मिणीवर ॥ बैसलेअसतीलवाटतें ॥ १८ ॥ मगह्मणेरेकटकटा ॥ प्रपंचव्यवहारकरि
तोंखोटा ॥ तेथेंआत्मसुखाचानाहींसांठा ॥ व्यर्थकरंठाभुललोंमी ॥ १९ सांवळासकुमारराजीवनयन ॥ पीतांबरधारी ॥ ४ ॥
जगज्जीवन ॥ तोमजसाठींविप्रवेषधरून ॥ अश्वधरूनबैसला ॥ १२० ॥ जेणेंशीणआलापंढरीनाथा ॥ तेंकर्मआतां

१ गगन, आकाश. २ रात्र. ३ घोडा. ४ नजीक. ५ गुप्त. ६ मनामध्यें. ७ हात. ८ खाडा. ९ घोडा. १० चोर. ११ देव. १२ कृपण. १३ कमलनेत्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नकरावेंसर्वथा ॥ ऐसाअनुतापधरूनिचित्ता ॥ जाहलाबोलततयांसी ॥ २१ ॥ व्यवसायांसिह्मणेभानुदास ॥ आतां
स्वस्थकरावेंमानस ॥ तस्करींदंडिलेंतुह्मांस ॥ तरीखेदचित्तासनकरावा ॥ २२ ॥ गर्तेंतूनिदिंडकाढोनी ॥ वस्त्रेंदीधलीं
तयांसिवांटोनी ॥ अश्वद्रव्यत्यांसिअर्पूनी ॥ भानुदासतैथोनीनिघाले ॥ २३ ॥ निजमंदिरासिजाऊन ॥ करितबैसला
हरिभजन ॥ टाकोनियांमानाभिमान ॥ कीर्तनींगुणगातसे ॥ २४ ॥ नकरीकोणाचेंउपार्जन ॥ प्रपंचचिंतेंतनघाली
मन ॥ कुटुंबकलत्रअसोन ॥ उदासपणेंवर्ततसे ॥ २५ ॥ आषाढीकार्तिकीयेतांबरी ॥ चालवीपंढरीचीवारी ॥ टाळमृदं
गघोषगजरीं ॥ कीर्तनकरीवाळुवंटीं ॥ २६ ॥ नानापरीचीकवित्वकळा ॥ रचूनिआळवीघनसांवळा ॥ हृदयींप्रेमाचा
जिव्हाळा ॥ कीर्तनींगळासद्गदित ॥ २७ ॥ भानुदासकीर्तनींउभेराहती ॥ तेव्हांस्वानंदजळेंनेत्रभरती ॥ तेआवडीदे
खोनिरुक्मिणीपती ॥ नृत्यकरितीत्याठायीं ॥ २८ ॥ दुर्बुद्धिअथवाअज्ञानखळ ॥ तेहीऐकूनिहोतीप्रेमळ ॥ ह्मणतीत
यामुखीचेंकीर्तनप्रांजळ ॥ सार्वकाळऐकावें ॥ २९ ॥ केंचीलटकीप्रपंचमाया ॥ केंचीनाशवंतहेकाया ॥ ऐसेंज्ञानहोऊ
निश्रोतयां ॥ धरितीदयासर्वांभूतीं ॥ ३० ॥ अयाचितवृत्तीकरून ॥ कोणींदेईलवस्त्रअन्न ॥ परीस्वमुखेंकरूनिजाण ॥
नाहींमागणकोणासी ॥ ३१ ॥ आपुलेंआणिपराव ॥ हेकल्पनाचिनाहींस्वभाव ॥ सर्वांभूतींऐक्यभाव ॥ विकल्पवा
वटाकिला ॥ ३२ ॥ यापरीभानुदासाचेंचित्त ॥ सदासर्वकाळवैराग्यभरित ॥ प्रेमउल्हासेंदिवसरात ॥ भजनकरीत
श्रीहरीचें ॥ ३३ ॥ पुढिलेअध्यायींजगदुद्धारा ॥ राजानेईलविद्यानगरा ॥ तेंसुरसकथाऐकतांचतुरा ॥ उल्हासअंत
रावाटेल ॥ ३४ ॥ संतसज्जनदैवतमेळीं ॥ महाराष्ट्रओव्याफुलेंमोकळीं ॥ महीपतिघेऊनिपुष्पांजली ॥ उभाजवळीति
ष्ठत ॥ ३५ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ द्विचत्वारिंशाध्यायरसाळहा
॥ १३६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ४२ ॥ ॥ ओव्या ॥ १३६ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीवसुदेवनंदनायनमः ॥ ऐकाश्रोतेसज्जनहे ---

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीवसुदेवनंदनायनमः ॥ ऐकाश्रोतेसज्जनप्रेमळ ॥ आजिकल्पतरूसिपातलेंफळ ॥ जेभक्तक
थाअतिरसाळ ॥ प्रकटल्याप्रांजळनिरुपम ॥१॥ जोअनिर्वाच्यवैष्णवमहिमा ॥ विरिंचीसिनकळेज्याचीसीमा ॥ जया
चापारनेणवेनिगमा ॥ तोअनुपमप्रेमाजाणिजे ॥ २ ॥ जयांसिसत्कर्मचीप्रधान ॥ तेअंतींपावतीब्रह्मभुवन ॥ जेयज्ञया
गआचरतीजाण ॥ तेकरितीगमनस्वर्गलोकीं ॥ ३ ॥ जेपितरांचेठाईंभावधरिती ॥ तेअंतींपितृवासींचविचरती ॥ जेज्या
देवातेंभजती ॥ तेंपदपावतीअंतींते ॥ ४ ॥ पिशाचउपासितीतामसगुणी ॥ तेतैसेचहोतीदेहांतींमरणीं ॥ जेभक्तकथाऐ
कतीश्रवणीं ॥ तेवैकुंठभुवनींपावती ॥ ५ ॥ त्यांचेंसंकटदेखतांनयनीं ॥ तेंतत्काळनिवारीचक्रपाणी ॥ अंतींचतुर्भुजरू
पकरूनी ॥ सायुज्यसंदनींबैसवी ॥ ६ ॥ ऐसावरपंढरीनाथें ॥ दीधलाअसेयाग्रंथातें ॥ ह्मणोनिश्रोतेसादरचित्तें ॥ ऐ
काश्रवणार्थनिजप्रीतीं ॥७॥ मागीलअध्यायाचेअंतीं ॥ भानुदासासभेटलेरुक्मिणीपती ॥ मगत्याणेंधरूनविरक्ती ॥
प्रपंचवृत्तीसांडिली ॥ ८ ॥ आतांऐकायावरीनिरूपण ॥ पंढरीक्षेत्रींचाएकब्राह्मण ॥ द्रव्यइच्छामनींधरून ॥ देशावरा
सीचालिला ॥ ९ ॥ तोपुरेंपट्टणेंपाहतांसत्वरा ॥ अकस्मातआलाविद्यानगरा ॥ नगरींप्रवेशोनिसत्वरा ॥ ह्मणेनृपवरा
भेटावें ॥ १० ॥ स्नानसंध्याकरूनिद्विजवर ॥ मगप्रवेशलाराजमंदिर ॥ परीद्वारपाळजाऊंनदेतीसत्वर ॥ बैसाक्षणभ
रह्मणोनी ॥ ११ ॥ भूपतीचीआज्ञाआणितोंसत्वर ॥ मगप्रवेशाजीनृपमंदिर ॥ रायासिपुसोनिआलेकिंकर ॥ मगभी
तरींद्विजवरप्रवेशला ॥ १२ ॥ ब्राह्मणासदेखोनिरामराजा ॥ नमनकरूनिकेलीपूजा ॥ अतिउल्हासवाटलाद्विजा ॥
ह्मणेधन्यमहाराजाधर्ममूर्ती ॥ १३ ॥ राजापुसेत्याजकारण ॥ कोठोनिजाहलेंजीआगमन ॥ कायमनींइच्छाधरून ॥
कृपाकरूनआलेती ॥ १४ ॥ ऐसेंपुसतांनृपनाथ ॥ ब्राह्मणसांगेउल्हासयुक्त ॥ ह्मणेपंढरीक्षेत्रअतिअद्भुत ॥ वास्तव्य

१ वसुदेवाचा मुलगा, श्रीकृष्ण. २ ब्रह्मदेवास. ३ वेदांस. ४ सत्यलोक. ५ वैकुंठ. ६ राजानीं. ७ राजसेवक, द्वारपाळ. ८ संतोष. ९ येणें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेथें असे कीं ॥ १५ ॥ तुझें औदार्य ऐकोनि सत्वर ॥ पाहावयासि आलों देशावर ॥ वचन ऐकोनि नृपवर ॥ संतोष थोर वा
टला ॥ १६ ॥ राजा ह्मणे ब्राह्मणासी ॥ तुह्मीं असावें स्वस्थ मानसीं ॥ मी स्नान करूनि त्वरेंसी ॥ देवीपूजनासी जाईन
॥ १७ ॥ तुह्मी तेथें येऊनि पाहावें स्थळ ॥ सुवर्णकांति असे देऊळ ॥ मी अर्चन करूनि सकळ ॥ तुलसीदल अर्पीन ॥ १८ ॥
ऐसें बोलतां तयाप्रती ॥ द्विज संतोष पावला चित्तीं ॥ देवीदर्शना चालिला भूपती ॥ त्याचे संगतीं जातसे ॥ १९ ॥ देवालया
भोंवतीं अमोलिका ॥ रायें लाविली पुष्पवाटिका[1] ॥ अंतरगाभारीं स्थापूनि अंबिका ॥ समारंभ निकों[2] करीतसे ॥ २० ॥
नाना वाद्यांचे होती गजर ॥ पूजा करीत बैसला नृपवर ॥ द्विज बोलती मंत्रोच्चार ॥ आनंदें गजर होतसे ॥ २१ ॥ षोडशोप
चारें करूनि पूजन ॥ देवीस लेववी वस्त्रें भूषण ॥ नानापरींचीं दिव्य रत्न ॥ शोभायमान दिसती पैं ॥ २२ ॥ चंदनादिक उ
पचार ॥ कंठीं घातले सुमनहार[3] ॥ धूप दीप करूनि नृपवर ॥ नैवेद्य भावें अर्पितसे ॥ २३ ॥ मग पंचारती उजळोनियां ॥
वोंवाळिली महामाया ॥ साष्टांग नमस्कार घालोनियां ॥ लागला पायां नृपनाथ ॥ २४ ॥ प्रसाद वांटोनियां सकळांसी ॥
राजा बैसला स्वस्थ मानसीं ॥ [illegible] पंढरीच्या द्विजासीं ॥ बोलता झाला ते धवां ॥ २५ ॥ ह्मणे राजा ऐसें दैवत पाही ॥ धुंडि
तां त्रिभुवनीं न दिसे कांहीं ॥ आह्मीं देखिलें ऐकिलें नाहीं ॥ धन्य नवाई[4] अगाध ॥ २६ ॥ सुंदर देऊळ पाहावें नयनीं[5] ॥ यासि
रुप्याचें सारिलें पाणी ॥ भोंवती पुष्पवाटिका लाऊनी ॥ पूजितों सुमनीं[6] जगदंबा ॥ २७ ॥ विद्यानगरींचे सकळ जन ॥ येती घ्या
वया दर्शन ॥ सेवेसि लाविले प्रधान जन ॥ मी निजांगें[7] पूजन करीतसें ॥ २८ ॥ तुह्मीं राहतां पंढरीसी ॥ तेथें तों महिमा[8] नसेल ऐसी ॥
राजा ह्मणे ऐसे पांडुरंगासी ॥ उपचार तयासी नसतील ॥ २९ ॥ दुर्बळ ब्राह्मण करिती पूजन ॥ तेथें कैंचें वस्त्र भूषण ॥ ऐकोनि
रामरायाचें वचन ॥ विप्र निजमनीं क्रोधावला ॥ ३० ॥ मग ह्मणे गा नृपनाथा ॥ पंढरी दृष्टीस न देखतां ॥ आपुलीच थोर

१ फुलझाडांच्या कुंज्यांची बाग. २ चांगला, खरा. ३ फुलांचे हार. ४ कौतुक, गोडी. ५ डोळे. ६ फुलांनीं. ७ स्वतः, आपण. ८ माहात्म्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ह्मणसीदेवता ॥ अभिमानवृथाधरूनी ॥ ३१ ॥ देउळासिरुप्याचेंदीधलेंपाणी ॥ तेंचिभूषणसांगसीजनीं ॥ आमुचेंक्षे
त्रसुवर्णकोंदणीं ॥ गेलारचोनीविश्वकर्मा ॥३२ ॥ तेथेंकल्पतरूचींलागलींझाडें ॥ परिसचिंतामणीलोटतीखडे ॥ दिव्य
पताकाचहूंकडे ॥ चपंळेऐशाझळकती ॥ ३३ ॥ तेथेंकामधेनूचींगोधन ॥ रत्नजडितवृंदावन ॥ तेथेंप्रेमळवैष्णवजन ॥
करितीकीर्तनउल्हासें ॥ ३४ ॥ तेथेंचंद्रभागाअमृतवाहिनी ॥ जेसकळतीर्थांचीस्वामिनी ॥ दर्शनेंचिमुक्तहोतीप्राणी ॥
वैकुंठभुवनींपावती ॥ ३५ ॥ रंभातिलोत्तमायेऊनिसुंदरी ॥ नृत्यकरितीगरुडपारीं ॥ गंधर्वगायनहोतसेद्वारीं ॥ ना
दअंबरींकोंदाटे ॥ ३६ ॥ ऐसादेवाधिदेवरुक्मिणीकांत ॥ क्षीरसागरींहोतानांदत ॥ तोपुंडलीकदेखोनिनिजभक्त ॥
आलावरितत्याठायां ॥ ३७ ॥ दोनीकरठेऊनिजघनीं ॥ उभाराहिलाचक्रपाणी ॥ निजभक्तांचेंसंकटदेखोनी ॥ पा
वेतेक्षणींनिजांगें ॥ ३८ ॥ त्याचेंस्वरूपपाहतांनयनीं ॥ लक्ष्मीलज्जितजाहलीमनीं ॥ कोटिसूर्यजातीलपोनी ॥ मुकु
टावरूनीतयाच्या ॥ ३९ ॥ सांवळासकुमारशार्ङ्गधर ॥ कांसेकसिलापीतांबर ॥ दिव्यकुंडलेंमकरांकार ॥ श्रीमुख
मनोहरसाजिरें ॥ ४० ॥ हेंरूपदेखावयादृष्टीं ॥ इंद्रादिदेवतेतीसकोटी ॥ करजोडोनिसदातिष्ठती ॥ सद्भावेंस्तविती
निजप्रेमें ४१ ॥ ज्याचेंनामअहर्निशीं ॥ एकांतींजपेकैलासवासी ॥ श्रुतिशास्त्रेंवर्णितीजयासी ॥ पारविरिंचीसिनेणवे ॥
॥४२॥सहस्रमुखेंस्तवनप्रीतीं॥शेषकारिताजाहलानिगुंतीं॥जिव्हाचिरूनिदुखंडहोती॥मगनिवांतस्थितराहिला॥४३॥
पांडुरंगाऐसेंदैवत ॥ आणिपंढरीऐसेंपुण्यक्षेत्र ॥ चंद्रभागेऐसेंपावनतीर्थ ॥ नाहींदिसतत्रिभुवनीं ॥४४॥ हेंदृष्टीसआ
धीनपाहतां ॥ आपुलेंचभूषणेंसांगसीवृथा ॥ राजाईतुझीकुळदेवता ॥ हेंमाझियाचित्तानयेकीं ॥४५॥ हेनित्यपंढरीसये
ऊन ॥ करीतसेसडासंमार्जन ॥ ऐसेंबोलतांचिब्राह्मण ॥ क्रोधायमानन्रृपनाथ ॥ ४६ ॥ ह्मणेमाझीआराध्यदेवता ॥ याणें

१ विश्वकर्मा या नामे देवांचा सुतार. २ विजेसारिख्या. ३ आकाशांत. ४ कमरेवर. ५ मत्स्याकृति. ६ शोभायमान, सुंदर. ७ रात्रंदिवस. ८ शंकर. ९ वेद. १० निभ्रांत, यथार्थ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निंदिलीमजदेखतां ॥ आपुलीचसांगेप्रशंसावार्ता ॥ विचारचित्तानकरिता ॥ ४७॥ आतांजिवेंमारावेंयासी ॥ तरीअधि
कारीव्हावेंदोषासी ॥ शिक्षाकरूनिद्विजासी ॥ नगरप्रदेशींदवडावा ॥ ४८ ॥ मगब्राह्मणासिह्मणेनृपवर ॥ तूंअसत्यबो
लिलासिउत्तर ॥ सुवर्णमयपंढरपुर ॥ ऐकिलेंसाचारनाहींकीं ॥४९॥ आणिराजाईदैवतमूळपीठवासी ॥ इजलास्वमुखेंह्म
णतोसिदासी ॥ तरीशिक्षाकरूनितुजसी ॥ अरण्यासीदवडीन ॥ ५० ॥ मगब्राह्मणह्मणेएकभूपती ॥ म्यांयथार्थसांगीत
लेंतुजप्रती ॥ तुह्मींपंढरीसयेऊनसत्वरगतीं ॥ रुक्मिणीपतिपाहावा ॥ ५१ ॥ म्यांसांगितलेंत्याचेंमहिमान ॥ त्याहूनिवि
शेषकोटिगुण ॥ तुझेदृष्टीसनपडतांजाण ॥ मगमजदंडनकरावें ॥ ५२॥ तोंदेवाधिदेवदेखिलानाहीं ॥ तोंवरीचथोरहेरा
जाई ॥ जैसासूर्योदयनहोतांचिपाही ॥ दीपकसोज्वळदीसती ॥ ५३ ॥ जोंदेखिलानाहींऐरावती ॥ तोंइतरवारणथो
रभासती ॥ कींपौर्णिमेचानुगवतांनिशापती ॥ उडुगणवाटतीसतेज ॥ ५४॥ नातरीसुधारसनयेतांहाता ॥ इतररसांची
तंवचिवार्ता ॥ कींपयोब्धिदृष्टीसनदेखतां ॥ दिसतीसरितांअनुपम ॥ ५५ ॥ कल्पतरूचेंनदेखतांवन ॥ तोंवरीआव
डेआंवेवन ॥ ऐकिलेंनाहींवेदांतज्ञान ॥ तोंवरीपाखंडगायनआवडे ॥ ५६ ॥ देखिलानाहींसुवर्णपर्वत ॥ तोंवरीचपित
ळझगमगित ॥ तेवींजोंदेखिलानाहींपंढरीनाथ ॥ तोंइतरदैवतआवडती ॥५७॥ ऐकोनिह्मणेनृपवर ॥ आतांपंढरीसयेतों
सत्वर ॥ सांगीतल्याऐसेंदेखिलेंजर ॥ तरीचबरद्विजवरा ॥ ५८॥ आणिअसत्यवदलेंअसेलजरी ॥ तरीशिक्षाकरीनतु
जसत्वरीं ॥ मगप्रधानासिसांगेतेअवसरीं ॥ करावीस्वारीनिजांगें ॥५९॥ अश्वगजरथशिबिकाभरण ॥ सवेंघेऊनिकांहीं
सैन्य ॥ राजासत्वरचालिलाजाण ॥ पांडुरंगदर्शनध्यावया ॥ ६० ॥ नानावाद्यांचेहोतातीगजर ॥ तयांमागूनचालेद्वि
जवर ॥ ह्मणेलज्जारक्षीलरुक्मिणीवर ॥ कींकरीलअव्हेरदीनाचा ॥ ६१ ॥ म्यांसांगितलेंजैशारीतीं ॥ तैसेंनदेखेजरी

१ ब्राह्मण. २ खचित, खरें, सत्य. ३ राजा. ४ इंद्राचा हत्ती. ५ दुसरे हत्ती. ६ चंद्र. ७ नक्षत्रें. ८ अमृत. ९ दुसरे. १० समुद्र. ११ नद्या. १२ वृक्ष. १३ मेरु.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भूपती ॥ तरीशिक्षाकरीलमजप्रती ॥ संशयचित्तींनधरितां ॥ ६२ ॥ मगध्यानींआणोनिपांडुरंगमूर्ती ॥ स्तवनकरी आपुलेचित्तीं ॥ ह्मणेभक्तवत्सलारुक्मिणीपति ॥ मजयाआकांतींपावावें ॥ ६३ ॥ अनाथदीनमीतुझाब्राह्मण ॥ देशावरासिनिघालोंजाण ॥ तुझेंसांगूनिनामाभिधान ॥ कुटुंबरक्षणकरीतसें ॥ ६४ ॥ देवातुझीअद्भुतकीर्ती ॥ वर्णिलीआहेमागिल्यासंतीं ॥ तैसीचसांगीतलीरायाप्रती ॥ परीयथार्थचित्तींवाटेना ॥ ६५ ॥ त्याचीनिंदिलीकुळदेवता ॥ ह्मणोनिरागआलानृपनाथा ॥ साक्षपहावयासिआतां ॥ पंढरिनाथायेतसे ॥ ६६ ॥ पंढरीआहेजैशारीतीं ॥ तैसेंचकथिलेंरायाप्रती ॥ परिकलियुगींमृत्तिकेच्याभिंती ॥ लोकांसिभासतीअभिन्नलें ॥ ६७ ॥ जैसेंवडिलांचेंद्रव्यपुरलेंअसे ॥ तेंनिर्दैव्यासिपाहतांदिसतीकोळसे ॥ तैसीचपंढरिसुवर्णमयअसे ॥ परीविकल्पेंनदिसे ॥ ६८ ॥ संतींमागेंकेलीकथनी ॥ म्यांतैसेंचिसांगीतलेंत्यालागोनी ॥ आतांदृष्टीसनदेखतांचक्रपाणी ॥ तरीमजलागोनीदंडीलतो ॥ ६९ ॥ मगमीआपुलादेईनप्राण ॥ परीअसत्यहोईलसंतवचन ॥ पुढेंपंढरीमाहात्म्यऐकोनिसज्जन ॥ विश्वासमनींनधरिती ॥ ७० ॥ अनाथनाथारुक्मिणीवरा ॥ ऐशासंकटींपावसत्वरा ॥ करुणाभाकितांद्विजेंअंतरा ॥ जगदुद्धाराजाणिवलें ॥ ७१ ॥ ह्मणेमाझीकीर्तिवाखाणितांगहन ॥ ब्राह्मणाचाहोतोअपमान ॥ तरीजैसेंकथियेलेंआहेतयान ॥ तैसेंचदाखवणलागेल ॥ ७२ ॥ ऐसास्वमनींकरूनिविचार ॥ रुक्मिणीसिसांगेशार्ङ्गधर ॥ विद्यानगरींचानृपवरें ॥ येतोसत्वरदर्शना ॥ ७३ ॥ तरीजैसीहोतीद्वारकापुरी ॥ त्याहूनिविशेषआहेपंढरी ॥ नृपवरासिदाखवूंनिमिषभरी ॥ संशयनिवारींतयाचा ॥ ७४ ॥ नाहींतरीशिक्षापावेलब्राह्मण ॥ मगतोदेईलआपुलाप्राण ॥ आणिआपुलेबिरुदासियेईलउण ॥ संतसज्जनहांसतील ॥ ७५ ॥ वचनऐकोनिजगज्जननी ॥ चरणनमस्कारीतयेक्षणीं ॥ ह्मणेवैकुंठींचिरचनाआणोनी ॥ रायासियेक्षणींदाखवीन ॥ ७६ ॥

१ राजा. २ नाम. ३ आश्चर्यकारक. ४ ब्राह्मण. ५ राजा. ६ पनिशेस, मोठेपणास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ऐसीकल्पनाकरितांजाण ॥ तैसेंचिजाइलेंनलगतांक्षण ॥ तोमायालाघवीजगज्जीवन ॥ निजभक्तमहिमानवाढवी॥७७॥
तोंइकडेरामराजाचालतांसत्वर ॥ सन्निधउरलेंपंढरपुर ॥ भयभीतहोऊनिद्विजवर ॥ रुक्मिणीवरआळवीतसे ॥ ७८ ॥
मगसन्निधंपाचारूनद्विजा ॥ कायबोलतसेरामराजा ॥ आतांसंशयनफिटतांमाझा ॥ तरीअपमानतुझाकरीन ॥ ७९ ॥
मगसंन्निधवारणंआणवूनित्वरित ॥ अंबारींतबैसलानृपनाथ ॥ पंढरीविलोकितांचित्वरित ॥ तोंनवलअद्भुतदेखिलें
॥८०॥ जैसापौर्णिमेचानिशापति[3] ॥ त्याभोंवतींनक्षत्रेंदिसती ॥ तेवींदेवालयाच्याकळसाभोंवती ॥ मंदिरेंचमकतीलखलखित ॥ ८१ ॥ हेंकौतुकदेखतांदृष्टीसी ॥ राजाविस्मितजाहलामानसीं ॥ ह्मणेब्राह्मणेंकथिलीजैसी ॥ पंढरीतैसीदिसताहे ॥ ८२ ॥ मगअनुतापधरूनचित्तांत ॥ खालींउतरलानृपनाथ ॥ नमस्कारसाष्टांगघालूनित्वरित ॥ विप्रासिबोलततेधवां ॥ ८३ ॥ तुह्मींसांगितलेंजैशारीती ॥ तैसेंचदिसोनयेतसेपुढती ॥ मीनेणतांअभिमानधरूनिनिश्चितीं ॥
विकल्पंचित्तींधरियेला ॥ ८४ ॥ ऐसेंबोलोनिनृपवर ॥ द्विजासिकेलानमस्कार ॥ मगशुद्धकरूनिअभ्यंतर ॥ चरणीसत्वरलागला ॥ ८५ ॥ ब्राह्मणविस्मयपावलाचित्तीं ॥ ह्मणेमजपावलारुक्मिणीपति ॥ हर्षनमायेत्रिजगतीं ॥ गातसेकीर्तिसप्रेमें ॥ ८६ ॥ ह्मणेभक्तांमाजीअग्रगणी ॥ एकपुंडरीकशिरोमणी ॥ त्याचेभेटीसीद्वारकेहूनी ॥ चक्रपाणीपातले ॥८७॥
सकळतीर्थांतवरिष्ठगंगा ॥ तीहूनिविशेषचंद्रभागा ॥ दर्शनेंचपावनकरीजगा ॥ अभिमानअंगाजडोंनेदी ॥ ८८ ॥ मथुरागोकुळवृंदावन ॥ येस्थळींनांदजगज्जीवन ॥ द्वारकेंतहीश्रीकृष्ण ॥ भक्तांकारणतिष्ठत ॥ ८९ ॥ परीयाक्षेत्रींचेंमहिमान ॥ अनुपमदिसतसेमजलागून ॥ ऐसाब्राह्मणनिर्लज्जहोऊन ॥ गातसेगुणनिजप्रीतीं ॥ ९० ॥ टाळमृदंगआणोनित्वरित ॥ समारंभकरीनृपनाथ ॥ मिळवूनियांवैष्णवभक्त ॥ गजरकरितस्वानंदें ॥ ९१ ॥ पुढेंविलोकितांचिजाण ॥ तोंक

१ जवळ. २ हत्ती, ३-निशा ह्मणजे रात्रि तिचा पति. चंद्र. ४ गर्व. ५ संशय' ६ मन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ल्पतरूचेंलागलेंवन ॥ खडेपरिसचिंतामणीसमान ॥ लागतांरानंपंढरीचें ॥ ९२ ॥ कामधेनुऐशाउदंडगायी ॥ भोंवत्या
असतीतयेठायीं ॥ राजाविस्मितहोऊनिपाही ॥ ह्मणेधन्यनवायीअगाध ॥ ९३ ॥ ब्राह्मणाचाधरूनिहात ॥ भूपतिपु
ढेंविलोकित ॥ तोंपंढरीक्षेत्रलखलखित ॥ पाहातांदिपतनेत्रपातीं ॥ ९४ ॥ तरुवरींबैसोनिपक्षियाती ॥ निजच्छंदेंगा
यनकरिती ॥ हंसमयूरनृत्यकरिती ॥ सप्रेमगतीउल्हासें ॥ ९५ ॥ तपस्वीकरितीअनुष्ठान ॥ ब्राह्मणकरितीवेदाध्य
यन ॥ विष्णुभक्तकरितीकीर्तन ॥ मदंगविणेघेऊनी ॥ ९६ ॥ ठायींठायींसभाकरूनिजाणा ॥ नृत्यकरितीदेवांगना ॥
तेणेंतटस्थतायेऊजिनयनां ॥ विषयिकजनाभुलविलें ॥ ९७ ॥ संतबैसोनिठायींठायीं ॥ आत्मचर्चाबोलतीपाही ॥ अनु
भवेंतल्लीनहोऊनितेही ॥ आलिंगनदेतीयेरयेरां ॥ ९८ ॥ चंद्रभागेसिअष्टोत्तरशत ॥ तीर्थेंयेऊनिमूर्तिमंत ॥ स्नानकरू
निपावनहोत ॥ दृष्टीसपाहातनृपनाथ ॥ ९९ ॥ एककनकाचेंरचूनवृंदावन ॥ त्यावरीबैसविलेंरत्नकोंदण ॥ दिव्यलेवूनिव
स्त्राभरण ॥ करितीपूजननरनारी ॥ १०० ॥ मगभीमेंरथींतकरूनिस्नाना ॥ राजाचालिलादेवदर्शना ॥ तोंइंद्रादिदेवस
कळजाणा ॥ पंढरीराणालक्षिती ॥ १ ॥ अष्टसिद्धिसकळदासी ॥ निजांगेंराबतीदेवापासीं ॥ तयांमाजीअकस्मातराजा
ईसी ॥ रायेंदृष्टीसीवोळखिलें ॥ २ ॥ ह्मणेविद्यानगरींअर्चितोंपूजनी ॥ तेचिहेआमुचीकुळस्वामिनी ॥ तीपंढरीसझाडि
तसेआंगणीं ॥ विस्मितमनींनृपनाथ ॥ ३ ॥ उदोशब्दह्मणोनितेसमयीं ॥ राजातीसपुसेलवलाहीं ॥ ह्मणेमातेतूंकिमर्थये
ठायीं ॥ निजांगेंपाहीझाडितेसी ॥ ४ ॥ मगभवानींउत्तरदेततयासी ॥ तुवांव्यर्थचिअहंताधरिलीमानसीं ॥ मजऐशाअनंत
दासी ॥ येतीपंढरीसीराबावया ॥ ५ ॥ यापुंडरीकाचेअंगणीं ॥ सकळतीर्थेंघालितीलोळणी ॥ मगपवित्रहोऊनितत्क्षणीं
वाहतीपाणीनिजांगें ॥ ६ ॥ विस्मितहोऊनिनृपनाथ ॥ पुढेंविलोकूनिजोंपाहत ॥ तोंनारदतुंबरयेऊनितेथ ॥ कीर्तनकरि

१ कल्पवृक्ष. २ दिंडिरवन. ३ बहुत. ४ कौतुक. ५ आपले इच्छेनें. ६ मोर. ७ स्त्रिया. ८ नेत्र. ९ परस्पर. १० पवित्र. ११ सोनें. १२ चंद्रभागा. १३ दिंडीरवन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तदेखिले ॥ ७॥ चतुर्भुजरूपेंनारीनर ॥ अवघेदिसतीसाचार ॥ लोटांगणघालीनृपवर ॥ स्वानंदेंनिर्भरमानसीं ॥ ८ ॥
शंखचक्रादिआयुधेंघेऊनी ॥ द्वारींजयविजयतिष्ठतीदोनी ॥ दिव्यपताकागगनीं ॥ चपळेऐशाझळकती ॥९॥ मागुतीघा
लोनिदंडवत ॥ राजाप्रवेशलाराउळांत ॥ तेंतेजपाहतांनेत्रझांकत ॥ मगधरिलाहस्तब्राह्मणाचा ॥ ११० ॥ तोंसांवळास
कुमारराजीवनयन ॥ पीतांबरधारीजगज्जीवन ॥ कमललोचनसुहास्यवदन ॥ स्वरूपसगुणदेखिलें ॥ ११ ॥ जेंयोगियां
चेंनिजध्यान ॥ हृदयींध्यातोपंचवदन ॥ तेंस्वरूपवर्णितांचिजाण ॥ उपमागौणदिसताहे ॥१२॥ अमृताचीचवीसांगतां ॥
उपमाद्यावयारसकोणता ॥ तेवींदेवाधिदेवरुक्मिणीकांता ॥ दृष्टांतींवर्णितांनयेकीं ॥ १३ ॥ तरीदृष्टीसदेखतीनिजभ
क्तजन ॥ तेचिअनुभवेंजाणतीखूण ॥ येरवींबुद्धिमतेंकरितांस्तवन ॥ पडलेंमौनश्रुतीसी ॥ १४ ॥ ऐसीनिरुपमपरब्रह्म
मूर्ती ॥ प्रीतीनेंआलिंगीभूपती ॥ स्वरूपन्याहाळूनियांदिठीं ॥ मगचरणींमिठीघातली ॥ १५ ॥ ब्राह्मणासिह्मणे
रामराजा ॥ तूंसखासद्गुरुजिवलगमाझा ॥ कायउपकारआठवूंतुझा ॥ गरुडध्वजाभेटविलें ॥ १६ ॥ तुवांजेंकांकथि
लेंदेख ॥ त्याहूनिकोटिगुणेंअधिक ॥ दृष्टींदेखिलावैकुंठनायक ॥ सौख्यअनेकपावलों ॥ १७॥ राजाईमाझीकुलस्वा
मिनी ॥ तेहीझाडितांदेखिलीअंगणीं ॥ इंद्रासमवेतसुरयेऊनी ॥ करजोडोनितिष्ठती ॥ १८॥ पंढरीऐसेंक्षेत्रअद्भुत ॥आ
णिपांडुरंगाऐसेंवरिष्ठदैवत ॥ चंद्रभागेऐसेंपावनतीर्थ ॥ नाहींदिसतत्रिभुवनीं ॥ १९॥ घुंगरडेंहोतांउंबराआड ॥ तेंह्म
णेहेंमाझेंब्रह्मांडगाढें ॥ फोडोनिदाखवितांचहूंकड ॥ होतसेवेडनिजमनीं ॥ १२० ॥ तैसेंचिजाहलेंरायाकारण ॥ मग
ब्राह्मणाचेधरिलेचरण ॥ ह्मणेमीवेष्टिलोंहोतोंअविद्येकरून ॥ परीजाहलोंपावनतुझेनी ॥२१॥ यापरीकौतुकदाखवूनि ॥ ४ ॥
जाणा ॥ मगअदृश्यजाहलीतितुकीहीरचना ॥ तोंमूर्तिकेच्याभिंतीदिसतीनयना ॥ आश्चर्यमनांतवाटत॥२२॥ जैसें

१ देव. २ दृढ. ३ मुक. ४ मातीच्या.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दाखविलें रायाप्रती ॥ तैसेंच पंढरीक्षेत्र आहे निश्चितीं ॥ परी मनुष्यासि मृत्तिका ऐसी भासती ॥ निजकर्मगतीकरूनी ॥ २३ ॥
सांप्रत आपणा जैसें दीसत ॥ तैसेंच देखे नृपनाथ ॥ विस्मित होऊनि मनांत ॥ ह्मणे चमत्कार बहुत देखिला ॥ २४ ॥ राजा
विचारी आपुले मनीं ॥ आतां व्यर्थ कासया पुजावी भवानी ॥ सन्निध क्षीरसागर टाकूनी ॥ सरिता जीवनीं कां न्हावें ॥ २५ ॥
अमृतसरोवर देखिल्या पाहीं ॥ दिव्य औषधी कासया घ्यावी ॥ कल्पतरु सन्निध असोनि पाहीं ॥ बाभूळछायीं न बैसावें
॥ २६ ॥ हातींचा परिस टाकोनियां ॥ धातुवादी व्हावें कासया ॥ कामधेनु गृहासि आलिया ॥ अजा कासया पुजावी ॥ २७ ॥
गृहीं प्रकटतां सूर्यनारायण ॥ मग दीपक कासया सरसावण ॥ तेवीं जाहलिया पांडुरंगदर्शन ॥ देवीउपासन कासया ॥ २८ ॥
ऐसें ह्मणोनि रामराजा ॥ प्रार्थितसे गरुडध्वजा ॥ ह्मणे देवाधिदेवा वैकुंठराजा ॥ मनोरथ माझा पुरवी कां ॥ २९ ॥ चित्तीं
हेत आहे ऐसा मज ला ॥ कीं विद्यानगरासि न्यावें तुज ला ॥ आतां अभय देऊनि शरणागताला ॥ सत्वर चला देवराया ॥
॥ १३० ॥ देव ह्मणे भूमीवरी ठेवितां मज सी ॥ तरी तेथेंच राहीन निश्चयें सी ॥ कांहीं अन्याय घडतां तुज सी ॥ मागुती पंढ
रीसी येईन ॥ ३१ ॥ ऐसें सांगतां चक्रपाणी ॥ राजा हर्षला आपुले मनीं ॥ ह्मणे स्थळोस्थळीं डाक ठेवूनी ॥ जाईन घेऊनी
देवासी ॥ ३२ ॥ पंढरीक्षेत्रापासूनि जाण ॥ विद्यानगरपर्यंत तेण ॥ दोंभागीं मनुष्यें उभीं करून ॥ मूर्ति काढून नेतसे
॥ ३३ ॥ पुजारी ब्राह्मण निवांत ठायीं ॥ भूपतीसी बळ न चले कांहीं ॥ मूर्ति उचलोनि लवलाहीं ॥ हातोहातीं चालिले ॥ ३४ ॥
विद्यानगरासि नेऊनि सवेग ॥ तेथें स्थापिला पांडुरंग ॥ नानापरीचे उपचार भोग ॥ राजा निजांगें करीतसे ॥ ३५ ॥
इकडे यात्रेसि आषाढमासीं ॥ वैष्णव आले पंढरीसी ॥ तेथें मात ऐकोनि ऐसी ॥ कीं विद्यानगरासि देव गेले ॥ ३६ ॥ उ
दास दिसे पंढरपुर ॥ जैसें प्राणावांचोनि शरीर ॥ कीं सरिते माजी नसतां नीर ॥ जेवीं भयासुर वाटे ते ॥ ३७ ॥ कीं नृपनाथा

१ रामराजा, २ नद्यांच्या उदकानें, ३ शेळी ४ राजापुढें. ५ झडकर, ६ वर्तमान, गोष्ट. ७ नदींत, ८ उदक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भ. वि. वांचोनिसैन्यसंपत्ती ॥ कींचंद्रावांचोनिनक्षत्रजाती ॥ नातरीध्रुवताराविणपतिव्रतासती ॥ निढळदिसतीजनांत ॥ ३८ ॥ अ०
॥ ९ ॥ तेवींविद्यानगरासिगेलियाहरी ॥ अवघीउदासदिसेपंढरी ॥ संतमहंतगरुडपारीं ॥ येऊनिसत्वरींबैसले ॥ ३९ ॥
ह्मणतीकोणाचेंकरावेंकीर्तन ॥ आह्मांसिटाकिलेंजगज्जीवन ॥ पुंडरिकासिदीधलेंवरदान ॥ तेंअसत्यवचनजाहलेंकीं ॥४३॥
॥ १४० ॥ भाविकभक्तआलेसर्व ॥ ह्मणतीकायजाहलापंढरीराव ॥ विद्यागनरासिगेलेदेव ॥ कळलाअभिप्रायसकळां
सी ॥ ४१ ॥ संतसाधुवैष्णवजन ॥ एकमेकांसिबोलतीवचन ॥ विद्यानगरासिकोणिजाऊन ॥ रुक्मिणीरमणआणा
वा ॥ ४२ ॥ ऐसेंएकमेकासिबोलतीवचन ॥ परीकोणीचनदेतीआश्वासन ॥ ह्मणतीपुंडरिकासिगेलाउपेक्षून ॥ तोआ
मुचेननयेसर्वथा ॥ ४३ ॥ एकबोलतीप्रत्युत्तरीं ॥ आमुचाप्रवेशनोव्हेराजमंदिरीं ॥ नृपासवृत्तांतकळेलजरी ॥ तरी
शिक्षाबरीकरीलकीं ॥ ४४ ॥ एकदावितीनिर्गुणभाव ॥ आपुलेदेहींचआहेदेव ॥ चित्तींनसतांचिअनुभव ॥ बोलती
वांवआत्मज्ञानी ॥ ४५ ॥ एकह्मणतीईश्वरइच्छेन ॥ जेंजेंजैसेंयेईलघडोन ॥ तेंतेंदृष्टींपाहावेंआपण ॥ तळमळकोणीन
करावी ॥ ४६ ॥ त्यांतभानुदासवैष्णवभक्त ॥ प्रतिज्ञाकरूनीकायबोलत ॥ मीघेऊनियेतोंरुक्मिणीकांत ॥ नाहींतरी
जीवितनठेवीं ॥ ४७ ॥ ऐसेंबोलोनितयांप्रती ॥ तेथोनिनिघालासत्वरगती ॥ विद्यानगरासिजाऊनराती ॥ लोकांप्रती
पुसतसे ॥ ४८ ॥ पंढरीहूनिपांडुरंगमूर्ती ॥ येथेंघेऊनिआलानृपती ॥ तेकोठेंस्थापिलीनिश्चितीं ॥ सांगामजप्रतील
वलाहें ॥ ४९ ॥ राजयाच्याभयेंकरून ॥ कोणीयथार्थनसांगतीवचन ॥ आह्मांसिविदितनाहींह्मणोन ॥ प्रतिवचन
बोलती ॥ १५० ॥ मगभानुदासपुसतीएकांती ॥ त्याससांगितलेंवैष्णवभक्तीं ॥ मंदिरींठेऊनिरुक्मिणीपती ॥ पूजीए ॥ ५ ॥
कांतींनृपनाथ ॥५१॥ राजाकरूनिगेलियापूजन ॥ मगआंणिकासिनव्हेदर्शन ॥ कपाटकुलुपेंघालून ॥ द्वारपाळरक्ष

१ स्त्री. २ साक्षात्कार. ३ पोकळ, व्यर्थ. ४ रायराजा. ५ लवकर. ६ दुसरे लोकांस. ७ दरवाजे. ८ दूत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दासासिनिंदितीदेखोन ॥ परीतोखेदनकरीजाण ॥ नामस्मरणकरीतसे ॥ ८३ ॥ एकह्मणतीमैंदाचियागळां ॥ अहो भाणा
बोलतीतुळसीमाळा ॥ तोआजिप्रत्यक्षदेखिलाडोळां ॥ हारचोरिलायेणेची ॥८४॥ नवरत्नाचाहारघेऊन ॥ दूतानींराया
सिदीधलानेऊन ॥ ह्मणतीतस्करआणिलाबांधोन ॥ तयासिदंडकोणकरावा ॥ ८५॥ सक्रोधबोलेनृपवर ॥ त्यासिशूला
वरीघालासत्वर ॥ कोणकैसापाहावातस्कर ॥ ऐसाविचारनकेला ॥ ८६॥ भानुदासदूतांसिबोलेवचन ॥ माझेंतंवसन्निध
आलेंमरण ॥ परीशेवटींपांडुरंगाचेंदर्शन ॥ मजकारणकरवावें ॥८७॥ त्यांतकोणीहोतेसज्जन ॥ त्यांसमानलेंत्याचेंवच
न ॥ मगरायासिआज्ञामागून ॥ गेलेघेऊनदेउळासी ॥ ८८॥ भानुदासह्मणेदेवाप्रती ॥ मीन्यावयासिआलोंएकांतीं ॥
ह्मणोनियोजिलीऐसीयुक्ती ॥ आणिंनृपाहातींदंडविलें ॥ ८९ ॥ जोन्यावयायेईलतुजकारण ॥ त्याचाऐसाचघ्यावाप्रा
ण ॥ मगराजमंदिरींविलासभोगून ॥ सुखेंराहावेंयाठायीं ॥ १९० ॥ ऐसाविचारकरूनिघननीळा ॥ मगहारघातला
माझियागळां ॥ ऐसेंबोलतांतयेवेळां ॥ अश्रुडोळांलोटले ॥ ९१ ॥ परीशतसहस्त्रजन्माअंतीं ॥ तुजमीनसोडींरुक्मि
णींपती ॥ ऐसेंबोलेनिश्चगुतीं ॥ नमनप्रीतींघातलें ॥ ९२ ॥ दूतह्मणतीतेअवसरीं ॥ आतांउठगाचालझडकरी ॥ आ
धींचकेलीनसतीचोरी ॥ तरीऐसीपरीकांहोती ॥ ९३ ॥ ऐसेंह्मणोनिसत्वर ॥ भानुदासासिकाढिलेंबाहेर ॥ शूळदेऊनि
खांद्यावर ॥ माथांसेंदुरघातला ॥ ९४ कौतुकपाहावयासत्वरीं ॥ अमितमिळाल्यानरनारी ॥ मगनेऊनिनगराबाहे
री ॥ शूळझडकरीरोविला ॥ ९५ ॥ उचलूनिजेंघालावेंवरी ॥ तोंभानुदासदेवातेंविनंतीकरी ॥ ह्मणेआकाशकडकडो
निपडोमजवरी ॥ तरीतुजअंतरींआठवीन ॥ ९६ ॥ सप्तसमुद्रसमरसजाहलिया ॥ तरीतुजनसोडींदेवराया ॥ तुजवरू
निनाशवंतकाया ॥ वोंवाळूनियांसांडिली ॥ ९७ ॥ लयाजाईलसकळक्षितीं ॥ आणिपंचभूतेंहीप्रळयापावती ॥ तैंतुजवां

१ लुटारू. २ ह्मण. ३ क्रोधयुक्त होऊन. ४ न ह्मणजे मनुष्य त्यास रक्षण करितो ह्मणून नृप हें नांव (राजा.) ५ प्रकार. ६ चमत्कार. ७ एकत्र. ८ पृथ्वी. ९ नाश.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चूनिरुक्मिणीपति ॥ आणिकसांगातीअसेना ॥ ९८ ॥ वडवानलखाईलत्रिभुवन ॥ तैंतूंमाझाजिवलगप्राण ॥ भानु
दासाचानिश्चयदेखोन ॥ जगज्जीवनपावले ॥ ९९ ॥ तंवनवलवर्तलेंअतिअद्भुत ॥ तेंसादरपरिसाभाविकभक्त ॥ शूळ
रोंविलाहोतातेथ ॥ त्यासिपल्लवअकस्मातफुटले ॥ २०० ॥ फुलेंफळेंआलींबहुत ॥ राजासिजाऊनिसांगतीमात ॥ ह्मणे
तोआहेवैष्णवभक्त ॥ पंढरीनाथपावलात्या ॥ १ ॥ शूळाचावृक्षजाहलासत्वर ॥ राजासिसांगतेजाहलेकिंकर[२] ॥ वचन
ऐकूनियांनृपवर[३] ॥ आश्चर्यथोरकरितसे ॥ २ ॥ पाहावयासियेतांत्वरित ॥ तंवदृष्टीसदेखिलेंसाक्षात ॥ मगअनुताप[४]
पावलाचित्तांत ॥ ह्मणेअन्यायबहुतमजघडला ॥ ३ ॥ भानुदासासिनमस्कारप्रीतीं ॥ सद्भावेंघालीतसेनृपती ॥ ह्मणेअ
पराधघडलामजप्रती ॥ विवेकचित्तींनकरितां ॥ ४ ॥ मगरामरायेंभानुदासाप्रती ॥ देउळींनेलासत्वरगती ॥ दृष्टीसदेख
तांपांडुरंगमूर्ती ॥ सद्गदितकंठींजाहला ॥ ५ ॥ चरणींमिठीघालितांचिजाण ॥ उचलोनिधरीजगज्जीवन ॥ भानुदासा
सिह्मणेरुक्मिणीरमण ॥ मजकारणशिणलासी ॥ ६ ॥ आतांमजघेऊनिखांद्यावरी ॥ पंढरपुरासिचालसत्वरीं ॥ तेथेंपुं
डरिकाचेद्वारीं ॥ निरंतरींवसेन ॥ ७ ॥ रामराजाधरितसेपाय ॥ मजउपेक्षूनिजातांकाय ॥ देवह्मणतीतुझाअन्याय ॥
घडोनिआलाअनायासें ॥ ८ ॥ कांहींतुझेंहोतेंसुकृत[५] ॥ ह्मणोनिहोतोंदिवसबहुत ॥ आतांमाझेंरूपहृदयांत ॥ आठवी
नित्यसप्रेमें ॥ ९ ॥ भानुदासह्मणेरुक्मिणीकांता ॥ कैसाउचलसीलमजआतां ॥ माझीतोंनाहींराजसत्ता ॥ त्यांमेळवू
निबहुतांतुजन्यावें ॥ २१० ॥ ऐकोनिह्मणेदीनदयाळ ॥ मीतुझेस्वाधीनजाहलोंकेवळ ॥ आतांमाझीसत्ताआहेसकळ ॥
तेतुझीचअसेनिजभक्ता ॥ ११ ॥ ऐसेंह्मणोनिजगज्जीवन ॥ तत्काळरूपधरिलेंसान[६] ॥ भानुदासासिबोलेवचन ॥ सांब
ळींतघालोनमजनेयी ॥ १२ ॥ मगगवाळेंआणोनितयेक्षणीं ॥ त्यांतबांधिलेचक्रपाणी[७] ॥ ऐसींऐकोनियांवाणी ॥ आशं

१ वर्तमान. २ सेवक. ३ राजा. ४ पश्चात्ताप. ५ पुंण्य. ६ लहान, ७ चक्र हस्तामध्यें धारणकरणारा ह्मणून चक्रपाणि हेंनाव.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णठेविलें ॥ ५२ ॥ ऐसीऐकोनियांमात ॥ भानुदासझालाहर्षयुक्त ॥ मगअर्धरात्रलोटतांचिवरित ॥ झालेनिद्रितसकळिक ॥ ५३ ॥ द्वारापासीयेतांचिजाण ॥ कुलुपेंगळालींनलागतांक्षण ॥ भानुदासआंतप्रवेशोन ॥ घातलेंनमनसाष्टांग ॥५४॥ स्वरूपदृष्टीसीन्याहाळून ॥ आलिंगनदीधलेंप्रीतींकरून ॥ कंठसद्गदितहोऊन ॥ देवासिविनवणकरीतसे ॥५५॥ ह्मणेलक्ष्मीकांतावैकुंठवासिया ॥ पुंडरीकवरदायादवराया ॥ आह्मांवरीललोभसांडोनियां ॥ जाहलासिरायास्वाधीन ॥५६॥पुंडरीकासिदीधलेंवरदान ॥ कींकदापिनजायेयेथून ॥ तेंतुझेंआतांअभयवचन ॥ असत्यदिसोनआलेंकीं ॥५७॥ आह्मांदुर्बळांचीनावडेपूजा ॥ येथेंउपचारकरितोराजा ॥ तेंसुखमानोनिअधोक्षजा ॥ गरुडध्वजाराहिलासी॥ ५८ ॥ दिव्यवस्त्रेंआणिआभरणं ॥ नैवेद्यासिअनेकपक्कान्न ॥ यालागींदुर्बळाचेंस्मरण ॥ तुजकारणनव्हेकीं ॥ ५९ ॥ रुक्मिणीराधासत्यभामा ॥ इतुक्यांसिसांडोनिपुरुषोतमा ॥ रामरायेंतुजलावूनिप्रेमा ॥ मेघश्यामाचालविलें ॥ १६० ॥ सांडोनियांपंढरपुर ॥ वसतेंकेलेंविद्यानगर ॥ तेथेंवाटपाहातीऋषीश्वर ॥ भक्तथोरतिष्ठती ॥ ६१ ॥ रंभातिलोत्तमाउर्वशीमेनका ॥ सेवेसियेतीअष्टनायिका ॥ सांडोनियांविधिजनका ॥ बैसलासिनिकायेठायीं ॥ ६२ ॥ कींआमुचेपदरींदोषदारुण ॥ पळोनिआलासितयाभेणें ॥ कींतुजमागतसोंप्रेमदान ॥ ह्मणोनिपळूनआलासी ॥ ६३ ॥ कींकीर्तनाचाहोतोगलबला ॥ तेणेंनिद्रानलागेचितुजला ॥ ह्मणोनिएकांतींठावपाहिला ॥ कळलेंमजलायथार्थ ॥ ६४ ॥ कींयात्रामिळतेअसंख्यात ॥ तयांसिभेटतांशिणसीबहुत ॥ मगयेऊनिविद्यानगरांत ॥ घेतोसिविश्रांतयाठायीं ॥ ६५ ॥ ऐकोनिभानुदासाचेंवचन ॥ कायबोलतसेजगज्जीवन ॥ तूंबोलतोसिउदासवचन ॥ विचारमनींनकरितां ॥ ६६ ॥ मजनरुचतीनानाउपचार ॥ वस्त्रेंभूषणेंअलंकार ॥ कधींदेखेनभिमातीर ॥ ह्मणोनिअंतरझुरतसें ॥ ६७ ॥ रायेंआणोनिमजलागूनी ॥

१ अलंकार. २ चांगला. ३ भयानें. ४ मनांत.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

येथेंघातलेंबंदिखानीं ॥ तुह्मीहीनिष्ठुरहोऊनिमनीं ॥ परतकोणीनकेली ॥ ६८ ॥ ऋद्धिसिद्धीचारीमुक्ती ॥ मीदेतहो
तोंतुह्मांप्रती ॥ परीत्यांसिअव्हेरूनिनिश्चितीं ॥ भजनप्रीतींकरीतसा ॥ ६९ ॥ याविरहिततोंमजपासीं ॥ कांहींचन
दिसेद्यावयासी ॥ सेवाऋणनफिटेमजसी ॥ ह्मणोनितुह्मांसीटाकिलें ॥ १७० ॥ ऐसेंबोलोनिरुक्मिणीकांत ॥ कंठजा ॥४३॥
हलासद्गदित ॥ आनंदाश्रुनेत्रींवाहात ॥ दोघेहीस्फुंदतनिजप्रेमें ॥ ७१ ॥ भानुदासासिजगज्जीवन ॥ मागुतीदीधलें
आलिंगन ॥ ह्मणेप्रातःकाळींकरितांपूजन ॥ देईनदर्शनतुजलागीं ॥७२ ॥ मगनवरत्नाचाकाढोनिहार ॥ भानुदासासि
देतशार्ङ्गधर ॥ ह्मणेआतांबिऱ्हाडासिजाईसत्वर ॥ येईलनृपवरदर्शना ॥ ७३ ॥ बाहेरयतांचिभानुदास ॥ कुलुपेंबैस
लींकवाडास ॥ अणुमात्रनकळतांकोणास ॥ निजभक्तासभेटला ॥७४॥ प्रातःकाळींउठोनिनृपती ॥ स्नानकेलेंसत्वरग
तीं ॥ देवासिनमनकरूनिप्रीतीं ॥ कांकडआरतीकरितसे ॥ ७५ ॥ तोंकंठींनदिसेरत्नहार ॥ पुजाऱ्यासिपुसिलेंसत्व
र ॥ ह्मणेयेथेंकोणआलातस्कर ॥ ह्मणोनिनृपवरक्रोधावला ॥ ७६ ॥ तयासिताडनकरूनिबहुत ॥ ह्मणेहारत्वरितआ
णिजेयेथ ॥ अमूल्यरत्नेंनमिळतीनिश्चित ॥ पृथ्वीसमस्तधुंडितां ॥ ७७ ॥ ऐसीआज्ञाहोतांचिसत्वर ॥ झाडाघेतीघ
रोघर ॥ परीकोठेंचिनदिसेहार ॥ मगपाहातीबाहेरतस्करासी ॥ ७८ ॥ तोंगंगातीरींस्नानकरूनी ॥ भानुदासबैसलेना
मस्मरणीं ॥ राजदूतपाहतीविलोकूनी ॥ तोंहारदुरूनीदेखिला ॥ ७९ ॥ ह्मणतीसांपडलारेतस्कर ॥ आतांयासधरावा
सत्वर ॥ अकस्मातबांधोनिवैष्णववीर ॥ चालिलेकिंकररायाचे ॥ १८० ॥ नगरांतआणितांत्याकारण ॥ देखोनिहांस ॥ ६ ॥
तीसकळजन ॥ ह्मणतीहाभोंदावयाजनाकारण ॥ संतहोऊनहिंडतो ॥८१॥ देवावरीहातघातलापाहे ॥ तोमनुष्यासि
भियेलकाये ॥ कसाबासिभेटतांकपिलागाये ॥ तोपूजीलकायेतिजलागीं ॥ ८२ ॥ ऐसेंनानापरीचेत्रिविधजन ॥ भानु

१ सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. २ टाकून. ३ नृ ह्मणजे मनुष्य यांचा पति, स्वामी, राजा. ४ चोर. ५ सेवक. ६ खाटक्यास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कितमनींनव्हावें ॥ १३ ॥ जैसेंआकाशविस्तीर्णआहेबहुत ॥ परीघटींपाहतांतेवढेंचहोत ॥ तेवींभक्तलीलेसिवैकुंठना
थ ॥ सूक्ष्महोतनिजप्रीतीं ॥ १४ ॥ कींअफाटसमीरआहेबहुत ॥ परीविंजणाहालवितांतैसाचिहोत ॥ तेवींभक्तास्वाधी
नरुक्मिणीकांत ॥ तैसाचिहोतनिजच्छंदें ॥ १५ ॥ मागेंकृष्णावतारींयशोदाघुसळितां ॥ जोंडेरियामाजीलागलातिच्या
हाता ॥ तोभानुदासाच्यागवाळयांतजातां ॥ संशयकोणताआणावा ॥ १६ ॥ जोअनंतघटींव्यापूनजाण ॥ तैसाचिदि
सेथोरसान ॥ अणुरेणूपरीसलहान ॥ ज्ञानदृष्टीनेंदिसताहे ॥ १७ ॥ तोभानुदासाचेआवडीसाठीं ॥ सांबळींतमावलाज
गजेठी ॥ खांद्यावरीघेऊनिउठाउठी ॥ सत्वरगतीजातसे ॥ १८ ॥ मंजुळशब्दगवाळयांतून ॥ भक्तासिबोलेजगज्जीवन ॥
धन्यआजिचाउगवलासुदिन ॥ संतसज्जनभेटतील ॥ १९ ॥ पद्मालयासिआलेभानुदास ॥ तेथेंखालींठेविलाजगन्निवा
स ॥ आपणलागलेस्नानास ॥ हर्षचित्तासवाटला ॥ २२० ॥ इकडेसांबळींतहोतेरुक्मिणीवर ॥ तेएकाएकींझालेथोर ॥
वरीलपूडमस्तकावर ॥ तळींचाचूरझालाकीं ॥ २१ ॥ भानुदासयेऊनिजंवपाहे ॥ ह्मणेदेवाधिदेवाकेलेंकाये ॥ थोरझाला
सिलवलाहें ॥ आतांउचलसीलकायेमजलागीं ॥ २२ ॥ मगह्मणेरुक्मिणीवर ॥ तूंपुढेंजाऊनसांगसत्वर ॥ नानावा
द्यांचाकरूनिगजर ॥ येतीलसामोरसंतसाधू ॥ २३ ॥ सुदिनघटिकाआजिचेदिनीं ॥ मजबैसवावेंसिंहासनीं ॥ ऐसें
बोलतांचक्रपाणी ॥ भानुदासतेथोनीनिघाला ॥ २४ ॥ तोंगरुडपारींवैष्णवभक्त ॥ अवघेबैसलेचिंताक्रांत ॥ ह्मणती
भानुदासासिदिवसलागलेबहुत ॥ परीरुक्मिणीकांतनयेकीं ॥ २५ ॥ तोंअकस्मातभक्तविजयी ॥ हास्यवदनदेखतां
पाहीं ॥ येतांदेखिलालवलाहीं ॥ ह्मणतीशेषशायीआणिला ॥ २६ ॥ संतांसिक्षेमदेऊनित्वरित ॥ ह्मणेपद्मालयासिआ
लेरुक्मिणीकांत ॥ ऐसीऐकोनिहर्षमात ॥ संतोषेचित्तसकळांचें ॥ २७ ॥ दिंडीपताकाघेऊनिसत्वर ॥ सामोरेचालिले

१ बारीक. २ वायु. ३ आपले इच्छेनें. ४ लहान. ५ व्याकूळ. ६ सत्वर. ७ शेषावर निद्रा करणारा (विष्णु.) ८ आनंदाची गोष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वैष्णववीर ॥ टाळमृदंगांचागजर ॥ वाद्यें अपारवाजती ॥ २८॥ पुजारीआणिलोकपाळ ॥ नरनारीसामोरेजातीसक
ळ ॥ पद्मालयासियेतांतेवेळ ॥ देखिलाघननीळदृष्टीसी ॥ २९ ॥ सकळींघालोनिदंडवत ॥ देवासिआलिंगनदेऊनि
त्वरित ॥ रथावरीबैसवोनिरुक्मिणीकांत ॥ चालिलेमिरवतसंभ्रमें ॥ २३०॥ संतगर्जतीगुणानुवाद ॥ त्यांपुढेंनटनाच
तीछंद ॥ भेरीवाजंत्र्यांचानाद ॥ वाटतोआनंदसकळांसी ॥ ३१ ॥ तोसमारंभवर्णितांवाचेसी॥दृष्टांतनपुरेद्यावयासी ॥
आतांप्रत्यक्षकार्तिकमासीं ॥ पाहातीदृष्टीसीवारकरी ॥ ३२ ॥ रथोत्साहपौर्णिमेसिहोत ॥ तेचिउपमातयासरत ॥ तै
शाचपरीपंढरीनाथ ॥ येतीमिरवतनिजछंदें ॥ ३३ ॥ येतांचंद्रभागेचेतीरीं ॥ तंवतेपुढारीयेतसामोरी ॥ देवासिस्ना
नघालोनियांझडकरी ॥ मगमहाद्वारींचालिले ॥३४॥ रथाखालींउतरूनसावळीमूर्ती ॥ शिबिकेंतघातलीहातोहातीं ॥
देवालयींनेऊनसत्वरगतीं ॥ अभिषेककरितिमधुपर्कें॥ ३५॥ ब्राह्मणबोलतीमंत्रघोष॥कीर्तनींगर्जतीवैष्णवदास ॥ सिं
हासनींबैसेजगन्निवास ॥ धन्यदिवससुदिनतो ॥ ३६ ॥ वस्त्रालंकारभूषण ॥ षोडशोपचारेंकेलेंपूजन ॥ पक्वान्ननैवे
द्यअर्पून ॥ मंगलारतीपैंकेली ॥ ३७ ॥ पुष्पांजलीमंत्रघोष ॥ पुजारीसमर्पितीदेवास ॥ संतवैष्णवयात्रेकऱ्यांस ॥ वा
टलाउल्हासतेधवां ॥३८॥ नरनारीमिळोनिसमस्त ॥ भानुदासाचेंस्तवनकरित ॥ ह्मणतीयाच्यायोगेंवैकुंठनाथ ॥ आ
लेपंढरींतमागुतीं ॥ ३९ ॥ एकशर्करानगरांतवांटिती ॥ एकपक्वान्नभोजनविप्रांघालिती ॥ क्षेत्रवासीलोकांप्रती ॥ आ
नंदचित्तींवाटला ॥ २४० ॥ जैसाद्वादशवर्षेंवनवासकंठोन ॥ अयोध्येसिआलारघुनंदन ॥ नगरवासीआनंदलेजन ॥
तैसेंचिझालेंतयांसी ॥ ४१ ॥ कींअवर्षणींअहाळलाहोतापर्वत ॥ त्यावरीमेघवर्षलाअपरिमित ॥ पंढरीचेलोकसमस्त ॥
संतोषमानीतयारीतीं ॥४२॥ कींअगस्तीच्यापोटांतूनी ॥ समुद्रनिघालादेखूनिनयनीं ॥ मगमेघांसिउल्हासवाटला

१ गडबडीनें. २ नगारे. ३ आपले इच्छेनें. ४ पाळखींत. ५ दह्यांमध्यें मधुमिश्र करून देणे त्यास मधुपर्क असें ह्मणतात. ६ आनंद. ७ पोळला.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मनीं ॥ तैसीचकरणीझालीकीं ॥ ४३ ॥ नातरीवसंतकाळयेतांचिवरित ॥ वनस्पतीदिसतीसुशोभित ॥ तेवींपंढरीस
येतांअनाथनाथ ॥ लोकसमस्तआनंदले ॥ ४४ ॥ कींशरीरांतीलपरतलाप्राण ॥ मगइंद्रियेंवर्ततीसावधान ॥ पंढरीचे
सकळहीजन ॥ तैशाचपरीजाहले ॥ ४५ ॥ पुढिलेअध्यायींकथासुरस ॥ ऐकतांयशजोडेनिर्दोष ॥ ह्मणवूनिभक्तहोसा
वकाश ॥ जोडकराहेचिपैं ॥ ४६ ॥ हेंसात्विकभक्तांचेंमहिमान ॥ वाढविताश्रीरुक्मिणीरमण ॥ महीपतित्याचावंदि
जन ॥ गातोसद्गुणकीर्तनीं ॥ ४७ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥
त्रिचत्वारिंशाध्यायरसाळहा ॥ २४८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ४३ ॥ ॥ ओव्या ॥ २४८ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीकालीयमर्दनायनमः ॥ आजज्ञानेंद्रियांतसभाग्यपूर्ण ॥ वैखरीदिसतेपुण्यपावन ॥ कींवि
ष्णुभक्तांचेवर्णितांगुण ॥ दुरितेंसंपूर्णपळालीं ॥ १ ॥ ध्यानींआणितांसंतमूर्ती ॥ तेणेंचिपावननेत्रपातीं ॥ श्रवणेंचि
कर्णपुनीतहोती ॥ सायासनिर्गुतींनकरितां ॥२॥ भक्तकथेसिकरितांगमन ॥ तेणेंचरणासिआलेंपवित्रपण ॥ आळस
त्यागोनिबैसतांजाण ॥ सर्वांगपावनहोतसे ॥ ३ ॥ यापुस्तकासिकरितांनमस्कार ॥ तेणेंचिपवित्रहोतीकरें ॥ मस्तकल
ववितांसाचार ॥ अहंतासत्वरजातसे ॥ ४ ॥ भक्तकथेसिकरितांनमन ॥ तेणेंचहोतसेउन्मन ॥ मगनिश्चलतेसियेऊनि
जाण ॥ समाधानभोगवी ॥ ५ ॥ ह्मणोनियांसभाग्यश्रोतीं ॥ येथेंधरावीपूर्णआर्ती ॥ मागीलअध्यायाचेअंतीं ॥ कथा
निर्गुतीपरिसिली ॥ ६ ॥ कींविद्यानगरासिसप्रेमस्थिती ॥ भानुदासजाऊनिसत्वरगती ॥ प्रार्थूनिआणिलीपांडुरंगमू
र्ती ॥ पंढरीसश्रीपतीस्थापिले ॥ ७ ॥ आणिककथाऐकाउद्भट ॥ प्रतिष्ठानक्षेत्रींबहिरंभट ॥ जोषट्शास्त्रींनिपुणपंडित ॥
वेदांतज्ञानीप्रवीण ॥ ८ ॥ आणिकब्राह्मणपढलेश्रुती ॥ परीतयाचेविद्यार्थीह्मणविती ॥ कितीएकविप्रलागोनिसंगतीं ॥
तेपुराणव्युत्पत्तीशिकले ॥ ९ ॥ इतुकेंसामर्थ्यअसतांजाणा ॥ कदापिनजायराजदर्शना ॥ गृहींअग्निहोत्रादिसत्कर्मै
नाना ॥ परीउद्विग्नमनानव्हेची ॥ १० ॥ अयाचितवृत्तीकरूनिजाण ॥ चालवीवेदोनारायण ॥ गंगातीरींकरूनिस्ना
न ॥ जपअनुष्ठानकरीतसे ॥ ११ ॥ मध्यान्हसमयींउठोनिसत्वरा ॥ बहिरंभटयेतीनिजमंदिरा ॥ नैवेद्यवैश्वदेवसारोनि
बरा ॥ पंक्तीसद्विजवरांघेतसे ॥ १२ ॥ यापरीभोजनसारूनिजाण ॥ मगतृतीयप्रहरींसांगतीपुराण ॥ मगश्रवणासि
येतीसज्ञान ॥ जेअध्यात्मींनिपुणअसती ॥ १३ ॥ एकेदिवसींभोजनींबैसला ॥ तोंआपुलेस्त्रियेसिविनोदकेला ॥ अल
वणीशाकवाढिलीमजला ॥ हाशब्दऐकिलाकांतेनें ॥ १४ ॥ मगउत्तरकायदेतसेत्यासी ॥ साठवर्षेंजाहलींतुह्मांसी ॥ आ

१ चतुर्विध वाचेपैकीं चौथीवाचा. २. पापें. ३ शुद्ध. ४ निभ्रांत. ५ हात. ६ मीपणा. ७ ज्ञान. ८ इच्छा, प्रीति. ९ यथार्थ. १० वेद. ११ व्यग्र, खिन्न. १२ याचना न करणें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तारेंसनेसचवीआपणासी ॥ वृथाकासयापाहिजे ॥ १५ ॥ कांतेचेंवचनऐकोनिलवरित ॥ अनुतापजाहलाहृदयांत ॥ ह्म
णेआतांजिणेंकासयाव्यर्थ ॥ करावेंसार्थकआपुलें ॥ १६ ॥ बहिरंभटउठोनिलवरेंसी ॥ नमस्कारकेलाकांतेसी ॥ ह्मणे
मातेयथार्थमजसी ॥ उपदेशदेशीनिजलोभें ॥ १७ ॥ मागीलसुकृतहोतेंबहुत ॥ तेंफळासिआलेंसुनिश्चित ॥ ह्मणूनि
शब्दाचेंहोऊनिनिमित्त ॥ वैराग्यअद्भुतझालेंकीं ॥ १८ ॥ बहिरंभटविचारीअंतरीं ॥ आतांऐसाचगेलोंवनांतरीं ॥ तरी
भीडघालोनिलोकाचारीं ॥ मागुतीघरींआणितील ॥ १९ ॥ तरीस्वजातिसंबंधतुटेझडकरी ॥ आणिआपणासिकोणी
उत्तरनकरी ॥ ऐसीयुक्तिकरावीबरी ॥ विचारअंतरींकरितसे ॥ २० ॥ आतांजरीघ्यावेंसंन्यासग्रहण ॥ तरीपूजाक
रितीलसकळब्राह्मण ॥ परमहंसदीक्षाघेतांजाण ॥ तरीब्रह्मरूपपणमानिती ॥ २१ ॥ तरीवरिष्ठनिंदाकरितीलजाण ॥
देखोनिथुंकाटाकितीलअवघेजण ॥ पिशुनकरितीलअपमान ॥ तैसेंचिहोणयेसमर्यी ॥ २२ ॥ ऐसेंघडेलमजकारण ॥
तरीचदेहहोईलपावन ॥ ऐसाअनुतापमनींधरून ॥ मंदिराहूनचालिला ॥ २३ ॥ मगअविंधपुरोहिताचेघरीं ॥ बहि
रंभटगेलेतेअवसरीं ॥ काजीसबोलेमधुरोत्तरीं ॥ स्वयांतींतसारीआह्मांतें ॥ २४ ॥ हिंदूचाअविंधकरितांजाण ॥ तुम
चेशास्त्रींबोलिलेंपुंण्य ॥ तरीकाहींसंकोचनधरून ॥ आपुल्यासमानकरावें ॥ २५ ॥ याबरीउत्तरदेतकाजी ॥ आजि
कांउदासझालेतभटजी ॥ कांवासनापालटलीतुझी ॥ तरीकार्यआजीसाधीन ॥ २६ ॥ तुह्मींज्ञानीपंडितअसतां ॥ त
रीआमुचेयातींतकासयायेतां ॥ कांहींकामनाअसेलचित्ता ॥ तेसर्वथापुरवीनमी ॥ २७ ॥ यावरीबहिरंभटउत्तरदेत ॥
मीनाहींझालोंसकामविरक्त ॥ एकंविधमार्गतुमचादिसत ॥ भगवंतप्राप्तव्हावया ॥ २८ ॥ ऐसीनिष्ठादेखोनी ॥ बहि
रंभटासिभ्रष्टविलेंत्यानीं ॥ ब्राह्मणवृत्तांतऐकूनिश्रवणीं ॥ उद्विग्नमनींसर्वत्र ॥ २९ ॥ कांहींचउपायनचलेह्मणोनी ॥ म

१ जिभेस. २ पश्चात्ताप. ३ पूर्वजन्मार्जित पुण्य. ४ मनांत. ५ दुर्जन. ६ शुद्ध, मुक्त. ७ आपल्या जातींत घ्या. ८ यवन. ९ इच्छा, आवड. १० एकप्रकारचा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गनिवांतराहिलेआपुलेमनीं ॥ कोणीविकल्पीहोतेपैठणीं ॥ तेदृष्टींदेखोनीनिंदिती ॥ ३० ॥ एकह्मणतीवैराग्यतामस ॥ एकह्मणतीतोपिशाचभास ॥ एकह्मणतीनामघेतांत्याचें ॥ सुकृतआमुचेंजाईल ॥ ३१ ॥ एकह्मणतीनिजकांतेन ॥ ऐसें सर्वथानवदावेंवचन ॥ एकह्मणतीतिचेंप्राक्तन ॥ आलेंदिसोनविपरीत ॥ ३२ ॥ एकह्मणतीतोनिर्दयचित्तीं ॥ आमु च्याकांताउदंडबोलती ॥ परीवैराग्यआणोनिचित्तीं ॥ प्रपंचभ्रांतीनसोडीं ॥ ३३ ॥ एकह्मणतीजाहलीद्रव्यसंपत्तीं ॥ कुटुंबाचीदेखिलीनिश्चिती ॥ मगसहजवैराग्यआठवलेंचित्तीं ॥ ऐसेंबोलतीपरस्परें ॥ ३४ ॥ एकह्मणतीशास्त्रींहोतानि पुण ॥ त्याणेंघ्यावेंहोतेंसंन्यासग्रहण ॥ नीचयातींतशिरून ॥ अविंधहोऊनबैसला ॥ ३५ ॥ एकबोलतीअनुष्ठानकरि तां ॥ मंत्रचळझालाअसेलअवचितां ॥ एकबोलतीविवेकनकरितां ॥ व्यर्थचिनिंदितांतयासी ॥ ३६ ॥ विद्यावयकुळउत्त मजाण ॥ सर्वसंपत्तिआणिधन ॥ पुत्रकलत्रसर्वअसून ॥ वैराग्यहोणअघटित ॥ ३७ ॥ पैठणींचेजनऐशारीतीं ॥ कोणी निंदितीकोणीस्तविती ॥ परीबहिरंभटअनुतापयुक्ती ॥ निर्भयचित्तींसर्वदा ॥ ३८ ॥ तंवकोणेएकेअवसरीं ॥ विप्रबैसले गंगातीरीं ॥ त्यांपासीजाऊनिसत्वरीं ॥ रुदनकरीअनुतापें ॥ ३९ ॥ कंठजाहलासद्गदित ॥ आनंदाश्रुनेत्रींवाहात ॥ ऐ सेंदृष्टींदेखोनित्वरित ॥ ब्राह्मणपुसतीतयासी ॥ ४० ॥ बहिरंभटासिबोलतीवचन ॥ तुह्मीकिमर्थझालेतयवन ॥ तेथें कोणतासद्गुणदेखोन ॥ दीधलेंटाकूनआह्मांतें ॥ ४१ ॥ ऐसेंबोलतांचिद्विजवर ॥ तयांसिदेतप्रत्युत्तर ॥ माझेंकर्मबलव त्तर ॥ ह्मणोनिअविचारघडलाकीं ॥ ४२ ॥ ईश्वरप्राप्तीस्तवजाण ॥ मीस्वइच्छेनेंझालोंयवन ॥ परीयेथेंहीआत्मप्रा प्तीचेंचिन्ह ॥ नयेदिसोनसर्वथा ॥ ४३ ॥ यावरीविप्रउत्तरदेती ॥ आपुल्यासत्कर्मींचआहेसद्गती ॥ ऐसेंबोलोनितयाप्र ती ॥ बिचारकरितीएकमेक ॥ ४४ ॥ ह्मणतीहाहोतासर्वज्ञगुणी ॥ निजकर्मेंभ्रष्टलाआपुलेमनीं ॥ तरीआतांविधियुक्त

१ पुंण्य. २ दैंव. ३ प्रवीण, कुशल. ४ जातींत. ५ यवन. ६ अकस्मात. ७ विचार. ८ स्त्री. ९ ब्राह्मण. १० आसवें. ११ आपल्या कर्मानें. १२ यथाशास्त्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रायश्चित्तदेऊनी ॥ ब्राह्मणपणींआणावा ॥ ४५ ॥ इतरग्रामींचेशास्त्ररीती ॥ सकळपुसावयाआपणासयेती ॥ आणि
यासशुद्धकरावयानिश्चितीं ॥ संशयचित्तींकासया ॥ ४६ ॥ जैसेइतरगांवींचेलेंडवोहळ ॥ गंगेंसिमिळतांपवित्रकेवळ ॥
आणितिचेंबाहेरपागळलेंजळ ॥ तेंकायअमंगळह्मणावें ॥ ४७ ॥ तेवींइतरग्रामींचेभ्रष्टलेकोणी ॥ तेशुद्धहोतातिप्रतिष्ठा
नीं ॥ आणियेथीलदवडावासर्वज्ञगुणी ॥ तरीआपणाशब्दयेईल ॥ ४८ ॥ मगशास्त्रपाहोनियांत्वरित ॥ तयासिदीधलें
प्रायश्चित्त ॥ द्रव्यवेंचोनिअपरिमित ॥ ब्राह्मणींपवित्रत्याकेलें ॥ ४९ ॥ सकळद्विजवरमिळोन ॥ बहिरंभटासिबोलती
वचन ॥ आपुल्यासत्कर्मीतुह्माकारण ॥ होईलदर्शनश्रीहरीचें ॥ ५० ॥ तेव्हांसमस्तअविंधहोऊनिगोळा ॥ द्विजांसिह्म
णतीतयेवेळां ॥ तुह्मीयवनाचाब्राह्मणकैसाकेला ॥ सांगाचलाराजद्वारीं ॥ ५१ ॥ बहिरंभटह्मणेतयांप्रती ॥ मजअविंध
केलेंकैशारीतीं ॥ कर्णाचींछिद्रेंअद्यापिदिसती ॥ संशयमजप्रतीवाटतो ॥ ५२ ॥ नेत्रासिदृष्टीअसोनियां ॥ मगअं
धह्मणावेंकैसेंतया ॥ गमनशक्तीआहेजया ॥ पांगुळतयानह्मणावें ॥ ५३ जीवासिअसतांअहंता ॥ तयासिमुक्त
ह्मणणेवृथा ॥ कर्णद्वारेंशब्दऐकतां ॥ तरीबधिरसर्वथानह्मणावें ॥ ५४ ॥ शर्करामद्यांतमेळवितांजाण ॥ तिचेंनजायगु
ळचटपण ॥ तेवींतुह्मीभ्रष्टविलेंमजलागून ॥ परीकर्णींविंधनतैसेंची ॥ ५५ ॥ विंधनेंअसतांअविंधह्मणतां ॥ लज्जानवा
टेतुमच्याचित्ता ॥ यापरीयवनासिवादघालितां ॥ भागलेबोलतांसकळिक ॥ ५६ ॥ विप्रांसिह्मणेऐकावचन ॥ मजप्रा
यश्चित्तदेऊनिकेलाब्राह्मण ॥ ऐसेंतुमचेंधर्मशास्त्रकोण ॥ मजकारणकळेना ॥ ५७ ॥ चर्मकापिलेंलिंगावरुतें ॥ तेंआलें
चनाहींप्रायश्चित्तें ॥ भस्मगोमयलावूनिवरतें ॥ कैसापवित्रमीजाहलों ॥ ५८ ॥ नासिककापूनघेतल्यापाही ॥ सन्मा ॥ २ ॥
नराहिलाकवणेठायीं ॥ तेवींमजभ्रष्टविलेंयवनाहीं ॥ तेथेंब्राह्मणत्वनाहींराहिलें ॥ ५९ ॥ पौर्णिमेनेंचंद्रसोज्वळकेला ॥

---

१ दुसऱ्या गांवचे. २ असंख्य ३ यवन. ४ मीपणा. ५ छिद्र. ६ पूर्ण कळांनीं प्रकाशित.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यासी ॥ ६७ ॥ नमस्कारकरूनितेवेळीं ॥ एकनाथसमाधींतन्याहाळी ॥ तोंअजानवृक्षाचीमुळी ॥ ज्ञानदेवाजवळीपा
तली ॥ ६८ ॥ तेनिजकरेंलावूनिएकीकड ॥ मागुतीसमाधीचेंलागलेंकवाँड ॥ चुनेगच्चीनेंबुजवोनिदृढ ॥ पूर्ववतदगड
रचियेले ॥ ६९ ॥ तेव्हांअलकावतीउजाडबहुत ॥ सिधासामग्रीनमिळेतेथ ॥ शिष्यसंप्रदायीजाहलेक्षुधित ॥ तोंपंढ
रीनाथपावले ॥ १७० ॥ निजभक्तांचीभूकताहान ॥ निजांगेंपुरवीजगज्जीवन ॥ तेथेंवाणियाचेंरूपधरून ॥ पाँलदेऊ
नबैसले ॥ ७१ ॥ हेंदृष्टीदेखोनित्वरित ॥ चित्तींहर्षलेएकनाथ ॥ ह्मणेव्यवसायीआलेबाजारांत ॥ सामग्रीविकतआ
णावी ॥ ७२ ॥ मगदोघेब्राह्मणपाठवूनझडकरी ॥ सर्वसाहित्यघेतलेंपदरीं ॥ ह्मणतीद्रव्यआणूनदेतोंसत्वरीं ॥ तुह्मीं
स्वस्थअंतरींअसावें ॥ ७३ ॥ यावरीबोलतीपंढरीनाथ ॥ आह्मीआजचादिवसआहोंयेथ ॥ तुह्मीस्वयंपाककरूनित्व
रित ॥ जेवासमस्तबिऱ्हाडीं ॥७४॥ एकनाथासिजाणतोंआह्मी ॥ परीतेनोळखतीमजलागोनी ॥ तेयात्रेसिआलेऐको
नी ॥ सामग्रीघेऊनीमीआलों ॥ ७५ ॥ पाठमोरेहोतांब्राह्मणासी ॥ तोंअदृश्यजाहलेहृषीकेशी ॥ आश्चर्यवाटलेंसक
ळांसी ॥ एकनाथासीसांगितलें ॥ ७६ ॥ ह्मणतीआह्मासिसामग्रीदेऊनी ॥ तत्काळअदृश्यजाहलावाणी ॥ द्रव्यहीन
देतांत्यालागूनी ॥ जाहलीकरणीअद्भुत ॥ ७७ ॥ ऐसीऐकोनियांमाँत ॥ एकनाथजाहलेसद्गदित ॥ ह्मणतीआह्मासा
ठींपंढरीनाथ ॥ शिणलेबहुतवाटतें ॥७८॥ मगपाकसिद्धहोतांचिजाण ॥ ब्राह्मणांसहितकेलेंभोजन ॥ तेदिवसींरात्रींरा
हून ॥ मांडिलेंकीर्तननिजप्रेमें ॥ ७९ ॥ समाधीसकरूनिनमस्कार ॥ दुसरेदिवसींनिघालेसत्वर ॥ प्रतिष्ठानींयेऊन

१ दृढासन. २ पाहूं लागला. ३ दरवाजा. ४ तंबु. ५ व्यापारी लोक. ६ गुप्त. ७ वर्तमान. ८ गहिंवर. ९ पैठण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

साचार ॥ सप्रेमभजनकरीतसे ॥ १८० ॥ एकनाथाचीऐसीस्थिती ॥ जनार्दनस्वरूपत्रिजगतीं ॥ तोचिव्यापकसर्वां
भूतीं ॥ संशयचित्तींनवाटे ॥ ८१ ॥ जनार्दनाचेंलागतांध्यान ॥ स्वयेंचझालेजनार्दन ॥ तेथेंकांहींचनदिसेभिन्न ॥ जे
वींसरिताजीवनसागरीं ॥ ८२ ॥ कींदीपप्रकाशदोघेजण ॥ नामेंवेगळींपरीएकत्रजाण ॥ तेवींएकनाथआणिजनार्दन ॥
नव्हतीभिन्नसर्वथा ॥ ८३ ॥ कींकर्पूरसुगंधएकपाहीं ॥ कींद्रवत्वनीरींसिद्धैतनाहीं ॥ नातरीपुष्पमकरंदएकेठायीं ॥
निजप्रीतीनेंनांदती ॥ ८४ ॥ तेवींएकनाथआणिजनार्दन ॥ समरसअसतीएकपण ॥ महीपतितयांसिअनन्यशरण ॥
वंदीतचरणसद्भावें ॥ ८५ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ षट्चत्वा
रिंशाध्यायरसाळहा ॥ १८६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ४६ ॥ ॥ ओव्या ॥ १८६ ॥ ॥ ॐ ॥

१ नदीचें पाणी. २ उदक, पाणी, ३ पुष्परस, सुगंध.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीद्वारकानाथायनमः ॥ ऐकाश्रोतेहोकथाचोखडी ॥ जेणेंपरमार्थींलागेलगोडी ॥ श्रवणींऐ
कतांचितांतंडी ॥ दुरितेंरोकडींनराहती ॥ १ ॥ तुटोनिमायामोहपाश ॥ विकल्पसंशयाचाहोयनाश ॥ भेदाभेदमावळे
निःशेष ॥ शांतिसुखअनायासयेहाता ॥ २ ॥ तुटोनियांकर्माकर्म ॥ चित्तींठसावेभजनप्रेम ॥ भक्तकथेचामहिमानिरु
पमं ॥ पुरषोत्तमेंह्मणितला ॥ ३ ॥ हेसांगूंकायबहुव्यत्पत्ती ॥ अनुभवेंखूणसभाग्यजाणती ॥ जयासिचित्तींबाणलीवि
रक्ती ॥ जेकांभक्तिपंथालागले ॥ ४ ॥ टाकोनियांलौकीकप्रौढी ॥ जेकीर्तनींनाचतीकडोविकडी ॥ त्यांवांचूनिकथेसगो
डी ॥ नलागेरोकडीकवणासी ॥ ५ ॥ यास्तवतुह्मीसभाग्यश्रोतीं ॥ जोडिल्यामागेंपुण्यसंपत्ती ॥ ह्मणोनिकथाश्रवणीं
धरोनिआर्त्तीं ॥ श्रवणासिप्रीतींबैसलां ॥ ६ ॥ मागीलअध्यायींकथाअद्भुत ॥ एकनाथप्रेमळवैष्णवभक्त ॥ जोविष्णुअ
वतारमूर्तिमंत ॥ परिसिलेंचरित्रतयाचें ॥ ७ ॥ असोयावरीकृष्णातीरींजांबनगर ॥ तेथेंरामउपासकएकाद्विजवर ॥ पर
मभाविकज्ञानीचतुर ॥ असेउदारसर्वस्वें ॥ ८ ॥ कांतापुरुषदोघेंजण ॥ एकचित्तेंअसतीजाण ॥ अहोरात्रप्रेमेंकरून ॥
श्रीरामभजनकरिताती ॥९॥ सहजकुलकर्णाचीवृत्ती ॥ ह्मणोनिनिरंतरतेथेंचनांदती ॥ अन्नार्थींयांसीतृप्तकरिती ॥ भूत
दयाचित्तींधरूनियां ॥१०॥ रामजयंतीयेतांजाण ॥ बोलावूनिसाधुवैष्णवजन ॥ मंडपपताकाउभारून ॥ महोत्साहक
रितउल्हासें ॥११॥ सर्वसाहित्यकरूनिप्रीतीं ॥ द्विजांसीपक्वान्नभोजनघालिती ॥ कीर्तनकरूनिनवरात्री ॥ जाग्रणक
रितीउल्हासें ॥ १२ ॥ श्रीरामसीतालक्ष्मण ॥ यामूर्तींघरींपुरातन ॥ त्यांसिदिव्यमखरेंशृंगारून ॥ षोडशोपचारेंपूजि
ती ॥१३॥ वाजंत्रीभेरीमृदंगकुसरी॥ वाद्येंवाजतीमंडपद्वारीं ॥ प्रतिवर्षींऐशियापरी ॥ महोत्साहगजरींकरीतसे ॥१४॥
दशमीचेरात्रींकरूनललित ॥ सकळगौरवावेसाधुसंत ॥ मानसींधरूनिअत्यंतप्रीत ॥ नमस्कारकरीतसद्भावें ॥ १५ ॥

१ चांगली, सुंदर. २ खरेनें. ३ पातकें. ४ उपमा देता येत नाहीं असा, अतर्क्य. ५ पटली. ६ आवड, प्रीति. ७ बायको. ८ आनंद. ९ नगारे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

परीपुत्रसंताननाहींपोटीं ॥ ह्मणोनिकांताहोतसेकष्टी ॥ तोंरात्रींनिद्रानलागतांमोठी ॥ मगस्वप्नदृष्टींदेखिलें ॥ १६ ॥
दृष्टांतींयेऊनिश्रीरघुनाथ ॥ ब्राह्मणाप्रतीकायसांगत ॥ मारुतिअवतारमूर्तिमंत ॥ तुमचेउदरायेईल ॥ १७ ॥ भक्ति
ज्ञानवैराग्यजाण ॥ त्याचेदेहींवसतीपूर्ण ॥ तोनिजभक्तअंजनीनंदन ॥ पुत्रनिधानदेखसी ॥१८॥ ऐसेंस्वप्नदेखोनिब्रा
ह्मण ॥ जागृतजाहलानलागतांक्षण ॥ मनांतविस्मयहोऊन ॥ कांतेप्रतीसांगतसे ॥ १९॥ भ्रताराचेंवचनऐकून ॥ चित्तीं
वाटलेंसमाधान ॥ तोंनवमासगर्भींतहोतांजाण ॥ पुत्रनिधानप्रसवली ॥ २० ॥ गृहींसर्वसंपत्तिसुख ॥ त्यावरीपाहिलें
पुत्रमुख ॥ द्विजासिवाटलापरमहरिख[3] ॥ ह्मणेजानकीनायकपावला ॥ २१ ॥ प्रसन्नहोऊनिअयोध्याधीश ॥ पुत्रदीधला
हामोठाहर्ष ॥ नामठेविलेंरामदास ॥ द्वादशदिवसलोटतां ॥ २२ ॥ दिवसेंदिवसथोरजाहला ॥ पांचवेवर्षींव्रतबंधकेला ॥
मगवैदिकब्राह्मणघरींठेविला ॥ पढोंघातलात्यापासीं ॥ २३ ॥ कांताह्मणेभ्रताराकारण ॥ निजपुत्राचेंकरावेंलग्न ॥ ते
व्हांपुरोहिततत्काळजाऊन ॥ वधूविचारूनठेविली ॥ २४ ॥ मगलग्नसामग्रीअलंकार ॥ वस्त्रेंभूषणेंघेऊनिफार ॥ नर
नारीसोइरेसत्वर ॥ घेतलेसकळलग्नासी ॥ २५॥ पुढेंसोयराहोऊनिसामोरी ॥ वरपूजिलातेअवसरीं ॥ बिऱ्हाडदेऊन
जानवसघरीं ॥ उल्हासगजरींवाद्यांचा ॥ २६ ॥ देवकप्रतिष्ठाकरूनजाण ॥ केलेंब्राह्मणसंतर्पण ॥ लग्नघटीउरतांचदि
न ॥ मधुपर्कविधानपैंकेलें ॥ २७ ॥ मगअंतःपटधरूनिदेख ॥ ब्राह्मणबोलतीमंगलाष्टक ॥ शेवटींअवघेहोऊनिएक॥
सावधानदेखह्मणताती ॥ २८ ॥ तंवएकपुरोहितसन्निधबैसला ॥ रामदासप्रश्नकरीत्याजला ॥ तुह्मीसावधानह्मणतां
कवणाला ॥ सांगामजलाएसमयीं ॥ २९ ॥ तंवतोविनोदेंबोलेवचन ॥ सावधानह्मणतोंतुजकारण ॥ आजपासोनि ॥ १ ॥
संसारबंधन ॥ पडलेंजाणनिश्चितीं ॥ ३० ॥ परमदुःखरूपसंसारपाही ॥ येथेंअणुमात्रसौख्यनाहीं ॥ संसारह्मणित

१ स्त्री. २ मारुति. ३ आनंद, उल्हास. ४ श्रीराम. ५ मौंजीबंधन. ६ ब्राह्मणभोजन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लाजिहीं ॥ तरीतेसर्वस्वेंहींनाडलें ॥ ३१ ॥ ह्मणोनिसकळपुरोहित ॥ तुजलागूनिसावधानह्मणत ॥ रामदासऐकोनि
मात ॥ थरथरांकांपततेधवां ॥ ३२ ॥ वैराग्यहोऊननिजअंतरीं ॥ पळोनिचालिलेवनांतरीं ॥ मायबापेंधरूंपाहातीस
त्वरीं ॥ परीमोहअंतरींपरतेना ॥३३॥ जैसेंविषरांधिलेंअन्नांत ॥ तोजेवणारासिकळलावृत्तांत ॥ मगतोजैसेंपात्रटाकोनि
देत ॥ उपचारसमस्तअव्हेरी ॥ ३४ ॥ तैसाकंटाळोनिविषयसुखीं ॥ पळोनिगेलाएकाएकीं ॥ उद्दंडगौरवकेलालोकीं ॥
परीनायकेशैखींकोणाचें ॥ ३५॥ तयामागेंचिमातापिता ॥ अरण्यांतगेलींउभयतां ॥ पुत्रासिलाऊंह्मणतीममता ॥ परी
तोसर्वथापरतेना ॥३६॥ रामदासह्मणेपित्यासी ॥ तुह्मींव्यर्थकांगोऊंपाहतांमजसी ॥ प्रपंचकेवळदुःखराशी ॥ उमजलें
मजसीनिश्चित ॥ ३७ ॥ कामाचेंआर्त्तपुरवावया ॥ ह्मणोनिकेलीसुंदरजाया ॥ तिचेंपालनकरावया ॥ आटलीकायास
र्वस्वें ॥ ३८ ॥ धनवंताचेंउपार्जन ॥ करूनिद्रव्यमिळविलेंजाण ॥ आणिअवचिततस्करपडलेयेऊन ॥ तरीघेती
प्राणआपुले ॥ ३९ ॥ जेवींगळआहेउंडिआंत ॥ हेंमीनासिउमजलेंअकस्मात ॥ मगपळोनिगेलापाणियांत ॥ तैसा
सावचित्तमीजाहलों ॥ ४० ॥ कींनळिकायंत्रदेखोनिडोळां ॥ शुंकआकाशींपळोनिगेला ॥ तेवींप्रपंचफांसानपडतांभ
ला ॥ उमजलेंमजलायारीतीं ॥ ४१ ॥ आतांकांहींममतानधरितांचित्तीं ॥ परतोनिजावेंसदनाप्रती ॥ ऐसेंह्मणोनि
सत्वरगती ॥ अरण्याप्रतीचालिला ॥ ४२ ॥ पिताउमजलानिजअंतरीं ॥ हामारुतीचाअवतारब्रह्मचारी ॥ कदापिन
बुडेभववंपुरीं ॥ मगपरतोनिमंदिरींचालिला ॥ ४३ ॥ पुर्वीदृष्टांतजोजाहला ॥ तोकांतेसिमागुतीआठवदीधला ॥ ह्मण
तीधन्यवंशआपुला ॥ कींपुत्रनिघालावीतरागी ॥ ४४ ॥ यापरीसमाधानकरूनिचित्ता ॥ ग्रामासिगेलींउभयतां ॥ हृद
यींध्यातीश्रीरघुनाथा ॥ मायाममताटाकोनी ॥४५॥ तोंइकडेरामदासअरण्यांत ॥ एकांतींजाऊनिबैसलात्वरित ॥ होऊ

१ त्याग करी. २ पुष्कळ बहुत सत्कार. ३ शेवटीं. ४ समजलें. ५ इच्छा, ६ बायको. ७ आर्जव., सेवा. ८ चोर. ९ मत्स्य, मासा. १० पोपट. ११ संसार नगरी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निर्वैराग्यभरित ॥ विचारकरितमानसीं ॥ ४६ ॥ तीर्थेंव्रतेंअनुष्ठान ॥ कलिमाजीनव्हतींसाधन ॥ तरीश्रीरामासिरि
घोनिशरण ॥ करावेंचिंतनतयाचें ॥ ४७ ॥ नामघेतांउठाउठीं ॥ गणिंकाचढलीवैकुंठीं ॥ नामजपतांधूर्जटी ॥ शीतळ
पोटींतोजाहला ॥ ४८ ॥ ऐसाविश्वासधरून ॥ करीतबैसलानामस्मरण ॥ नेघेफळमूळअथवाजीवन ॥ मांडिलेंनिर्वाण
निजनिष्ठें ॥ ४९ ॥ ह्मणेजयअयोध्यावासीदशरथकुमरा ॥ कौसल्यातनयाजानकीवरा ॥ रावणांतकाजगदुद्धारा ॥ सा
युज्यउदाराश्रीरामा ॥ ५० ॥ मीअनाथबाळकतुझेंदीन ॥ अरण्यांतबैसलोंकिलवाण ॥ तूंभक्तकैवारीपतितपावन ॥ त
रीद्यावेंदर्शनमजआतां ॥ ५१ ॥ ऐसीकरुणाभाकितांचित्तीं ॥ तोंतेथेंप्रकटलामारुती ॥ विक्राळरूपदाविलेंनिश्चितीं ॥
परीभयभीतचित्तींनहोय ॥ ५२ ॥ जैसाअग्निप्रदीप्तहोऊनिपाहे ॥ कृशांनासिपोळवूंजाये ॥ परीतयासिसर्वथानुपजे
भये ॥ एकचिदेहह्मणोनी ॥ ५३ ॥ कींदिनंकरभास्कराचेगेलियाघरा ॥ त्यासिसर्वथानयेचिउबारा ॥ तेवींउग्ररूपेंमारुती
भेटलाखरा ॥ परीरामदासअंतरागजबजेना ॥ ५४ ॥ किंवापौर्णिमेसिसागरआणूनिभरतें ॥ आपुलाचिकल्लोळलप
वूंपाहात ॥ परीतोनबुडेनिश्चित ॥ असेएकत्रह्मणोनी ॥ ५५ ॥ कींआकाशसक्रोधहोऊनिपाहे ॥ नर्भासीअवचितगि
ळूंजाये ॥ तरीतेंत्याचेनगिळवेलकाये ॥ व्यर्थचिउपायेहातैसा ॥ ५६ ॥ तेवींविक्राळरूपेंअंजनीसुत ॥ रामदासासिभय
दाखवित ॥ परीतोनिर्भयचित्तांत ॥ एकत्रभावितआपणासी ॥ ५७ ॥ रामदासाचानिश्चयदेखोन ॥ मारुतीसवाटलें
समाधान ॥ मगसौम्यरूपधरून ॥ दीधलेंदर्शननिजप्रीतीं ॥ ५८ ॥ रामदासेंदेऊनिआलिंगन ॥ वंदिलेमारुतीचेच
रण ॥ ह्मणेश्रीरामाचेंहोयदर्शन ॥ तोउपायसांगणमजलागीं ॥ ५९ ॥ अभयदेऊनितेअवसरीं ॥ मारुतीअदृश्यजाह ॥ २ ॥
लेसत्वरी ॥ मगरामदासजाऊनिनगरांतरीं ॥ करतळभिक्षामागती ॥ ६० ॥ तेंभिक्षेचेंअल्पसेवूनिअन्न ॥ मगअर

१ वेश्या २ शंकर. ३ उदक, पाणी. ४ श्रीराम. ५ अग्नि. ६ सूर्य. ७ लहरी. ८ आकाश. ९ मारुति.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ण्यातजाऊनिकरीस्मरण ॥ निद्राआलस्यनयेचिजाण ॥ अनुतापबळेंसर्वथा ॥ ६१ ॥ आपुलेंचिमनआपुल्यासिश्रो
तां ॥ आपुलेंचिमनआपुल्यासिवक्ता ॥ मनापरीसज्ञानदाता ॥ सद्गुरुसर्वथाअसेना ॥ ६२ ॥ मगमनासिबोधकरून
साचं ॥ श्लोकरचिलेदोनशेंपांच ॥ तेसप्रेमेंगातीजेनित्यवाचे ॥ वैराग्यत्याचेंआंदण ॥ ६३ ॥ श्रीरामरूपआठवूनिम
नीं ॥ कीर्तनींनाचेप्रेमेंकरूनी ॥ मगकंठसद्गदितहोऊनी ॥ आनंदाश्रुनयनींलोटती ॥ ६४ ॥ झाडेंवृक्षआणिपाषाण ॥
पक्षीश्वापदेंवनचरेंजाण ॥ हेचिआपुलेसखेसज्जन ॥ निश्चयमनींदृढकेला ॥ ६५ ॥ मध्यान्हसमयींभिक्षेपुरत ॥ क्षण
भरजाऊनिनगरांत ॥ तेणेंक्षुधाकरूनशांत ॥ मागुतीअरण्यांतबैसावें ॥ ६६ ॥ प्रपंचिकलोकयेतांजवळी ॥ तरीपळो
निजावेंतत्काळीं ॥ ह्मणेगुंताकरोनिमजयेकाळीं ॥ मायाजाळींपाडितील ॥ ६७ ॥ जोपरमार्थविषयींविरक्त ॥ सज्ञान
आणिधैर्यवंत ॥ तेणेंधरितांजनाचीसंगत ॥ तरीहोईलअनर्थरोकडा ॥ ६८ ॥ कस्तूरीचेंसुवासपोतं ॥ क्षणेकठेविलेंहिं
गाआंत ॥ तरीत्याचेंमोलतुटेनिश्चित ॥ अवगुणलागतनिमेषमात्रें ॥ ६९ ॥ कींतंबाकूआणिपूगीफलपाही ॥ दोनी
सांठविलींएकेठायीं ॥ तरीदुर्गंधिलागेलनिश्चयीं ॥ संशयकांहींनधरावा ॥ ७० ॥ तेवींप्रापंचिकजेअज्ञान ॥ समूळवे
ष्टिलेअविद्येंकरून ॥ त्याचेसंगतीसिविरक्तसज्जन ॥ लागतांनाडलेनिश्चित ॥ ७१ ॥ ह्मणोनिरामदासवैराग्यशील ॥
मनुष्यदेखोनिपळेतत्काळ ॥ नामस्मरणसार्वकाळ ॥ करीतप्रेमळविदेही ॥ ७२ ॥ तोंएकेदिवसींआषाढमासीं ॥ पंढ
रीसचालिलेयात्रेसी ॥ मार्गींमारुतिसांगेत्यासी ॥ श्रीरामतुजसीभेटतील ॥ ७३ ॥ ऐसादृष्टांतदेखोनिसत्वरीं ॥ परम
हर्षवाटलाअंतरीं ॥ मगरामदाससप्रेमगजरीं ॥ पंढरीसत्वकरींचालिले ॥ ७४ ॥ तंवतेथेंटाळमृदंगवाजती ॥ वैष्णव
आनंदेंगातीनाचती ॥ पुढेंवाहेभीमरथी ॥ तेव्हांसंशयचित्तींवाटला ॥ ७५ ॥ ह्मणेमीजयाचेंकरितोंध्यान ॥ तोकांहींच न

---

१ पश्चात्ताप झाल्याच्या योगानें. २ ऐकणारा. ३ बोलणारा. ४ खरा. ५ सुपारी. ६ विरक्त होऊन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दिसेयेथेंजाण ॥ मगविक्षेपपावूनिनिजमन ॥ श्रीरामभजनकरितसे ॥ ७६ ॥ श्रीरामचरित्रमुखेंगात ॥ महाद्वा
रासिआलात्वरित ॥ तंवगरुडआणिहनुमंत ॥ पुढेंअवचितदेखिले ॥ ७७ ॥ मारुतीसिकरूनियांनमन ॥ पुढेंपाहा
तसेविलोकून ॥ तोंसंतसाधुवैष्णवजन ॥ करितीकीर्तनस्वानंदें ॥ ७८ ॥ दिंड्यापताकागरुडटके ॥ जैसेंवैकुंठउतरलें
निकें ॥ मगरामदासासिवाटलाहरिखं ॥ सप्रेमसुखदेखोनी ॥७९॥ तेव्हांहरिदासासिकरूनिनमन ॥ घ्यावयाचालि
लेदेवदर्शन ॥ तोंविटेवरीउभेजगज्जीवन ॥ देखिलेंदुरूनदृष्टीसी ॥ ८० ॥ समचरणकरकटीं ॥ नासाग्रींठेविलीदिठी॥
ऐसेंस्वरूपदेखोनिदृष्टीं॥ रामदासभेटीनघेचीं॥८१॥ह्मणेमीमानसपूजाकरितोंनित्य ॥ तेंश्रीरामस्वरूपनदिसेयेथ ॥
मगसन्मुखउभाराहूनितेथ॥ कायबोलतदेवासी ॥८२ ॥चापबाणहातींचेंकायकेले ॥ निजकरजघनावरीठेविले॥ कांनि
जवेषासिपालटिलें ॥ सांगवहिलेंश्रीरामा ॥ ८३ ॥ अबोलाधरिलाजगजेठी ॥ कांहींआह्मांसीनबोलसीचगोष्टी ॥ काय
अपराधधरिलापोटीं ॥ तेंमजउठा[4]उठीसांगावें ॥ ८४ ॥ शरयूगंगात्यजिलीकाये ॥ येथेंभीमरथीवाहातआहे ॥ ऐसेंवि
परीतजाहलेंकाये ॥ सांगाल[4]वलाहेंरघुनाथा ॥ ८५ ॥ लोपोनिगेलीअयोध्यानगरी ॥ येथेंवसविलीक्षेत्रपंढरी ॥ काय
जाहलीसीतासुंदरी ॥ एथेंचौघीनारीमेळविल्या॥ ८६ ॥ अमितवानरदळपाहीं ॥ तेंकांहींचनदिसेयेठायीं ॥ आतांआ
ह्मीनमावेंकायी ॥ सांगालवलाहींश्रीरामा ॥८७॥ एकहनुमंतदिसतोयेथ ॥ हासैन्यांतूनफुटलाकिमर्थ ॥ तुजचाळवू
निकोण्याभक्तें ॥ उभेंकेलेंयाठायीं ॥ ८८ ॥ आतांकोणासिद्यावेंआलिंगन ॥ जेणेंचित्तासवाटेसमाधान ॥ कोणासिक
रावेंसाष्टांगनमन ॥ तेंमजकारणकळेना ॥८९॥ कंठजाहलासद्गदित ॥ नेत्रींअश्रुपातवाहात ॥ ह्मणेअयोध्यावासीजान
कीकांत ॥ भेटावेंत्वरितमजलागीं ॥ ९० ॥ मीतरीतुझाअनाथदीन॥ येथेंदिसतोंकिलवाणें ॥ आतांकृपादृष्टींविलोकून॥

१ प्रत्यक्ष, हुबेहुब. २ हर्ष. ३ मुकेपणा. ४ लवकर. ५ सैन्य. ६ काकुळती.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

द्यावेंदर्शनश्रीरामा ॥ ९१॥ ऐसानिश्चयदेखोनिचित्तीं ॥ संतोषलेरुक्मिणीपती ॥ ह्मणेधन्यरामदासाचीभक्ती ॥ उपासकनिश्चितींयानाव ॥ ९२ ॥ मगरुक्मिणीसिह्मणेजगज्जीवन ॥ रामउपासकनिजभक्तजाण ॥ घ्यावयाआलाआपुलेंदर्शन ॥ तरीतूंसीताहोऊनबसावें ॥ ९३ ॥ ऐसेंसांगूनिपंढरीनाथ ॥ आपुलेंस्वरूपपालटिलेंत्वरित ॥ श्रीरामस्वरूपधरूनितेथ ॥ जाहलेंउदितभेटावया ॥९४॥ मुकुटकुंडलेंविराजमान ॥ सुंदरसगुणमेघश्यामवर्ण ॥ हातींघेतलेंधनुष्यबाण ॥ ठाणमांडोनउभेकीं ॥ ९५ ॥ सन्निधहोतीरुक्मिणीमाता ॥ तेतत्काळजाहलीसगुणसीता ॥ हेंदृष्टीसदेखोनिनिजभक्ता ॥ आनंदचित्तावाटला ॥९६॥ मगरामदाससन्निधयेऊन ॥ श्रीरामासिदीधलेंआलिंगन ॥ तेंध्यानदृष्टीसिन्याहाळितांजाण ॥ समाधानवाटलें ॥ ९७॥ कंठहोऊनसद्गदित ॥ आनंदाश्रुनेत्रींवाहत ॥ मगचरणींमिठीघालोनित्वरित ॥ मस्तकठेवीतसद्भावें ॥ ९८ ॥ बहुतांदिवसींदिधलीभेटी ॥ ह्मणोनिसमाधानवाटलेंपोटीं ॥ रामदासासिजगजेठी ॥ कृपादृष्टींपाहातसे ॥ ९९ ॥ ह्मणतीतुझियाआवडीकारण ॥ म्यांश्रीरामरूपधरिलेंजाण ॥ आतांहेंचरूपध्यानींआणून ॥ द्वैतखंडनकरावें ॥१००॥ शिष्यसंप्रदायीकरूनकांहीं ॥ सद्भावेंकीर्तनकरीतजायीं ॥ तेणेंजडमूढअज्ञानपाही ॥ माझेभजनींलागतील ॥ १ ॥ ऐसेंसांगोनिजानकीवर ॥ मस्तकींठेविलाअभयकर ॥ मागुतीकटावरीठेऊनिकर ॥ स्वरूपसत्वरपालटिलें ॥२॥ पांडुरंगरूपजगज्जीवन ॥ धरितेजाहलेनलागतांक्षण ॥ तोमायालाघवीमनमोहन ॥ लाघवपूर्णकळोंनेदी ॥३॥ धन्यरामदासाचीसप्रेमभक्ती ॥ स्वाधीनकेलाजगत्पती ॥ जैसीइच्छाधरिलीचित्तीं ॥ तैसाश्रीपतीजाहलाकीं ॥ ४ ॥ मगविठ्ठलमूर्तीसआलिंगन ॥ देऊनिसद्भावेंधरिलेचरण ॥ रामदासेंमांडिलेंहरिकीर्तन ॥ प्रेमउल्हासेंतेसमयीं ॥५॥ रामकृष्णस्वरूपेंदोनी ॥ हासंशयहोतानिजमनीं ॥ तोदेवेंतत्काळनिरसूनी ॥ अद्वैतभजनींलाविला ॥६॥ गोपाळ

१ उत्कंठित, प्रकट. २ श्रीरामाचें स्वरूप. ३ आसवें. ४ श्रीरामानें. ५ कमरेवर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कालाझालियावरी ॥ देवासिपुसोनियांचालिलेसत्वरीं ॥ आश्रमासिजातांतेअवसरीं ॥ तोंवाटेसिजेजुरीलागली ॥ ७ ॥
रामदासयेतांनगरांत ॥ चित्तींहर्षलेझाळसाकांत ॥ ह्मणतीधन्यहावैष्णवभक्त ॥ आणिकदैवतनेणेची ॥ ८ ॥ जोपांडुरं
गमूर्तींसिनकरीनमन ॥ तोकैसाघेईलमाझेंदर्शन ॥ तरीआपणमनुष्यरूपधरून ॥ यावेंभेटोनतयासी ॥ ९ ॥ तेव्हांहो
ताशिवाजीनृपवर ॥ तैसेचिजाहलेझाळसावर ॥ अश्वारूढहोऊनसत्वर ॥ कपाळींभंडारलाविला ॥ ११० ॥ ऐशारूपीं
मणिमल्लमर्दन ॥ तेथोनिचालिलेनलागतांक्षण ॥ रामदासासिदेखतांदुरून ॥ अश्वावरूनउतरले ॥ ११ ॥ ह्मणेधन्यआ
जिचासुदिन ॥ स्वामीचेंअकस्मातजाहलेंदर्शन ॥ मगरामदासाचेधरूनिचरण ॥ दीधलेंआलिंगननिजप्रीतीं ॥१२॥ जो
साक्षातशिवअवतारपाहे ॥ तोरामदासाचेवंदीपाये ॥ हस्तजोडोनियांलवलाहें ॥ बोलतीकायेतयासी ॥१३॥ पंढरीसये
तांजाण ॥ आह्मांसदेतजावेंदर्शन ॥ मीगडावरीराहिलोंबहुतदिन ॥ तुमचीभेटइच्छितसें ॥ १४ ॥ ऐसेंबोलोनिझाळ
सापती ॥ रामदासासिबोलेपुढती ॥ जेश्रीरामाचेंभजनकरिती ॥ तेमजआवडतीसज्जन ॥ १५ ॥ रामदासेंउत्तरद्यावें
कांहीं ॥ तोंअदृश्यजाहलेतयेठायीं ॥ अश्वनृपतिकांहींचनाहीं ॥ ह्मणतीहेनवांयीअगाध ॥ १६ ॥ मगविवेकदृष्टींजं
वपाहत ॥ ह्मणेआलेअसतीलझाळसाकांत ॥ तोशंकरअवतारसाक्षात ॥ जोभजनकरितअहर्निशीं ॥ १७ ॥ तरीआ
तांपरतोनजाऊन ॥ पाहावेंतयाचेंनिजस्थान ॥ ऐसाविचारमनेंकरून ॥ चालिलेतेथूनसत्वर ॥ १८ ॥ जोश्रीरामाचा
प्रियकर ॥ साक्षातमारुतीचाअवतार ॥ त्याणेंसत्वरजाऊनगडावर ॥ झाळसावरपाहिला ॥ १९ ॥ श्रीरामस्वरूपआ
ठवूनिमनीं ॥ नमस्कारकेलातयेक्षणीं ॥ सभामंडपींकीर्तनकरूनी ॥ आरतीरचोनीगायिली ॥ १२० ॥ पंचाननहय
वाहनह्मणती ॥ तेरामदासानींकेलीआरती ॥ नमस्कारकरूनिसत्वरगती ॥ तेथूनमागुतीनिघाले ॥ २१ ॥ परतोनिजां

१ घोडयावर. २ हळद. ३ गुप्त. ४ घोडा. ५ नवल, चमत्कार. ६ विचार, तर्क. ७ रात्रदिवस.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वासियेतांजाण ॥ शिवाजीसकळलेंवर्तमान ॥ कींमार्तंडआपुलेंरूपधरून ॥ रामदासासीभेटले ॥ २२ ॥ हेकीर्तिऐको नियांऐसी ॥ शरणआलासद्भावेंसी ॥ मगअधिकारदेखोनिरामदासीं ॥ उपदेशतयासीदीधला ॥ २३ ॥ आणिकसं प्रदायींवैराग्यशील ॥ भजनींलाविलेभक्तप्रेमळ ॥ परीरामदासउदाससर्वकाळ ॥ नकरीतळमळसर्वथा ॥ २४ ॥ मा नापमानदोनीसारिखीं ॥ अरण्यांतबैसलेएकाएकीं ॥ कांहींगुंताकळतांलौकिकीं ॥ तेथोनिशीघ्रींपळावें ॥ २५ ॥ रा जारंकआणिदीन ॥ दृष्टींसलेखीततत्समान ॥ सर्वांभूतींसद्भावपूर्ण ॥ हेंआत्मज्ञानप्रकटिलें ॥ २६ ॥ अनुभवाचेसोलीं वशब्द ॥ ग्रंथरचिलादासबोध ॥ तोसद्भावेंवाचितांबुद्धिमंद ॥ तरीतोहोयअगाधज्ञानराशी ॥ २७ ॥ रामदासाचेंज्ञान अद्भुत ॥ स्वमुखेंरचिलाअध्यात्मग्रंथ ॥ जेश्रवणकरितीवैष्णवभक्त ॥ तरीजीवन्मुक्ततेहोती ॥ २८ ॥ करावयाविश्वो द्धार ॥ भूतळींअवतरलेवैष्णववीर ॥ जेसिद्धांतज्ञानींअतिउदार ॥ करुणाकरदीनाचे ॥ २९ ॥ रामदासाचीअद्भुतस्थि ती ॥ सारिखीचदिसेशेणमाती ॥ पुढेंयेतांइंद्रसंपत्ती ॥ तरीनगणीचित्तींसर्वथा ॥ १३० ॥ श्रवणींऐकावेंश्रीरामकीर्त न ॥ मुखींजपावेंत्याचेंनाम ॥ ध्यानींआणोनिआत्माराम ॥ दृष्टीसमसर्वांभूतीं ॥ ३१ ॥ पुढिलेअध्यायींअतिसुगम ॥ कथारसाळनिरुपम ॥ जोवैष्णवभक्ततुकाराम ॥ त्यासिपुरुषोत्तमपावतील ॥ ३२ ॥ त्याकथेचीरसउत्पत्ती ॥ वदवि ताश्रीरुक्मिणीपती ॥ श्रोतयांविनवीमहीपती ॥ अवधानचित्तींअसोंद्या ॥ ३३ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐक तांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ सप्तचत्वारिंशाध्यायरसाळहा ॥ १३४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ॥ ४७ ॥ ॥ ओव्या ॥ १३४ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

१ काळजी. २ शेवटीं. ३ दरिद्री. ४ पृथ्वीवर. ५ उपमा देतां येत नाहीं अशी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीपंढरीनाथायनमः ॥ जयजयकरुणासागराआनंदघना ॥ भक्तवत्सलाराजीवनयना ॥ वि
धिजनकादानवभंजना ॥ जगज्जीवनाजगदीशा ॥ १ ॥ जयजयविश्वव्यापकाकमलापती ॥ सज्जनजीवनाआनंदमू
र्ती ॥ निर्गुणसगुणाविश्वपती ॥ अतर्क्यगतीवेदशास्त्रां ॥ २ ॥ जयजयविश्वबाहुअपरिमिता ॥ विश्वचक्षूनेंतूंदेखता ॥
विश्वपादेंगमनकर्त्ता ॥ निगमवार्ताबोलिले ॥ ३ ॥ जयजयचित्स्वरूपाआत्मारामा ॥ गुणनिधानाउत्तमोत्तमा ॥ स्वानं
दप्रकाशापुरुषोत्तमा ॥ अनुपममहिमापैंतुझा ॥ ४ ॥ तुझीध्यानांतआणितांमूर्ती ॥ श्रुतिपरतल्याह्मणोनिनेतिनेती ॥
कुंठितझालीपुराणव्युत्पत्ती ॥ शास्त्रसंपत्तिलज्जित ॥ ५ ॥ करितांतपेंतीर्थाटणें ॥ प्राप्तनव्हेचिअनुष्ठानें ॥ तोतूंनिजभ
क्तांचींऐकोनिकीर्तनें ॥ जाशीधांवूनत्याठायां ॥ ६ ॥ करूनियोगाचीआटणी ॥ साधकबैसलेवज्रासनीं ॥ त्यांसिनेण
तांचक्रपाणी ॥ भाविकधुंडोनीपाहासी ॥ ७ ॥ तूंसर्वदेवांतमुकुटमणीश्रेष्ठ ॥ सनकादिकांसिपूज्यवरिष्ठ ॥ तोतूंभाविकां
चेघरींकष्ट ॥ करिसीस्पष्टनिजांगें ॥ ८ ॥ निजभक्तांचेंकामकरितां ॥ लज्जानवाटेतुझियाचित्ता ॥ मानापमाननेणवेसर्व
था ॥ पंढरीनाथातुजलागीं ॥ ९ ॥ तुझ्यानिजभक्तांचीऐसीनिष्ठा ॥ कदानघालितीतुजसंकटां ॥ प्रपंचदुःखाचेदावूनि
कष्टा ॥ वैराग्यवरिष्ठत्यांदेशी ॥ १० ॥ त्यावैराग्याचेंनिजबळ ॥ तुझेंभजनकरितिसर्वकाळ ॥ कीर्तनगातीभक्तप्रेम
ळ ॥ सांडोनितळमळचित्ताची ॥ ११ ॥ तूंअभक्तांच्याहृदयींरिघोनं ॥ त्याभक्तांचेंकरविसीछळण ॥ मगआपणचिनि
जांगेंउडीघालून ॥ राखिसीसन्मानदासांचा ॥ १२ ॥ अघटितदावूनिकरणी ॥ कीर्तिवाढविसीत्रिभुवनीं ॥ ऐसानिज
भक्तांचाऋणी ॥ तूंचक्रपाणीगोविंदा ॥ १३ ॥ त्याचेंवर्णावयासगुणचरित्र ॥ कोणासिकरिसीनिमित्तमात्र ॥ मीतंव
मंदबुद्धिस्वतंत्र ॥ तूंराजीवनेत्रप्रकाशिता ॥ १४ ॥ अनाथनाथारुक्मिणीपती ॥ आतांनमूंतुजपुढतंपुढतीं ॥ ऐसेंहीह्म

१ कमलनेत्र. २ ब्रह्मदेव. ३ दैत्य. ४ लक्ष्मी. ५ वेद. ६ दृढासन. ७ काळजी, चिंता. ८ प्रकट होऊन. ९ पुढपुढें होऊन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णतांनिजप्रीतीं ॥ कुंठितमतिहोतसे ॥ १५ ॥ तुझीकृपानहोतांचिजाण ॥ कदापिनकरवेतुजनमन ॥ जेंज्याकाळींयेई
लघडोन ॥ तेंतुझेसत्तेविणनव्हेची ॥ १६ ॥ क्षणक्षणापालटोनिमती ॥ संकल्पविकल्पयेतीलचित्तीं ॥ तूंतरसाक्षजा
णसीश्रीपती ॥ सांगोंकितीनिजमुखें ॥ १७ ॥ नसांगोंजरीरुक्मिणीकांता ॥ परीकरुणानयेचितुजसर्वथा ॥ जैंतान्हें
बाळकरुदनकरितां ॥ धरीतसेमातादूरतयासी ॥ १८ ॥ तैशारीतींचक्रपाणी ॥ भक्तआळवितीतुजकरुणावचनीं ॥ म
गकृपादृष्टींविलोकूनी ॥ सप्रेमभजनत्यांदेसी ॥ १९ ॥ ऐसींचतुझ्यागृहींचीरीती ॥ मागेंवर्णिलीसभाग्यसंतीं ॥ त्या
निजभक्तांचीअद्भुतकीर्ती ॥ तूंचिश्रीपतिवदवीकां ॥ २० ॥ मागिलेअध्यायींकथालाघव ॥ रामदासाचानिश्चयदृढभा
व ॥ देखूनियांपंढरीराव ॥ जाहलेरामरावनिजांगें ॥ २१ ॥ आतांसादरहोऊनिप्रेमळजनीं ॥ निरूपणरसाळऐकावें
श्रवणीं ॥ दीडयोजनअलकापुरींहुनी ॥ देहुगांवधरणींपुण्यक्षेत्र ॥ २२ ॥ तेथीलनिजभक्ततुकावाणी ॥ आंबलेउपनाम
त्यालागोनी ॥ परीव्यवसायकरितअसतांजनीं ॥ असत्यसर्वथानबोले ॥ २३ ॥ दोघीकांतातयासिअसती ॥ घरीं
उदंडधनसंपत्ती ॥ परीत्याचीअखंडविदेहवृत्ती ॥ स्मरणएकांतींकरितसे ॥ २४ ॥ मातापिताक्रमलियांवर ॥ दुःख
रूपजाहलासंसार ॥ दुष्काळपडलाथोर ॥ तेणेंद्रव्यसमग्रआटलें ॥ २५ ॥ धनधान्यजेंकांहींहोत ॥ तेंआटोनिगेलें
जेथिंच्यातेथ ॥ जैसेंपौर्णिमेचेंभरत ॥ सागराआंतसामावे ॥ २६ ॥ कींवर्षाऋतूचेंअभ्रपाहे ॥ शीतकाळींनाहींसेंहोये ॥
नातरीहोतांसूर्योदय ॥ नक्षत्रेंगगनींचहारपती ॥ २७ ॥ कींवार्धक्यअंगींयेतांपाही ॥ तारुण्यदशानदिसेदेहीं ॥ नातरीउ
ष्णकाळयेतांठायीं ॥ तृणेंसर्वहीनासती ॥ २८ ॥ तेवींस्वदेशींपडतांदुष्काळ ॥ धनधान्यआटोनिगेलेंसकळ ॥ मुलेंमाणसें ॥ १ ॥
करितीतळमळ ॥ परीअन्ननमिळेसर्वथा ॥ २९ ॥ ज्येष्ठकांतेसिपुत्रदोघेजण ॥ कनिष्ठेसिनव्हतेंसंतान ॥ भाजीपालाखा

१ वश करितात. २ गौरव. ३ साहा कोस. ४ पृथ्वीवर. ५ विरक्तपणा. ६ मृत्यु पावल्यावर. ७ हिंवाळ्यांत. ८ लोपतात.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तीउकडोन ॥ परीदृष्टीसकणदिसेना ॥ ३० ॥ तरीहोणारनचुकेचिसर्वथा ॥ ज्येष्ठनिवर्तलीअन्नअन्नकरितां ॥ तेणेंल
ज्जितहोऊनचित्ता ॥ प्रपंचममतान्‍आठवे ॥ ३१ ॥ संपत्तिवैभवहरतांजाण ॥ त्यासवेंचगेलासन्मान ॥ देखतांहांसती
सोयरेपिशुन ॥ तेव्हांलज्जितमनतुकयाचें ॥ ३२ ॥ जेराखितहोतेबहुमर्यादा ॥ तेचिस्वमुखेंकरितीनिंदा ॥ अन्नवस्त्रा
चीसदाआपदा ॥ उदीमधंदाकांहींचालेना ॥ ३३ ॥ पुरुषझालियाद्रव्यहीन ॥ त्यासिनपुसतीसोयरेपिशुन ॥ जेवीं
वृक्षाचींपत्रेंगेलियाझडोन ॥ तेथेंविलासीजननरमती ॥ ३४ ॥ कींरणींपडतांचिनृपती ॥ देहलोभीरणटाकूनिपळती ॥
तेवींदरिद्रयेतांपुरुषाप्रती ॥ पिशुनकरितीअपमान ॥ ३५ ॥ हाकठिणकाळयेतांचिदेखा ॥ परमलज्जितझालातुका ॥ प्रपं
चींकोणीनदिसेसखा ॥ मगचित्तींविवेकाआठविलें ॥ ३६ ॥ कांहींकरितांउदिमाचीहातवटी ॥ तंवतेथेंअधिकहोतसेतुटी
हाकठिणकाळपडतांसंकटीं ॥ अनुतापपोटींउपजला ॥ ३७ ॥ ह्मणेप्रपंचलटकामिथ्यामाया ॥ नरदेहकेवळनाशवंतका
या ॥ म्यांजन्मदवडिलावांयां ॥ पंढरीरायाविसरोनी ॥ ३८ ॥ ढेंकुणाचेबाजेकरितांशयन ॥ तेथेंसुखनिद्रानलागेचिजाण ॥
कींविषकालवूनिरांधिलेंअन्न ॥ तेंउत्तमभोजनह्मणूंनये ॥ ३९ ॥ तेवींप्रपंचींह्मणतीविषयसुख ॥ तेकेवळह्मणावेंअतिमूर्ख ॥
जैसावांझेचापुत्रउपजतांदेख ॥ वायांचिहरिखमानावा ॥ ४० ॥ ऐसाविवेककरूनमानसीं ॥ वैराग्यजाहलेंतुकयासी ॥
सुखदुःखदोनींमानूनिसरसीं ॥ भजनअहर्निशींकरितसे ॥ ४१ ॥ पांडुरंगाचेंदेऊळपुरातन ॥ बहुतांदिवसांचेंहोतेंजी
र्ण ॥ निजांगेंतेंलिंपोनिजाण ॥ केलेंसारवोनसोज्वळ ॥ ४२ ॥ सकळसाधनामाजीश्रेष्ठ ॥ एकादशीव्रतवरिष्ठ ॥ तेंआरं
भूनियांएकनिष्ठ ॥ जागरणवरिष्ठकरावें ॥ ४३ ॥ कीर्तनकरावेंनिजमतं ॥ परीआधींअभ्यासीनवतेंचित्त ॥ कोणीसप्रे
मगातीसाधुसंत ॥ धरावेंध्रुपदत्यामागें ॥ ४४ ॥ मागीलसंतझालेश्रेष्ठ ॥ त्यांचींवचनेंकेलींपाठ ॥ त्याहूनिमार्गनाहीं

१ दुर्जन, निंदक. २ दुःख, संकट. ३ व्यापार. ४ राजा. ५ विचार. ६ पश्चात्ताप. ७ व्यर्थ. ८ हर्ष. ९ शुद्ध, स्वच्छ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वरिष्ठ ॥ भावएकनिष्ठधरियेला ॥ ४५ ॥ भूतमात्रासिदेखोनिदृष्टीं ॥ त्याचीकरुणायेतसेपोटीं ॥ त्यासिपरोपकारेंका
याकष्टी ॥ संतप्तपोटींनिववीत ॥ ४६ ॥ तेजरीह्मणालकैसियारीती ॥ सकळिकऐकामथितार्थी ॥ कोणीप्रवासिपाहतां
वस्ती ॥ त्यांसिमंदिराप्रतीआणावें ॥ ४७ ॥ क्षुधार्थीयासिअसल्याअन्न ॥ तरीघालावेंत्यासिभोजन ॥ नसेलतरीक
ष्टकरून ॥ आणावेंमेळवूनत्यासाठीं ॥ ४८ ॥ कोणीतृषाक्रांतझालियावर्नी ॥ त्यासिनेऊनपाजावेंपाणी ॥ कोणीचाल
तआलेदुरूनी ॥ त्यांसिरगडूनीनिववावें ॥ ४९ ॥ कोणाचेमस्तकींअसलाभार ॥ तोआपणघ्यावासत्वर ॥ तेंवोझेंवाहूनि
पाठीवर ॥ विसांवाक्षणभरत्याद्यावा ॥ ५० ॥ कोणीरोगीप्रवासींपीडित ॥ जवळीनसतांसुहृदआप्त ॥ त्यावरीहोऊनि
कृपावंत ॥ औषधदेऊनपथ्यकरवी ॥ ५१ ॥ गाईवृषभांसिनिर्बळपणी ॥ मोकलूनिदेतीनिर्दयधनी ॥ तेनिजकरेंकुरवाळो
नी ॥ चारापाणीत्यांसद्यावें ॥ ५२ ॥ गृहासियेतांवैष्णवजन ॥ तयांसिघालीलोटांगण ॥ सद्भावेंधुवोनियांचरण ॥ तीर्थप्राश
नकरावें ॥ ५३ ॥ हेंशरीरतपकरितांनिश्चितीं ॥ यावरीजाहलोकविलाचीस्फूर्ती ॥ जेश्रुतिशास्त्रांनींवर्णिलीकीर्ती ॥ तेप्रा
कृतमतीबोलत ॥ ५४ ॥ येथीलमागीलनिरूपणासरिसें ॥ दृष्टांतींआलेअनायासें ॥ तेंकथानकअतिसुरसें ॥ श्रोतींसावका
शेंपरिसावें ॥ ५५ ॥ एकदानामावैष्णवभक्त ॥ पांडुरंगासिवचनबोलत ॥ शतकोटिकविलप्राकृत ॥ तुझीकीर्तीवर्णीनमीं
॥ ५६ ॥ ऐकोनिह्मणेरुक्मिणीकांत ॥ नामयावांप्रतिज्ञाकेलीव्यर्थ ॥ कलिमाजीआयुष्यवर्षेंशत ॥ त्यांतहीआघातसर्वथा
॥ ५७ ॥ आणिप्रतिज्ञाकरूनबोलसीआतां ॥ परीसिद्धीसनजायहेसर्वथा ॥ मगनामदेवेंचरणींठेऊनिमाथा ॥ रुक्मिणीकां
ताविनवित ॥ ५८ ॥ मीतुझ्याआश्रयेंबोलिलेंदेवा ॥ तोनिजांगेंपणसिद्धीसन्यावा ॥ तूंकायएकनकरिसीदेवा ॥ आमुचा
केंवातोकिती ॥ ५९ ॥ ऐकूनिनामयाचेंकरुणाउत्तर ॥ प्रसन्नजाहलाशार्ङ्गधर ॥ मस्तकींठेऊनिअभयकर ॥ सरस्वती

१ भुकाळु. २ ताहानेनें व्याकुळ. ३ बैल. ४ सोडून. ५ आपुल्या हातानें. ६ वेद. ७ थोरी, मोठेपणा,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सकायआज्ञापी ॥ ६० ॥ तुबांयाचेबैसोनिजिव्हाग्रीं ॥ कवित्ववदावेंअतिकुसरी ॥ जेश्रुतीचेगर्भआहेतअंतरीं ॥ ते प्राकृतवैखरींवदावे ॥ ६१ ॥ मगब्रह्मतनयाकरीविनवणी ॥ नामदेववदतीलप्रसादवाणी ॥ परीयाचाचपळलेंलिहिणा रकोणी ॥ चक्रपाणीयोजावा ॥ ६२ ॥ मुखांतूनिनिघतांचिअक्षरें ॥ तत्काळलिहावींनिजकरें ॥ परतोनिपुसिल्याउ त्तरें ॥ तरीनयेचीसर्वथा ॥ ६३ ॥ यावरीह्मणेघननीळ ॥ मीलिहितबैसेनसर्वकाळ ॥ आणिकलेखकतोंयेवेळ ॥ नादिसे चपळसर्वथा ॥ ६४ ॥ मगविलासभोगसर्वटाकूनी ॥ नामयाचेंकवित्वचक्रपाणी ॥ हातींघेऊनिदउतलेखणी ॥ निजां गेंलिहितबैसले ॥ ६५ ॥ ज्याचीवेदशास्त्रेंकरितीस्तुती ॥ व्यासवाल्मीकादिकवर्णिती ॥ तोनामयाचेंकवित्वलिहिनि श्चिती ॥ नवलमजप्रतीवाटलें ॥६६॥ सांडोनियांवैकुंठभुवन ॥ सांडोनिक्षीरसागरशेषशयन ॥ हातींघेऊनिदौतलेख ण ॥ जगज्जीवनतिष्ठती ॥ ६७॥ कायनिघेलमुखांतूनी ॥ तेथेंअवधानदेतचक्रपाणी ॥ निद्राआळससर्वटाकूनी ॥ अ सतीनिशिदिनींसावध ॥६८॥ ऐसेंबहुतदिवसश्रीपती ॥ नामयाचेबैसोनिसंगती ॥ लोकवित्वसंख्येचीपाहतांगणती ॥ जाहलीकितीऐकाते ॥ ६९॥ चाळीसलक्षचौऱ्यांणवकोटी ॥ नवलक्षलळितआलेंशेवटीं ॥ इतुकीसंख्यादेखोनिदिठीं ॥ जाहलेजगजेठीविस्मित ॥ ७० ॥ ह्मणतीधन्यनामयाचाप्रेमा ॥ अद्भुतवर्णिलामाझामहिमा ॥ सर्वथापारनलागेनिग मा ॥ त्यामजपुरुषोत्तमावशकेलें ॥ ७१ ॥ ऐसेंह्मणूनिजगजेठी ॥ निजकरेंनामयाचीपाठीथापटी ॥ ह्मणेकांहींप्रेमारा हिलापोटीं ॥ तोपुढेंगोष्टीवदवीन ॥ ७२ ॥ आतांमाझेंस्वरूपआठवोनिमनीं ॥ सप्रेमपाहादृष्टीभरोनी ॥ ऐसेंबोलतां चक्रपाणी ॥ नामाचरणींलागला ॥ ७३ ॥ त्यांशतकोटीचाकेलापण ॥ तोसिद्धीसन्यावयाजगज्जीवन ॥ बाकीराहिलें कवित्वलेखन ॥ तेंकरीसंपूर्णनिजांगें ॥ ७४ ॥ मगनामयाचाधरूनिहात ॥ तुकयाचेस्वप्नींआलेत्वरित ॥ ह्मणेवाउगेंन

१ कौशल्यानें. २ स्पष्ट जिव्हेनें. ३ सरस्वती. ४ रात्रंदिवस. ५ दृष्टीनें. ६ वेदांस.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बोलावेंनिश्चित ॥ करावेंकवित्वममाज्ञा ॥ ७५ ॥ प्रमाणाचीसंख्याशतकोटी ॥ तेसिद्धीसपाववीतूंशेवटीं ॥ ऐसेंह्मणो
निजगजेठी ॥ पाठथापटीनिजकरें ॥ ७६ ॥ जागृतहोऊनिजंवपाहत ॥ तंवदृष्टीसिनदिसेरुक्मिणीकांत ॥ नामदेवही
नाहींतेथ ॥ चमत्कारअद्भुतदेखिला ॥ ७७ ॥ मगतेचिआज्ञावंदोनिशिरीं ॥ आरंभिलीकवित्वकुंसरी ॥ त्याविणवाउ
गीवैखरी ॥ गोष्टीदुसरीनबोले ॥ ७८ ॥ कीर्तनकरितांप्रेमेंकरूनी ॥ प्रसादिकरसिकवदेवाणी ॥ प्रेमळभक्तआवडी
करूनी ॥ ऐकतीश्रवणींसद्भावें ॥ ७९ ॥ कोणीविकल्पीजेविचक्षणे ॥ तेह्मणतीहेंकवित्वनूतन ॥ आह्मासिनवाटेप्रमा
ण ॥ नकरूंश्रवणसर्वथा ॥ ८० ॥ मागीलसंतांचींटाकूनिवचनें ॥ आपुलींकासयादाविशीभूषणें ॥ आइतींटाकोनिप
कान्नें ॥ हातपोळवणेंकासया ॥ ८१ ॥ ह्मणालआज्ञाकर्त्तारुक्मिणीरमण ॥ त्याचेंकवित्वकांनिंदितीजन ॥ तरीभावि
कांपाठीपुरातन ॥ विकल्पीअसतीबहुसाल ॥ ८२ ॥ मागेंत्रेतायुगींवाल्मीकीन ॥ भविष्यकेलेंरामायण ॥ तेव्हांही
होतेअभक्तजन ॥ तेअप्रमाणमानिती ॥ ८३ ॥ मगअवतारघेऊनिजानकीपती ॥ लीलादाविलीतैशाचरीती ॥ तेअनु
भवासयेतांप्रचीती ॥ यथार्थमानितीसकळिक ॥८४॥ द्वापारींबोलिलेकविन्यास ॥ परीकौरवांसिनवाटेविश्वास ॥ मगघ
डोनिआलियाअनायास ॥ धृतराष्ट्रसंजयासनमस्कारी ॥८५॥ एवंभावार्थेंयामागेंविकल्पीनर ॥ लागलेअसतीपरंपर
ह्मणोनितुकयाचेअभंगसाचार ॥ निंदितीपामरनिजमुखें ॥८६॥ सूर्याचाप्रकाशदेखोनिदृष्टीं ॥ ढुंढुळउगेचिजलपतीपोटीं ॥
कींपूर्वसचंद्रयेतांनिकटीं ॥ तस्करांसिभेटीनावडे ॥८७॥ दातयाचीऐकोनिकीर्तीं ॥ कृपणउगेचित्याधिक्कारिती ॥ कींदिव्य
औषधीचमकतांरातीं ॥ रोगतळमळतीचित्तांत ॥८८॥ पंडिताचीदेखोनिवक्तृत्वता ॥ अजांपाळह्मणतीहेबडबडवृथा ॥ कींगंध
र्वसुस्वरगायनकरितां ॥ तेथेंगर्दभभुंकतांनराहाती ॥८९॥ बकुळीचासुगंधयेतांपाहे ॥ तोपुंगळवेलीसमानेलकाये ॥ सुंदर

१ कौशल्य. २ संशयखोर. ३ ज्ञानी. ४ निंदा करणारे. ५ काजवे. ६ उदयास. ७ चोरांस. ८ धनगर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कपिलाअसलीगाय ॥ तरीयवनकायपूजिती ॥ १० ॥ ब्राह्मणप्रतिमेचिपूजाकरिती ॥ आणिअविंधतयाफोडुंपाहाती ॥ तेवींभाविकतुकयाचेंकीर्तनऐकती ॥ विकल्पीनिंदितीनिजमुखें ॥ ११ ॥ परीदोनीमानूनतेसमान ॥ करितसंतोश्रीहरिभजन ॥ कोणीहरिदासकरितांकीर्तन ॥ तरीसादरश्रवणींऐकावें ॥ १२ ॥ दिवसेंदिवसअधिकचिप्रीती ॥ यानावेंच ढतीवाढतीभक्ती ॥ निद्राकिंचितनलागेराती ॥ करितांएकांतींहरिभजन ॥ १३ ॥ आषाढीकार्तिकीपंढरीसी ॥ नेमेंवारीधरिलीऐसी ॥ मगपंधरादिवसींएकादशीसी ॥ जायदर्शनासीनिजभावें ॥ १४ ॥ निरपेक्षतातरीकिती ॥ एकेदिवसींशिवाजीनृपती ॥ तुकोबाचीऐकूनिकीर्ती ॥ दर्शनाप्रतीपातले ॥ १५ ॥ तेव्हांअविंधांचेंप्राबल्यथोर ॥ सिंहगडींहोतानृपवर ॥ कोणासिनकळतांसाचार ॥ पुणियासिसत्वरपातला ॥ १६ ॥ तेथेंएकावाणियाचेघरीं ॥ तुका वैष्णवकीर्तनकरी ॥ राजयासिकळतांसत्वरीं ॥ संतोषअंतरींवाटला ॥ १७ ॥ मगनिशीमाजीकोणानकळत ॥ लपोनि आलेनगरांत ॥ यवनाचेंभयवाटेबहुत ॥ कींनेतीलत्वरितधरूनी ॥ १८ ॥ तुकोबाचेंघेऊनदर्शन ॥ गडावरीजावेंपरतोन ॥ ऐसामनींहेतधरून ॥ आलालपोननृपनाथ ॥ १९ ॥ रुप्याचेंतबकसोज्वळजाण ॥ तयांतघातल्यामोहराहोन ॥ तुकयापुढेंद्रव्यठेवून ॥ केलेंनमनसाष्टांग ॥ १०० ॥ तेंराजद्रव्यदेखोनित्वरित ॥ थरथरांकांपेविष्णुभक्त ॥ मगशिवाजीसकायबोलत ॥ तेंपरिसासंतभाविकहो ॥ १ ॥ कासयापाहिजेद्रव्यठेवा ॥ एकविठ्ठलचिआह्मांसिव्हावा ॥ त्याविणआणिकंप्रपंचहेवा ॥ आमच्याजीवानावडे ॥ २ ॥ जैसाजोहारियाच्यासाटोवाटी ॥ गाराआणिल्याउठाउठी ॥ तेवींआमुचीघ्यावयाभेटी ॥ कनकवोंटीआणिली ॥ ३ ॥ तुझीविशाळऐकतोंमती ॥ आजिउदारत्व कळलेंनृपती ॥ आह्मांवैष्णवांसिनावडेचित्तीं ॥ तेंपुढेंनिजप्रीतींठेविलें ॥ ४ ॥ तुवांआणिलेंद्रव्यहोन ॥ हेंआह्मांगोमां

१ यवन. २ शिवाजी राजा. ३ रात्री. ४ तुकाराम बावा. ५ रत्नपारख्याच्या दुकानावर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ससमान ॥ ऐसेंऐकोनिनिर्वाणवचन ॥ लज्जितमनन्नृपनाथ ॥ ५ ॥ पुढतीरायासिबोलेवचन ॥ आमुचेंव्हावेंसमाधान ॥
ऐसेंइच्छितअसेलतुझेंमन ॥ तरीतेऐकेखूणसांगतों ॥ ६ ॥ तुह्मींकरावेंविठ्ठलनामस्मरण ॥ तेणेंचिआह्मींसुखसंपन्न ॥
येरसंपत्तिदेशीलधन ॥ तेंमृतिकेसमानन्नृपनाथा ॥ ७ ॥ गळयांतकंठीमिरवातुळसी ॥ व्रतकरावेंएकादशी ॥ तेणेंचिस
माधानआह्मांसी ॥ द्रव्यराशीनघेतां ॥ ८ ॥ चित्तींधरूनिप्रेमउल्हास ॥ ह्मणावेंविठोबाचादास ॥ हेचिआमुचीआहे
आस ॥ पुरवासावकाशघणीवरी ॥ ९ ॥ ऐसीनिरपेक्षदेखोनिस्थिती ॥ मनांतआश्चर्यकरीन्नृपती ॥ मगअनन्यभावें
लोटांगणप्रीतीं ॥ पुन्हांमागुतीघातलें ॥ ११० ॥ तेदिवसींअसेहरिदिनीं ॥ कीर्तनऐकेप्रेमेंकरूनी ॥ तोंदोनसहस्त्रपठाण
चाकणाहूनी ॥ अविंधेंत्वरितपाठविले ॥ ११ ॥ हेरठेविलेहोतेपाळती ॥ त्याणींसांगीतलेंयवनाप्रती ॥ कींपुणियासिआला
नृपती ॥ दर्शनासिरातींतुकयाचे ॥ १२ ॥ मगस्वारपाठविलेत्यादुर्जनीं ॥ कींत्यासिआणावेंशीघ्रधरूनी । नानापरीचीं
शस्त्रेंघेऊनी ॥ आलेधांवूनीअर्धरात्रीं ॥ १३ ॥ जेथेंमांडिलीहोतीकथा ॥ तोवाडावेढिलासभोंवता ॥ आंतीलमनुष्यबाहेर
निघतां ॥ तेजाऊंसर्वथानदेती ॥ १४ ॥ ह्मणतीशिवाजीसवोळखोनिसत्वर ॥ बांधोनिआणावेंबाहेर ॥ रायासिकळलासमा
चार ॥ कींवेढिलेंमंदिरपरचक्रें ॥ १५ ॥ कोणीह्मणतींनृपवरासी ॥ आतांउठोनिपळावेगेंसी ॥ तेणेंभयउपजलेंमानसीं ॥
विचारतयासीपडियेला ॥ १६ ॥ देखोनिश्रोतयांचेंदुश्चिंतचित्त ॥ तुकयासिकळलावृत्तांत ॥ ह्मणेकायगुजगुजकरितांमनां
त ॥ सांगात्वरितमजपासीं ॥ १७ ॥ ऐकूनितुकयाचेंवचन ॥ हळूचसांगतीसज्ञानजन ॥ कींराजयासिन्यावयाकारण ॥ पर
चक्रदारुणपातलें ॥ १८ ॥ ह्मणोनिआतांसत्वरगती ॥ येथोनिपळवावान्नृपती ॥ आज्ञाद्यालअह्मांप्रती ॥ तरीचवांचती
प्राणयाचे ॥ १९ ॥ तयांसितुकाबोलेकाये ॥ कीर्तनांतूनसर्वथाउठोंनये ॥ धर्मनीतितोंऐसीआहे ॥ नेणतांकायेसकळिक

१ शेवटचें. २ मनोरथ. ३ एकादशी. ४ चिंताक्रांत, दिलगीर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ १२० ॥ ऐसेंऐकोनिनृपती ॥ निश्चयकरूनबैसलाएकचित्तीं ॥ ह्मणेतारितामारितारुक्मिणीपती ॥ त्याविणत्रिजग
तींअसेना ॥ २१ ॥ आजएकादशीपर्वकाळसुदिन ॥ सन्निधसंतवैष्णवजन ॥ एथेंकीर्तनांतआलेंजरीमरण ॥ तरीभाग्य
धन्यपैंमाझें ॥ २२ ॥ इकडेबाहेरपरदळविचारकरिती ॥ कींधरूनिआणावासत्वरनृपती ॥ वाडयांतहेरउदंडयेती ॥ प
रीकोणीचनोळखतीरायासी ॥ २३ ॥ यवनासिसांगतीजाऊन ॥ कीर्तनींबैसलेबहुतजन ॥ तयांतशिवाजीआहेकोण ॥
आह्मांकारणकळेना ॥ २४ ॥ ऐकोनिपापियांचेंवचन ॥ क्रोधेंसंतापलातोदुर्जन ॥ ह्मणेकथेंतबैसलेजितकेजन ॥ तितुके
मारूनटाकावे ॥ २५॥ त्यांतसहजचिराजासांपडला ॥ ऐसानिश्चयदृढकेला ॥ तोंअंतरसाक्षतुकयाला ॥ वृत्तांतकळला
तेसमयीं ॥ २६ ॥ मगध्यानांतआणोनिपंढरीनाथ ॥ नानापरीचीकरुणाभाकित ॥ जयजयअनाथनाथकृपावंत ॥ धां
वेलरितयेसमयीं ॥ २७ ॥ तुझ्याकीर्तनासिआलेसज्जन ॥ तयांसितत्काळवोढवलेंविघ्न ॥ आतांहेंअरिष्टनिवारण ॥ तु
जविणकोणकरील ॥ २८ ॥ जेथेंतुझेंनामसंकीर्तन ॥ तेथूनिविघ्नेंजातीपळोन ॥ ऐसेंसंतबोलिलेवचन ॥ तेंअसत्यहोऊन
आलेंकीं ॥ २९ ॥ माझेंचित्तपाहासीजगज्जीवना ॥ परीमीभीतनाहींआपुल्यामरणा ॥ परीदुःखहोईलसंतसज्जना ॥
तेंमाझियानयनानदेखवे ॥ १३० ॥ आमुचीजातिपरंपराऐसी ॥ रुक्मिणीपतीतूंकायनेणसी ॥ विक्षेपझालाजोभज
नासी ॥ याहूनिमरणआह्मांकोणतें ॥ ३१ ॥ ऐसेंऐकोनिकरुणावचन ॥ तत्काळआलेजगज्जीवन ॥ तुकयासिदेऊनि
आलिंगन ॥ ह्मणेलांकीर्तनकरावें ॥ ३२ ॥ परचक्रआलेंमहाविघ्न ॥ तेंमीनिजांगेंकरितोंनिवारण ॥ तूंस्वस्थकरूनिआ
पुलेंमन ॥ सप्रेमभजनकरावें ॥ ३३ ॥ ऐसेंह्मणोनिघनसांवळा ॥ शिवाजीराजाआपणजाहला ॥ अश्वारूढहोऊनिते
वेळां ॥ सत्वरचालिलाबाहेरी ॥ ३४ ॥ कीर्तनींबैसलेलोकसमस्त ॥ तयांसिनकळतांहावृत्तांत ॥ कौतुकमांडिलेंअत्यद्भुत

१ पुष्कळ. २ सेवकांचें, हेरांचें. ३ खोटें झालें. ४ अडथळा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेंपरिसानिजभक्तभाविकहो ॥ ३५ ॥ ज्यावाडचांतहोतेंहरिकीर्तन ॥ तेथेंअकस्मातप्रकटलेजगज्जीवन ॥ आपणचिस्व
मुखेंहाक्रमारून ॥ ह्मणेजातोपळूननृपनाथ ॥ ३६ ॥ दोनसहस्रपठाणींवेढोनिवाडा ॥ घातलाहोतात्याणींगराडा ॥
तितुकेहीहोऊनिमागांपुढां ॥ पाहातीरोकडानृपनाथ ॥३७॥ क्षणएकपडोनितयाचेदिठी ॥ चपळलेंचालिलेउठाउठी ॥
सैन्यल्लाऊनिआपुलेपाठी ॥ लाघवजगजेठीदावित ॥ ३८ ॥ नगरवासीलोकसमस्त ॥ जाग्रतहोऊनिअतिलरित ॥
माडचामाळवदेऊभेराहात ॥ कायबोलतपरस्परें ॥ ३९ ॥ राजापुढेंजातोपळोन ॥ तयामागेंलागलेयवन ॥ आतांन
वांचतीलत्याचेप्राण ॥ अनर्थहोईलदिसताहे ॥ १४० ॥ अविंधांच्यासैन्यांतून ॥ पाळतीहेरजेठेंविलेजाण ॥ त्यांसि
दिसेजगज्जीवन ॥ जैसानृपवरशिवाजी ॥ ४१ ॥ एकह्मणतीधराधरा ॥ राजापळोनजातोखरा ॥ हडबडझालीमहावी
रां ॥ ह्मणोनिसलरधांवती ॥ ४२ ॥ एकाजवळीचदिसेपाही ॥ धरूंजातांकांहींचनाहीं ॥ एकह्मणतीपळोनिकायी ॥ आ
तांचलवलाहींमारावा ॥ ४३ ॥ एकह्मणतीघालावेढा ॥ कायपाहतांरेमागांपुढां ॥ एकह्मणतीतुह्मांभ्यांडा ॥ वीररोक
डाधरवेना ॥ ४४ ॥ आपणदोनसहस्रशूर ॥ इतुक्यांतूनिपळतोएकलावीर ॥ कासयावागवितांहतियार ॥ प्राणसलर
द्यानाकां ॥ ४५ ॥ एकह्मणतीउगवेलदिवस ॥ मगराजयासधरूंसावकाश ॥ आतांआमुचेडोळांनदिस ॥ व्यर्थकासा
वीसकांहोतां ॥ ४६ ॥ क्षणएकठायींराहिलेस्थिर ॥ तंवकौतुककरीशार्ङ्गधर ॥ आपणप्रकटझालेसलर ॥ ह्मणतीधरारेसां
पडला ॥ ४७ ॥ मागुतीसकळलागलेपाठीं ॥ तरीतयांसिनातुडेजगजेठी ॥ क्षणएकसंनिधपडोनिदृष्टीं ॥ धरितांनिक
टींआतुडेना ॥ ४८ ॥ मगशुक्लपक्षींचेंपडिलेंचांदण ॥ त्याप्रकाशेंधांवतीयवन ॥ प्रहररात्रींतपांचयोजन ॥ अरण्यांत
नेऊनघातलें ॥ ४९ ॥ ज्याडोंगरींलागलेंकंटकवन ॥ महाभयानकवोसाडअरण्य ॥ त्यास्थळाप्रतिनेऊनिसैन्य ॥ म

१ शिवाजी राजा. २ दृष्टीस. ३ कौतुक, नवलाई. ४ यवनाच्या. ५ गडबड, धांदल. ६ भितऱ्यांस. ७ आटपत नाहीं, सांपडत नाहीं. ८ कांटेरी झाडी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गजगज्जीवनपरतले ॥ १५० ॥ तेथेंसकळवीरसभोंवतेंपाहती ॥ तोंकोठेंचिनदिसेशिवाजीनृपती ॥ ह्मणतीआपुल्या सपडलीभ्रांती ॥ धांवलोंरातींव्यर्थचि ॥ ५१ ॥ एकह्मणतीतरळलीदृष्टी ॥ तेणेंवायांचिझालोंकष्टी ॥ एकह्मणतीसन्नि धरूपष्टी ॥ आह्मींतंवदृष्टींदेखिला ॥ ५२ ॥ परतोनिचालिलेमागुती ॥ तंवमावळोनिगेलानिशापती ॥ आंधारींकांहीं चनदिसेरातीं ॥ मार्गनिश्चितींसांपडेना ॥ ५३ ॥ एकापुढेंएकअश्वहाकिती ॥ अडखळोनितेचिठायींपडती ॥ येरयेरां सीकायबोलती ॥ बरवीगतीदिसेना ॥ ५४ ॥ आंगासिलागतांकांटवण ॥ तेणेंवस्त्रेंगेलींफाटून ॥ एकदीर्घस्वरेंकरिती रुदन ॥ जातीलप्राणह्मणोनी ॥ ५५ ॥ हिंवसुटलेंअतिप्रबळ ॥ तेणेंचिसैन्यझालेंविकळ ॥ वोसाडअरण्यांतकरितीतळ मळ ॥ अश्वतंवसकळपळाले ॥ ५६ ॥ अद्भुतकेलेंजगज्जीवनें ॥ कोणासिनमारितांजीवेंप्राणें ॥ नागडेउघडेफिरतीयव न ॥ आलीनागवणसकळांसी ॥ ५७ ॥ शस्त्रेंहातीचींपडलींसत्वरीं ॥ अश्वतोंजाहलेरानभरी ॥ कांटवणींराहिलींवस्त्रें दूरी ॥ केलेंभिकारीसकळिक ॥ ५८ ॥ ऐसादुर्जनासिदंडकरूनी ॥ परतोनिआलेचक्रपाणी ॥ तुकयाचेकीर्तनींयेऊ नीं ॥ प्रेमरंगणींनाचती ॥ ५९ ॥ श्रवणासिबैसलेलोकसमस्त ॥ तयांसिनकळतांहावृत्तांत ॥ विघ्नटाळीतपंढरीनाथ ॥ मावअघटितकरूनियां ॥ १६० ॥ तुकयाचेकानींजगज्जीवन ॥ येऊनिसांगेवर्तमान ॥ आतांनिर्भयकरूनमन ॥ करा वेंकीर्तनआवडी ॥ ६१ ॥ मगजयजयकारेंपिटोनिटाळी ॥ हरिनामेंगर्जेतीसकळमंडळी ॥ वैष्णवनाचतीकीर्तनमेळीं ॥ तुष्टलावनमाळीह्मणोनी ॥६२॥ रायासिसांगतीसकळजन ॥ परचक्रआलेंहोतेंदारुण ॥ तयाचेंनकरितांनिवारण ॥ गेलें पळोनआपेंआप ॥६३॥ आश्चर्यकरीनृपवर ॥ ह्मणेमजपावलारुक्मिणीवर ॥ अरिष्टआलेंहोतेंथोर ॥ आह्मांअनिवा रसकळांसी ॥६४॥ यापरीमानूनिसमाधान ॥ श्रवणकरितीहरिकीर्तन ॥ चारप्रहरझालेंजागरण ॥ तोंउदयासिअरुण

१ मायावली. २ चंद्र. ३ एकमेकांशीं, ४ थंडी. ५ गलित, घाबरे. ६ घोडे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पातला ॥ ६५ ॥ मगउजळोनिमंगळारती ॥ ओंवाळिलारुक्मिणीपती ॥ हरिनामेंगजौनिक्षितीं ॥ दंडवतप्रीतीघातलें ॥ ६६ ॥ बिऱ्हाडासिजातांनृपनाथ ॥ ग्रामांतनरनारीकायबोलत ॥ तुह्मांऐसाचिरात्रींपळत ॥ गेलाबरितनगरांतूनी ॥ ६७ ॥ हेंयवनानेंदेखोनिदृष्टीं ॥ पळतचिगेलेत्याचियापाठी ॥ कैसेवांचलेतसंकटीं ॥ आश्चर्यपोटींवाटतें ॥ ६८ ॥ राजा चमत्कारलामनीं ॥ ह्मणेईश्वराचीअघटितकरणी ॥ वांचविलेंअरिष्टापासोनी ॥ चक्रपाणींकृपाळें ॥ ६९ ॥ एकेदिवसीं शिवाजीनृपती ॥ विचारकरीआपुलेचित्तीं ॥ तुकोबासिदेतांधनसंपत्ती ॥ परीतेनघेतीसर्वथा ॥ १७० ॥ परीदीनरूपध रूनिआपण ॥ नेऊनद्यावेंत्याचेघरींधान्य ॥ येरवींतोमाझेंराजान्न ॥ तेंतोनघेचीसर्वथा ॥ ७१ ॥ ऐसीयुक्तीयोजूनिजा ण ॥ वस्त्रेंनेसलाफाटकींजीर्ण ॥ वृषभावरीधान्यदोनमण ॥ चालिलेघेऊनतेधवां ॥ ७२ ॥ दोनघटिकालोटतांयामि नी ॥ तुकोबाचियापातलासदनीं ॥ तेंतेबैसलेहोतेवृंदावनीं ॥ हातींस्मरणींघेऊनियां ॥ ७३ ॥ तोंराजायेऊनियांसत्व रीं ॥ गोणीलोटोनिटाकिलीद्वारीं ॥ ह्मणेस्वामीम्यांकरूनिमजुरी ॥ धान्यमेळवूनीआणिलें ॥ ७४ ॥ तुमचेचरणींधरूनि हेत ॥ येथेंघेऊनिआलोंकिंचित ॥ मीअनाथदीनआहेंबहुत ॥ हेंसांठवागृहांतआपुल्या ॥ ७५ ॥ मगनमनकरूनिसत्व रीं ॥ राजागेलातेअवसरीं ॥ तुकयासिकळलेंनिजअंतरीं ॥ कृत्रिमपरीह्मणोनियां ॥ ७६ ॥ ह्मणेओळखसांगतांरायाका रण ॥ त्याचेप्रेमाचेंहोईलखंडण ॥ ह्मणोनिउगेंचिधरूनमौन ॥ नामस्मरणकरीतसे ॥ ७७ ॥ मगनिजकांतेप्रतीबोलत ॥ धान्यआणिलेंतोंनृपनाथेंत्वरित ॥ गृहांतठेविलेंजरीसमस्त ॥ तरीखंडेलसुकृतआपुलें ॥ ७८ ॥ जरीएकादिवसापुरतें अन्न ॥ निजकरेंघेसीलत्यांतून ॥ वरकडद्विजांसिबोलावून ॥ त्यांजकारणंअर्पावें ॥ ७९ ॥ ऐसीऐकोनियांगोष्टी ॥ कां तासक्रोधजाहलीपोटीं ॥ आपुल्याकरेंललाटपिटी ॥ ह्मणेमीकरंटीअभाग्य ॥ १८० ॥ अवचितगोणीआलीघरा ॥

१ गरीब, अनाथ. २ जुनीं, मळलेलीं. ३ बैलावर घालून. ४ रात्र. ५ पुंण्य. ६ क्रोधाविष्ट, क्रोधायमान.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तेंधान्यखाऊंनेदीचपोरां ॥ वांटिलेंगांवींचियाद्विजवरां ॥ म्यांकायसंसाराकरावें ॥ ८१ ॥ यावरीकांतेसिउत्तरदेत ॥
जैसेंआपुलेंआहेसंचित ॥ तोवांटाटाकोनिश्चित ॥ घ्यावेंबहुतकोठोनी ॥ ८२ ॥ एकेदिवसींदेवालयांत ॥ तुकोबाआनं
देंकीर्तनकरित ॥ तोंनवलवर्तलेंअद्भुत ॥ तेंपरिसाचरित्रभाविकहो ॥ ८३ ॥ टाळमृदंगवाजवितीसुस्वर ॥ तेणेंनादेंकोंद
लेंअंबर ॥ तटस्थहोऊनिनारीनर ॥ ऐकतीसादरहरिलीला ॥ ८४ ॥ तेथेंएककांसारभाविकसज्जन ॥ ऐकावयायेतसेकी
र्तन ॥ त्याचियामुलासव्यथादारुण ॥ होतीप्राणकासावीस ॥ ८५ ॥ कांताह्मणेतयासी ॥ आजितुह्मीनजावेंहरिकीर्तना
सी ॥ तेणेंनायकोनितिचेवचनासी ॥ गेलाकीर्तनासीसत्वर ॥ ८६ ॥ तोमागेंलेंकुराचेजातांप्राण ॥ मातादीर्घस्वरेंकरीरु
दन ॥ तैसेंचप्रेतखांद्यावरीघेऊन ॥ कीर्तनांतआणोनटाकिलें ॥ ८७ ॥ कांसारीणह्मणेतुकोबासी ॥ त्वांआमचीपाठचेत
लीकैसी ॥ वेडलावूनिभ्रतारासी ॥ मायालोभासीसांडविलें ॥ ८८ ॥ तुझीकथाऐकिलियान ॥ माझेबाळकाचेगेलेप्राण ॥
आमुचेघरींपूर्वापासून ॥ नाहींधारजिणहरिनाम ॥ ८९ ॥ ऐसेंबोलोनिउद्धत ॥ कीर्तनरंगींठेविलेंप्रेत ॥ तेणेंश्रोतयांचेंदु
खवोनिचित्त ॥ राहिलेनिवांतअवघेची ॥ ९० ॥ जैसेंभोणंगपक्कान्नजेवित ॥ त्यामाजीमृत्तिकापडलीअकस्मात ॥ तेवींकी
र्तनामाजीआणितांप्रेत ॥ रंगसमस्तवितुळला ॥ ९१ ॥ लोकह्मणतीऐककांसारिणी ॥ तूंयेथेंकुणपआलीसघेऊनी ॥ प
रीयाजपासींनाहींमृतसंजीवनी ॥ मगलेंकरूंउठवूनीदेईल ॥ ९२ ॥ ऐसेंबोलतांसकळलोकां ॥ प्रतिउत्तरदेतसेतुका ॥
हरिनामापरीससुधारसफिका ॥ जोइंद्रादिकांदुर्लभ ॥ ९३ ॥ विश्वासनमानीतुमचाजीव ॥ तरीतत्काळपाहायाचाअनु
भव ॥ ऐसेंह्मणोनिभक्तवैष्णव ॥ अपूर्वलाघवंदाखविलें ॥ ९४ ॥ श्रोतयांसिह्मणेतयेक्षणीं ॥ विठ्ठलविठ्ठलवदावाणी ॥ हेचि
अमृतसंजीवनी ॥ विकल्पमनींनधरावा ॥ ९५ ॥ ऐसेंबोलतांसभारंगणीं ॥ विठ्ठलनामाच्याउठल्याध्वनी ॥ नादब्रह्ममु

१ आकाश. २ दरिद्री, भिकारी. ३ प्रेत. ४ अमृत. ५ चमत्कार गौरव. ६ संशय.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सावोनी ॥ गगनंभरोनीकोंदलें ॥ ९६ ॥ मंडपतिवाशागालिचे ॥ विठ्ठलनामगर्जतीवाचें ॥ खडेपाषाणतेभूमीचे ॥ बोल
तीवाचेहरिनाम ॥ ९७ ॥ दिंडचापताकाटाळांतूनी ॥ विठ्ठलनामाच्यानिघतीध्वनी ॥ तेव्हांसुरवरआकाशींयेऊनी ॥
तोआनंदनयनींपाहाती ॥ ९८ ॥ जाणतेनेणतेथोरलाहान ॥ विठ्ठलह्मणतीप्रेमेंकरून ॥ भाळेंभोळेसकळजन ॥ प्रेमें
करूनडुल्लती ॥ ९९ ॥ एकमेकांकडेलोकपाहाती ॥ तंवअवघ्यादिसतीविठ्ठलमूर्ती ॥ यातीवर्णवेगळेंनदिसती ॥ अद्भु
तस्थितीबाणली ॥ २०० ॥ तंवअद्भुतनवलवर्तलेंतेथ ॥ प्रेतउठोनिबैसलेंसावचित ॥ मगसावधह्मणतीलोकसमस्त ॥
देखतांविस्मिततेजाहले ॥ १ ॥ सन्निधहोतीत्याचीमाता ॥ संतोषवाटलातिचियाचित्ता ॥ ह्मणेमीअज्ञानपणेंनेणतां ॥
निंदिलेंवृथातुकयासी ॥ २ ॥ कौतुकदेखिलेंसकळजनीं ॥ विश्वासबैसलात्यांचेमनीं ॥ ह्मणतीअमृतसंजीवनी ॥ हरि
नामाहूनिअसेना ॥ ३ ॥ पुढिलेअध्यायींकथासुंदर ॥ वदवितांश्रीरुक्मिणीवर ॥ महीपतीसिदेवोनअभयकर ॥ वस
विलेंअंतरनिजकृपें ॥ ४ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ अष्टचत्वा
रिंशाध्यायरसाळहा ॥ २०५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ४८ ॥ ॥ ओंव्या ॥ २०५ ॥ ॥ छ ॥

१ आकाश. २ इंद्रादि देव. ३ पटली, झाली.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीलक्ष्मीरमणायनमः ॥ जयकृपासागराजगजेठी ॥ तूंसगुणस्वरूपदाखविसीदृष्टीं ॥ जैंभ
क्तपडतांमहासंकटीं ॥ तैंतूंनटळसीआपेंआप ॥ १ ॥ सर्वांगींदिसशीघनसांवळा ॥ दिव्यपीतांबरकांसेपिंवळा ॥ पिंव
ळेंचिपदकवक्षस्थळा ॥ त्यावरीरत्नकळाफांकती ॥ २ ॥ पिंवळाचिमुकुटकनकदीप्ती ॥ देखोनिलज्जितनिशापती ॥ पिं
वळीकुंडलेंकानींतळपती ॥ मकराकृतीसुढाळें ॥ ३ ॥ पिंवळीचकंठींमोहनमाळ ॥ मध्येंकौस्तुभदिसेसुढाळ ॥ दृष्टीसदे
खोनिसर्वकाळ ॥ भक्तप्रेमळभुललेपैं ॥ ४ ॥ पिंवळाकेसरीतिलकललाटीं ॥ पिंवळीचअंगींचंदनउटी ॥ पिंवळयाचव
ळीनेंक्षुद्रघंटी ॥ देखतांचिदृष्टींतल्लीन ॥ ५ ॥ पिंवळेंचिवस्त्रपांघरुण ॥ पिंवळेंचहातींवीरकंकण ॥ पिंवळेंचअंगींभूषण ॥
तुजकारणशोभती ॥ ६ ॥ पिंवळाचचरणींवांकीतोडर ॥ पिंवळेशोभतीवाळेनेपुर ॥ नखींचेंतेजसर्वकाळ ॥ भक्तप्रेमळ
देखती ॥ ७ ॥ ब्रह्मादिकांदुर्लभचरण ॥ तेप्राप्तजाहलेदासांकारण ॥ जिहींप्रपंचाचेंटाकूनिभान ॥ वर्णितीसद्गुणपैंतु
झे ॥ ८ ॥ मानापमाननाठवूनिचित्तीं ॥ जिहींसांडिलीलौकिकास्थिती ॥ जेनिर्लज्जहोऊनिकीर्तनींगाती ॥ तेतुजश्रीप
तीपावले ॥ ९ ॥ जयर्णीदुराशाटाकोनिमनें ॥ जेसारिखेंचलेखितीशेणसोनें ॥ स्वर्गसुखासिविटलेमनें ॥ तेतुजकारणेंआ
वडती ॥ १० ॥ जिहींदेहलोभसांडोनितत्वतां ॥ चहूंमुक्तींसहाणीतल्यालाता ॥ ऐसीजयांचीनिरपेक्षता ॥ तेरुक्मिणी
कांतातुजपावले ॥ ११ ॥ संकटींपडतांभक्तप्रेमळ ॥ सगुणरूपधरिसीतत्काळ ॥ नविचारिसीकाळवेळ ॥ तूंदीनदया
ळपावसी ॥ १२ ॥ कलियुगींबौद्धावतारजाण ॥ ऐसेंबोलतीशास्त्रपुराण ॥ त्यांचेंएकवेळमोडोनिवचन ॥ होसीसगु
णस्वइच्छें ॥ १३ ॥ जैसीसांजवेळनहोतांपाहे ॥ वत्समातेसिपीऊंजाये ॥ परिमोहेंपान्हाघालिताहे ॥ निष्ठुरनहोयेस
र्वथा ॥ १४ ॥ तेवींअवताराचीनयेतांवेळ ॥ तुजबोलावितिभक्तप्रेमळ ॥ तयांचीमानोनिकळवळ ॥ बोलसीतत्काळगुज

१ विसंबणार नाहीं. २ छातिवर. ३ चंद्र. ४ चमकनात. ५ सुशोभीत. ६ कडें. ७ मुका.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गोष्टी ॥ १५ ॥ ऐसेएकनिष्ठवैष्णवजन ॥ जिहींतुजकेलेंआपुलेस्वाधीन ॥ त्यांचेवर्णावयासद्गुण ॥ उल्हासमनेंधरियें
ला ॥ १६ ॥ दीनदयाळवनमाळी ॥ मीतंवअघटितघेतलीआळी ॥ तूंनिजांगेंबैसोनिहृदयकमळीं ॥ स्वानंदनवाळीबो
लविसी ॥ १७ ॥ जैसापितापुत्राचाधरूनिहस्त ॥ खडेमांडोनिओनामाशिकवित ॥ तेवींबुद्धीचाचालकतूंरुक्मिणीकां
त ॥ लिहविसीग्रंथमजहातीं ॥ १८ ॥ गोवर्धनउचलोनिआपण ॥ गोपाळांदीधलेंथोरपण ॥ तेवींमाझीकरूनिबुझांव
ण ॥ ग्रंथरचनतूंकरविसी ॥ १९ ॥ मीमंदबुद्धिपंढरीनाथा ॥ धडनिरोपतोहीनसांगतां ॥ त्यामुखेंवदविशीभक्तकथा ॥
हेंआश्चर्यचित्तावाटतें ॥ २० ॥ कवणेवेळेवर्तलेंकायीं ॥ तेंम्यांसर्वथादेखिलेंनाहीं ॥ लिहितांअटकपडलीकांहीं ॥ तूंदेसी
लवलाहींआठवण ॥ २१ ॥ तुंबुद्धिप्रकाशकशार्ङ्गधर ॥ सर्वहाभारघातलातुजवर ॥ हरोनिमीपणाचाबडिवार ॥ ग्रंथसा
चांरवदविसी ॥ २२ ॥ मागीलअध्यायाचेअंतीं ॥ विठ्ठलस्मरणकरितांप्रीतीं ॥ कुणॅपउठविलेंसत्वरगतीं ॥ तेंकथानकश्रोतीं
परिसिलें ॥ २३ ॥ तोचमत्कारअद्भुतदेखोन ॥ बहुतसन्मानकरितीजन ॥ मगतुकोबाअरण्यांतजाऊन ॥ करीचिंतनश्री
हरीचें ॥ २४ ॥ दांभिकलौकिकप्रतिष्ठा ॥ मानीजैसीश्वानविष्ठा ॥ टाकोनियांसन्मानचेष्टा ॥ करीएकनिष्ठाहरिभजन
॥ २५ ॥ जेणेंलोकपिशाचह्मणती ॥ कुटिलस्वमुखेंनिंदाकरिती ॥ तैसीचधरूनिविदेहस्थिती ॥ जाऊनिएकांतींबैस
त ॥ २६ ॥ कोणीनिजमुखेंकरितीस्तवन ॥ तेथूनसत्वरजावेंपळून ॥ आपणासकोणीठेवितीलदूषण ॥ तेथेंकरीतश्र
वणबैसावें ॥ २७ ॥ कोणीपक्कान्नेंकरूनिनाना ॥ आदरकरूनिदेतीभोजना ॥ तरीतेंसर्वथानयेमना ॥ विवेकें
रसनाँआवरित ॥ २८ ॥ कोणीदुर्बलअनाथदीन ॥ त्याणेंवाढिलेंभार्जीचेंपान ॥ तेंदेहनिर्वाहापुरतेंजाण ॥ आवडी ॥ १ ॥
करूनभक्षावें ॥ २९ ॥ बल्लाळाच्यावनाआंत ॥ दिवसाएकांतीजाऊनबैसत ॥ रात्रींयेऊनग्रामांत ॥ कीर्तनकरीतस

---

१ समजूत. २ प्रतिबंध, चूक, विसर. ३ अभिमान. ४ खरा. ५ प्रेत. ६ वैराग्य. ७ जीभ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रेमें ॥ ३० ॥ दोनमासअसोनिआपुलेनगरीं ॥ गेलेनाहींतनिजमंदिरीं ॥ कांतागाऱ्हाणेंघरोघरीं ॥ लोकाचारींदेतसे ॥३१॥ ऐकासाजंणीएकमात ॥ माझेंकर्मबहुविपरीत ॥ घरधणीनकरीचआपुलीपरत ॥ बैसतोअरण्यांतजाऊनी ॥३२॥ टाकूनियांधंदाउदिम ॥ कीर्तनींनाचतोनिजप्रेम ॥ हृदयांतआठवीपुरुषोत्तम ॥ भजनींनेमधरियेला ॥ ३३ ॥ दोनमहिनेगावांतअसोनी ॥ भ्रतारआलानाहींसदनीं ॥ मीचिंतातुरहोऊनिमनीं ॥ झुरतेंसाजणीरात्रदिवस ॥ ३४ ॥ कधींभेटेलतुह्मांप्रती ॥ तयासिसांगाधर्मनीती ॥ कीतुवांटाकिलेंकांतेप्रती ॥ जाहलीफजितीजनांत ॥ ३५ ॥ ऐसीशेजारिणीलागोनी ॥ नित्यसांगतसेगाऱ्हाणीं ॥ तोंएकेदिवसींउदकालागूनी ॥ घागरघेऊनिचालिली ॥ ३६ ॥ कुंभांतभरूनिजीवन ॥ परतोनिघरायेताजाण ॥ तोंतुकोबाकरूनियांस्नान ॥ देवालयांतचालिले ॥ ३७ ॥ कांतालवलाहेंजाऊनियांजवळी ॥ पदरींधरिलातत्काळीं ॥ मर्यादाटाकूनितेवेळीं ॥ कायबोलिलीतेंऐका ॥ ३८ ॥ तूंनिर्लज्जनिःशंकहोऊनिमनीं ॥ कीर्तनींनाचतोसिनिशिदिनीं ॥ घरासिनयेसीपरतोनी ॥ मीतळमळमनींकरीतसें ॥ ३९ ॥ लोकलज्जाधरूनिपाही ॥ घरींमोकलितेंनित्यधायीं ॥ त्वांआमुचीवाटकेलीकायी ॥ सांगालवलाहींयेसमयीं ॥ ४० ॥ यावरीकांतेप्रतीबोलेवचन ॥ तुझियामायबापेंकेलेंलग्न ॥ त्यांहींआह्मांसिदीधलेंपाहोन ॥ तरीवस्त्रअन्नपुरवूंकासया ॥ ४१ ॥ कांताह्मणेमगतुकयासी ॥ पाहिलेंसांगकवणासी ॥ येरूह्मणेआमचेमायबापांसी ॥ निरंविलेंतुजसीनिजकांते ॥ ४२ ॥ यावरीकांताउत्तरबोलिली ॥ तुझींमायबापेंमरोनिगेलीं ॥ तींकोठेंधुंडोनिपाहूंवहिलीं ॥ जींमसणींजाळिलींनिजकरें ॥ ४३ ॥ यावरीनिजभक्तबोलेकाय ॥ पांडुरंगपितामाझाहोय ॥ विश्वजननीरुक्मिणीमाय ॥ अचळअक्षयसर्वदा ॥ ४४ ॥ सृष्टीसहोतांजैंउत्पत्ती ॥ तेणेंकाळेंतेनवाढती ॥ विश्वासयेतांप्रलयगती ॥ तेनाशनपावतीसर्वथा ॥४५॥ घटांतआकाशबिंबतांजाण ॥

---

१ सख्यांनो. २ गोष्ट. ३ घरीं. ४ रात्रंदिवस. ५ चिंता, काळजी. ६ व्यवस्था. ७ स्वाधीन केलें. ८ या वेळेस.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्यासनाहींदुजेपण ॥ नाशहोतांघटाकारण ॥ तेंगेलेंफुटोनह्मणोंनये ॥ ४६ ॥ तेवींआमुचीबापमाये ॥ त्यांचेचित्तींआ
ठवीपाये ॥ तींअन्नवस्त्रपुरवितीलपाहे ॥ नधरीसंशयेसर्वथा ॥ ४७ ॥ मगकांताह्मणेप्राणेश्वरा ॥ आतांचलावेंनिजमं
दिरा ॥ तेणेंपिशुनांसिहोईलउजंगरा ॥ संसारबरातुमचेनी ॥ ४८ ॥ मीश्रीहरीचेपायआठवीन ॥ तेचपुरवितीलव
स्त्रअन्न ॥ परीतुह्मींउगेचघरींबसून ॥ श्रीहरिभजनकरावें ॥ ४९ ॥ भ्रताह्मणेतेअवसरीं ॥ माझेंवचनऐकसीलज
री ॥ भाकदेयीवोनिजकरीं ॥ येतोंमंदिरींआतांची ॥ ५० ॥ कांतेनेंवचनदेऊनिदेखा ॥ घरासिआणिलावैष्णवतुका ॥
आश्चर्यवाटलेंगांवींच्यालोकां ॥ बोलतीएकमेकांपरस्परें ॥ ५१ ॥ चारदिवसवैराग्यदाखवून ॥ आपुलीप्रतिष्ठावाढ
विलीत्यान ॥ पुनःमायेसिवरपैडाहोऊन ॥ प्रपंचींजाऊनपडियेला ॥ ५२ ॥ एकह्मणतीजाहलेंयथास्थित ॥ प्रपंचीं
चसाधेपरमार्थ ॥ तुकयानेंअःपंगिलेंनिजकांतेतं ॥ तेणेंचसमाधानचित्तआमुचें ॥ ५३ ॥ जाऊनिबैसतांगिरिकपांटीं ॥
कोणचढलादेखावैकुंठीं ॥ यापरीलोकबोलतीगोष्टी ॥ विवेंकपोटींनकरितां ॥ ५४ ॥ कोणीनिंदितीकोणीस्तविती ॥
उत्तमअथवाअधमह्मणती ॥ परीतुकयासिनाहींहर्षखंती ॥ आनंदचित्तींसर्वदा ॥ ५५ ॥ तेदिवसींहोतीहरिदिनी ॥
तुकोबाबैसलेवृंदावनीं ॥ कांतेसिसन्निधबोलावूनी ॥ ह्मणेऐकेश्रवणींहरिकथा ॥ ५६ ॥ मगसन्मुखबैसवोनिति
जला ॥ निजकरींटाळविणाघेतला ॥ अकराअभंगउपदेशकेला ॥ तोसज्जनींऐकिलाअसेल ॥ ५७ ॥ त्याचाचि
अन्वयआणोनिध्यानीं ॥ मीहीबोलतोंआर्षवाणी ॥ जैसेंदेखावयावासरमणी ॥ दीपकउजळोनीदाखविती ॥ ५८ ॥
नातरीव्हावयाअमृतसिद्धी ॥ तेथेंवैद्यदेतीआपुलीऔषधी ॥ तेवींतुकयाचेअभंगाचीअर्थसिद्धी ॥ मीमंदबुद्धीसांग
तों ॥ ५९ ॥ गंगेंतवोहळमिळालियापाहे ॥ त्यासिअपवित्रसर्वथाह्मणोंनये ॥ कींपरिसासिलोहभेटलियाकाये ॥

---

१ दुर्जनांस. २ जागरण. ३ भुलून. ४ पर्वताच्या गुहेचें द्वार. ५ विचार. ६ एकादशी. ७ अनुक्रमानें अर्थ. ८ यथामति. ९ सूर्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काळिमानराहेतयासी ॥ ६० ॥ त्यांतसंतांचेंअनुपमवचन ॥ अर्थपाहतांसखोलगहन ॥ परीकिंचितवदेनत्याचेकृपेन ॥ तेंपरिसासज्जननिजप्रीतीं ॥ ६१ ॥ मगकांतेसिसंमुखबैसवून ॥ ह्मणेनरदेहहेंक्षेत्रजाण ॥ येथेंयेऊनिकेलियाहरिस्मरण ॥ तरीपिकेलदारुणनिजभाग्यें ॥ ६२ ॥ जिहींपरमार्थनकेलादृढ ॥ त्याचीकेवळजाहलीबूड ॥ वाहूनिप्रपंचकाबाड ॥ झिजविलेंहाडव्यर्थचीं ॥ ६३ ॥ ऐशींटक्केदिवाणदारा ॥ देणेंलागतोयाचासारा ॥ नाहींतरीकाळोजीहुद्देदारा ॥ दाखवीदराराबहुसाल ॥ ६४ ॥ त्याचेंचिभयपावोनिमनीं ॥ दाहाटक्केटाकिलेझाडोनी ॥ बाकीसत्तरत्यालागूनी ॥ ऐवजनयनींदिसेना ॥ ६५ ॥ दहाटक्केह्मणशीलकोणते ॥ तेआशंकावाटेलनिजचित्तें ॥ तरीदशइंद्रियेंक्षेत्राआंत ॥ झडलींप्रस्तुतजाणवो ॥ ६६ ॥ अपशब्दआणिरसाळस्तुती ॥ सारिखेंचिवाटेश्रवणाप्रती ॥ नेत्रांससोनेंआणिमाती ॥ सारिखेंदिसतीमाझिया ॥ ६७ ॥ साखरआणिवृंदावन ॥ जिव्हेंसिनाहींअधिकउण ॥ पुंगळवेलआणिबकुळसुमन ॥ घ्राणांसिलागतीसारिखीं ॥ ६८ ॥ इंद्रियांतमनचंचळपाही ॥ तेंस्थिरावलेंविठ्ठलपायीं ॥ तैसींचकर्मइंद्रियेंदेहीं ॥ कर्तेपणनाहींतयांसी ॥ ६९ ॥ ज्याचाविषयनकळेत्यासी ॥ तेसहजचिदाहाझाडलीऐसीं ॥ बाकीसत्तरउरलेतयांसीं ॥ ऐवजमजपासींसांगतों ॥ ७० ॥ पांडुरंगचौधरीजाणयेथिचा ॥ ह्मणेझाडाकरावासकळबाकीचा ॥ हृदयचोहटांबैसोनिसाचा ॥ बोलतोवाचातेऐका ॥ ७१ ॥ ह्मणतोहांडेंभांडेंगुरेंशेखीं ॥ देऊनिझाडीआपुलीबाकी ॥ हेचिबुद्धीकरूनियांनिकीं ॥ होयीनिष्कळंकीह्मणतसे ॥ ७२ ॥ हेंयासीनदेतांनिजकांते ॥ तरीलपावयासिस्थळकोणतें ॥ याविणस्थळनदिसेरितें ॥ विवेकेंचित्तेंविचारी ॥ ७३ ॥ हाविश्वव्यापकजगजेठी ॥ यार्जभेणेंपळतांउठाउठी ॥ दुजाकोणीघालीलपाठी ॥ नदिसेदृष्टींसर्वथा ॥ ७४ ॥ कायतेगव्हाणहिंडावेंकिती ॥ पाठघेतलीयाच्यादूतीं ॥ आधींचकुळवाडीके

१ भार, ओझें. २ मृत्यु. ३ शरीरांत. ४ नाकास. ५ हृदयरूप,चवाठ्यावर. ६ चांगली, खरी. ७ विचारानें. ८ याच्या भयानें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

लीनसती ॥ तरीकांमजप्रतीगांजिता ॥ ७५ ॥ तरीबेबाकहोऊनिसर्वोपरी ॥ येथेंचअसावेंनिरंतरीं ॥ स्वइच्छादेईलजे
मजुरी ॥ तेभक्षूंनिजकरींसकळिक ॥ ७६ ॥ याणेंनागवूनसोडिलेकिती ॥ तेसंसाराआलेनाहींतमागुती ॥ याभेणेंक
रूनिपदरींसुती ॥ कोणीनघेतीसर्वथा ॥ ७७ ॥ एकासिसद्गुरुघेऊनिजमान ॥ केलेंतयाचेंनिसंतान ॥ तयाहांसतीस
कळजन ॥ मानाभिमानटाकितां ॥ ७८ ॥ कसवटींतसरलेजेनिकटीं ॥ तयांसिघालितोवैकुंठीं ॥ माझीहीतैसीचघेऊनि
पाठी ॥ केलीसोंठीजीवाची ॥ ७९ ॥ ऐसेंपहिलेंकळलेंअसतां ॥ जाणोनिजाहलोंमीनेणता ॥ जेणेंनिर्दयपणेंगांजिलेंब
हुतां ॥ त्याचेहातांसांपडलों ॥ ८० ॥ आतांविवेककरूनमानसीं ॥ उदासहोईसंसारासी ॥ नाशआरंभिलामाझियाजी
वासीं ॥ मगअनुमानासीकासया ॥ ८१ ॥ जरूरदिसोनआलेंसहज ॥ मगकांनावडेसांगतुज ॥ उपासरोकडेयेतीमज ॥
आतांकासयालाजधरावी ॥ ८२ ॥ देहाचालोभधरिलियापाहे ॥ तुझियाजीवाचेंव्हावेंकाये ॥ मजतुजतूटकदानहोये ॥
तेऐकसोयेसांगेन ॥८६॥ मुलांलेंकुरांसमवेतपाहीं ॥ उभयतांनांदोंएकेचठायीं ॥ हाविचारऐकसीलजरीनिश्चयीं ॥ तरी
वियोगनाहींसर्वथा ॥ ८४ ॥ ह्मणसीललेंकुरेंखातीलकाये ॥ हेचिंतासर्वथाकरूंनये ॥ तयांचेंअन्नवस्त्रतयांसपाहे ॥ लि
हिलेंआहेविधीनें ॥ ८५ ॥ तूंआपुलागळाघेईउगवूनी ॥ चुकवीचौऱ्यासींलक्षयोनी ॥ गर्भवासाचीचुकवीजाचणी ॥ तो
विचारकानींऐकेवो ॥८६॥ मीतुजटाकूनिपळतोंनिराळा ॥ कींऐवजदेखोनिबांधितीगळा ॥ तुझेहातींचेमुजाईममजला॥
होऊनिघालाघालितील ॥ ८७ ॥ धर्मदूतांचाअवघडमार ॥ देखोनिजीवकांपेथरथर ॥ आतांमाझीचाडअसलीजर ॥
तरीव्हावेंउदारसर्वस्वें ॥ ८८ ॥ कायकरूंयानिजसंचिता ॥ साठीपडिलीसेजीववितां ॥ हेमाझीकरणीनव्हेसर्वथा ॥ पं
ढरीनाथाआवडलें ॥ ८९ ॥ मोकळाभिकारीजाहलोंपाहे ॥ तरीपुढांपाठघेतलीचआहे ॥ त्यासिसर्वथाकरुणानये ॥ ना

१ निर्भय, निर्धास्त. २ हानि, नाश. ३ ब्रह्मदेवानें. ४ विपत्ती, दुःख. ५ यमदूत,मृत्यु. ६ भीड,इच्छा,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गवणहोयेनिश्चयेंसी ॥ १० ॥ भौंपळाघेऊनिप्याविंजीवन ॥ जेंवावयादेवेंलाविलेंपान ॥ तरीतुवांचित्तवाडकरून ॥ सर्व
स्वदानकरावें ॥ ११ ॥ ऐसानिश्चयकरिसीलचित्तीं ॥ तरीभलेलोकतुजलामानवती ॥ उभयलोकींवाढेलकीर्ती ॥ तोवि
चारचित्तींऐकवो ॥ १२ ॥ बरगपडोनिमेलींगुरें ॥ भांडीनेलींह्मणावेंचोरें ॥ नाहींजाहलींमजलेंकुरें ॥ ऐसेंकठिणअंतर
करावें ॥ १३ ॥ सर्वस्वेंनिरसोनियांआस ॥ कठीनकरीनिजमानस ॥ उपमासमानवज्रजैस ॥ धैर्यचित्तासकरावें ॥
॥ १४ ॥ किंचित्प्रपंचींविषयसुख ॥ हेंनिःशेषथुंकोनिटाकितांदेख ॥ परमानंदधणीपावसीअनेक ॥ जेसनका
दिकइच्छिती ॥ १५ ॥ हेसायासचुकतीबहुमोटे ॥ भवबंधनआपेंआपतुटे ॥ अंतींसोहळेहोतीगोमटे ॥ वैकुंठवाटे
चालतां ॥ १६ ॥ तेंसुखहोईलउभयतांसी ॥ सोहळेकरितीलदेहऋषी ॥ जडितविमानींसन्मानेसी ॥ विष्णुदूत
आपणासिबैसविती ॥ १७ ॥ संतमहंतसिद्धकिन्नर ॥ हेपुढेंयेतीलसामोर ॥ विमानींबैसवोनिसादर ॥ नामघोष
गजरकरितील ॥ १८ ॥ मायबापपडतांदृष्टीं ॥ चरणींघालूनिदृढमिठी ॥ तेथेंकरूनसुखगोष्टी ॥ असोंनिकटी
त्यापासीं ॥ १९ ॥ तेंसर्वसुखाचेंपुरवावयाकोडें ॥ ह्मणूनिचित्तकरीतूंवांड ॥ टाकूनिप्रपंचकाबाड ॥ परमार्थदृढसा
धावा ॥ १०० ॥ तूंदेवपाहावयासायासकरी ॥ नाशिवंताचीआसनधरी ॥ प्रातःकाळींउठोनिझडकरी ॥ स्नानकरी
अनुतापें ॥ १ ॥ सोमवारद्वादशीपर्वकाळ ॥ उदयीकपावलाउत्तमकाळ ॥ तरीमनशुद्धकरूनिउतावेळ ॥ ब्राह्मणसक
ळपाचारी ॥ २ ॥ संकल्पकरूनिविधियुक्तीं ॥ गृहलुटवावेंद्विजांहातीं ॥ पुढेंमिळेलकैशारीतीं ॥ हाउद्वेगँचित्तींकरूंन
को ॥ ३ ॥ मायबापसखाजिवलग ॥ आपुलेशिरींआहेपांडुरंग ॥ तोसर्वपुरवीलनिजांगं ॥ आपदामगहोऊंनेदी ॥ ४ ॥
तोसन्निधआहेमजजवळी ॥ परीदूरसांगतोंपाल्हाळीं ॥ तूंदेखोनिकायजाहलीसआंधळी ॥ चिन्हेंसकळींनजाणसी ॥ ५ ॥

१ थोर, मोठें. २ चांगलें. ३ आवड. ४ थोर, मोठें. ५ ओझें, भार. ६ नष्ट होणाऱ्या शरीराची इच्छा. ७ चिंता, खेद.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तोपांडुरंगहृदयींप्रकटलादेख ॥ ह्मणूनिनावडेविषयसुख ॥ मनाच्याबोधीखुंटल्याअनेक ॥ सगुणस्वरूपन्याहाळितां
॥ ६ ॥ कनककांतापदार्थदोन ॥ जनासिआवडतीजीवाहून ॥ आह्मांसितेपाषाणाहूनिहीन ॥ तूंकायखूणनजाणसी
॥ ७ ॥ भूकताहाननिश्चयेंराहिलीजाण ॥ सज्जनसोयरेआणिहेंवन ॥ वृक्षवल्लीआह्मांकारण ॥ दिसेसमानसारिखेंची
॥ ८ ॥ तोजवळीआहेरुक्मिणीपती ॥ ह्मणोनिसुखदुःखेंसमानवाटती ॥ तोडोनिविषयांचीनैश्वल्यभ्रांती ॥ भजनप्री
तींकरावें ॥ ९ ॥ हेंसद्गुरूचेकृपेकरून ॥ देवेंबोलविलेंमजकारण ॥ त्वांहीसादरकेलेंश्रवण ॥ तरीतैसेंचवर्तूनदावीकां
॥ ११० ॥ प्रसन्नहोऊनिरुक्मिणीवर ॥ माझातंक्केळाअंगिकार ॥ आतांसर्वथाआणिकविचार ॥ नव्हेसाचारनिश्चित
॥ ११ ॥ यावचनींधरूनविश्वास ॥ बळकटहोईघालूनिकास ॥ आतांचजाहलातुजउपदेश ॥ कांहींसायासनकरितां ॥ १२ ॥
करूनिसडासंमार्जन ॥ शृंगारीतुळसीवृंदावन ॥ अतीतब्राह्मणाचेंपूजन ॥ सद्भावेंजाणकरावें ॥ १३ ॥ कायावाचामनो
भावेंसी ॥ होईवैष्णवांचीअनन्यदासी ॥ विठ्ठलनामनिजप्रेमेंसी ॥ अहर्निशीघेईकां ॥ १४ ॥ हास्त्रीउपदेशाचाआशयजा
ण ॥ सहजआलेंअनुसंधान ॥ उपलंबिलेंअसेसंपूर्ण ॥ संतसज्जनजाणती ॥ १५ ॥ एकादशअभंगमुख्यदेखा ॥ निजमुखें
बोलिलावैष्णवतुका ॥ त्याजवरओवीबद्धटीका ॥ अर्थनेटकानिर्वाळिला ॥ १६ ॥ तेमुळींचींपदेंपाहूनिनिगुती ॥ अर्थध्या
नासिआणिजेसंतीं ॥ तेणेंप्रमाणेंजेकांवर्तती ॥ तेतरतीनिश्चितींसभाग्य ॥ १७ ॥ निजकांतेचेंकरूनिमिष ॥ केलासाधकां
सिउपदेश ॥ जेणेंतुटोनिभवबंधपाश ॥ शांतिसुखअनायासयेहाता ॥ १८ ॥ जैसीचातकाचीदेखोनिआर्ती ॥ गगनींउग
वलारोहिणीपती ॥ परीप्रकाशनवंचीकोणाप्रती ॥ समानस्थितीतयाची ॥ १९ ॥ तेवींकांतेसिउपदेशकेला ॥ परीअर्थना
हींकोणासिवंचिला ॥ जोस्वभावेंघेईलत्याजला ॥ असेठेलास्वतःसिद्ध ॥ १२० ॥ तेंवचनकानींपडतांनिश्चित ॥ तेणेंद्रवलें

१ नाशिवंत, अशाश्वत. २ रात्रंदिवस. ३ निवडून घेतला, वर्णिला. ४ संसारबंधन. ५ आवड. ६ चंद्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तिचेंचित्त ॥ मगअनुसंधानींलाऊनिप्रीत ॥ श्रवणकरीतनिजप्रेमें ॥२१॥ आणिकश्रीहरीचेंवर्णूनिगुण ॥ चारप्रहरकेलें जागरण ॥ मगउदयासियेतांअरुण ॥ रुक्मिणीरमणओंवाळिला ॥ २२ ॥ जाऊनिइंद्रायणीच्यातीरीं ॥ स्नानसारिलेंते अवसरीं ॥ कांतायेऊनियांमंदिरीं ॥ द्विजांसिझडकरीपाचारिलें ॥ २३ ॥ चित्तशुद्धकरूनिनिश्चितीं ॥ संकल्पकेलानिज प्रीतीं ॥ कांहींकामनानधरूनचित्तीं ॥ मंदिरत्यांहातींलुटविलें ॥ २४ ॥ भांडींगुरेंवस्त्रअन्न ॥ सकळघेऊनिगेलेब्राह्मण ॥ तेथेंजटिलसंन्यासीयेऊन ॥ मंदिरधुंडोनपाहतसे ॥ २५ ॥ तंवकांहींचनदिसेनिश्चितीं ॥ मगचुलीचीराखघेतलीप्रीतीं ॥ सर्वांगासिचर्चिलीविभूती ॥ देखूनिहांसतीसकळिक ॥२६॥ ह्मणेचवदारत्नेंवांटितांवेळ ॥ शंकरालाधलेंहलाहल ॥ तेवीं निर्दैवाचेंप्राक्तनकेवळ ॥ दिसोनआलेंआपणासी ॥ २७ ॥ इतुकेंकरूनितेअवसरीं ॥ तुकोबाचालिलेबाहेरी ॥ तिळमा त्रअन्ननाहींघरीं ॥ ह्मणोनिकांताउद्विग्न ॥ २८ ॥ कालचीएकादशीनिराहार ॥ क्षुधेनेंपीडितीमुलेंलेंकुरें ॥ ह्मणूनिअंतरीं चिंतातुर ॥ ह्मणेकैसाविचारकरावा ॥ २९ ॥ तंवगांवचीमाहारीणहोतीदीन ॥ तिचेंरूपधरीमातारुक्मिण ॥ तुकयाचेंस लपाहावयाकारण ॥ वस्त्रमागोनपाहावें ॥ १३० ॥ ऐसेंह्मणोनिविश्वजननी ॥ बाहेरनिघालीतयेक्षणीं ॥ तुकयातेंदेखो निनयनीं ॥ कायबोलिलीतयासी ॥ ३१ ॥ घरलुटविलेंविप्रांहातीं ॥ मीतुमच्याघरचीमाहारीणराबती ॥ कांहींउरलें असेलतयाहातीं ॥ तरीद्यावेंमजप्रतीमायबाप ॥ ३२ ॥ तोंवाडियामागूनपरसाआंत ॥ लुगडेंवाळतांदेखिलेंतेथ ॥ तें तुकयानेंओढोनिलवरित ॥ तिजकारणेंदीधलें ॥ ३३ ॥ गांवींचेलोकदेखोनिमनीं ॥ विस्मितजाहलेतयेक्षणीं ॥ ह्मणतीया णेंविपरीतकेलीकरणी ॥ घातलेंपाणीसंसारा ॥ ३४ ॥ त्यांणींघरींसांगतांमांत ॥ ऐकोनिकांताक्रोधभरित ॥ ह्मणेप्राक्त नंमाझेंविपरीत ॥ जाहलीलोकांतअपकीर्ती ॥ ३५ ॥ वाड्यांतमिळाल्याशेजारिणी ॥ त्यांजवळदेतसेगाऱ्हाणीं ॥ दुःख

१ स्त्री. २ इच्छा. ३ विष. ४ खिन्न, चिंताक्रांत. ५ गोष्ट. ६ दैव.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कोणासांगोंसाजणी ॥ तळमळमनींकरीतसें ॥ ३६ ॥ दोनमासपर्यंतजाण ॥ भ्रतारेंत्यागिलेंमजकारण ॥ परतोनिघरीं
नयेचजाण ॥ गांवांतअसोनसाजणी ॥३७॥ नानापरीचेत्रिविधजन ॥ मागेंपुढेंबोलतीन्यून ॥ ह्मणतीकालसमजावून
घरासिघेऊनमीआलें ॥ ३८॥ रात्रींमांडोनिकीर्तन ॥ त्याणेंमजघातलेंमोहन ॥ नानापरीचेदृष्टांतदेऊन ॥ बोलिलावचन
तेंऐका ॥ ३९ ॥ मायबापविठ्ठलरखुमायी ॥ त्यांचेपायआठवीतजायी ॥ तींअन्नवस्त्रदेतीलसमर्थीं ॥ सायासकांहींनकरितां
॥ १४०॥ त्यांचाविश्वासम्यांधरून ॥ सकळलुटविलेंधनधान्य ॥ भांडींगुरेंसर्वदेऊन ॥ उदासहोऊनबैसलें ॥ ४१ ॥ नेस
तेंवस्त्रआणिलेंधुवोनी ॥ तेंपरसांतवाळवूंघातलेंसाजणी ॥ तेंमाहारिणीसदींधलेंवोढोनी ॥ तुह्मीतोंनयनींदेखिलें ॥ ४२ ॥
मीकरूनियामोलमजुरी ॥ लेंकुरेंपोशीतहोतेंबरीं ॥ त्याचेंतोंवाहेरबरव्यापरी ॥ चालेपरभारीप्रारब्धें ॥ ४६ ॥ यापरी
काळकडेलागतां ॥ म्यावायांचिबुद्धिकेलीवृथा ॥ घरासिआणिलेंप्राणनाथा ॥ मुकलेंअर्थसर्वस्वें ॥ ४४ ॥ पायआठवि
तांनिशिदिनीं ॥ अन्नवस्त्रदेतीलमजलागोनी ॥ ऐसाविश्वासत्यांचेवचनीं ॥ आपुलेमनींजाणिला ॥ ४५ ॥ चिंतनकेलें
दोनतीनवेळ ॥ तोंदरिद्रपातलेंतत्काळ ॥ लेंकुरेंकरितीतळमळ ॥ अन्ननमिळह्मणोनी ॥४६॥ ऐसापायांनींकेलाघात ॥
ह्मणोनिसंतप्तजाहलेंचित्त ॥ तरीआतांमीजाऊनदेवळांत ॥ करीनविपरीततेंऐका ॥ ४७ ॥ घरंधणीपायांचीवर्णितीथो
री ॥ तेफोडोनिटाकीनयेअवसरीं ॥ मगपाषाणघेऊनमस्तकावरी ॥ चालिलीलवकरीदेउळांत ॥४८॥ ह्मणेरुक्मिणी
पतीचेचरण ॥ ब्रह्मादिककरितीज्यांचेंध्यान ॥ नारदादिकरितीज्यांचेंगायन ॥ वर्णितीथोरपणजयांचें ॥ ४९ ॥ त्याव
रीपाषाणघालोनिपाहे ॥ मीफोडूनिटाकीनलवलाहें ॥ ऐसाचित्तींकरूननिश्चये ॥ महाद्वारासीजातसे ॥ १५० ॥ हेंजा
णोनिपंढरीनाथ ॥ देऊळामाजीथरथरांकांपत ॥ तोभक्तवत्सलदीननाथ ॥ लीलादाखवीतदासांसी ॥ ५१ ॥ जेणेंमत्स्य

१ सख्यानों. २ शरीरकष्ट, मेहेनत. ३ क्रोधयुक्त. ४ तुकाराम बावा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रूपधरूनी ॥ शंखासुरमारिलासमुद्रजीवनीं ॥ तोतुकयाचेस्त्रियेसभिऊनी ॥ चक्रपाणीकांपत ॥ ५२ ॥ जोकूर्महोऊनि
घननीळ ॥ पाठीवरीधरिलामंदराचळ ॥ तोसप्रेमभक्तीचेंदेखोनिबळ ॥ कांपेचळचळांनिजांगें ॥ ५३ ॥ जोवराहरूपधरू
नश्रीहरी ॥ वसुंधाधरिलीदाढेवरी ॥ तोलीलानाटकीवैकुंठविहारी ॥ निजभक्तांसीभीतसे ॥ ५४ ॥ जोबळेंचस्रगटोनिस्तं
भाआंत ॥ हिरण्यकशिपुविदारिलादैत्य ॥ तोनिजभक्ताचेंभयबहुत ॥ वागवीचित्तांतआपुल्या ॥ ५५ ॥ दानाभिमानेंफु
गलाबळी ॥ मगत्रिविक्रमहोऊनिवनमाळी ॥ तयासिघातलेंपाताळीं ॥ तोकांपतदेउळींथरथरां ॥ ५६ ॥ जोरेणुकेच्याउ
दरासियेऊनी ॥ निःक्षत्रियकेलीसकळअवनी ॥ तोनिजभक्तांसिचक्रपाणी ॥ भयभीतहोऊनिकांपत ॥ ५७ ॥ सकळ
सुरवरांसिजिंकिलेंजेणें ॥ तोदशकंठनिवटिलारघुनंदनें ॥ ऐसाप्रतापीभक्तभूषण ॥ भयेंकरूनकांपत ॥ ५८ ॥ कंसचा
णूरमहादैत्य ॥ स्वहस्तेंनिवटीश्रीकृष्णनाथ ॥ तोतुक्याचेकांतेचेंभयबहुत ॥ असेवागवीतमानसीं ॥ ५९ ॥ धर्मेंउडवि
लाचक्रपाणी ॥ देखोनिविस्मितजाहलीरुक्मिणी ॥ ह्मणेकवणचिंताउपजलीमनीं ॥ मजलागोनींसांगावें ॥ १६० ॥ या
वरीह्मणेचक्रपाणी ॥ आजिचिंताउद्भवलीआमुचेमनीं ॥ जेतुकयाचीकांतासक्रोधहोऊनी ॥ पाषाणघेऊनीयेतसे ॥ ६१ ॥
निजकरेंफोडावेआमुचेचरण ॥ ऐसानिश्चयकेलातिणें ॥ यासिउपायकरावाकवण ॥ हेंमजलागोनकळेना ॥ ६२ ॥ रु
क्मिणीह्मणेसंकटकाये ॥ येथोनिपळावेंलवलाहें ॥ एवढीवेळचुकवूनिपाहे ॥ परतोनयावेंमागुती ॥ ६३ ॥ यावरीह्मणे
जगज्जीवन ॥ आपुलेतेंस्वाधीननाहींजाण ॥ मीजाहलोंअसेंभक्तांआधीन ॥ त्यांचेआज्ञेनवर्ततसें ॥ ६४ ॥ बाळकपद
रधरितांपाहें ॥ पित्यासिबळेंसोडवितांनये ॥ तोनिजमोहेंथोकलाचिराहे ॥ तैसेंचआह्मांहेंजाहलें ॥ ६५ ॥ मिलिंदेंनि
जमुखेंकोरीकाष्ठासी ॥ परीकमळिणीसर्वथानफोडवेत्यासी ॥ अडकलाराहेनिजमोहेंसी ॥ गतितैसीमजजाहली ॥ ६६ ॥

१ पाण्यांत. २ कांसवरूप. ३ डुकररूप ४ पृथ्वी. ५ मारून टाकिला. ६ वामन. ७ पृथ्वी. ८ देवांस. ९ रावण. १० मारिला. ११ स्वच्छ. १२ भ्रमर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आपणगेलियायेथून ॥ तरीतुकयाचेंमोडेलमन ॥ मूर्तीनदेखतांसगुण ॥ तोदेईलप्राणआपुला ॥ ६७ ॥ त्याचेंमनोगत राखिलेंजरी ॥ तरीकांतायेऊनियेअवसरीं ॥ पाषाणघालीलपायांवरी ॥ हेचिंताअंतरींमजवाटे ॥ ६८ ॥ इकडेपत्नीस क्रोधमानसीं ॥ सत्वरयेतसेदेउळासी ॥ देखोनितुकापुसेतिजसी ॥ कोठेंजातेसीमजसांग ॥ ६९ ॥ येरीतयासिउत्तरदेत ॥ तुझापितारुक्मिणीकांत ॥ तेणेंचिमाझाकेलाघात ॥ पायचित्तांतआठवितां ॥ १७० ॥ तुवांउ[१]देशिलेंमजकारण ॥ आ ठवीतजाईत्याचेचरण ॥ मगपुरवीलवस्त्रअन्न ॥ तेंम्यांवचनऐकिलें ॥ ७१ ॥ विश्वासेंवचनधरूनचित्तीं ॥ घरलुटविलें विप्रांहातीं ॥ मुलेंलेंकुरेंअनाथदिसती ॥ अन्नवस्त्रत्यांप्रतीमिळेना ॥ ७२ ॥ ऐसापायांनींकेलाघात ॥ ह्मणोनिचा लिलेंदेउळांत ॥ त्यावरीपाषाणघालोनित्वरित ॥ फोडीननिश्चितयेसमयीं ॥ ७३ ॥ ऐसीपत्नीचीऐकोनिमात ॥ मोहेंद्र वलेंतुकयाचेंचित्त ॥ ह्मणेइणेंतोमांडिलेंविपरीत ॥ ह्मणोनिअश्रुपातलोटले ॥ ७४ ॥ तरीइजसवेंचिजाऊनिआपण ॥ नम्रबोलावेंविनीतवचन ॥ कींक्रोधनावरेचतुजकारण ॥ तरीमजवरीपाषाणघालीकां ॥ ७५ ॥ ऐसेंविचारूनचित्तीं ॥ मागूनिचालिलेसत्वरगती ॥ हेंजाणोनियांवैकुंठपती ॥ चिंताकरितीमानसीं ॥ ७६ ॥ पहिलेथरथरांहोतेकांपत ॥ तेउ गेचराहिलेनिवांत ॥ देखोनिरुक्मिणीझालीविस्मित ॥ मगविनोदेंपुसतदेवासी ॥ ७७ ॥ ह्मणेदेवाधिदेवापंढरीना था ॥ मघांचळचळांकांपतहोतां ॥ आतांआश्रयजाहलाकोणता ॥ हासंशयचित्तावाटतसे ॥ ७८ ॥ कोणतुमचाप्राण सखा ॥ जिवलगपातलापाठीराखा ॥ ह्मणोनियांवैकुंठनायका ॥ निवांतराहिलांयेसमयीं ॥ ७९ ॥ मगह्मणेदीनदया ळ ॥ आणिकचिअरिष्ट[२]वोढवलेंसबळ[३] ॥ तुकयाआपुलाभक्तप्रेमळ ॥ आलीकळवळमाझीतया ॥ १८० ॥ कांताफोडील आपुलेचरण ॥ ह्मणोनिमागेंयेतसेजाण ॥ कींपत्नीसऐसेंबोलावेंवचन ॥ घालीपाषाणमजवरी ॥ ८१ ॥ आपुलेंदुःख

१ गोष्ट. २ संकट. ३ भयंकर, कठीण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ह्मणोनिविसरून ॥ त्याचीचचिंतावाटतीदारुण ॥ यासउपायकरावाकवण ॥ हेंमजकारणकळेना ॥ ८२ ॥ तिचीतोंआ
हेविरोधभक्ती ॥ विवेकविचारनाहींचित्तीं ॥ अवचितमारीलतुकयाप्रती ॥ हेचिंतामजप्रतीवाटते ॥ ८३ ॥ पाषाणघा
लीलपायांवरी ॥ मगत्याचेपायदुखवलेजरी ॥ तरीकीर्तनींनाचेलकैशापरी ॥ हेचिंताअंतरींमजवाटे ॥ ८४ ॥ यावरी
रुक्मिणीउत्तरदेत ॥ तुह्मीकांउद्विग्नजाहलेतिव्यर्थ ॥ जयावरीआपुलीदयाकिंचित ॥ तरीकळिकाळकांपततयासी ॥ ८५ ॥
जयासिप्रसन्नजाहलाभास्कर ॥ त्यावरीसर्वथानपडेअंधार ॥ कींवस्तीसमिळालियाक्षीरसागर ॥ तोसर्वदाक्षुधातुर
राहेना ॥ ८६ ॥ साधलियाअमृतसंजीवनी ॥ तरीरोगनबाधीत्यालागोनी ॥ तेवींतुमचेंनामतुकयाच्यावदनीं ॥ अस
तांचक्रपाणीभयकाय ॥ ८७ ॥ ऐसेंबोलतांजगन्माता ॥ तोंआलीअवचिततुकयाचीकांता ॥ पाषाणठेविलामस्तकावरु
ता ॥ देखिलेंयेतांमहाद्वारीं ॥ ८८ ॥ तीअंतरींप्रवेशतांसत्वर ॥ रुक्मिणीनेंआडकेलेंद्वार ॥ तुकयासिठेविलेंबाहेर ॥ का
यनिमित्तपैंतेव्हां ॥ ८९ ॥ कांतासंतापोनिअंतरीं ॥ पाषाणघालीलतयावरी ॥ ह्मणूनियेतांचभीतरी ॥ तुकयासिबाहे
रीकोंडिलें ॥ १९० ॥ यापरीचुकवोनिआघात ॥ भक्तांसिरक्षीपंढरीनाथ ॥ जैसेंबाळकअग्निसिधरूंजात ॥ तंवमातार
क्षिततयासी ॥ ९१ ॥ तुकयाचेंचित्तींऐसाभाव ॥ जेकांतेसिपावलापंढरीराव ॥ मजवरीरुसलारुक्मिणीनांवो ॥ ह्मणऊ
निद्वारआडकेलें ॥ ९२ ॥ कीर्तनींजागलाघनसांवळा ॥ आतांविश्रांतिघ्यावयानिद्रितजाहला ॥ मीजाऊनयेथेंकरीन
गलबला ॥ कोंडिलेंमजलायासाठीं ॥ ९३ ॥ आतांपरतोनजावेंघरा ॥ सर्वथानकरावाउजगरा ॥ किंवारागआलारु
क्मिणिवरा ॥ आडकेलेंद्वारायासाठीं ॥ ९४ ॥ कींकांतेचीभक्तिविशेषजाण ॥ तीसअंपंगीजगज्जीवन ॥ मजबाहेरदी
धलेंटाकून ॥ ह्मणोनिरुदनकरीतसे ॥ ९५ ॥ असोतेसमयींतिचेंप्रेमवर्णितां ॥ तरीग्रंथींविशेषवाढेलकथा ॥ पायांवरी

१ माझ्या मनास. २ सूर्य. ३ मुखीं. ४ आंत. ५ पति, नवरा. ६ जागरण. ७ रक्षी, सांभाळी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पाषाणउचलोनिघालितां ॥ तंवरुक्मिणीमाताबोलेली ॥ ९६ ॥ कायअपराधकेलाजगज्जीवनें ॥ ह्मणोनिफोडितेसिया चेचरण ॥ तेंतूंसांगहोमजकारण ॥ संकोचमनींनधरितां ॥ ९७ ॥ येरीह्मणेऐकवोमाये ॥ एकदोनवेळांआठविलेपाये ॥ तोंमंदिरींनदिसेएकहीठाये ॥ संसारसोयेमोडिली ॥ ९८ ॥ घरींनाहींवस्त्रअन्न ॥ मुलेंलेंकुरेंकरितीरुदन ॥ ह्मणोनिसंता पलेंमन ॥ फोडितेंचरणयासाठीं ॥ ९९ ॥ पायांनींकेलाआमुचाघात ॥ ह्मणोनिसंतप्तजाहालेंचित्त ॥ ऐसीऐकोनितिये चीमात ॥ रुक्मिणीबोलततियेसी ॥ २०० ॥ जेंसंसारांतपडेलउणें ॥ मीनिजांगेंपुरवीनतुजकारणें ॥ मगसाडीचोळी मूठभरहोन ॥ तिजकारणंदीधले ॥ १ ॥ हेंदेखतांपावलीसमाधान ॥ मगपाषाणदीधलाटाकून ॥ तेव्हांवस्त्रकरोनिपरि धान ॥ धरिलेंचरणरुक्मिणीचे ॥ २ ॥ मूठभरहोनघेऊनहातीं ॥ बाहेरआलीसत्वरगती ॥ पुढिलेअध्यायींरसउत्पत्ती ॥ तरीसादरश्रोतींपरिसावें ॥ ३ ॥ हृदयींबैसोनिरुक्मिणीकांत ॥ स्वयेंचिवदवीतसेयथार्थ ॥ महीपतीत्याचामुद्रांकित ॥ शरणागतदासांचा ॥ ४ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ एकोनपंचाश त्तमाध्यायरसाळहा ॥ २०५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ४९ ॥ ॥ ओव्या ॥ २०५ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

१ क्रोधयुक्त. २ गान्हाणें, गोष्ट. ३ आज्ञाधारक, सेवक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीप्रलंबासुरमर्दनायनमः ॥ जयजयकृपासागराचक्रपाणी ॥ भवभंजनासायुज्यदानी ॥ म
जकृपादृष्टींविलोकूनी ॥ कर्मापासूनींसोडवावें ॥ १ ॥ आशापाशतोडूनिश्रीपती ॥ करीनिरपेक्षउदासवृत्ती ॥ तुझे
भजनींलागेप्रीती ॥ ऐसेंश्रीपतीकरावें ॥ २ ॥ कामक्रोधादिमदमत्सर ॥ देहींउठतीअनिवार ॥ तूंकृपाकरिसीजैंशार्ङ्ग
धर ॥ शुद्धअंतरतैंहोय ॥ ३ ॥ लौकिकप्रतिष्ठामानाभिमान ॥ हेंपुढेंवोढवलेंमहाविघ्न ॥ तेथेंचिलाऊनियांमन ॥ तुझें
चिंतनघडेना ॥ ४ ॥ ऐसेअवगुणअसोनिअंतरीं ॥ मीतुझाह्मणवितोंलोकाचारीं ॥ हाचिअभिमानधरूनिश्रीहरी ॥ म
जउद्धरीपतितांसी ॥ ५ ॥ चंचळमनहेंअनिवार ॥ तुझेचरणींअसावेंस्थिर ॥ हेंचिइच्छितोंनिरंतर ॥ जाणसीअंतरपां
डुरंगा ॥ ६ ॥ हस्तइच्छितीतुझेंअर्चन ॥ षोडशोपचारेंकरावेंपूजन ॥ त्यांचेंकरावेंसमाधान ॥ मनोरथपूर्णकरावे ॥ ७ ॥
समदृष्टीनेंचराचरभूतीं ॥ तुजचिपाहावेंवैकुंठपती ॥ विकल्पद्वेषहेनयेचित्तीं ॥ ऐसेंश्रीपतीकरावें ॥ ८ ॥ चरणांचेंसार्थक
तरीचजाण ॥ तुझेयात्रेसकरावेंगमन ॥ नृत्यकरावेंनिर्लज्जहोऊन ॥ देहाभिमानटाकोनी ॥ ९ ॥ तुझेनिजभक्तरुक्मि
णीपती ॥ त्यांचीचसुखेंवर्णावीकीर्ती ॥ हेइच्छाधरूनिचित्तीं ॥ विनवितोंतुजप्रतिदयाळा ॥ १० ॥ हेम्यांअघटितघेतली
आळ ॥ तूंनिरूपणवदवीरसाळ ॥ जेश्रवणींपडतांचितत्काळ ॥ श्रोतेप्रेमळसंतोषती ॥ ११ ॥ मागीलअध्यायींशेवटीं
कथा ॥ देउळींगेलीतुकयाचीकांता ॥ प्रसन्नहोऊनिरुक्मिणीमाता ॥ बोलिलीअवचितांनिजभाग्यें ॥ १२ ॥ साडी
चोळीमुष्टीभरीहोन ॥ देतांचिवाटलेंसमाधान ॥ ह्मणेपाषाणमूर्तीबोलिलीवचन ॥ हेंअघटितदेखोनविस्मित ॥ १३ ॥
परिधानकरूनिदिव्यांबर ॥ रुक्मिणीसकेलानमस्कार ॥ बाहेरयेतांचिसत्वर ॥ कळलेंसाचारतुकयासी ॥ १४ ॥ मग
कांतेसिकायवचनबोलत ॥ तुवांउतावेळकेलेंचित्त ॥ तेणेंअंतरलेंपरमार्थहित ॥ ऐकतेमातंनिजकर्णी ॥ १५ ॥ उभेंचि

१ पातक्यास. २ धांवरें. ३ पूजा, सेवा. ४ संशय. ५ पायांचें. ६ स्त्री. ७ आश्चर्यभरीत. ८ गोष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शेतमोडितांजाण ॥ पुढेंराशीसयेतसेउणेंपण ॥ कींदुधावरीलसायभक्षितांजाण ॥ मगनवनींतकोठोनयेईल ॥ १६ ॥
नातरीऊंसउभाचिचोंखिलासारा ॥ तरीकोठूनलाभेलशर्करा ॥ ऐसाविवेककरूनिअंतरा ॥ होनद्विजवरांवांटावे ॥
॥ १७ ॥ काचमणीचात्यागकरितां ॥ मुक्ताफळयेतसेहातां ॥ तरीधीरधरूननिजचित्ता ॥ उदासआतांवाव्हावें ॥ १८ ॥
खद्योतत्यागितांमनांतूनी ॥ गृहासियेतसेवासरमणी ॥ कींथिल्लरटाकितांडावलोनी ॥ पयोब्धियेऊनीभेटेल ॥ १९ ॥
गुंजाहारनलेतांवाडेंकोडें ॥ तरीअनर्घ्यरत्नेंलाधतीपुढें ॥ कींनधरितांऔषधाचीचाड ॥ तरीसुधारसगोडलाधेलकीं ॥
॥ २० ॥ नकरितांसिद्धिचाआदरू ॥ तरीनिजभाग्येंभेटतोकल्पतरू ॥ दुर्जनत्यागेंभेटतीसद्गुरू ॥ तरीकांअव्हेरूक
रावा ॥ २१ ॥ तेवींऋद्धिसिद्धिसंपत्तिधन ॥ त्यांसत्यागितांमनांतून ॥ तरीतूंपावसीसायुज्यसदन ॥ जेंइच्छितीसुरगण
मानसीं ॥ २२ ॥ ऐसींऐकोनिदृष्टांतवचन ॥ कांतापावलीसमाधान ॥ तत्काळविप्रबोलावून ॥ वांटिलेंहोनतयांसी ॥
॥ २३ ॥ सांडोनियालोभममता ॥ हृदयींआठवीश्रीपंढरीनाथा ॥ पुढेंवर्तलीअपूर्वकथा ॥ तेसावधानताऐकावी ॥ २४ ॥
तुकयाचीप्रशंसाजाहलीफार ॥ मानूंलागलेथोरथोर ॥ कींयासवेंजेवितोरुक्मिणीवर ॥ लोकपरस्परबोलती ॥ २५ ॥
हेंचिंचवडींभूदेवांसिकळतांजाण ॥ असह्यजाहलेंत्यांजकारण ॥ ह्मणतीआह्मीप्रतिष्ठितब्राह्मण ॥ गणपतीप्रसन्न
केलाकीं ॥ २६ ॥ आणितुकयाजातीचाशूद्रवाणी ॥ त्यासवेंजेवितोचक्रपाणी ॥ हेतंवअघटितदिसेकरणी ॥
आलीदिसोनीयथार्थ ॥ २७ ॥ तरीतयासिबोलावूनियेथ ॥ दृष्टीसपाहावीकांहींप्रचित ॥ ऐसेंविचारूनचित्तांत ॥
तोंकळलावृत्तांततुकयासी ॥ २८ ॥ ह्मणेचिंचवडीचेथोरब्राह्मण ॥ त्याणींकेलेंआपुलेंस्मरण ॥ तरीआतांतेथवरीजाऊन ॥
घ्यावेंदर्शनतयांचे ॥ २९ ॥ ऐसीकल्पनाधरूनिपोटीं ॥ सत्वरनिघालाउठाउठी ॥ मगमूषकवहनाचीघेऊनभेटी ॥ बै

१ लोणी. २ विचार. ३ मोतीं. ४ काजवा. ५ सूर्य. ६ क्षीरसागर. ७ गडबडीनें, कौतुकानें. ८ अमृत. ९ देव. १० गणपति.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सलेनिकटींदेवांचे ॥ ३० ॥ तुकयासिदेखोनियांत्यानीं ॥ ह्मणतीइच्छितहोतोंजेंमनीं ॥ तेंअनायासेंआलेंघडोनी ॥ चमत्कारनयनींपाहावा ॥ ३१ ॥ तोंसहजपावलामध्यान्हकाळ ॥ पंक्तीसबैसलेब्राह्मणसकळ ॥ तुकयासिपात्रतेवेळ ॥ वाढिलेंतत्काळतयांनीं ॥ ३२ ॥ देवांसिह्मणेवैष्णवभक्त ॥ आमुचासंगातीपंढरीनाथ ॥ तोभोजनासियेईलयेथ ॥ तरीआणिकपात्रमांडावें ॥ ३३ ॥ आणखीतुह्मींहीप्रार्थूनिगजवदनासी ॥ येथेंआणावेंभोजनासी ॥ वचनऐकतांचमानसीं ॥ आश्चर्यदेवांसीवाटलें ॥ ३४ ॥ ह्मणतीहेंतोंअघटितजाहलें ॥ आमुचेमंत्रआह्मांसफळले ॥ मगदेव्हारांजाऊनतेवेळे ॥ करकमळजोडिलेंतयासी ॥ ३५ ॥ नानापरीचीकेलीस्तुती ॥ परीभोजनासिनयेचगणपती ॥ कायकराव्याशास्त्रयुक्ती ॥ एकसद्भक्तीनसतांची ॥ ३६ ॥ बाह्यात्कारेंकेलेंपूजन ॥ अंतरींविकल्पेंभरलेंमन ॥ तरीकोणतेंहीदैवतनव्हेप्रसन्न ॥ दुश्चितमनअसतांपैं ॥ ३७ ॥ गजेंद्रासिपावलावैकुंठपती ॥ तोकायजाणेशास्त्रव्युत्पत्ती ॥ गोपीउद्धरल्यानेणोंकिती ॥ सप्रेमभक्तीदेखोनी ॥ ३८ ॥ विधियुक्तयाज्ञिककर्मठपण ॥ त्यांसिअंतरलेश्रीकृष्णचरण ॥ ऋषिपत्न्यांनींनेलेंअन्न ॥ त्यांसिजगज्जीवनभेटला ॥ ३९ ॥ भोळेभाविकभक्तप्रेमळ ॥ त्यांस्वाधीनजाहलादीनदयाळ ॥ हुंबरीघालितांचगोपाळ ॥ तेंऐकेघननीळनिजप्रीतीं ॥ ४० ॥ असोआतांबोलूनकायफार ॥ हेंवर्मजाणतीवैष्णववीर ॥ जिहींशुद्धकरूनिअंतर ॥ शार्ङ्गधरवशकेला ॥ ४१ ॥ मगब्राह्मणह्मणतीतुकयासी ॥ पाषाणमूर्तीजेवीलकैसी ॥ नैवेद्यदाखवितांगजवदनासी ॥ सुवासतयासीजातसे ॥ ४२ ॥ यावरीबोलेवैष्णववीर ॥ मूर्तीमाजीनाहींविघ्नहर ॥ तुह्मांसिसंशयअसलाजर ॥ तरीऐकाविचारनिजकर्णीं ॥ ४३ ॥ समुद्रजीवनींकरितांस्नान ॥ एकभक्तबुडतहोताजाण ॥ त्याणेंएकदंताचेंकेलेंस्तवन ॥ करीधावनह्मणोनी ॥ ४४ ॥ तयासिकाढावयात्वरित ॥ विनायकगेलेअसतीतेथ ॥ याचीपाहाणेंअसेलप्रचित ॥ तरीबैसा

---

१ हात. २ संशयानें. ३ यथाशास्त्र. ४ गणपति.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वेंमुहूर्तक्षणभरी ॥ ४५ ॥ देव्हारीं नसतां गजवदनासी ॥ तुह्मीं नैवेद्य दाखविला कवणासी ॥ ऐसें बोलतां तुकयासी ॥ आ
श्चर्य देवांसी वाटलें ॥ ४६ ॥ तों एक मुहूर्त लोटतां चित्यांनीं ॥ कौतुक देखिलें आपुले नयनीं ॥ गणपतीची मूर्ती सिंहासनीं
उदकें भरूनि निथळत ॥४७॥ पीतांबर पिळोनि पाहातां जाण ॥ तों क्षार लागलें समुद्रजीवन ॥ हा चमत्कार अद्भुत गहन ॥
आश्चर्य देखोन करिताती ॥४८॥ तुकयासि पुसती द्विजवर ॥ किमर्थ भिजला से पीतांबर ॥ यावरी ह्मणे वैष्णववीर ॥ आले
विघ्नहर ये ठायीं ॥ ४९ ॥ निजभक्त बुडतां जाण ॥ त्याचें सत्वर केलें धांवण ॥ ऐलतीरीं बैसवोनि त्या कारण ॥ गजवदन आ
लेकीं ॥ ५० ॥ ऐकोनि तुकयाची वचनोक्ती ॥ देव निजमनीं आश्चर्य करिती ॥ ह्मणे विष्णुभक्तांची अद्भुत स्थिती ॥ आ
पणाप्रती नेणवे ॥ ५१ ॥ पुढती ब्राह्मण काय बोलत ॥ समुद्रासि गेले पार्वतीसुत ॥ हें तुह्मांस कैसें जाहलें श्रुत ॥ साक्षात प्र
चीत दाखविली ॥ ५२ ॥ परस्परें आपण उत्तर देती ॥ याणें आराधिला रुक्मिणीपती ॥ सकळ दैवतांची गती ॥ आलीसे
हातीं यास्तव ॥ ५३ ॥ प्रसन्न होतां सूर्यनारायण ॥ काय एक न दिसे त्याकारण ॥ कां कल्पतरूचें देखतां उद्यान ॥ कामना
अपूर्ण न राहे ॥ ५४ ॥ जेणें क्षीरसागरीं रहिवास केला ॥ तरी क्षुधे तृषेचा उद्वेग गेला ॥ नातरी अमृतसिद्धी येतां साधकां
ला ॥ औषधी त्या जलान लागती ॥ ५५ ॥ तेवीं कृपा करितां पंढरीनाथ ॥ तयासि वोळंगती सकळ दैवत ॥ जेवीं विलोकितां
रोहिणीपती तें ॥ उडुगण समस्त दीसती ॥ ५६ ॥ यापरी परस्परें बोलती देव ॥ ऐकोनि ह्मणे तुका वैष्णव ॥ भोजनासि आ
ले पंढरीराव ॥ अंतरीं सद्भाव देखोनी ॥ ५७ ॥ तुह्मीं प्रार्थोनि गजवदन ॥ तयासि साक्षात जेववा अन्न ॥ ऐसें ऐकोनि यां
वचन ॥ देवीं मौन धरियेलें ॥ ५८ ॥ मग तुकयासि ह्मणती द्विजवर ॥ तुह्मीं प्रार्थिला रुक्मिणीवर ॥ त्यांचे पक्तीस विघ्नह
र ॥ जेववा साचार निजप्रीतीं ॥ ५९ ॥ अवश्य ह्मणोनि तये क्षणीं ॥ पात्र वाढिलें त्यांजकडोनी ॥ मग गणपतीच्या सान्नि

१ पाझरत. २ उदक. ३ गणपति. ४ समजणार नाहीं. ५ वन, अरण्य. ६ पीडा. ७ चंद्रास. ८ नक्षत्र समुदाय.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धयेवोनी ॥ करजोडोनिविनवीत ॥ ६० ॥ जयजयाजिलंबोदरा ॥ चौदाविद्यांच्यासागरा ॥ तुझेंतांडवदेखोनीउमा
वरा ॥ हर्षअंतरानसमाये ॥ ६१ ॥ तुझीहोतांचिकृपादृष्टी ॥ विघ्नेंपळतीउठाउठी ॥ सप्रेमेंअनुभवघेतांदिठी ॥ तुटेफां
सोटीभवबंधा ॥ ६२ ॥ आतांप्रार्थितोंतुजकारण ॥ जेनैवेद्यभक्षावाप्रीतींकरून ॥ वचनऐकोनिगजवदन ॥ करितीभो
जनतेधवां ॥ ६३ ॥ एकेपात्रींरुक्मिणीरमण ॥ त्यासन्निधगजवदन ॥ तुकयाचेभक्तीस्तवजाण ॥ बैसलेयेऊनउभयतां
॥६४॥ परीकोणासिनदिसतीनयनीं ॥ अन्नतरसरलेंपात्रांवरूनी ॥ हाचमत्कारदेखोनिमनीं ॥ आश्चर्यवाटलेंदेवांसी
॥६५॥ ह्मणतीआह्मीलंबोदरउपासिला ॥ परिसाक्षातनाहींकधींजेविला ॥ तुकयानेंअघटितदाविलीलीला ॥ नवलस
कळांवाटलें ॥ ६६ ॥ गणपतीजेविलाअपूर्वकाये ॥ हेंअघटितसर्वथाह्मणोंनये ॥ साक्षातआलेपंढरीराये ॥ जेदुर्लभहो
येसाधकां ॥६७॥ पयोब्धीचजाहलियास्वाधीन ॥ मगसरितांचापाडकोण ॥ तेवींकृपाकरितांरुक्मिणीरमण ॥ दैवतें
संपूर्णतुष्टती ॥६८॥ कामधेनुगृहासियेतांपाही ॥ तेथेंसहजचियेतीइतरगायी ॥ कींरोहिणीवराच्यादर्शनेंपाही ॥ नक्षत्रें
कायीनदिसतीकीं ॥६९॥ वज्रासनींबैसोननेटीं ॥ योगियांसिज्याचीदुर्लभभेटी ॥ तोसगुणसाकारजगजेठी ॥ पावतोसं
कटींनिजदासां ॥ ७० ॥ यापरीब्राह्मणस्तवितीदेवा ॥ ह्मणतीवैष्णवभक्तप्रेमळतुका ॥ स्वाधीनकेलेंवैकुंठनायका ॥ जो
ब्रह्मादिकांदुर्लभ ॥७१॥ मगकरशुद्धितांबूलघेऊन ॥ तेथेंमांडिलेंहरिकीर्तन ॥ एकरात्रतेथेंराहून ॥ चालिलेपुसोननिज
ग्रामा ॥ ७२ ॥ गजवदनासिकरोनिनमन ॥ देवांसविनवीकरजोडून ॥ आतांदेहूसजावयाकारण ॥ आज्ञादेणमजला
गीं ॥ ७३ ॥ यावरीब्राह्मणबोलतीवचन ॥ पुन्हामागुतीद्यावेंदर्शन ॥ निरोपयेईलतुह्मांकारण ॥ तैंकरावेंगमननिजप्री
तीं ॥७४॥ अवश्यह्मणोनिवैष्णवभक्त ॥ तेथोनिचालिलेअतित्वरित ॥ ग्रामासमीपयेतांनिश्चित ॥ तोंएकमाळीअकस्मा

१ तांडवनृत्य. २ शंकरास. ३ संसारफांस. ४ गणपति. ५ क्षीरसमुद्र. ६ नद्यांची थोरी. ७ चंद्रास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तपातला ॥७५॥ तुकयासिकरोनिसाष्टांगनमन ॥ करजोडोनिबोलेवचन ॥ मळियातगुऱ्हाळलागलेंजाण ॥ तेथवरीआ
गमनकरावें ॥७६॥ सद्भावदेखोनित्याचेअंतरीं ॥ अवश्यह्मणतीतेअवसरीं ॥ तुकयासियेतांमळियाभीतरी ॥ माळीअंत
रींसंतोषला ॥७७॥ बैसावयासितेवेळे ॥ घडीकरोनिटाकिलेंचवाळें ॥ ह्मणेधन्यभाग्यमाझेंसुफळ ॥ जेदीनदयाळपातले
॥ ७८ ॥ इक्षुदंडमोडोनिलवडेंसवडी ॥ काढोनिदीधलींमध्यकांडीं ॥ परितुकयासतेथींचीगोडी ॥ नरुचेचोखंडीसर्वथा
॥ ७९ ॥ जेणेंब्रह्मरससेविलाप्रीतीं ॥ त्यासइतरसर्वथानावडती ॥ जेवींदिनकराचेलागतांसंगती ॥ दीपकदिसतीतेजही
न ॥८०॥ जोसिद्धांतज्ञानींमग्नआहे ॥ तोपाखंडकर्णीऐकेलकाय ॥ कामधेनुऐसीजोडल्यागाय ॥ मगअजांपालणकास
या ॥ ८१ ॥ तेवींनामसुधेचीलागतांगोडी ॥ इतरांसियेतअनावडी ॥ ह्मणोनइक्षुदंडाचीचोखडी ॥ चवीधडपुडीजाणे
ना ॥ ८२ ॥ परीमाळियाचासद्भावदेखोन ॥ तेथेंबैसलेनिवांतक्षण ॥ त्याणेंसोज्वळपात्रउटोन ॥ रसआणोनपाजि
ला ॥ ८३ ॥ जातेसमयींतुकयाप्रती ॥ माळीकरजोडूनिकरीविनंती ॥ कींऊंसन्यावेलेंकरांप्रती ॥ मंदिराप्रतीआपुल्या
॥ ८४ ॥ अकळुनइक्षुदंडएकेठायीं ॥ बांधोनदीधलेतेसमयीं ॥ तेखांद्यावरीघेऊनलवलाहीं ॥ तेथोनसत्वरीचालिले ॥
॥ ८५ ॥ देहूसप्रवेशतांतुकयास ॥ गांवींचींलेंकुरेंमागतीऊंस ॥ तेव्हांआपुलेंपरावेंनदिसेत्यास ॥ देतसेऊंसत्यांप्रती
॥ ८६ ॥ जैसाघरधनीआणितस्कर ॥ दीपकासिसारिखेनिरंतर ॥ कींदरिद्रीआणिनृपवर ॥ यांसिप्रकाशेदिनकरसा
रिखा ॥ ८७ ॥ कींचूतवृक्षआणिबाभुळजाण ॥ गंगातीरींउगवलींदोघेंजण ॥ परीतिजलाअधिकउण ॥ नवाटेजाण
सर्वथा ॥ ८८ ॥ नातरीउर्वीवरीजाण ॥ वसतीमुंगीआणिवारण ॥ समविषमनवाटेतिजलागून ॥ लेखीसमानदोहींतें ॥ ३ ॥
॥ ८९ ॥ कींअसंख्यजळचरेंजाण ॥ पयोब्धींतवसतीरात्रदिन ॥ आपपरभावजाण ॥ नलेखीचसर्वथा ॥ ९० ॥ ना

१ घोंगडी. २ ऊंस. ३ गडबडीनें, तांतडीनें. ४ चांगली. ५ अमृत, ब्रह्मानंद. ६ सूर्याचे. ७ शेळी. ८ खरी. ९ दुसऱ्याचें. १० आंब्याचा वृक्ष. ११ पृथ्वीवर. १२ हत्ती.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तरीपौर्णिमेचानिशापती ॥ प्रकाशेंसारिखासर्वांप्रती ॥ तैसाचभावतुकयाचानिश्चितीं ॥ अद्भुतस्थितीनिरुपम ॥९१॥ इक्षुदंडन्यावेआपुलेघरीं ॥ हाआठवसर्वथानव्हेअंतरीं ॥ सर्वांभूतींमैत्रीबरी ॥ दृष्टीचराचरींसारिखी ॥ ९२ ॥ मुलांस वांटितांऊंसदेख ॥ गृहासिन्यावयाउरलाएक ॥ हेंकांतेनेंदेखिलेंसम्यक ॥ देखोनसंतापवाटला ॥ ९३ ॥ तंवगृहासि येऊनिवैष्णववीर ॥ कांतेसिबोलेमधुरोत्तर ॥ तिणेंऊंसघेऊनसत्वर ॥ मगकठिणउत्तरबोलिली ॥ ९४ ॥ इक्षुदंडवांटिले सर्वांस ॥ तेकायपावलेतुमचेवडिलांस ॥ घरींलेंकुरेंदिसतीउदास ॥ नाहींखावयासह्मणोनी ॥ ९५ ॥ मगसक्रोधहो ऊनिअंतरीं ॥ इक्षुदंडमारिलापाठीवरी ॥ दोनकांडींपडलींभूमीवरी ॥ एकनिजकरींराहिलें ॥ ९६ ॥ निजशांतिअंत रींधरोनिदेखा ॥ कांतेसिबोलेवैष्णवतुका ॥ वांटाजाहलासेनेटका ॥ साह्यनिजसखापांडुरंग ॥ ९७ ॥ तुझातुजपाशींरा हिलाभाग ॥ खालींदोनपडलेसवेग ॥ तेलेंकुरेंआणिआह्मीसांग ॥ घेऊंवांटूननिजप्रीतीं ॥ ९८ ॥ ऐसीनिजांगेंदेखो निशांती[1] ॥ आश्चर्यवाटलेंकांतेप्रती ॥ ह्मणेहानिर्लज्जजाहलानिश्चितीं ॥ प्रपंचभ्रांतीटाकोनी ॥ ९९ ॥ आतांमायाभ्रां तीटाकोनिपाही ॥ यासिवायांछळोनिकायी ॥ मानापमाननकळेकाहीं ॥ संसारसोयीटाकिली ॥ १०० ॥ ऐसाविवेकं[2] करोनिचित्ता ॥ निवांतराहिलीनिजकांता ॥ तुकयाचीशांतिवर्णितां ॥ तुळणेसिदृष्टांतानयेकीं ॥ १ ॥ मगविवेककरोनियांम हीपती ॥ पुरातनभक्तांच्याधुंडोनियांस्थिती ॥ तंवएकादशस्कंधींउद्धवाप्रती ॥ कदर्युकथासांगीतली ॥ २ ॥ तेंएकना थाचेटीकेवरूनी ॥ परिसिलेंअसेलसंतसज्जनीं ॥ तैसीचतुकयाचीशांतिनयनीं ॥ दृष्टांतींदिसोनीयेतसे ॥ ३ ॥ हेउपमा देतांजाण ॥ मजलादिसोनयेतसेगौण ॥ जेंकदर्यूनेंघेतलेंसंन्यासग्रहण ॥ मगकेलेंछळणतयाचें ॥ ४ ॥ आणिगृहस्था श्रमींअसतांवैष्णवभक्त ॥ मानापमानसारिखेमानित ॥ निजकांतेनेंमारितांत्वरित ॥ परीक्रोधअणुमात्रनयेची ॥ ५ ॥

---

१ चंद्र. २ विचार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ह्मणोनिउपमाद्यावयासिपाही ॥ दृष्टांतनपुरेकवणेठायीं ॥ जैसाक्षीरसागराचेतुळणेसपाही ॥ रत्नाकरकायीयेईल ॥
॥ ६ ॥ कींसायुज्यतेचेसाम्यतेसिनिश्चितीं ॥ सलोकतासमीपतानसरती ॥ तुकयाचीतैसीअद्भुतस्थिती ॥ सभाग्यश्रो
तींजाणिजे ॥ ७ ॥ जेणेंकलीमाजीवैकुंठींसहज ॥ देहासहितलाविलाध्वज ॥ तोप्रेमळभक्तवैष्णवराज ॥ जगद्गुरूसहज
अवतरला ॥ ८ ॥ तयासिथोरथोरह्मणतापाहे ॥ तरीवरिष्ठसर्वथाह्मणोंनये ॥ जैसासमुद्रगंभीरह्मणतांपाहे ॥ येरवींका
येनव्हेतो ॥ ९ ॥ कींवासरमणीसतेजआगळा ॥ कासयाह्मणावेंवेळोवेळां ॥ नातरीशीतळरोहिणीपतीला ॥ ह्मणाव
यालानलगेची ॥ ११० ॥ पृथ्वीचीक्षमावर्णितांपाहे ॥ तेतेंव्हांचितैसीझालीकाये ॥ नातेस्वभावेंचितैसीआहे ॥ तरीवा
नावेंकायेनिजमुखें ॥ ११ ॥ तेवींविवेकशांतीचेंभूषण ॥ तुकयाचेअंगींअक्षयलेण ॥ तेंनिजमुखेंवर्णावेंकोण ॥ पवित्र
सज्ञानजाणती ॥ १२ ॥ कायिकंवाचिकमानसिकपाही ॥ त्याचेपासितुळणानाहीं ॥ असत्यवचननयेचिकांहीं ॥ प्रा
णांतहीवोढवल्या ॥ १३ ॥ हेंवाचिकतपजाणासुनिश्चितीं ॥ आतांमानसिकाचीकैसीरीती ॥ सारिखीचकरुणासर्वां
भूतीं ॥ विषमचित्तींनधरितां ॥ १४ ॥ हामानसतपाचाविचार ॥ संक्षेपेंबोलिलोंसाचार ॥ आतांनिजांगेंकरावापरोप
कार ॥ हेंतपशारीरबोलिजे ॥ १५ ॥ हेतीनयथापद्धतीन ॥ तुकयासिसर्वांगींजाहलेभूषण ॥ चरणचालीनिजप्रीतीन ॥
पंढरीगमनकरावें ॥ १६ ॥ पंधरादिवसींहरिदिनीशी ॥ नेमेंवारीधरिलीऐसी ॥ एकदिवसराहोनिमंदिरासी ॥ दुसरे
दिवसींनिघावें ॥ १७ ॥ गातनाचतप्रेमभरित ॥ पंढरीससातवेदिवसींजात ॥ तीनरात्रींराहूनतेथ ॥ परतोनियेतगृहा
सी ॥ १८ ॥ तीनवर्षेंलोटतांऐसीं ॥ तोंशीतज्वरलागलाशरीरासी ॥ मगशक्तिहीनदेखोनिमानसीं ॥ तळमळचित्तासी
करीतसे ॥ १९ ॥ निजांगेंनचालवेपाउलभरी ॥ ह्मणेपंढरीचीअंतरलीवारी ॥ कांहींदोषहोतापदरीं ॥ तेंविघ्नलोकरी

१ समुद्र. २ सायुज्यता मुक्तीची बरोबरी. ३ परमात्मा, श्रेष्ठ. ४ सूर्याला. ५ अधिक प्रकाशमान्. ६ थंड. ७ देहदंडनानें केलेली ईश्वरभक्ती. ८ प्राप्त झाल्यास. ९ द्वैतभान.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वोढवलें ॥१२०॥ तोंनिजभक्ततेअवसरीं ॥ पंढरीसचालिलेवारकरी ॥ त्यांचेहातींपत्रलिहूनसत्वरीं ॥ पंढरीसीपाठविलें ॥ २१ ॥त्याविसाअभंगांचाअन्वयनिश्चितीं ॥ अभिप्रायपरिसिलावैष्णवभक्तीं ॥ जेश्रवणकरितांनिजप्रीतीं ॥ प्रेमचित्तींठसावे ॥ २२ ॥ ध्यानींआणोनिपांडुरंगमूर्ती ॥ ह्मणेदेवाधिदेवारुक्मिणीपती ॥ तुजविनवावयानिश्चितीं ॥ भाग्यमजप्रतीअसेना ॥ २३ ॥ परीधीटहोऊनिआपुलेमनीं ॥ पत्रलिहितोंआवडीकरूनी ॥ पारनेणिजेश्रुतिपुराणीं ॥ मीपामरकोठूनीवर्णूंशकें ॥ २४ ॥ परीजैसीतैसीआरुषवाणी ॥ अंगिकारावीचक्रपाणी ॥ सलगीकेलीपायांलागोनी ॥ मस्तकचरणींठेविला ॥ २५ ॥ तूंसकळसुरवरांवरिष्ठदेव ॥ गोपिकापतिसगुणमाधव ॥ उदाररूपातिवर्णितीसर्व ॥ सत्कीर्तिवैभवत्रिभुवनीं ॥ २६ ॥ नाममात्रेंचिहृषीकेशी ॥ नाशितोसिपातकांच्याराशी ॥ कर्मेजळतीलआपैशीं ॥ दारिद्र्यदृष्टीसीदिसेना ॥२७॥ सर्वसुखेंविठाबाई ॥ तुझ्यावोळंगतीपायीं ॥ ऋद्धिसिद्धिअनुकूलठायीं ॥ चारीमुक्तीआंदण्या ॥२८॥ इंद्रादिकांजेंदुर्लभपद ॥ तेंनिजदासपावतीसप्रेमबोध ॥ कीर्तनींनाचतांअतिआल्हाद ॥ टाळियाछंदेंपीटितां ॥२९॥ विश्वींजडजीवअसतीअनंत ॥ त्यांचेंजीवनतूंरुक्मिणीकांत ॥ परीमाझेंचिखोटेंसंचित ॥ ह्मणोनिमूळनपाठविसी ॥१३०॥ नाहींनिरोपपाठविलातुज ॥ ह्मणोनिउदासधरिलेंमज ॥ निष्ठुरहोऊनियांसहज ॥ मोकलिलेंआजयेसमयीं ॥ ३१ ॥ कींकांहींजरूरपडलाधंदा ॥ ह्मणूनिविसरलासिमजगोविंदा ॥ मींवाटपाहतसेंमुकुंदा ॥ दाखवीपदाआपुल्या ॥३२॥ नातरीकांहींद्यावेंलागेलमजला ॥ हेंचिसांकडेंपडलेंतुजला ॥ ह्मणोनिसांडकरूनिविठ्ठला ॥ मूळमजलानपाठविसी ॥३३॥ एवडासंकोचमानसीं ॥ तरीकासयापोरेंव्यालासी ॥ आह्मींजाऊनिकोणापासीं ॥ तोंडवासूनिमागावें ॥ ३४ ॥ तुवांदीधलेंमोकलून ॥ तरीकोणआहेआह्मांकारण ॥ कोणनिवारीभागशीण ॥ एकातुजविणपांडुरंगा ॥ ३५ ॥ कोणाचीवाटपा

१ सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. २ बोलावणें. ३ सोडून—टाकून दिलेंस. ४ संकट. ५ तोंड पसरून.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हूंसांग ॥ कोणसखाआह्मांसिजिवलग ॥ तुवांचमोकलिलेंश्रीरंग ॥ तरीहोईलभवभंगकैशियारीतीं ॥ ३६ ॥ कोणमाझे अ०
जीवीचेंसांकडें ॥ नसांगतांजाणेलवाडेंकोडें ॥ तुजविणनिवारितारोकडें ॥ मागेंपुढेंदिसेना ॥ ३७॥ देवाधिदेवारुक्मिणी
पती ॥ कायमाझीदेखिलीअनीती ॥ ह्मणोनिकरुणानयेचित्तीं ॥ मोकलिलेंमजप्रतीदयाळा ॥ ३८ ॥ तरीडोळेभेटद्यावी ॥५०॥
सत्वर ॥ कांहींवेंचैनघालींतुजवर ॥ अहर्निशींनामउच्चार ॥ वारंवारकरीतसें ॥ ३९ ॥ जेंसंचिताप्रमाणेंमिळेल ॥ तेंचिक
रोनिदाटपातळ ॥ कंडेलावूंआपुलाकाळ ॥ सोडोनितळमळचित्ताची ॥ १४० ॥ परीतुजवरीभारनघालींसर्वथा ॥ हाचि
निश्चयपंढरीनाथा ॥ हृदयमंदिरींतुंवसतां ॥ जाणसीतत्वतांअंतरीचें ॥ ४१ ॥ परीआह्मांलेंकुरांचीजाती ॥ भेटावयासि
वाटेखंती ॥ ह्मणोनियांरुक्मिणीपती ॥ तळमळचित्तींकरीतसें ॥ ४२ ॥ तुजतंवपोरेंजाहलींफार ॥ त्यांचीनसाहेकिर
किर ॥ ह्मणोनिचित्तींहोऊनिनिष्ठुर ॥ माझाअव्हेरकेलाकीं ॥ ४३ ॥ आह्मीकरितोंकलागती ॥ तुजसींभांडतोंरुक्मिणी
पती ॥ ह्मणोनियांमजप्रती ॥ सांडिलेंनिश्चितींदयाळा ॥ ४४ ॥ नातरीकुटुंबबहुतजाहलेंपदरीं ॥ कन्यावराचेघरीं ॥ म
गनिष्ठुरताधरोनिअंतरीं ॥ आह्मांससासुरींटाकिलें ॥ ४५ ॥ कांव्यवहारकरितांजगजेठी ॥ व्यवसायांतआलीतुटी ॥
ह्मणोनिकृपणताधरोनिपोटीं ॥ मजयेसंकटींटाकिलें ॥ ४६ ॥ नातरीपतबुडालीलोकाचारीं ॥ रिणकरीयेऊनिबैसलेद्वा
रीं ॥ ह्मणोनिविसरअंतरीं ॥ पडलाश्रीहरिआमुचा ॥ ४७॥ बरेंमूळपाठवावयानहोय ॥ तरीनिरोपधाडितांवेंचेकाय ॥
कोरडेंयशहीनघेववे ॥ उपजलेंभयमानसीं ॥ ४८ ॥ आह्मासीटाकिलेंजगजेठी ॥ तरीजोडसंचिलीकोणासाठीं ॥ एवढी
करिसीआटाआटी ॥ लेंकुरेंदृष्टींनावडती ॥ ४९ ॥ फुकाचाशब्दवेंचितांजाण ॥ यशनघेववेतुजकारण ॥ तरीधनकेलें ॥ ५ ॥
बहुतजतन ॥ तेंकोणाकारणदेशील ॥ १५० ॥ पोटींच्यालेंकुरासिनाहींसुख ॥ रुदनकरितांलागलीभूक ॥ तरीजेणें

१ संसारदुःखाचा नाश. २ विनोदानें. ३ भार. ४ रात्रंदिवस. ५ कज्जाभांडण. ६ टाळाटाळ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

होईलतुझालौकिक ॥ तैसाविवेककरावा ॥ ५१ ॥ आमुचातळतळाटघेशीलजर ॥ तरीतुझेंकदापिनहोयबरं ॥ ऐसामा
नसींकरूनिविचार ॥ घ्यावासमाचारदीनाचा ॥५२॥ नाहींतरींभीडनधरितांअंतरीं ॥ सर्वथानठेवीकांहींउरी ॥ संतांसि
सांगोनियांसत्वरीं ॥ तुझीजोडनिर्धारींबुडवीन ॥५३॥ नामजपतोंअहर्निशीं ॥ तेंकदापिमीनघेवाचेसी ॥ जरीतूंहोऊनउ
दासी ॥ आसंबुडविसीदयाळा ॥ ५४ ॥ तूंएवढासमर्थजगजेठी ॥ पोटींजन्मलोंआह्मींकरंटीं ॥ हेचअपकीर्तिजाहली
खोटी ॥ फजितीमोठीजगांत ॥५५॥ येथेंखावयासनमिळेअन्न ॥ मूळहीनयेचमाहेरींहून ॥ आतांव्यर्थचहेंखोटेंजीवपण
कासयावागवणव्यर्थची ॥ ५६ ॥ पुढेंआठवधरोनिरुक्मिणीपती ॥ सांगोनिपाठवावेंमजप्रती ॥ रात्रदिवसकरितोंखं
ती ॥ तरीनिष्ठुरचित्तींनव्हावें ॥ ५७ ॥ कंठींधरोनियांप्राण ॥ पायांपासीपातलेंमन ॥ चित्तजाहलेंअसेंऊद्विग्न ॥ तुझेंद
र्शनघ्यावया ॥ ५८ ॥ सांडोनिप्रपंचआडाआंडी ॥ वाटपाहातोंमिबराडी ॥ तरीकृपादृष्टीकरोनिगाढी ॥ मूळतांतडीपा
ठवावें ॥ ५९ ॥ धीरनधरवेनिमेषभर ॥ कैंचीबुद्धिमाझीस्थिर ॥ मनासिआवरोनिवारंवार ॥ मतिसाचारशुद्धनाहीं ॥
॥ १६० ॥ ऐसीदशाआलीअंगा ॥ तूंसर्वजाणसीपांडुरंगा ॥ ह्मणोनियांरुक्मिणीरंगा ॥ करीभवभंगामाझिया ॥ ६१ ॥
शरणागतउपेक्षिलाकोणी ॥ हेमातऐकिलीनाहींकर्णी ॥ ह्मणोनिपायआठवोनिमनीं ॥ मस्तकचरणींठेवितों ॥६२॥ क
धींकरिसीलउचित ॥ हेंमजनकळेचनिश्चित ॥ परीसमाधानमानोनिचित्त ॥ वर्णितोंकीर्तनिशिदिनीं ॥ ६३ ॥ हेविनंति
ऐकोनिशार्ङ्गधरा ॥ मूळपाठवीमजसत्वरा ॥ वारकरीपरतोनयेतीघरा ॥ तोंवरीवाटपाहातसें ॥ ६४ ॥ मगसामोराजा
ऊनत्वरित ॥ सद्भावेंघालीनदंडवत ॥ पुसेननिरोपाचीमात ॥ कींत्वांकायउचितपाठविलें ॥६५॥ महाद्वाराचीपायरीनि
श्चित ॥ निवांतपडलीआहेतेथ ॥ तैसेंचमाझेंदंडवत ॥ सांगतीलसंततुजलागीं ॥ ६६ ॥ कींदंडकाठीउभीचसोडितां ॥

१ विचार. २ मनांत. ३ बाकी. ४ अहोरात्र, रात्रंदिवस. ५ इच्छा, आशा. ६ दरिद्री, दीन. ७ बोलावणें. ८ खोटें. ९ उदास. १० ताणा ताण. ११ सत्वर. १२ क्षण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धरणीसपडेअवचितां ॥ तैसेंचदंडवतपंढरीनाथा ॥ सांगीतलेंसंतांतुजलागीं ॥ ६७ ॥ नातरीजननीपासीछंदघेत ॥
बाळकगडबडांजैसेंलोळत ॥ तैसेंचमाझेंदंडवत ॥ सांगतीलसंततुजलागीं ॥६८॥ मगवारकरीयांसिह्मणेतयेक्षणी ॥ मा
झीतुह्मीकराविनवणी ॥ कींतुकयासिटाकूनिदीधलेंवनीं ॥ अन्यायदेखोनीकोणता ॥ ६९ ॥ दाखवोनियांकीवकाकुळती ॥
मातपुसावीतयाप्रती ॥ कींतुकयाचेअन्यायदेखिलेकिती ॥ ह्मणोनित्याप्रतीमोकलिलें ॥ १७० ॥ कांपंढरीसनहोय
त्याचेंयेणें ॥ विटेवरीनदिसतीसमचरणें ॥ मोकलूनिदीधलेंकवण्यागुणें ॥ त्याजकारणेंपुसावीं ॥ ७१ ॥ मगकृपाकरू
निपंढरीनाथ ॥ मजबोलावीलजरीतेथ ॥ तरीमीधांवोनयेईनत्वरित ॥ साधुसंतभेटती ॥ ७२ ॥ त्रिविधतापआहेतपोटीं ॥
तेतत्काळपळतीउठाउठी ॥ जेगुणचरित्रेंगातांकंठीं ॥ हरुषेंवाळुवंटींनाचतां ॥ ७३ ॥ मातेपुढेंरिघोनजाण ॥ प्रेमेंकरीन
स्तनपान ॥ परिसोनिमाझेंकरुणावचन ॥ उत्तरपाठवणसत्वर ॥ ७४ ॥ कृपासागरराजगज्जीवना ॥ गुणदोषकांहींचना
णीमना ॥ करोनिपापाचाउर्गाणा ॥ दाखवीचरणामजलागीं ॥ ७५ ॥ माझींदुरितेंहरावयातुजसी ॥ सामर्थ्यनाहींहृ
षीकेशी ॥ ह्मणोनिनिष्ठुरहोवोनिमानसीं ॥ मजपरदेशींमोकलिलें ॥ ७६ ॥ कीर्तिऐकोनिरुक्मिणीपती ॥ रात्रदिवस
वाटतेखंती ॥ मीसाक्षातभेटतांनिश्चितीं ॥ तैंलोभजोडतीअपार ॥ ७७ ॥ तुझेंचरित्रजगज्जीवना ॥ वर्णावयासनाहीं
रर्सना ॥ प्रेमामृताचाखावयामना ॥ उतावीळवासनाहोतसे ॥७८॥ परीकाळसाह्यसनतांदेख ॥ वायांचकरीतबैसलोंशोक
पुढेंअधिकवाटेदुःख ॥ कल्पनाअनेकनावरती ॥७९॥ अंतरसाक्षतुंश्रीहरी ॥ आतांजाणशीलतैसेंकरी ॥ मीतळमळटाको
निसर्वोपरी ॥ निश्चलअंतरींराहिलों ॥ १८० ॥ परीअव्हेंरूनटाकितांसहज ॥ तरीदांतकसाळीलागेलतुज ॥ तूंमरोनगे ॥ ६ ॥
लियाअधोक्षज ॥ पोरवडेंमजयेईलकीं ॥ ८१ ॥ तरीआशीर्वाददेतोंतुजआतां ॥ सुखरूपनादेरुक्मिणीकांता ॥ कर्धीतरी

१ पृथ्वी. २ माता. ३ हट्ट. ४ आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक. ५ समुद्र. ६ नाश. ७ पापें. ८ जिव्हा. ९ त्याग.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धरोनिममता ॥ आह्मांअनाथाआपंगीतसां ॥ ८२ ॥ जरीटाकोनियांदीधलेंदूर ॥ तरीनिरोपेंघेसीसमाचार ॥ मोहेंदाटलि याअंतर ॥ दाखविसीमाहेरमजलागीं ॥ ८३ ॥ कृपासागराजगजेठी ॥ आतांऐकमाझीगोष्टी ॥ कळेलतैसेंकरीशेवटीं ॥ पुढेंवटवटीकरीना ॥ ८४ ॥ जैसेंयेईलतुझियाचित्ता ॥ तोजबाबपाठवीपंढरीनाथा ॥ मीबोललोंजाणतांनेणतां ॥ तोअ पराधअनंताक्षमाकरी ॥ ८५ ॥ आधींबाळकासिदीधलालाड ॥ तैसेंचपुरवीमाझेंकोड ॥ भेटदेऊनिनिजनिवाड ॥ भ ववंधसांकडनिवारीतूं ॥ ८६ ॥ ऐसेंकरुणाशब्दलिहूनप्रीतीं ॥ पाठविलेंवारकऱ्यांचेहातीं ॥ इतुकापाल्हाळऐकोनिश्रो तीं ॥ आशंकितचित्तींनव्हावें ॥ ८७ ॥ ह्मणालअनुसंधानटाकोनिदूरी ॥ ग्रंथलिहिलाअतिविस्तारीं ॥ स्वानंदप्रेमा चियेभुली ॥ आठवणमागलीनयेची ॥ ८८ ॥ तरीतैसेंनव्हेचिनिश्चित ॥ वायांचवाढविलानाहींग्रंथ ॥ पत्रिकेचेअभंग पाहोनिखरित ॥ लिहिलेंसंकेलितयेठायीं ॥ ८९ ॥ तुकयाचेंप्रेमवर्णितांप्रीतीं ॥ सहसानपुरेआपुलीमती ॥ जैसाचि ताऱ्यानेंलिहिलागभस्ती ॥ परीप्रकाशत्याप्रतीकाढवेना ॥ १९० ॥ कांसरितांभरोनिचालिलीजरी ॥ तेकरीलकाय सागराचीबरोबरी ॥ नातरीदुधाळधेनुअसलीजरी ॥ तेकामधेनूचीसरीकरीना ॥ ९१ ॥ पितळळखलखितदिसेदुरून तेंकायहोईलशुद्धकांचन ॥ कींसुधारसाचेंसामर्थ्यजाण ॥ औषधीकारणनयेकीं ॥ ९२ ॥ कांमेघगर्जनाकरितांनाचेम यूर ॥ तैसेंचकरूंपाहेलांडोर ॥ परीदोहींचीकळाभिन्नसाचार ॥ सज्ञानचतुरजाणती ॥ ९३ ॥ तेवींतुकयाचेंप्रेमवर्णि तांप्रीतीं ॥ कुंठितजाहलीसकळमती ॥ जैसाउदयासियेतांगभस्ती ॥ उडुगणेंलोपतीत्यापुढें ॥ ९४ ॥ परीकस्तूरींतमृ त्तिकापडतांभली ॥ तैशाचमोलेंतुकयासिआली ॥ तेवींसंतस्तवनींवैखरीभली ॥ हेपावनजाहलीअनायासें ॥ ९५ ॥ अ सोमागीलअनुसंधान ॥ पंढरीसचालिलेवैष्णवजन ॥ त्यांजहातींपत्रतुकयान ॥ दीधलेंलिहूननिजप्रीतीं ॥ ९६ ॥ मग

१ इच्छा. २ अल्प. ३ सूर्य. ४ नदी. ५ गाय. ६ बरोबरी. ७ सुवर्ण. ८ अमृत. ९ मोर. १० नक्षत्रें. ११ जीभ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तुकयासिभेटोनिसत्वरीं ॥ पंढरीसचालिलेवारकरी ॥ पुढिलेअध्यायींभक्तचतुरीं ॥ सप्रेमभरींपरिसिजे ॥ १७ ॥ जैसाकृपणमोजितांधन ॥ अणुमात्रफांकोंनेदीमन ॥ कांपरनिंदाकर्णीऐकोन ॥ कुटिलतल्लीनहोतसे ॥ १८ ॥ तैशापरी अवधानप्रीतीं ॥ देतांतुष्टेलरुक्मिणीपती ॥ श्रोतयांसिविनवीमहीपती ॥ श्रवणींसद्भक्तीअसोंद्या ॥ १९ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकेंभाविकभक्त ॥ पंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ २०० ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५० ॥ ॥ ओव्या ॥ २०० ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अध्याय ५१ वा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तुकयासिभेटोनिसत्वरीं ॥ पंढरीसचालिलेवारकरी ॥ पुढिलेअध्यायींभक्तचतुरीं ॥ सप्रेमभरींपरिसिजे ॥ ९७ ॥ जै
साकृपणमोजितांधन ॥ अणुमात्रफांकोंनेदीमन ॥ कांपरनिंदाकर्णींऐकोन ॥ कुटिलतल्लीनहोतसे ॥ ९८ ॥ तैशापरी
अवधानप्रीतीं ॥ देतांतुष्टेलरुक्मिणीपती ॥ श्रोतयांसिविनवीमहीपती ॥ श्रवणींसद्भक्तीअसोंद्या ॥ ९९ ॥ स्वस्ति
श्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकंभाविकभक्त ॥ पंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ २०० ॥ श्रीकृ
ष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५० ॥ ॥ ओव्या ॥ २०० ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीगोपालकृष्णायनमः ॥ जयजयदीनदयाळाहृषीकेशा ॥ सप्रेमभक्तहृदयनिवासा ॥ रुक्मिणीरंगापंढरीशा ॥ आदिसर्वेशाजगद्गुरू ॥ १ ॥ जयजयलीलानाटकीसूत्रधारिया ॥ गुणनिधानायादवराया ॥ हृदयीं आठवूनितुझियापायां ॥ समुद्रतनयातल्लीन ॥ २ ॥ जयअंतरसाक्षाचराचरवासा ॥ आदिस्वरूपानिर्गुणवेशा ॥ पुंडलीकवरदापरेशा ॥ जयअविनाशाआत्मरूपा ॥ ३ ॥ जयकरुणासागरावैकुंठपती ॥ विराटस्वरूपावामनमूर्ती ॥ तुवां परशुधरेंनिर्वीरकरूनिक्षिती ॥ विप्रांप्रतिस्थापिलें ॥ ४ ॥ जयअसुरदमनाधर्मस्थापका ॥ त्रैलोक्यपतिविधिजनका ॥ प्रेमळभक्तांसिसज्जनसखा ॥ तुजविणआणिकाअसेना ॥ ५ ॥ म्यांनिजमुखेंकरावीतुझीस्तुती ॥ तरीबुद्धीसनाहींअखंडस्फूर्ती ॥ अर्चनकरावेंनिजप्रीतीं ॥ तरीसाहित्यनिश्चितींघडेना ॥ ६ ॥ अनुतापेंकरावेंतीर्थाटन ॥ तरीशरीरजाहलें शक्तिहीन ॥ नातरीसत्पात्रींकरावेंदान ॥ तरीपदरींधननसेकीं ॥ ७ ॥ व्रतकरावेंविधियुक्त ॥ तरीक्षुधेनेंप्राणव्याकूळ होत ॥ वंदोनिनमावींसर्वभूतं ॥ तरीगुणदोषआठवतअंतरीं ॥ ८ ॥ शास्त्राभ्यासकरूंश्रीपती ॥ तरीआयुष्यनाहींआपुलेहातीं ॥ अनुतापेंटाकावीप्रपंचभ्रांती ॥ तरीवैराग्यचित्तींठसेना ॥ ९ ॥ एकांतींकरावेंतुझेंध्यान ॥ तरीबुद्धीसिनावरे चंचळमन ॥ टाकूनिस्वरूपानुसंधान ॥ रानोरानहिंडतसे ॥ १० ॥ नातरीकरावेंइंद्रियदमन ॥ तरीरसनानव्हेस्वाधीन ॥ ऐसावेष्टिलोंअवगुणेंकरून ॥ जाणसीखूणअंतरींची ॥ ११ ॥ ह्मणोनिप्रार्थनारुक्मिणीपती ॥ जेनिजभक्ततुजलाप्रियअसती ॥ त्यांचीवर्णावयासद्गुणकीर्ती ॥ सप्रेमस्फूर्तिअसोंदे ॥ १२ ॥ कायावाचामनेंकरून ॥ हेंचिवांछितोंप्रसाददान ॥ याविरहितइच्छानसेआन ॥ तरीमनोरथपूर्णकरावा ॥ १३ ॥ ऐकाश्रोतेहोसादरगोष्टी ॥ मागिलेअध्यायींकथागोमटी ॥ तुकयानेंसप्रेमहोऊनपोटीं ॥ पत्रिकाशेवटींपाठविली ॥ १४ ॥ तेचोवीसअभंगघेऊनिसत्वरीं ॥ पंढरीसचालिलेवारकरी ॥ मा

१ ठेवा, खाण. २ लक्ष्मी. ३ नाशरहित. ४ परशुराम अवतार घेऊन. ५ राक्षस. ६ ब्रह्मदेव. ७ इच्छितों. ८ अनुपम, सुंदर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गींजातांस्वानंदलहरी ॥ कीर्तनगजरींडुल्लत ॥ १५ ॥ ऐशाखेळीमेळींसत्वरा ॥ वैष्णवआलेपंढरपुरा ॥ सकळदेखतां
चित्याअवसरा ॥ लोटांगणएकसराघातलें ॥ १६ ॥ एकमेकांसआलिंगनदेती ॥ आनंदाश्रुनेत्रींवाहाती ॥ आरतीक
रूनिश्रीपती ॥ ओंवाळितीप्रीतीनें ॥ १७ ॥ मगदिंडचापताकाघेऊनकरीं ॥ आलेचंद्रभागेचेतीरीं ॥ स्नानकरूनिझ
डकरी ॥ नित्यनेमसारिला ॥ १८ ॥ पुंडरीकासिभेटोनिजाणा ॥ मगकेलीक्षेत्रप्रदक्षिणा ॥ टाळमृदंगलाऊनिनाना ॥
नृत्यकरितीस्वानंदें ॥ १९ ॥ असोयावरीवैष्णववीर ॥ सत्वरपावलेमहाद्वार ॥ पुढेंदेखोनिगरुडपार ॥ लोटांगणेंघा
लिती ॥ २० ॥ पत्रलिहिलेंजेंतुकयान ॥ तेंआनंदेंगातीवैष्णवजन ॥ ऐसीकरुणाऐकूनिरुक्मिणीरमण ॥ गहिवरेंदा
टलेतेधवां ॥ २१ ॥ सावकाशनाहींतुकयासी ॥ ह्मणोनिघाबरलेहृषीकेशी ॥ जैसेंपाडसपडतांपारधीफांसी ॥ तेव्यथा
हरिणीसीवाटत ॥ २२ ॥ कींबाळकांसिदेवीनिघतांजाण ॥चैननपडेमातेकारण ॥ तेवींतुकयाचेंपत्रऐकून ॥ जगज्जीव
नघाबरले ॥ २३ ॥ जीवनजळदेवताशोषितांपाही ॥ मत्स्यतळमळतीआपुलेठायीं ॥ तेवींतुकयाचीकरुणाऐकूनपाही ॥
शेषशायीघाबरले ॥ २४ ॥ कींकृपणाचियाधनावर ॥ पाळतीलावीतस्[3]कर ॥ ऐकोनिदचकेत्याचेंअंतर ॥ तेवींशार्ङ्गधर
घाबरले ॥ २५ ॥ मगरुक्मिणीसिह्मणेवैकुंठपती ॥ तुकयाचीमजवाटतसेखंती ॥ ह्मणोनिसद्गदहोऊनिचित्तीं ॥ अ[4]श्रुपड
तीनेत्रकमळीं ॥ २६ ॥ वारकरींआलेसकळिक ॥ परीदृष्टीसीतुकयानदिसेएक ॥ ह्मणोनिमाझेजीवासीसुख ॥ नवाटेदे
खसर्वथा ॥ २७॥ आतांआपणजावेंयेथून ॥ तरीयात्रेसआलेबहुतजन ॥ यासिविचारकरावाकवण ॥ तुजकारणपुसतसें
॥ २८ ॥ यापरीरुक्मिणीबोलेवचन ॥ गरुडासमूळेंपाठवावेंजाण ॥ तोतुकयासपाठीवरबैसवून ॥ नलागतांक्षणआणी
लकीं ॥ २९ ॥ हेंसामर्थ्यअसोनआपणासी ॥ व्यर्थकांचिंताकरावीमानसीं ॥ ऐकोनिऐशियावचनासी ॥ हृषीकेशिसं

१ शक्ति, अवकाश. २ हरिणींचें बालक. ३ चोराची नजर. ४ आंसवें. ५ बोलावणें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तोषले ॥ ३० ॥ मगबोलावूनविनतासुत ॥ तयाससांगेपंढरीनाथ ॥ तुवांदेहूसिजाऊनित्वरित ॥ कार्यनिश्चितसाधावें ॥ ३१ ॥ मगस्वकरेंलेखणीघेऊन ॥ पत्रलिहीतजगज्जीवन ॥ तेंसादरकरूनमन ॥ परिसासज्जनभाविकहो ॥३२॥ ह्मणेवैकुंठकैलासअसेजोंवरी ॥ चिरंजीवतुकाअसोतोंवरी ॥ आणिअखंडमजलाहृदयमंदिरीं ॥ प्रेमभरेंआठवो ॥३३॥ ऐसाआशीर्वादहोतांजाण ॥ तेव्हांरुक्मिणीचेंविस्मितमन ॥ ह्मणेहेंआपुलेमुखींचेंवचन ॥ असत्यनोहेसर्वथा ॥ ३४ ॥ मौनेंचिहांसोनपंढरीनाथ ॥ हृदयींदाटलेप्रेमभरित ॥ ह्मणेतुकयावाटेतुझीखंत ॥ व्यथाविपरीतऐकोनी ॥ ३५ ॥ कैशारीतींह्मणसीलजरी ॥ तरीतुझेंचिचित्तसाक्षअंतरीं ॥ निरोपसांगतांवारकरी ॥ जाहलोंअंतरींकासावीस ॥ ३६ ॥ भेटीसिधांवोनियावेंत्वरित ॥ तरीयात्रामिळालीआहेबहुत ॥ ह्मणोनिगरुडपाठविलातेथ ॥ तुजलानिश्चितआणावया ॥ ३७ ॥ तरीकांहींसंकोचनधरितांअंतरीं ॥ बैसावेंयाचेपाठीवरी ॥ क्षणनलागतांयेऊनिपंढरी ॥ भेटदेसत्वरींमजलागीं ॥३८॥ ऐसेंलिहूनिजगज्जीवन ॥ गरुडाप्रतिबोलेवचन ॥ माझेठायींतुकयाजाणून ॥ आणीबैसवूनपाठीवरी ॥३९॥ अवश्यह्मणोनितेअवसरीं ॥ माथाठेविलाचरणावरी ॥ ह्मणेस्वामीनिजयासिधरिलेंपदरीं ॥ तोआह्मांशिरींवंद्यअसे ॥ ४० ॥ मूर्खासिप्रसन्नसरस्वती ॥ जाहल्यापंडितसन्मानिती ॥ सरितेसिअंगिकारितांअपांपती ॥ तरीवोतअव्हेरितिकासया ॥ ४१ ॥ कींबोरीबाभूळीसमैलागिरीनें ॥ शेजारदीधलानिजप्रीतीनें ॥ तयांसकांटवणह्मणावेंकवणें ॥ सुगंधाउणेंनसेची ॥ ४२ ॥ नातरीवाचस्पतीनेंअंगिकारकेला ॥ मगसकळसुरगणमानितीत्याला ॥ कींलोहदंडपरिसासीलागला ॥ मगमलिनत्यालानह्मणावें ॥ ४३ ॥ तेवींतुकयाचेंशुद्धदेखोनिअंतर ॥ तुह्मीतुष्टजाहलेतितयावर ॥ मगआह्मांसिधरावयादूर ॥ नाहींअधिकारसर्वथा ॥ ४४ ॥ ऐसेंह्मणोनितेअवसरीं ॥ मस्तकठेविलाचरणावरी ॥ खगपतिउठो

१ गरुड. २ ऐका. ३ आश्चर्यभरित. ४ पूज्य. ५ नदीस. ६ समुद्र. ७ बृहस्पतीनें. ८ देव. ९ गरुड.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निझडकरी ॥ पवनचालीनिघाला ॥ ४५ ॥ तोंइकडेतुकाउताविळमनीं ॥ निढळावरीठेऊनिपाणी ॥ वाटपाहतनिशि
दिनीं ॥ जेवींबाळकजननीनदेखतां ॥ ४६ ॥ नातरीचातकासितृषालागत ॥ तोतोंडपसरूनिपाहेनिरुत ॥ कींक्षुधाला
गतांपोटांत ॥ कांसवीविलोकीतजननीसी ॥ ४७ ॥ कींकृपणाचेंधनहारपतांसकळ ॥ त्यासिरात्रदिवसलागतोचळ ॥
नातरीमीनाचेंतुटतांजळ ॥ करितळमळजयारीतीं ॥ ४८ ॥ तेवींपंढरीच्यावियोगेंकरून ॥ तुकातळमळीरात्रदिन
तोंअकस्मातगरुडयेऊन ॥ उभाठाकलासन्निध ॥ ४९ ॥ खगपतीसदेखतांक्षणीं ॥ नमस्कारघातलासाष्टांगधरणीं ॥
आलिंगिलाप्रीतीकरूनी ॥ प्रेमभावेंतेधवां ॥५०॥ मगवर्तमानपुसेनिजप्रीतीं ॥ सुखीआहेकींरुक्मिणीपती ॥ मजरात्र
दिवसवाटेखंती ॥ कधींभेटतीकळेना ॥५१॥ कांनिष्ठुरहोऊनिजगज्जीवन ॥ कठीणकेलेंबहुतमन ॥ मजपरदेशींदीधलें
टाकून ॥ होतसेंउद्विग्नयासाठीं ॥ ५२ ॥ वारकरीमिळालेअसतीलफार ॥ माझाकिमर्थपडिलाविसर ॥ कोणतादोष
जाणोनिदुर्धर ॥ हेंमजनिर्धारकळेना ॥ ५३ ॥ ऐकूनितुकयाचेंवचन ॥ कायबोलेविष्णुवाहन ॥ तुझ्याउद्वेगेंजगज्जीव
न ॥ अतिविव्हळमानसीं ॥ ५४ ॥ जेवींतान्हयाच्यावियोगेंजननी ॥ कींपाडसवियोगेंजैसीहरिणी ॥ कींतृषाक्रांतजी
वनावांचूनी ॥ तळमळमनींकरीतसे ॥ ५५ ॥ तैशाचपरीरुक्मिणीपती ॥ रात्रदिवसतुजआठविती ॥ मगमूळपाठविलें
मजनिश्चितीं ॥ न्यावयाप्रतीतुजलागीं ॥ ५६ ॥ पत्रपाठविलेंरुक्मिणीकांत ॥ तेंतुकयासिवाचूनदाखविलेंत्वरित ॥ तें
श्रवणींपडतांअश्रुपात ॥ नेत्रसजलजाहलेकीं ॥ ५७॥ तेंपत्रहातींघेऊनिसत्वर ॥ मस्तकींठेवीवारंवार ॥ मागुतीहृदयीं
धरूनिकर ॥ आलिंगितनिजप्रीतीं ॥ ५८ ॥ जैसासुकत्याझाडावरीसहज ॥ अवचितांवोळलामेघराज ॥ तेवींपत्रदेख
तांचिअंडजराज ॥ तुकयासंतोषवाटला ॥ ५९ ॥ कींउदयासयेतांवासरमणी ॥ संतोषपावतीजैशाकमळिणी ॥ तेवींग

१ कपाळावर. हातं. ३ रात्रंदिवस. ४ माता. ५ निश्चयें करून. ६ मासा. ७ गरुड. ८ सूर्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रुडाचेआगमनीं ॥ तुकयासिसंतोषवाटला ॥ ६० ॥ नातरीश्रीरामाचीवाटपाहात ॥ नंदिग्रामींबैसलाभरत ॥ मगनि
रोपसांगतांअंजनीसुत ॥ संतोषवाटतज्यारीतीं ॥ ६१ ॥ तेवींपत्रपाठविलेंरुक्मिणीवरें ॥ आणिनिरोपसांगीतलाखगे
श्वरें ॥ तेणेंतुकयाचेंअंतर ॥ जाहलेंस्थिरतेसमयीं ॥ ६२ ॥ मगगरुडबोलेमधुरोत्तरीं ॥ आतांबैसावेंमाझेपाठीवरी ॥ निमे
षनलागतांसत्वरीं ॥ दावीनपंढरीतुजलागीं ॥ ६३ ॥ रोगेंशरीरजर्जरबहुत ॥ चालावयासिनाहींशक्त ॥ मगकृपाकरू
निपंढरीनाथ ॥ पाठवीत्वरितमजलागीं ॥ ६४ ॥ तरीआतांऊठवेगेंसी ॥ विलंबनकरावाजावयासी ॥ वचनेंऐकोनियां
ऐसीं ॥ उत्तरतयासीदेतसे ॥ ६५ ॥ खगपतीसह्मणेऐकवचन ॥ तूंआमुचेस्वामीचेंवहन ॥ आणिआह्मांसेवकांपूज्य
मान ॥ होसिसुजाणविचक्षणा ॥ ६६ ॥ पायींचीवाहाणपायींबरी ॥ तेवागवूनयेमस्तकावरी ॥ कींवाळेनेपुरेंबांधितां
शिरीं ॥ विचारचतुरींकरावा ॥ ६७ ॥ कींमहाद्वाराचीपायरीपाहे ॥ प्रतिमास्थानींबैसेलकाये ॥ हडपीआवडताह्म
णोनिरायें ॥ बैसवूनयेसिंहासनीं ॥ ६८ ॥ ह्मणोनिविष्णुवाहनाअवधारीं ॥ मीसर्वथानबैसेंतुजवरी ॥ तुझेभाग्याची
वर्णितांथोरी ॥ मजनिर्धारींकळेना ॥ ६९ ॥ जोपुराणपुरुषवैकुंठविहारी ॥ अनंतब्रह्मांडेंजयाचेउदरीं ॥ तयावागविशी
पृष्ठीवरी ॥ नवलअंतरींवाटतसे ॥ ७० ॥ जोसुरांअसुरांअजितजाण ॥ तयांसिजिंकोनिसांडलापण ॥ शेखींजाहलासि
त्याचेंवहन ॥ सदाकरजोडूनितिष्ठसी ॥ ७१ ॥ ह्मणोनिआह्मांउपासकांजाण ॥ सेवकस्वामीतत्समान ॥ यालागींपाठी
वरीबैसोन ॥ नघडेयेणसर्वथा ॥ ७२ ॥ तरीआतांअसोहेविज्ञप्ती ॥ माझीअवस्थाजाणोनिचित्तीं ॥ पंढरीसजाऊनिस
त्वरगती ॥ रुक्मिणीपतीआणावा ॥ ७३ ॥ मगगरुडाचेधरूनिचरण ॥ साष्टांगेंघातलेंलोटांगण ॥ ह्मणेतुह्मांआधीनज
गज्जीवन ॥ तोमजआणोनभेटवा ॥ ७४ ॥ अवश्यह्मणोनित्वरित ॥ सत्वरनिघालाविनतासुत ॥ तुकयासभेटवूनपंढ

१ मारुति. २ गरुड. ३ विडा—तांबुल देणारा राजसेवक. ४ राहणारा, क्रीडा करणारा. ५ देव देयांस आर्जक. ६ शेवटीं. ७ गरुड.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रीनाथ ॥ विचारमनांतपैंकेला ॥ ७५ ॥ हानिश्चयकरूनिमानसीं ॥ गरुडपावलापंढरीसी ॥ पृथ्वीवरीनदेखतांतुकया
सी ॥ हृषीकेशीघाबरले ॥ ७६ ॥ जैसेंकन्येसिमूळपाठवितां ॥ तेंफिरोनिरितेंदेखिलेंयेतां ॥ हिंवसलीउगीचराहेमाता ॥
तेवींरुक्मिणीकांताजाहलें ॥ ७७ ॥ मगसन्निधयेऊनितेअवसरीं ॥ मस्तकठेविलाचरणावरी ॥ ह्मणेदेवाधिदेवाश्रीहरी ॥
तुकामजवरीनबैसे ॥ ७८ ॥ परीतुझ्यावियोगेंरुक्मिणीपती ॥ रात्रदिवसकरितोखंती ॥ आतांकृपाकरूनिवैकुंठपती ॥
चालत्याप्रतीभेटावया ॥ ७९ ॥ अवश्यह्मणेनिजगज्जीवन ॥ गरुडासदीधलेंआलिंगन ॥ मगरुक्मिणीसबोलावून ॥
सांगेखूणअंतरींची ॥ ८० ॥ मगविश्वजननीउत्तरदेत ॥ यात्रेसिआलेवैष्णवभक्त ॥ हाउत्साहटाकूनजावेंतेथ ॥ नसेउ
चितसर्वथा ॥ ८१ ॥ जैसेंकांतेविणमंदिरशून्य ॥ कींजीवनेविणसरितांजाण ॥ तेवींतुझ्याविणपंढरीशून्य ॥ वैकुंठनाथादि
सेलकीं ॥ ८२ ॥ नातरीन्नृपवरावांचूनिसेनासंपत्ती ॥ कींचंद्राविणउडुगणदिसती ॥ कींकुंकुमाविणअलंकारनिश्चितीं ॥
मलिनदिसतीसर्वथा ॥ ८३ ॥ तेवींआपणनसतांयेअवसरीं ॥ उदासदिसेलहेपंढरी ॥ तरीगोपालकालाजाहलियावरी ॥
जाऊंभेटीसतुकयाचे ॥ ८४ ॥ ऐकोनिरुक्मिणीचेंवचन ॥ अवश्यह्मणतीजगज्जीवन ॥ तोंदर्शनासिआलेसंतजन ॥ ना
माभिधानतींऐका ॥ ८५ ॥ शेखमहंमदआणिगणेशनाथ ॥ बोधलानिंबराजविख्यात ॥ संतोबापवारवैष्णवभक्त ॥ आ
लेवारितदर्शना ॥ ८६ ॥ टाळविणेमृदंगवाजती ॥ सप्रेमभावेंवैष्णवगाती ॥ पताकाशोभायमानफडकती ॥ तयांतच
मकतीगरुडटके ॥ ८७ ॥ लोटांगणघालितीसकळजन ॥ तेव्हांरुक्मिणीसिबोलेजगज्जीवन ॥ निंबराजासिजाहलाबहु
शीण ॥ घालीतलोटांगणआलातो ॥ ८८ ॥ तरीयासिप्रसन्नहोऊनिवारित ॥ कांहींद्यावेंवरदानउचित ॥ तंवश्रोतेहोऊ ॥ ३ ॥
नआशंकित ॥ प्रश्नकरितिनिजप्रेमें ॥ ८९ ॥ ह्मणतीनिंबराजकोठीलकोण ॥ तयाचेंसविस्तरकरीकथन ॥ ऐसाकरि

१ स्त्री. २ नदी. ३ नक्षत्रमंडळ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तांचिप्रश्न ॥ हर्षलेंमनवक्तयाचें ॥ ९० ॥ तोप्रश्नवाटलाकैशारीती ॥ जैसाचकोरांसिउदेलानिशापती ॥ कींक्षुधार्थीया
सिप्रारब्धगतीं ॥ अमृतअवचितींवर्षलें ॥ ९१ ॥ कींदुर्बळाचियाअंगणीं ॥ कामधेनुठाकलीयेऊनी ॥ नातरीलोहसं
दुकांतजाऊनी ॥ परीसअवचितांपडिलाकीं ॥ ९२ ॥ कींक्षेत्रपिकासिआलेंजाण ॥ त्यावरीपुढतीवर्षलाघन ॥ मगद्वि
गुणदाटलेकण ॥ तेसभाग्यजाणलाधती ॥ ९३ ॥ तेवींश्रोतयांचेप्रश्नोत्तरीं ॥ वक्तासंतोषलानिजअंतरीं ॥ ह्मणेनिंबरा
जचरित्रविस्तारीं ॥ प्रेमभरींअवधारा ॥ ९४ ॥ स्वदेशांतग्रामजाण ॥ देवपैठणह्मणतीत्याकारण ॥ तयाग्रामींचेंकुल
कर्ण ॥ वृत्तिपुरातनतयाची ॥ ९५ ॥ मुलेंलेंकुरेंअसतीसर्व ॥ परीनिंबराजह्मणंवीभक्तवैष्णव ॥ संतपूजनींधरितांभाव ॥
अनुतापजाहलातयासीं ॥ ९६ ॥ मगह्मणेपुरेहासंसार ॥ दुर्धरमायाअनिवार ॥ प्रपंचकरितांव्यवहार ॥ आयुष्यस
मग्रवेंचलें ॥ ९७ ॥ ऐसाअनुतापधरूनिजाणा ॥ मगचालिलेतीर्थाटना ॥ बाराज्योतिर्लिंगेंदेखोनिनयना ॥ संतोषम
नावाटला ॥ ९८ ॥ भूतळींचींतीर्थेंअवघडें ॥ तींदृष्टीसिदेखिलींअतिचोखडें ॥ सप्तपुर्‍याकरूनिपुढें ॥ हिमालयाप्रती
पैंगेले ॥ ९९ ॥ त्यामार्गींचीख्यातिवर्णितां ॥ तरीबहुविस्तारेंवाढेलकथा ॥ ह्मणोनिसंकलितबोलिलोंवार्ता ॥ जाणा
वेंश्रोताअंतरीं ॥ १०० ॥ भागीरथीच्यातीनकावडी ॥ रामेश्वरींघातल्याआवडी ॥ ऐसीसुकृताचीकरूनिजोडी ॥ म
गआलेतांतडीआश्रमा ॥ १ ॥ अंतरींइच्छाधरिलीजाण ॥ स्वमुखेंकरावेंहरिकीर्तन ॥ हेचआवडमनींधरून ॥ नामस्म
रणकरीतसे ॥ २ ॥ निष्कामबुद्धींव्रतेंतपें ॥ आचरलाअसेलजोसाक्षेपें ॥ तरीचश्रीहरिकीर्तनींअनुतापें ॥ होईलरतनि
जप्रीतीं ॥ ३ ॥ तीर्थेंयागवेदपठण ॥ हींतेव्हांचफळासिआलींजाण ॥ तरीनिर्लज्जहोऊनिमन ॥ वर्णीलगुणश्रीहरिचे
॥ ४ ॥ असोआतांबहुभाषण ॥ वैष्णवजाणतीसप्रेमखूण ॥ जेटाकोनियांमानाभिमान ॥ करितीभजनअहर्निशीं ॥ ५ ॥

---

१ चेलगाराचें. २ चंद्र. ३ लोखंडाच्या पेटींत, खाणींत. ४ मेघराज. ५ पश्चात्ताप. ६ पृथ्वीवरील. ७ अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, द्वारका. हीं सात तीर्थें, क्षेत्रें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीहरिकीर्तनींहोतांरत ॥ सकळसाधनेंहोतीव्यर्थ ॥ जैसीवापीखाणिलीसखोलबहुत ॥ परीजीवनाहींलागलें ॥ ६ ॥
कींक्षेत्रींकणसेंआलींसघन ॥ परीत्यावरीउमटलेनाहींकण ॥ कींदेसायांनींसाधिलेंवतन ॥ तेंसंतानाविणव्यर्थची ॥ ७ ॥
कींविद्याभ्यासकेलाफार ॥ परीसमर्यीनाठवेप्रत्युत्तर ॥ कींशौर्यतेजेंविणनृपवर ॥ व्यर्थचिबैसलाभद्रांसनीं ॥ ८ ॥ कीं
पात्रींपक्वान्नेंवाढिलींबहुत ॥ परीशेवटींनाहींआलेंघृत ॥ तेवींश्रीहरिचरित्रनवर्णितांहोत ॥ सकळसाधनेंव्यर्थची ॥ ९ ॥
तरीकीर्तनकरावेंप्रेमयुक्त ॥ ॥ हानिंबराजेंधरिलाहेत ॥ मगगजवदनासिपंढरीनाथ ॥ आज्ञाकरीतएकेदिनीं ॥ १० ॥
ह्मणेमत्कीर्तनींहोईलस्फूर्ती ॥ हावरद्यावातयाप्रती ॥ ऐसेंसांगतांरुक्मिणीपती ॥ अवश्यगणपतिह्मणतसे ॥ ११ ॥
तंवएकेदिनींयामिनींत ॥ निंबराजहोतेनिद्रित ॥ तंवब्राह्मणरूपेंस्वप्नांत ॥ पार्वतीसुतपावले ॥ १२ ॥ थापटोनिसावध
केलेंपाहीं ॥ ह्मणेवरप्रसादमाझाघेयीं ॥ मगतांबूलकाढोनितेसमयीं ॥ हातावरीदीधला ॥ १३ ॥ तोंनिंबराजसुषुप्तीं
त ॥ तत्काळटाकिलामुखांत ॥ मगगजवदनकायबोलत ॥ अक्षयवरदानदीधलें ॥ १४ ॥ आतांअभ्यासकेल्याविण ॥
बहुतवर्णिशीलहरीचेगुण ॥ आणिरंगदेवतायेऊन ॥ अखंडकीर्तनींनांदेल ॥ १५ ॥ ऐसावरदेऊनित्वरित ॥ अदृश्य
झालेपार्वतीसुत ॥ निंबराजहोऊनिजागृत ॥ स्वप्नध्यानांतआणिलें ॥ १६ ॥ तोंविप्रदिसतनाहींजवळ ॥ आणिमुखां
तअसेसाक्षाततांबूल ॥ मगतैसाचिगिळोनियांतेवेळ ॥ उठोनियांबैसला ॥ १७ ॥ हाताकडेविलोकूनपाहात ॥ तोंडाग
लागलाअसेआरक्त ॥ उदकेंकरूनिक्षाळिलाहात ॥ परीतोनजायसर्वथा ॥ १८ ॥ सांगेरेंकूपांसिदीधलेंपाणी ॥ तेंनआ
टेजैसेंअवर्षणीं ॥ कींयोगियांसितृप्तकरीउन्मनी ॥ तोनव्हेपरतोनीक्षुधार्थी ॥ १९ ॥ नातरीपरिसाचागुणलोहासिला ॥ ४ ॥
गला ॥ तरीपुढतीकाळिमानयेचत्याला ॥ कांगंगेनेंवोहळअंगीकारिला ॥ तोअक्षयपूज्यसकळांसी ॥ २० ॥ कींविरिं

१ विहीर, तळें. २ उदक. ३ पुत्रावांचून. ४ प्रश्नकाळीं. ५ सिंहासनावर. ६ निरंतर. ७ धूवून टाकिला. ८ समुद्रानें. ९ विहिरीस. १० ज्ञान.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चीनेंआयुष्यदिधलेंपाहे ॥ तेथेंभयव्यांधिसर्वथानजाये ॥ नातरीरंकासिहातींधरिलेंराये ॥ त्याचीसंपत्तिनजायेसर्व
था ॥ २१ ॥ कांभास्करेंदीधलीदिव्यकांती ॥ तेहिंवेंफुटेलकैशारीरीतीं ॥ तेवींतांबूलाचाडागलागलाहातीं ॥ तोधुतालि
यानजायसर्वथा ॥ २२ ॥ त्यादिवसापासून ॥ निंबराजकरूंलागलेकीर्तन ॥ जेश्रवणकरितीवैष्णवजन ॥ तल्लीनहोऊ
नराहाती ॥२३॥ टाकूनिलज्जामानलौकिक ॥ टाकोनिआशापाशदेख ॥ टाकूनिभेदाभेदअनेक ॥ सप्रेमसुखभोगीतसे
॥ २४ ॥ ऐसीवृत्तिअसतांसहज ॥ पंढरीसआलेनिंबराज ॥ येथूनिप्रश्नकेलासेमज ॥ श्रोतींउमजधरावा ॥२५॥ रुक्मि
णीसह्मणतीजगज्जीवन ॥ निंबराजासिद्यावेंवरदान ॥ जगन्मातातेंऐकून ॥ विस्मितमनहोतसे ॥२६॥ मगमाळिणीचेंरू
पधरूनी ॥ वाटेसिबैसलीविश्वजननी ॥ आंरक्तगाजरेंपांटींतभरूनी ॥ फांकाकरूनीठेविल्या ॥ २७॥ निंबराजयेतां
देउळांतून ॥ तयासिबोलेमधुरवचन ॥ ह्मणेतान्हेंबाळघरींरडतसेजाण ॥ मीजातेंतयासीआणावया ॥ २८॥ तरीकृपा
करूनिमजवरी ॥ येथेंबसावेंक्षणभरी ॥ मीबाळकघेऊनिसत्वरीं ॥ असीचयेतेंपरतोनी ॥ २९ ॥ तूंनायकसीजरीवचन॥
तरीयेथेंगाजरेंराखीलकोण॥ बाजारींफिरतीबहुतजन ॥ जातीलघेऊनयासाठीं ॥ १३०॥ ऐसेंबोलतांविश्वजननी ॥ करु
णाउपजलीतयाचेमनीं ॥ ह्मणेसत्वरयेईपरतोनी ॥ तरीमीबसतोंयेठायीं ॥ ३१ ॥ मगपांटीकरूनत्याचेस्वाधीन ॥ रा
उंळाकडेगेलीमाळीण ॥ एकप्रहरपर्यंतजाण ॥ नयेपरतोनसर्वथा ॥ ३२ ॥ तेव्हांवस्त्रकाढोनिपांटीवरूनी ॥ निंबराजवि
लोकीतयेक्षणीं ॥ तोंसुवर्णपाकळ्यादेखिल्यानयनीं ॥ गाजरएकहीदिसेना ॥ ३३ ॥ मगमनींहोऊनविस्मित ॥ ह्मणेआ
दिमायागोवूंपाहात ॥ कर्नकनव्हेहामहाअनर्थ ॥ दिसूनियेतमजलागीं ॥ ३४ ॥ ऐसाअनुतापधरिलामनीं ॥ जेवींवि
प्रप्रवेशेयवनसदनीं ॥ तेथिंचेंमांसदेखोनिनयनीं ॥ कंटाळूनीपळतसे ॥ ३५ ॥ कांगलितकुष्टदृष्टीसपडे ॥ तोंसुंदरनपा

१ अंग. २ दरिद्रपास. ३ सूर्यानें. ४ आई. ५ लाल. ६ देवालय. ७ डोळे. ८ सोनें. ९ पश्चात्ताप. १० घरांत. ११ कोड.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हेतयाकडे ॥ कींमेघातेंदेखूनिदृष्टीपुढें ॥ अनुतापीउठतेथूनी ॥ ३६ ॥ तैसेंतेंसुवर्णपाटींतदेखोन ॥ निंबराजाचेंचिळसलें
मन ॥ मगराउळांतजाऊन ॥ घालीलोटांगणसद्भावें ॥३७॥ हातजोडूनिकरीविनंती ॥ ह्मणेदेवाकांमजकरितोसिगुंती ॥
तुझीकृपाइच्छितोंचित्तीं ॥ नलगेसंपत्तिधनकांहीं ॥ ३८ ॥ मगरुक्मिणीसिकरूननमस्कार ॥ बिऱ्हाडासिआलेसत्वर ॥
नामस्मरणनिरंतर ॥ प्रेमभावेंकरीतसे ॥ ३९ ॥ इकडेरुक्मिणीह्मणेजगज्जीवना ॥ म्यांवंदोनितुमचीआज्ञा ॥ निंबरा
जासिदीधलेंसुवर्णजाणा ॥ परीत्याचेतेंमनानयेकीं ॥ १४० ॥ हांसोनिह्मणेजगन्निवास ॥ भजनींसंतुष्टमाझेदास ॥ त
यांसिममतालोभआंस ॥ बाधूंनशकेसर्वथा ॥ ४१ ॥ पर्वतींनरुततीपर्जन्यधारा ॥ कींकाळेंलावितांनयेअंबरा ॥ शीत
नबाधेचदिनकरा ॥ नहोयउबाराचंद्रासी ॥ ४२ ॥ कींतृषानबाधेसमुद्राकारण ॥ अग्नीसनबाधेकदाअन्न ॥ बंदीखा
न्यांतकोंडेलपवन ॥ कैशारीतीसुजाणे ॥ ४३ ॥ तेवींनिजभक्तउदासवर्तती ॥ आशापाशनबाधेत्यांप्रती ॥ ऐसेंबो
लतांवैकुंठपती ॥ रुक्मिणीचित्तींविस्मित ॥ ४४ ॥ दुसरेदिवसींप्रातःकाळीं ॥ स्नानासिचालिलीसंतमंडळी ॥ निंबरा
जतयांचेमेळीं ॥ चंद्रभागेसीपैंआले ॥ ४५ ॥ तंवविचारकरीपंढरीनाथ ॥ निंबराजासिद्यावेंसुखउचित ॥ जेणेंकरूनि
प्रेमभरित ॥ होईलरतमत्कीर्तनीं ॥ ४६ ॥ ऐसेंह्मणोनितेवेळ ॥ विप्रवेषधरिलातत्काळ ॥ गळांघालूनितुलसीमाळ ॥
तमालनीळपातले ॥ ४७ ॥ डोईसटोपीगळांमेखळा ॥ सुवासबुकाभाळींशोभला ॥ निंबराजासिघनसांवळा ॥ काय
बोलिलातेसमयीं ॥ ४८ ॥ मीस्नानासिजातोंभीमरथींत ॥ तस्करफिरतीयात्रेआंत ॥ तरीमेखळाटोपीमाळनिश्चित ॥
आपणापासींअसोंदे ॥४९॥ ऐसेंह्मणोनिरुक्मिणीपती ॥ आभरणेंदीधलींत्याचेहातीं ॥ आपणनलागतांपातयापातीं ॥ ॥ ५ ॥
अदृश्यजाहलेतेधवां ॥ १५० ॥ निंबराजपाहेसभोंवतं ॥ तोंब्राह्मणसर्वथानदिसेचतेथ ॥ एकप्रहरपर्यंत ॥ वाटपाहातबै

१ खिन्न. २ आशा. ३ आकाशास. ४ थंडी. ५ सूर्यास. ६ वायु. ७ वस्त्रविशेष. ८ कपाळावर. ९ चोर. १० कमरपट्टा. ११ अलंकार.

सला ॥ ५१ ॥ परीतोनयेचिपरतोन ॥ मगसंतांसिसांगेवर्तमान ॥ येथेंएकयेऊनिब्राह्मण ॥ बोलिलावचनतेंऐका ॥
॥ ५२ ॥ ह्मणेमीजातोंस्नानासी ॥ आभरणेंअसोंदेआपणापासी ॥ मगमाळटोपीमेखलामजपासी ॥ काढोनियांदीधली
॥ ५३ ॥ आपणनलागतांपातयापातें ॥ अदृश्यजाहलाजेथिचातेथें ॥ मीबैसलोंवाटपाहात ॥ चिंताक्रांतहोऊनी ॥
॥ ५४ ॥ तरीअजूननयेचिसर्वथा ॥ यासिविचारकायसांगाआतां ॥ वचनऐकूनियांसंतां ॥ आश्चर्यचित्तावाटलें ॥ ५५ ॥
मगसकळबोलतीवैष्णवभक्त ॥ ब्राह्मणनव्हेतोरुक्मिणीकांत ॥ तुह्मांसिउचितदेऊनिखरित ॥ जाहलेगुप्ततेचिठायीं ॥
॥ ५६ ॥ तरीआतांसंशयनआणूनिमनें ॥ अंगावरीघ्याआभरणें ॥ ऐसेंऐकूनिसंतवचन ॥ केलेंनमनसाष्टांग ॥ ५७ ॥
मगगळयांतघातलीमेखला ॥ कंठींशोभतीतुळसीमाळा ॥ टोपीलेववूनितेवेळां ॥ बुकालाविलासंतजनीं ॥ ५८ ॥ वाळुवं
टींमिळोनिभक्तमंडळी ॥ निंबराजासिह्मणतीतेवेळीं ॥ तुजउचितदेऊनिवनमाळी ॥ केलीदिवाळीभाविकां ॥ ५९ ॥ त
रीवाळुवंटींआजउभेराहून ॥ आपुल्यामुखेंकरावेंकीर्तन ॥ क्षुधितंजाहलेआमचेश्रवणं ॥ तरीतृप्तकरणययांसी ॥ १६० ॥
मगमृदंगाचेस्वरावरी ॥ विणामेळविलातेअवसरीं ॥ टालघोळमेळवूनझडकरी ॥ दिव्यपताकाउभारिल्या ॥ ६१ ॥ वै
दिकशास्त्रीपौराणिक ॥ संतमहंतवैष्णवअनेक ॥ अठरावर्णांचेबहुतलोक ॥ श्रवणासिदेखपातले ॥ ६२ ॥ अस्तमाना
सिचालिलादिनं ॥ तेव्हांआरंभिलेंकीर्तन ॥ विठ्ठलनामेंटालियापिटोन ॥ केलेंनमननिंबराजें ॥ ६३ ॥ अंतरींआठवूनि
रुक्मिणपिती ॥ आनंदाश्रुनेत्रींवाहती ॥ विमानिबैसोनिविबुधयेती ॥ कौतुकपाहतीतिधवां ॥ ६४ ॥ साबडेंसप्रेमगा
यन ॥ ऐकोनिवेधलेसकळजन ॥ सज्ञानआणिविचक्षणं ॥ तल्लीनहोऊनराहिले ॥ ६५ ॥ वक्तयासिचित्तींअसतां
प्रेम ॥ तेथेंचिसंतोषेपुरुषोत्तम ॥ परीकळाचातुर्यशाहाणपण ॥ नलगेचिजाणसर्वथा ॥ ६६ ॥ प्रेमावांचूनिकेलें

१ वस्त्र विशेष. २ भुकाळू. ३ कर्ण, कान. ४ सूर्य. ५ देवगण. ६ पंडित.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गायन ॥ कींशरीरप्राणेंविणजाण ॥ कींलवणावांचूनिरांधिलेंअन्न ॥ तेंरुचिनेदीचसर्वथा ॥ ६७ ॥ एकसुगंधनस
लाजरी ॥ तरीतेकायजाळावीकस्तूरी ॥ कींसंतानाविणकांतासुंदरी ॥ तीसघरचारीह्मणोंनये ॥ ६८ ॥ नासिका
विणगोरेपण ॥ कायजाळावेंतेंसुंदरवदन ॥ तेवींप्रेमेंविणकेलेंगायन ॥ तयासिकीर्तनह्मणावें ॥ ६९ ॥ कृष्णारामा
मेघश्यामा ॥ गोविंदागोपाळापुरुषोत्तमा ॥ अच्युतानरहरीआत्मयारामा ॥ असोंदेप्रेमानिजभजनीं ॥ १७० ॥
हींनामेंउच्चारूनिसहज ॥ नृत्यकारितांनिंबराज ॥ मगसंतोषोनिगरुडध्वज ॥ कायकरितीतेधवां ॥ ७१ ॥ बाळरूपध
रूनश्रीपती ॥ मयूरपिच्छेंघेतलींहातीं ॥ मगकौतुकमांडिलेंतेंसंतीं ॥ सादरश्रवणार्थींपरिसावें ॥ ७२ ॥ निंबराजाच्या
खांद्यावरी ॥ उभाराहोनिश्रीहरी ॥ मोरचेलवारितीनिजकरीं ॥ हेंनवलपरिसाभाविकहो ॥ ७३ ॥ जोक्षीरसागरवा
सीशेषशयन ॥ समुद्रतनयेचेंअंतरजीवन ॥ तोनिजभक्तांवरीजगज्जीवन ॥ चामरेंवारितोनिजप्रीतीं ॥ ७४ ॥ वज्रासनीं
बैसलेनेहटीं ॥ तयांसिलवकरनेदीचभेटी ॥ तोनिंबराजाचेराहूनिपाठीं ॥ मयूरपिच्छेंढाळीतसे ॥ ७५ ॥ नानायागत्र
तेंतपराशी ॥ करितांनातुडेसाधकांसी ॥ तोदीनदयाळहृषीकेशी ॥ निजदासांसीसन्मानी ॥ ७६ ॥ विरूपाक्षआवरू
निमन ॥ एकांतींकरितोज्याचेंस्मरण ॥ तोभक्तभूषणरुक्मिणीरमण ॥ करीतसन्मानदासांचा ॥ ७७ ॥ कीर्तनींपात
लाघनसांवळा ॥ तेथेंचिआल्याचौसष्टीकळा ॥ आणिचवदाविद्याअनुकूळा ॥ दिसोनियेतीविचक्षणा ॥ ७८ ॥तटस्थ
पाहातीसभाजन ॥ चारीप्रहरजाहलेंकीर्तन ॥ परीनिद्राआलस्यकोणाकारण ॥ नयेचिजाणसर्वथा ॥७९ ॥ दुष्का
ळनाहींक्षीरसागरासी ॥ रोगनराहेअमृतापासीं ॥ आंधारभास्कराचेगृहासी ॥ राहीलकैसाचतुरहो ॥ १८० ॥ तेवीं
प्रेमळाचेकीर्तनांतपाहे ॥ निद्राआलस्यसर्वथानये ॥ टाकूनिजातीवर्णसोये ॥ जाहलेएकमयेसकळिक ॥ ८१ ॥ टाळम्र

१ मीठ. २ बायको. ३ मुख. ४ ऐका. ५ जीवप्राण. ६ वेगानें, दृढ निश्चयानें. ७ शंकर. ८ सूर्याचे.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दंगाचेछंदें ॥ टाळियापिटितिब्रह्मानंदें ॥ विसरूनभेदाभेदद्वंद्वें ॥ नामस्मरणेंडोलती ॥ ८२ ॥ चारघटिकाउरल्यावरी यामिनी ॥ तोंनवलवर्तलेंतयेक्षणीं ॥ एकसावकारकांतावस्त्रपांघरूनी ॥ स्नानालागूनीचालिली ॥ ८३ ॥ तिणेंदृष्टीसअ कस्मात ॥ साक्षातदेखिलेपंढरिनाथ ॥ मगलगबगांधांवतधांवत ॥ कीर्तनांतपातली ॥ ८४ ॥ निंबराजापासीयेऊनि जाणा ॥ पाहूंलागेरुक्मिणीरमणा ॥ तोंअदृश्यजाहलाजाणा ॥ आश्चर्यमनावाटलें ॥ ८५ ॥ मगआक्रोशेंकरूनिरुद न ॥ निंबराजाचेधरिलेचरण ॥ लोकपुसतीतिजकारण ॥ आलीसधांवूनकायेंथें ॥ ८६ ॥ दृष्टीसकौतुकदेखिलेंकाये ॥ तेंसांगेंआह्मांसिलवलाहें ॥ मगसकळांसिनमस्कारूनिपाहे ॥ बोलिलीकायेतेंऐका ॥ ८७॥ निंबराजाच्याखांद्यावरी ॥ आतांम्यांदेखिलाश्रीहरी ॥ मयूरपिच्छेंधरूनिकरीं ॥ स्वहस्तेंवारीनिजप्रीतीं ॥ ८८ ॥ ह्मणूनिधावूनिआलेंत्वरित ॥ तो आतांकांहींचनदिसेयेथ ॥ कोठेंगेलारुक्मिणीकांत ॥ हेंमजनिश्चितकळेना ॥ ८९ ॥ सांवळासुकुमारजगजेठी ॥ पुढती पडावामाझेदृष्टी ॥ ह्मणोनिचित्तींहोतसेंकष्टी ॥ परीनेंदीचभेटीसर्वथा ॥ १९० ॥ लोकआश्चर्यकरितीपाहे ॥ ह्मणतीहें नवलसांगतांनये ॥ मगसाक्षपहावयालवलाहें ॥ समीपआलेविचक्षण ॥ ९१ ॥ निंबराजाचेखांद्यावरूनी ॥ अदृश्य जाहलेचक्रपाणी ॥ परिबुकाटाकिलाहोतासज्जनीं ॥ त्यावरीपाऊलेंचिमणींउमटलीं ॥ ९२ ॥ ऐसीसाक्षदेखोन ॥ आ श्चर्यकरितीसंतसज्जन ॥ एकमेकांसिआलिंगून ॥ लोटांगणघालिती ॥ ९३ ॥ जिणेंदेखिलेहोतेपंढरीनाथ ॥ तिजलान मितीभाविकभक्त ॥ ह्मणतीतुझेपदरींहोतेंसुकृत ॥ रुक्मिणीकांतदेखिला ॥ ९४॥ यापरीस्तवितांनारीनर ॥ तोंउदया सिपातलादिनकर ॥ मगनिंबराजेंआरतीकरूनिसत्वर ॥ शार्ङ्गधरओवाळिला ॥ ९५ ॥ पौर्णिमेसकेलागोपाळकाला ॥ मगयात्रेचासमुदायफुटला ॥ तेणेंदीनबंधूखंतावला॥ सद्गदितजाहलानिजलोभें ॥९६॥ अवळाकन्यासासन्यासजातां ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भ. वि. गाहिंवरेंरडेजैसीमाता ॥ तेवींयात्राफुटतांपंढरीनाथा ॥ अवस्थापूर्णजाहली ॥ ९७ ॥ रुक्मिणीस्रह्मणेश्रीहरी ॥ आतां अ०
॥ ७ ॥ उदासदिसेहेपंढरी ॥ निजभक्तगेलेआपुलेघरीं ॥ मजनिर्धारीनकंठे ॥ ९८ ॥ आतांउभयतांउठाउठी ॥ जाऊंतुक
यासद्यावयाभेटी ॥ ऐसेंह्मणेनिजगजेठी ॥ उतावेळपोटींजाहलेकीं ॥ ९९ ॥ गरुडासिपाचारिलासत्वर ॥ सगुणरूप ॥ ५१ ॥
धरिलेंसाकार ॥ जेअखंडआठवीअपर्णावर ॥ शुद्धअंतरकरोनी ॥ २०० ॥ विनतासुताचेपाठीवरी ॥ रुक्मिणीसहि
तबैसलेहरी ॥ इच्छामात्रेंझडकरी ॥ देहुग्रामासीपावले ॥ १ ॥ तोंइकडेवैष्णवतुकयावाणी ॥ उतावीळवाटपाहेमनीं ॥
ह्मणेकधींयेईलचक्रपाणी ॥ मातारुक्मिणीसमवेत ॥ २ ॥ आजउजवालवतोमाझानयन ॥ घडिघडिबाहूकरीस्फुरण ॥
क्षणक्षणांवाटेसमाधान ॥ हेउत्तमशकुनहोतातीं ॥ ३ ॥ तोंआकाशपंथेंअकस्मात ॥ गरुडटकादेखिलाझळकत ॥ मग
सामोराहोऊनित्वरित ॥ घालीदंडवतनिजप्रेमें ॥ ४ ॥ मगनिजभक्तांचाप्रेमभावो ॥ देखोनिप्रकटलेदेवाधिदेवो ॥ ब्रह्मा
दिकांसिज्याचाठावो ॥ नेणेचिपाहावोसर्वथा ॥ ५ ॥ रूपसांवळेंअतिसुकुमार ॥ कांसेवेष्टिलापीतांबर ॥ दिव्यकुंडलेंम
कराकार ॥ कौस्तुभसुंदरशोभत ॥ ६ ॥ मुकुटविराजेदेदीप्यमानें ॥ त्यावरीजडलींदिव्यरत्नें ॥ पदकएकावळीभूषणें ॥
जगज्जीवनेंघातलीं ॥ ७ ॥ चरणींनेपुरेंवाळेवाजती ॥ तेध्वनीऐकोनिलाजतीश्रुती ॥ रुक्मिणीसहितजगत्पती ॥ प्रग
टजाहलेतेधवां ॥ ८ ॥ ऐसेंरूपदेखोनिनयनीं ॥ तुकयासिहर्षवाटलामनीं ॥ सप्रेमेआलिंगनदेऊनी ॥ मिठीचरणीं
घातली ॥ ९ ॥ पुढीलअध्यायींसुरसवाणी ॥ देवभक्तांसिहोतीलबोलणीं ॥ तेंसादरहोऊनिसंतसज्जनीं ॥ परिसावेंश्रव
णींनिजप्रीतीं ॥ २१० ॥ जेंप्रेमगंगेचेंजीवनसुरस ॥ कींआनंदसमुद्रींचासुधारस ॥ महीपतीविनवीश्रोतयांस ॥ सेवासा ॥ ७ ॥
वकाशनिजप्रीतीं ॥ ११ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ एकपंचाश
त्तमाध्यायरसाळहा ॥ २१२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५१ ॥ ॥ ओव्या ॥ २१२ ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीजगदीश्वरायनमः ॥ जयजयभक्तकरुणाकरा ॥ अक्षयअभंगाजगदुद्धारा ॥ आदिस्तंभा
सायुज्यउदारा ॥ रुक्मिणीवराश्रीविठ्ठला ॥ १ ॥ तूंजयापाहासीकृपादृष्टीं ॥ त्याचीतुटेभवबंधफांसोटी ॥ करूनिप्रपं
चाचीतुटी ॥ देसीशेवटींअक्षयपद ॥ २ ॥ तुझेंउदारत्ववर्णितांपाहे ॥ सहस्रमुखातेंहीलेखानोहे ॥ महाकवीचीमतिकुं
ठितहोये ॥ तेथेंमीकायेमशक ॥ ३ ॥ परीआवडीचीऐसीजाती ॥ बाळकेंमातेसिभलतेंबोलती ॥ परीजननीसत्याचीनवा
टेखंती ॥ ऐकूनितुष्टेतीनिजलोभें ॥ ४ ॥ तेवींकृपाकरूनिजगज्जीवनें ॥ अंगिकारावींआरुषवचनें ॥ हेंचिमागतोंतुजका
रणें ॥ परीतुझेंचिसत्तेनेंदयाळा ॥ ५ ॥ सागरींचेंजीवनमेघआणिती ॥ तेंसरितांघेऊनसमुद्रासिजाती ॥ तरीउपकारको
णतयाप्रती ॥ ज्याचेंत्यासअर्पितां ॥ ६ ॥ भास्कराचेजावेंभेटीसी ॥ तरीत्याचेचप्रकाशेंपाहावेंत्यासी ॥ तेवींतुजप्रार्था
वयाहृषीकेशी ॥ सत्ताआह्मांसीअसेना ॥ ७ ॥ कींपृथ्वीसकेलानमस्कार ॥ आणितिजवरपडेचशरीरभार ॥ तेवींतुजव
र्णावयासाचार ॥ आणिकआधारअसेना ॥ ८ ॥ नातरीविनवावेंप्रभंजनास ॥ तरीत्याच्याचयोगेंनिघतीश्वास ॥ तेवीं
तुझींचरित्रेंयावयावाचेस ॥ कारणतूंचीअससीपैं ॥ ९ ॥ कींअग्नीसधूपदाखविलाजर ॥ तरीत्याचेचयोगेंनिघेधूर ॥ ते
वींतुझ्याचयोगेंचित्तहोतेंस्थिर ॥ निघतीउद्धारकथेचे ॥ १० ॥ गंगेसिकेलाअभिषेक ॥ परीतिजचिपासींघेतलेंउदक ॥
तेवींतुझियाप्रसादेंदेख ॥ कविअनेकवर्णिती ॥ ११ ॥ नातरीचंद्रआलाउदयास ॥ त्याच्याप्रकाशेंपाहावेंत्यास ॥ कां
मातेचीसेवाकेलीविशेष ॥ तरीशरीरअसेजननीचें ॥ १२ ॥ सुरतरुखालींबैसोन ॥ कल्पनेंकरूनित्यासिघातलेंजी
वन ॥ मगआपणउपकारदाखवितांजाण ॥ लज्जितसज्ञानहोतसे ॥ १३ ॥ तेवींतुझियासामर्थ्येंरुक्मिणीपती ॥ वेदीं
वर्णिलीअपारस्तुती ॥ मगविवेकेंकरूनिआपलेमती ॥ नेतिनेतिवदलेकीं ॥ १४ ॥ ऐसास्वसामर्थ्येंतूंअधोक्षज ॥ जा

१ संसाराचा फांस. २ शेषास. ३ मातेस, ४ बोबडे बोल. ५ नद्या. ६ सूर्याच्या. ७ वायूस. ८ तिचेपासून. ९ कल्पवृक्ष. १० उदक. ११ विचार

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णसीदासांचेंअंतरगुंज ॥ आतांअभयवरदेऊनमज ॥ वर्दैवीनिजभक्तविजयकथा ॥ १५॥ मागीलअध्यायाचेअंतीं ॥ देहूसआलेरुक्मिणीपती ॥ सगुणरूपधरूनिनिश्चितीं ॥ तुकयासिप्रीतींभेटले ॥ १६ ॥ मगप्रसन्नहोऊनिजगज्जीवन ॥ ह्मणतींकांहींमागवरदान ॥ जेंविरिंचीसनलाभेकरितांप्रयत्न ॥ तेंमीदेईनतुजलागीं ॥ १७॥ यावरीतुकादेतउत्तर ॥ ह्मणेचित्तींनपडावातुझाविसर ॥ गुणगाईनवारंवार ॥ सप्रेमअंतरींहोऊनी ॥ १८॥ आणितुझेनिजभक्तअंतरंग ॥ अखंडअसावात्यांचासंग ॥ हेंचमागतोंआलाप्रसंग ॥ नकरीमनोभंगदयाळा ॥ १९॥ तुझेभजनींअसावीप्रीती ॥ नलगेकांहींधनसंपत्ती ॥ पुढेंकरिसीलचारीमुक्ती ॥ तरीत्यानावडतीमजलागीं ॥ २० ॥ अखंडसंतसमागम ॥ वाचेसिअसावेंतुझेंनाम ॥ मगगर्भवासअसतांसंभ्रम ॥ होयसुगमसर्वदा ॥ २१ ॥ हेंचिमागणेंरुक्मिणीपती ॥ ह्मणोनिनमनकेलेंपुढती ॥ ऐसेंऐकोनिवैकुंठपती ॥ आश्चर्यचित्तींकरीतसे ॥ २२ ॥ मगगरुडासिह्मणेभक्तसखा ॥ उदासविरक्तप्रेमळतुका ॥ येणेंसर्वत्यागकरूनिदेखा ॥ मजचिएकाआराधिलें ॥ २३ ॥ माझियावियोगदुःखेंकरून ॥ अन्नउदकवर्जिलेंजाण ॥ ह्मणूनिदेहकृशहोऊन ॥ गेलावाळूनपाहेतुका ॥ २४ ॥ यावरीबोलेविनतासुत ॥ तुह्मींआशीर्वादलिहिलापत्रांत ॥ कींजोंवरीवैकुंठकैलासदिसत ॥ तोंवरीचिरंजीवअसावें ॥ २५ ॥ तेंआपुलेंवचनवैकुंठपती ॥ असत्यनव्हेचिकल्पांतीं ॥ तरीशरीरवाळलेंह्मणोनप्रीतीं ॥ उद्विग्नचित्तींकांहोतां ॥ २६ ॥ भजनींतरलेंयाचेंचित्त ॥ तेव्हांचिकळिकाळजाहलाअंकित ॥ हानामयाचाअवतारसाक्षात ॥ जाणतीसंतनिजखूण ॥ २७ ॥ अनंतजन्मींकरूनिभजन ॥ एकाग्रनिश्चळकरूनिमन ॥ तुह्मांसकेलेंआपुलेस्वाधीन ॥ वर्णितोगुणनिजप्रीतीं ॥ २८ ॥ यावरीतुकयासह्मणेजगजेठी ॥ मीक्षुधितजाहलोंबहुपोटीं ॥ उपवासीनिघूनिउठाउठी ॥ तुझियाभेटींपातलों ॥ २९ ॥ तरीगृहांतनिपजलेंअसेल ॥ १ ॥

१ मनांतील भाव. २ बोलीव. ३ ब्रह्मदेवासही. ४ गुप्त आहेत, जवळचे. ५ सलोकता. समीपता. सरूपता. सायुज्यता. ६ समारंभ. ७ गरूड. ८ चिरायु, मोडा आयुष्मान्.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अन्न ॥ तें पात्रीं आणावें विस्तारून ॥ बोलें कोरडें ह्मणोन ॥ संकोच मनीं न धरावा ॥ ३० ॥ ह्मणा लसन्निध असतां रुक्मि
णी ॥ क्षुधित कां आले चक्रपाणी ॥ तुकयाचा हेत होता मनीं ॥ कीं देव भोजनीं बैसवावे ॥ ३१ ॥ तें मनोगत जाणोनि त्वरित
तैसेंचि वदले पंढरीनाथ ॥ जेणें प्रेमळाचा पुरे हेत ॥ ते चि दीननाथ करीतसें ॥ ३२ ॥ मग तुकयानें आणोनि जळ ॥ धुतलें
देवाचें चरणकमळ ॥ कोमळ तुळसीदळाची माळ ॥ कंठीं तत्काळ घातली ॥ ३३ ॥ अत्यंत प्रीतीं करून नमन ॥ मग पात्रीं
वाढूनि आणिलें अन्न ॥ शुष्क भाकरी भाजीपान ॥ शाकेसि लवण दुसरें असे ॥ ३४ ॥ तें आवडीनें खात जगज्जीवन ॥ ऐ
कोनि आशंका धरिती सज्जन ॥ ह्मणती क्षीराब्धिवासी नारायण ॥ कोरडें कदान्न खातसे ॥ ३५ ॥ तरी एक सद्भाव असतां
अंतरीं ॥ तेथें चक्षुधित होय श्रीहरी ॥ मग याति कूळ न विचारी ॥ निजप्रीत बरी देखोनियां ॥ ३६ ॥ पक्वान्नें करूनि नाना
रीतीं ॥ वाट पाहे दुर्योधन कुमती ॥ परी तेथें न जेवितां श्रीपती ॥ कण्या चि खाती विदुराच्या ॥ ३७ ॥ कीं द्रौपदीनें सद्भा
वें पाहतां वाट ॥ जेवितां लोटून दीधलें ताट ॥ मग धांवत येऊन बैसले निकट ॥ मागत देंठ भाजीचा ॥ ३८ ॥ जो यज्ञपुरुष
अति निर्मळ ॥ तो उच्छिष्ट गवळियांचें खातो बळ ॥ भिल्लणीचीं उच्छिष्ट फळ ॥ भक्षी घननीळ निजप्रीतीं ॥ ३९ ॥ तो तुक
याचे घरीं कदान्न भक्षितां ॥ येथें आश्चर्य कोण तें चित्ता ॥ ह्मणोनि सांशंक न व्हावें श्रोता ॥ पुरातन कथा ऐकोनी ॥ ४० ॥ अ
सो रुक्मिणीसहित जगज्जीवन ॥ आवडी बैसोन केलें भोजन ॥ करशुद्धी देऊन तुकयान ॥ उच्छिष्ट आपण भक्षिलें ॥ ४१ ॥
देवास मुखशुद्धीस ते वेळ ॥ आणूनि दीधलें तुळसीदळ ॥ आवडी देखोनि दीनदयाळ ॥ अति आदरें भक्षिती ॥ ४२ ॥ या
परी होऊन संतुष्टी ॥ मग तुकयासी बोले जगजेठी ॥ आतां मज ठेऊनि हृदयसंपुटीं ॥ वियोग हिं पुढें न व्हावें ॥ ४३ ॥ तूं बो
लाविसील जैं मज ॥ तैं सगुणस्वरूपें भेटेन तुज ॥ ऐसें ह्मणोनि अधोक्षज ॥ जाते जाहले तेधवां ॥ ४४ ॥ तुकयानें धांवूनि ते

१ वाढून. २ उदक. ३ पाय. ४ मीठ. ५ जवळ, समीप. ६ श्रीराम. ७ संशयित. ८ हातावर उदक समर्पण करून. ९ दुःखी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वेळीं ॥ मस्तकठेविलाचरणकमळीं ॥ मगरुक्मिणीसहितवनमाळी ॥ पंढरपुरासीपातला ॥४५॥ तंवएकब्राह्मणकामना
धरूनी ॥ आळंदीसबैसलाअनुष्ठानीं ॥ ह्मणेपुराणव्युत्पत्तीव्हावीमजलागूनी ॥ मनींअखंडचिंतित ॥ ४६ ॥ मगदृष्टां
तदाविलाज्ञानेश्वरें ॥ कीतुकयापासींजायतूंत्वरें ॥ तोतुजप्रसाददेईलस्वकरें ॥ तरीमनोरथसाचारपुरतील ॥ ४७ ॥
तेव्हांब्राह्मणेंविचारूनिचित्तीं ॥ सत्वरआलादेहूप्रती ॥ तुकयासीभेटोनिएकांतीं ॥ कामनाचित्तींसांगितली ॥४८॥ ह्मणे
म्यांअनुष्ठानकेलेंअलकावतीसी ॥ ज्ञानदेवेंपाठविलेंतुह्मांपासीं ॥ वचनेंऐकोनियांऐसीं ॥ तुकामानसींविस्मित ॥ ४९ ॥
कांहींपुण्यनाहींगांठीं ॥ तरीतेंवेंचूंयासाठीं ॥ ज्ञानदेवेंहेशेवटीं ॥ पाठींलाविलीउपाधी ॥ ५० ॥ मगविचारकरीतआ
पुलेमनीं ॥ ह्मणेविद्यानाहींयाचेप्राक्तनीं ॥ ह्मणोनिज्ञानदेवेंकंटाळोनी ॥ धरणेंपाठवूनीदीधलें ॥ ५१ ॥ ह्मणेमीनेणता
अज्ञान ॥ नेणेंचिजपतपअनुष्ठान ॥ ज्ञानदेवेंमजलागून ॥ कासयाथोरपणदीधलें ॥५२॥ मगअकराअभंगआणिनार
ळ ॥ ब्राह्मणासिदीधलेतेवेळ ॥ ह्मणेहेंभक्षिशीजेवेळ ॥ ज्ञानतत्काळतुजहोईल ॥ ५३॥ ब्राह्मणाचेंविकल्पीमन ॥ ह्मणे
नारळभक्षितांनव्हेज्ञान ॥ प्राकृतअभंगमजकारण ॥ पाहिजेतपैंकासया ॥५४॥ ऐसाविकल्पचित्तींधरून ॥ टाकूनिगे
लाप्राक्तनहीन ॥ जैसाचिंतामणिहातींलागतांजाण ॥ गोफणींघेऊनदवडिला ॥५५॥ कांनिधानेंसांपडतांअभाग्याला ॥
तेंकोळशाऐसेंदिसेत्याला ॥ नातरीपक्वान्नरोगियाला ॥ कडवटजिव्हेसीलागत ॥ ५६ ॥ कांभागीरथीचीकुपीजाण ॥
उन्मत्तासिभासेमद्यपान ॥ नातरीकल्पतरूचेंवन ॥ जायडावलूनदरिद्री ॥ ५७॥ तेवींतुकयानेंप्रसाददीधला ॥ तोवि
प्रेंतेथेंचिटाकिला ॥ मगअलकावतीसज्ञानराजाला ॥ पत्रलिहूनपाठविलें ॥ ५८ ॥ मजपामरासिदेऊनिथोरी ॥ येथें
पाठविलाधरणेकरी ॥ तुमचीआज्ञावंदोनिशिरीं ॥ उचितझडकरीदीधलें ॥ ५९ ॥ तेणेंविकल्पधरूनिमग ॥ टाकिले

१ मनांत इच्छा धरून. २ काळजी, धरणें. ३ दैवीं, नशिबीं. ४ संग्रही. ५ द्रव्याचा ठेवा. ६ कल्पवृक्ष. ७ सोडून, त्यागकरून.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

एकादशअभंग ॥ महाफळाचाकरूनित्याग ॥ गेलासवेगयेथूनी ॥ ६० ॥ ऐसेंकल्पोनिमानसीं ॥ निरोपपाठविलाआ
ळंदीसी ॥ मगध्यानांतआणूनिहृषीकेशी ॥ नामस्मरणकरीतसे ॥ ६१ ॥ तंवशिवाजीराजापासींदेख ॥ शास्त्रज्ञहोतापु
राणिक ॥ त्याचाब्राह्मणजनएक ॥ होताअतिमूर्खअज्ञानी ॥ ६२ ॥ तोतुकोबापासींसत्वर ॥ करावयासिआलानमस्का
र ॥ तोचिनारळउचलोनिवैष्णववीर ॥ त्याचेहातींदीधला ॥ ६३ ॥ आणिएकादशअभंगठेविलेलिहून ॥ तेहीदीधलेत्या
कारण ॥ तेणेंतोनारळफोडून ॥ तेथेंचभक्षिलानिजप्रीतीं ॥ ६४ ॥ बिऱ्हाडासीगेलातोब्राह्मण ॥ तोतेथेंमांडिलेंहोतेंपुरा
ण ॥ श्रवणासिबैसलेपंडितजन ॥ अतिनिपुणवेदशास्त्रीं ॥ ६५ ॥ आणिकश्रोतेसज्ञानचतुर ॥ ऐकावयाबैसलेसादर ॥
तेथेंतोब्राह्मणजनयेऊनिसत्वर ॥ करीतप्रश्नपुराणिका ॥ ६६ ॥ तुह्मींश्लोकवाचिलाआतां ॥ त्याचेपदाचाअर्थराहि
लासांगतां ॥ पंडितमागुतीविचारितां ॥ तोंयथार्थसमस्तांवाटलें ॥ ६७ ॥ ह्मणतीहेंआश्चर्यबहुत ॥ यासिओनामातो
नवतायेत ॥ एकाएकींपुराणव्युत्पत्त ॥ कैसीजाहलीकळेना ॥ ६८ ॥ वृत्तांतपुसतांत्याकारण ॥ साकल्येंसांगीतलेंवर्त
मान ॥ ह्मणेएकादशअभंगतुकयान ॥ आणिनारळएकदीधला ॥ ६९ ॥ तोफोडोनिखातांचितेवेळीं ॥ गीर्वाणभाषा
कळोंलागली ॥ ऐसीऐकोनियांबोली ॥ तटस्थजाहलीसकळसभा ॥ ७० ॥ पुराणिकेंसमीपबोलावूनिप्रीतीं ॥ पत्रदीध
लेंत्याचेहातीं ॥ ह्मणेहेंवाचूनदावीआह्मांप्रती ॥ तरीसत्यप्रतीतीवाटेल ॥ ७१ ॥ मगतुकयाचेपायआठवूनिचित्तीं ॥
सांगूंलागलापुराणव्युत्पत्ती ॥ ऐकोनिपंडितततटस्थहोती ॥ आश्चर्यत्यांप्रतीवाटलें ॥ ७२ ॥ ह्मणतीविष्णुभक्तांचीअघ
टितकरणी ॥ नव्हेतेंचकरूनिदावितीजनीं ॥ एकसद्भावचित्तींधरूनी ॥ चक्रपाणीवशकेला ॥ ७३ ॥ जोलीलानाटकी
भगवंत ॥ रोंईचाकरीपर्वत ॥ त्याचेआवडतेजेनिजभक्त ॥ अघटितचरित्रतयांचें ॥ ७४ ॥ मूर्खासिज्ञानजाहलेंअद्भु

१ हृषीक ह्मणजे इंद्रियें यांचें नियम न करणारा तो हृषीकेशी, (विष्णु.) २ संपूर्ण. ३ संस्कृत भाषण. ४ अर्थ. ५ मोहोरीचा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त ॥ हीचिंचवडींदेवांसिकळलीमात ॥ मगब्राह्मणमिळोनिसमस्त ॥ स्वभावेंबोलतीएकमेकां ॥ ७५ ॥ आपणमताभि
मानधरून ॥ तुकयाचेंकरितींहेळण ॥ एरीमनुष्यनह्मणावेंत्यालागून ॥ यथार्थवचनजाणिजे ॥ ७६ ॥ एकह्मणतीपा
चारूनित्यासी ॥ प्रीतीनेंपुसावेंएकेदिवसीं ॥ तूंकोणआहेसहेंसांगआह्मांसी ॥ ऐसेंतुकयासीपुसावें ॥ ७७ ॥ तोब्राह्म
णभक्तअतिप्रेमळ ॥ आपणासिसांगेलतत्काळ ॥ ऐसाचिंचवडींतेवेळ ॥ विचारकेलाद्विजवरीं ॥ ७८ ॥ मगमनुष्यकरून
मोलकरी ॥ त्यासिसांगीतलेंतेअवसरीं ॥ तुवांजाऊनितेथवरी ॥ तुकयासिलवकरीपाचारिजे ॥ ७९ ॥ इतुकेंचजाऊनि
सांगवहिलें ॥ कींचिंचवडींदेवांनींपाचारिलें ॥ ऐसेंऐकूनितेवेळे ॥ मनुष्यउठिलेसत्वरीं ॥ ८० ॥ मगदेहूसयेऊनतयान ॥
तुकयासिकेलेंसाष्टांगनमन ॥ तंवतेथेंहोतसेहरिकीर्तन ॥ बैसलेसज्जनश्रवणासी ॥ ८१ ॥ सप्रेमभावेंअतिसादर ॥ श्रवण
करितीनारीनर ॥ नामघोषेंकोंदलेंअंबर ॥ पडिलाविसरदेहाचा ॥ ८२ ॥ नावडेकोणासिप्रपंचभ्रांती ॥ लवोंविसरलींनेत्र
पातीं ॥ नामरूपींजडलीवृत्ती ॥ जाहलीविश्रांतीसकळिकां ॥ ८३ ॥ टाळकरीआणिमृदंग्यासी ॥ आह्मींकोणहेंनाठवेत्यां
सीं ॥ आपपरनाठवेचकोणासी ॥ प्रेममानसींप्रगटलें ॥ ८४ ॥ हिलालधरिलाहोताजान ॥ तयासिनाहींदेहभान ॥ नाम
रूपींजडलेंमन ॥ मीकोणहेंस्फुरेना ॥ ८५ ॥ तेणेंहिलालकरितांवरी ॥ तोंमंडपासींलागलातेअवसरीं ॥ तोंआणिकक
थालागलीदुसरी ॥ तेसादरचतुरींपरिसावी ॥ ८६ ॥ चांभारगोंदियांतप्रसिद्ध ॥ ज्ञानसागरशेखमहंमद ॥ तोकीर्तन
करीतअतिआनंदें ॥ प्रेमछंदेंनामाच्या ॥ ८७ ॥ श्रवणासिबैसलेबहुतजन ॥ अठरावर्णांचेथोरलहान ॥ आणिकचतुर
श्रीमंतजन ॥ सज्ञानब्राह्मणपंडितजे ॥ ८८ ॥ एकाग्रऐकतीकीर्तनसांग ॥ कथेसिआलाअद्भुतरंग ॥ पाखंडियांसिव
चननसुचेमग ॥ आरोगिलेमूगतेसमर्थीं ॥ ८९ ॥ तोंवक्तयानेंतेवेळा ॥ उडीमारूनमंडपचोळिला ॥ हेंकौतुकदेखोनिडो

---

१ छळणा, निंदा. २ बोलावून आण. ३ आकाश. ४ मीतूंपणाचा अभिमान. ५ मशाल, दिवटी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ळां ॥ आश्चर्यसकळांवाटलें ॥९०॥ मगपुढेंबैसलेहोतेश्रवणीं ॥ तेपुसतेजाहलेतयेक्षणी ॥ कशाकरितांमंडपस्वामीनीं ॥
दाखविलाचोळूनीआह्मातें ॥ ९१ ॥ हेंकौतुकदृष्टींदेखोन ॥ आशंकितजाहलेंत्यांचेंमन ॥ शेखमहंमददेखोन ॥ काय
बोलिलेतेसमयीं ॥९२॥ वैष्णवतुकादेहूगांवांत ॥ प्रेमभावेंकीर्तनकरीत ॥ तोंमंडपासिहिलालअकस्मात ॥ लागला
अवचितनकळतां ॥ ९३ ॥ तोजळतांदृष्टींदेखिलातेथ ॥ म्यांनिजकरेंविझविलायेथ ॥ ऐसीऐकोनियांमात ॥ श्रोतेआ
शंकितजाहलेकीं ॥ ९४ ॥ हेंकोणासिनवाटेखरें ॥ ह्मणतीदेहूगांवबहुतदूर ॥ तुह्मासतेथीलसमाचार ॥ कैशापरीश्रुत
जाहला ॥ ९५ ॥ तेथेंहीश्रोतयांचाअसेलमेळा ॥ त्यांच्याकायनदिसेडोळां ॥ ह्मणूनिमंडपतुह्मींविझविला ॥ हेंयथार्थ
आह्मालानवाटे ॥९६॥ मगशेखमहंमदबोलेवचन ॥ तुकयाचेकीर्तनींबैसलेजन ॥ तयांसिनाहींदेहभान ॥ करितांश्रवण
हरिलीला ॥ ९७ ॥ नामरूपींजडलेंचित्त ॥ सकळजाहलेदेहातीत ॥ हिलाललागोनिमंडपजळत ॥ तोम्यांत्वरितविझ
विला ॥ ९८ ॥ यावरीश्रोतेपुसतीमात ॥ कीर्तनींअसतीपंढरीनाथ ॥ त्याणेंकांनचुकविलाआघात ॥ मंडपजळतांदे
खोनीं ॥ ९९ ॥ मगशेखमहंमदबोलतीत्यांसी ॥ प्रेमेंभुललेहृषीकेशी ॥ देवपणनाठवेचतयांसी ॥ नाठवेभक्तांसींभक्त
पण ॥ १०० ॥ तेदोघेएकजाहलेअसती ॥ कोणीरक्षावेंकोणाप्रती ॥ जेवींदोनीदीपकजळतअसती ॥ भिन्ननदिसती
सर्वथा ॥ १ ॥ त्याएकेठायींकरितांवस्ती ॥ सम[3]रसपणेंमिळोनिजाती ॥ ऐसीतयांचीविदेहस्थिती ॥ माझेचित्तींश्रुतजा
हली ॥ २ ॥ कीं[4]सरितेमाजीविशाळबेटें ॥ तेथेंउदकाचेहोतीदोनवांटे ॥ मगपुढेंहोऊनिएकवटें ॥ भिन्नत्वनदावितीसर्व
था ॥ ३ ॥ कांप्रतिमाआणिउप[6]करण ॥ एकेचिपितळेचींअसतीजाण ॥ मुशींतआटतांत्यांकारण ॥ नदिसतीभिन्नसर्वथा
॥ ४ ॥ नातरीघृतनवनीतपाही ॥ दोन्हींकढविलींएकेठायीं ॥ त्यांसिवेगळेपणपाहतांकांहीं ॥ भिन्नत्वनाहींसर्वथा

१ संशयभरित. २ ईश्वरस्वरूपीं निमग्न, देहाभिमानापासून वेगळे. ३ एक आनंदरूप रसामध्यें. ४ नदींत. ५ निराळेपण. ६ पितळेचें भांडी. ७ तूप. ८ लोणी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ५ ॥ तेवीं भक्त जाहले असतां एक ॥ कोण कोणाचें जाणेल दुःख ॥ समरसें अविनाश जाहलें सुख ॥ भेदाभेद मावळले ॥ ६ ॥ देवपण विसरले रुक्मिणीकांत ॥ तुकया नस्मरे मी भक्त ॥ तैसेच श्रोते जाहले समस्त ॥ हा मजवृत्तांत समजला ॥ ७ ॥ हें जरि तुह्मा सनवाटे लखरं ॥ तरि तेथूनि आणा समाचार ॥ ऐसें ऐकूनि उत्तर ॥ श्रोते चतुर संतोषले ॥ ८ ॥ मग देहूचे पाटिलासि पत्र लिहूनी ॥ एक सांडणी पाठविली त्यांणीं ॥ कीं रात्रीं कौतुक देखिलें नयनीं ॥ तें यथार्थ लिहूनी पाठवावें ॥ ९ ॥ अस्तमाना जातां दिनकर ॥ आलें त्याचें प्रत्युत्तर ॥ रात्रीं होता कीर्तनगजर ॥ मंडपासि हिलाल लागला ॥ ११० ॥ दीड हात छिद्र पडलें जाणा ॥ परी रात्रीं कळलें नाहीं कोणा ॥ सकाळीं उठोनि देखिलें नयना ॥ आश्चर्य मना वाटलें ॥ ११ ॥ ऐसें पत्र ऐकतां श्रवणीं ॥ यथार्थ वाटलें त्यांलागोनी ॥ मग शेख महंमदापासीं येऊनी ॥ नमस्कार घालिती ॥ १२ ॥ ह्मणती तेथील वृत्तांत ॥ तुह्मासि कैसा जाहला श्रुत ॥ हा चमत्कार देखोनि अद्भुत ॥ आश्चर्य चित्त सकळांचें ॥ १३ ॥ ऐसी ऐकूनि वचनोक्ती ॥ ह्मणे काय सांगावें तुह्माप्रती ॥ मीन नीट चि धार चढती ॥ ते आणिका गती अवघड ॥ १४ ॥ आणि कजळचरें बहुत जाण ॥ परी मत्स्या ऐसें त्यां न लोटे जीवन ॥ तेवीं निजभक्तांचे मनींची खूण ॥ भाविकांवांचून कळेना ॥ १५ ॥ कीं पिपीलिकांचे मार्गांन ॥ पिपीलिका चचालूं जाण ॥ तेवीं वैष्णवांचे मनींची खूण ॥ भाविकांवांचून कळेना ॥ १६ ॥ कीं अंतरिक्षीं विहंगम उडतां ॥ तेथें मार्ग पाहावा कोणता ॥ परी पक्षी च चालती त्या पंथा ॥ आणिका सर्वथा कळेना ॥ १७ ॥ जे कूपांमध्यें बेडूक राहात ॥ ते काय जाणती पयोब्धीची मात ॥ तेवीं गुरुभक्तांची खूण निश्चित ॥ मायालोभियांस कळेना ॥ १८ ॥ ऐसी वचनोक्ति बोलोनि त्वरित ॥ शेख महंमद राहिले निवांत ॥ आश्चर्य मानूनि श्रोते समस्त ॥ घातलें दंडवत सकळांनीं ॥ १९ ॥ असो सिंहावलोकनें आतां ॥ श्रोतीं परिसावी मागील कथा ॥ जो चिंचवडींहूनि मनुष्य येतां ॥ त्याणें ऐकिली कथा

१ नाश न होणारें अक्षय सुख. २ उंटस्वार, ३ मत्स्य जात. ४ मुंग्यांचे. ५ आकाशांत. ६ पक्षी. ७ विहिरी, तळीं इत्यादिकांत. ८ क्षीर समुद्राची गोष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तुकयाची ॥ १२० ॥ तेथेंचजडलात्याचाभाव ॥ निरोपसांगावयाचानाहींआठव ॥ प्रपंचउद्वेग[1]राहिलासर्व ॥ ऐसाजीव
सुखपावला ॥ २१ ॥ घरासिजावेंपरतोन ॥ हेंहीसर्वथानाठवेभान ॥ तुकयाचेंहोतांचिदर्शन ॥ जाहलातल्लीननिजप्री
तीं ॥ २२ ॥ इकडेचिंचवडींदेववाटपाहत ॥ ह्मणतीतुकयासिदिवसलागलेबहुत ॥ मनुष्यहीपरतोननाहींयेत ॥ काय
जाहलेंकळेना ॥ २३ ॥ मगविचारकरूनिसकळांनीं ॥ दुसरामनुष्यपाठविलात्यांणीं ॥ तोहीतुकयाचेंकीर्तनऐकूनी ॥
विदेही[2]होऊनीबैसला ॥ २४ ॥ विलंबलागतांचित्याप्रती ॥ तिसरापाठविलामागुती ॥ त्याचीहिउडालीदेहभ्रांती ॥
सप्रेमचित्तींहोऊन ॥ २५ ॥ मगगजवंदनाचेउपासक[3] ॥ आश्चर्यकरितीसकळिक ॥ तिघेमनुष्यगेलेदेख ॥ नयेएकपर
तोनी ॥ २६ ॥ जेवींगंगेसिवोहळगेले ॥ तेआपलेपणासिसमूळमुकले ॥ कांनानापुष्पांचेमकरंद[4]भले ॥ वायूसमिळालेस
मरसें ॥ २७ ॥ तरंग[5]मिळालाजळांत ॥ कींअभ्रचिलपालेंअकाशांत ॥ कींसुवागपिडेमुर्शीत ॥ तेनाहींयेतपरतोनी ॥ २८ ॥
तैसेंचिजाहलेंत्यांकारण ॥ निरोपहीनसांगतीयेऊन ॥ तुकयाचेंऐकतांसप्रेमगायन ॥ राहिलेतल्लीनहोऊनी ॥ २९ ॥
तुकयासिसांगीतलेंअसतेंतयांनीं ॥ तरीयावयाअनुमाननकरितामनीं ॥ त्याऐसांब्राह्मणभक्तजनीं ॥ वैष्णवज्ञानीअसे
ना ॥ १३० ॥ तरीआपणचिसांडोनिवर्णाभिमान[6] ॥ जाऊनिघ्यावेंत्याचेंदर्शन ॥ संशयवाटतसेमनींजाण ॥ तेजीवींची
खूणपुसावी ॥ ३१ ॥ ऐसाविचारकरूनिजाण ॥ ब्राह्मणनिघालेतेथून ॥ हेंअंतरींतुकयालागून ॥ नसांगतांखूणकळली
कीं ॥ ३२ ॥ ह्मणेमनुष्येंपाठविलींविप्रांनीं ॥ परीतोसांगितलानाहींनिरोपकोणीं ॥ आतांतेचिकृपाअवलोकनीं ॥ येताति
चालोनीभेटावया ॥ ३३ ॥ तरीआपणनजातांयेथून ॥ ब्राह्मणांचाहोईलअपमान ॥ लक्ष्मीकांतज्यांचेंचरण ॥ हृदयीं
भूषणवागवितो ॥ ३४ ॥ तेआलेनाहींतयेथवरी ॥ तोंआपणपुढेंजावेंसत्वरीं ॥ ऐसेंविचारूनिअंतरीं ॥ निघेसत्व

१ संसाराची काळजी, दुःख. २ वैरागी. ३ गणपति उपासक चिंचवडकर देव. ४ पुष्परस, सुगंध. ५ पाण्याच्या लाटा. ६ जातीचा श्रेष्ठपणा, जात्यभिमान.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रींतेयवां ॥ ३५ ॥ जैसीचातकांतृषालागत ॥ तोंमेघसत्वरधांवूनियेत ॥ कींउदयायेतांरोहिणीकांत ॥ सरिता
नाथउचंबळे ॥ ३६ ॥ नातरीहिरकणीदेखोनिसुंदरा ॥ ऐरणींतूनिनिघेहिरा ॥ येरयेरांच्याअंतरा ॥ साक्षजैसीप्री
तीती ॥ ३७ ॥ कांचुंबकाचीदेखोनिप्रीती ॥ लोहरजयेतयाप्रती ॥ तेवींद्विजवरांचिअत्यंतप्रीती ॥ तुकयाचित्तींजा
णवलें ॥ ३८ ॥ ह्मणूनियांलवडसवडी ॥ विष्णूभक्तजातसेतांतडी ॥ श्रीहरीचेगुणकडोविकैंडी ॥ अतिआवडीगात
से ॥ ३९ ॥ अर्धपंथेंलोटतांत्वरित ॥ तोंद्विजवरदेखिलेअकस्मात ॥ तुकयानेंमगदंडवत ॥ अतिप्रीतीनेंघातलें ॥ १४० ॥
यावरीधरांमरबोलत ॥ तूंसाक्षातविष्णुभक्त ॥ ह्मणोनिदर्शनाचाधरूनिहेतं ॥ येतहोतोंतुजपासी ॥ ४१ ॥ तंवयेथेंचि
मनोरथपूर्णजाहले ॥ मगसप्रेमेंआलिंगनदीधलें ॥ आसनावरीद्विजवरबैसले ॥ तुकयासिबोलिलेतेंऐका ॥ ४२ ॥ क
लीमाजीअवतारघेऊनी ॥ त्वांअघटितचरित्रदाखविलेंजनीं ॥ हेंदेखिलेंआपुलेनयनीं ॥ विस्मितमनींहोतसों ॥ ४३ ॥
मगअवसरपाहूनिएकांतीं ॥ पुसावयासिआलोंतुह्माप्रती ॥ तरीकोणआहांतेंसत्वरगती ॥ आह्मासिनिश्चितीसांगावें ॥ ४४ ॥
ऐकूनिद्विजवरांचेंवचन ॥ विचारकरीमनांतून ॥ ह्मणेयांसिप्रचीतदाखविल्याविण ॥ संशयखंडननव्हेची ॥ ४५ ॥ म
गआपलेमांडीचेंचर्मधरूनी ॥ वोढूनिचिरिलेंतयेक्षणीं ॥ तंवनिखळकापूसपिंजारोनी ॥ भरिलाअसेत्यामाजी ॥ ४६ ॥
हेंद्विजवरांहींदेखोनिदृष्टीं ॥ आश्चर्यकरितीआपुलेपोटीं ॥ ह्मणतीतुकयाचीमनुष्यराहाटी ॥ कैसीचालतीकळेना ॥ ४७ ॥
रुधिरमांसनसतांकाहीं ॥ कैसेंचैतन्यराहिलेंदेहीं ॥ एकह्मणतीमायालाघवी ॥ ईश्वरकरणीअघटित ॥ ४८ ॥ पंचभूतांचें
वोडंबरकोडें ॥ मायाममतेच्यालाऊनितोंडें ॥ जीवासिलाविलेंविषयवेडें ॥ प्रपंचकाबाडेंवाढविलें ॥ ४९ ॥ याविरहि
ततुकावैष्णवभक्त ॥ अनुभवेंकळोंआलीप्रचीत ॥ यासिह्मणोंनयेमनुष्यप्राकृत ॥ जगद्गुरूनिश्चितअवतरला ॥ १५० ॥

१ चंद्र. २ समुद्र. ३ गडबडीनें. ४ कौतुकानें. ५ मार्ग. ६ ब्राह्मण. ७ धरा ह्मणजे पृथ्वी तिचा ठाईं जे अमर, देव ते धरामर, (ब्राह्मण.) ८ आवड. ९ फुरसूद.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जैसेंगंगेसिनह्मणावेंजीवन ॥ कींपरिसासिनह्मणावेंपाषाण ॥ कनकांसिअन्यधातूसमान ॥ लेखोंनयेसर्वथा ॥ ५१ ॥
वृक्षनव्हेचिकल्पतरू ॥ कींसमुद्रनह्माणावासरोवरू ॥ कींइतरपर्वतांसमानमेरू ॥ लेखोंनयेचिसर्वथा ॥ ५२ ॥ अं
डजंयातीमाजीजाण ॥ निजभक्तजन्मलासुपर्ण ॥ तेवींशूद्रयातींतहावैष्णवजन ॥ उपमागौणदिसताहे ॥ ५३ ॥ गरुड
विष्णूचेंहोऊनिवहन ॥ आपुलेंशरीरकेलेंपावन ॥ तुकयानेंकरूनिहरिकीर्तन ॥ जडजीवसंपूर्णउद्धरिले ॥ ५४ ॥ पु
ढेंहीयाचीऐकोनिकविता ॥ वैराग्यउपजेलखळांचेचित्ता ॥ भाविकसज्ञानवैराग्यभक्तां ॥ मार्गप्रांजळदाविला ॥ ५५ ॥
ऐसेंबोलोनिद्विजवर ॥ तुकयासिकरितीनमस्कार ॥ येरूवरचेवरीधरूनिशिर ॥ चरणींसादरलागला ॥ ५६ ॥ विप्रां
सिह्मणेऐकामात ॥ हेंतुह्मींकरितसांअनुचित ॥ आमुचास्वामीभृगूचीलात ॥ हृदयींवागवितअद्यापी ॥ ५७ ॥ जोदे
वाधिदेवजगज्जीवन ॥ त्यासहीतुह्मींपूज्यमान ॥ आणिमीहीनयातिअनाथदीन ॥ देतसांथोरपणनिजकृपें ॥ ५८ ॥
यावरीद्विजवरउत्तरदेती ॥ ज्यासिविष्णुभजनींलागलीप्रीती ॥ त्याचीह्मणावयानीचजाती ॥ कुंठितश्रुतीजाहल्याकीं
॥ ५९ ॥ वानरविनटलेश्रीरामभजनीं ॥ तेंवाल्मीकेंवर्णिलेंरामायणीं ॥ गोवळ्याचीकीर्तिपुराणीं ॥ ठेविलीलिहूनीश्रीव्या
सें ॥ १६० ॥ ह्मणोनितुझीकरावयास्तुती ॥ अधिकारआहेआह्मांप्रती ॥ जेविष्णुभक्तांचीअद्भुतकीर्ती ॥ भरूनित्रिजगतीं
उरलीअसे ॥ ६१ ॥ बहुतदिवसहोताहेतं ॥ तोआजपुरलामनोरथ ॥ जेमांडीचिरूनिनिजहस्तेंत्वरित ॥ दाविलीप्रचीतआ
ह्मांसी ॥ ६२ ॥ पुढतीआलिंगनदेऊनिप्रीतीं ॥ ब्राह्मणतुकयासिकायबोलती ॥ चिंचवडींचालोनिएकरातीं ॥ कीर्तननिगुतीं
करावें ॥ ६३ ॥ त्यांचेंराखावयामनोगत ॥ नगरांतगेलेएकरात ॥ तोंलोहोगावींचेमिळोनिगृहस्थ ॥ विचारकरीतएकमेकां
॥ ६४ ॥ ह्मणतीतुकयासिआणोनिआपुलेनगरीं ॥ कीर्तनऐकावेंधणीवरी ॥ तेसेवितांप्रेमामृतलहरी ॥ सार्थकसंसारींहोई

---

१ सोनें. २ पक्षी. ३ गरुड. ४ दुष्टांनें. ५ पवित्र. ६ वर्तमान. ७ अयोग्य. ८ वेद. ९ श्रीकृष्ण चरित्र. १० इच्छा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ल ॥६५॥ मगतुकयासिविनीतहोऊनी ॥ लोहोगांवांसनेलेंतयानीं ॥ नित्यनित्यआवडीकरूनी ॥ ऐकतीश्रवणींहरिक
था ॥६६॥ भाविकलोकजेसज्जन ॥ करितीब्राह्मणसंतर्पण ॥ नानापरीचींपक्वान्नेंकरून ॥ घालितीभोजनविप्रांसी ॥६७॥
दिव्यमंडपउभारून ॥ पुष्पहारसुगंधचंदन ॥ कीर्तनासिप्रारंभहोतांजाण ॥ करितीपूजनवैष्णवांचें ॥ ६८ ॥ लोहो
गावांतएकमास ॥ नित्यनित्यसोहळाविशेष ॥ तंवपंढरपुरचेहरिदास ॥ देशावरासचालिले ॥ ६९ ॥ तंवव्यवसायी
बैसोनिअश्वावरी ॥ सत्वरचालिलाबाजारीं ॥ देखोनिहरिदासतेअवसरीं ॥ कायबोलतीतयासी ॥ १७० ॥ अश्वारू
ढहोऊनमार्गक्रमिसी ॥ येथेंतुजनिद्रालागलीकैसी ॥ हेंनवलदेखोनिदृष्टीसी ॥ आश्चर्यआह्मांसीवाटलें ॥ ७१ ॥ तं
वव्यवसायीबोलेत्यांकारण ॥ चारीप्रहररात्रजागरण ॥ ऐसेंएकमासपर्यंतजाण ॥ होतसेकीर्तनतुकयाचें ॥ ७२ ॥ ऐ
सीऐकोनियांमात ॥ हरिदासजाहलेचिंताक्रांत ॥ ह्मणतीआपणलोहोगांवांत ॥ आतांनजावेंसर्वथा ॥ ७३ ॥ जेथेंप्रे
मळाचेंकीर्तनहोत ॥ तरीआपुलेंकसबनरुचेतेथ ॥ जेवींरोगियालाधलेंदिव्यामृत ॥ तोनघेऔषधकल्पांती ॥ ७४ ॥
अमूल्यहिरियांचीदीप्ती ॥ काचमणीलोपोनिजाती ॥ नातरीउदयासियेतांगभस्ती ॥ दीपकहरपतीत्यापुढें ॥ ७५ ॥
समीपगंगावाहतांजाण ॥ मगवांपीकूपांसिपुसेकोण ॥ तेवींप्रसादिकांचेंऐकतांकीर्तन ॥ धीटपाठगायनरुचेना ॥ ७६ ॥
तरीलोहोगांवडावलोनियांपुढारा ॥ आतांचलावेंआणिकानगरा ॥ ऐसेंबोलोनियांयेरयेरां ॥ हरिदाससत्वरांपरतले
॥ ७७ ॥ गांवींचेलोकहोतेतेथ ॥ तेसत्वरयेऊनिनगरांत ॥ तुकयासिसांगतीवृत्तांत ॥ जोदेखिलादृष्टीसी ॥ ७८ ॥ ऐसें
ऐकतांचिवचन ॥ तेथोनिउठिलानलागतांक्षण ॥ ह्मणतीआपणसामोराजाऊन ॥ आणावेंप्रार्थूनहरिदासा ॥ ७९ ॥
आपणसवेगचालत ॥ अंतरींउल्हासवाटेबहुत ॥ ग्रामवासीलोकसमस्त ॥ तेहीचालतीसामोरे ॥ १८० ॥ ह्मणतीपंढरी

१ भोजन. २ फुलांच्या माळा. ३ व्यापारी. ४ घोड्यावर. ५ गोष्ट. ६ कालत्रयीं, कधीं. ७ तेजानें. ८ सूर्य. ९ निस्तेज दिसतात. १० तळीं, विहिरी इत्यादिकांस.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

क्षेत्रींहरिदास ॥ चालिलेहोऊनिउदास ॥ तरीआपणप्रार्थूनियांतयांस ॥ आणावेंनगरासआपुल्या ॥८१॥ मगपुढेंधां वणारपाठवूनी ॥ परतविलेंतयांलागोनी ॥ ह्मणतीवैष्णवतुकाआवडीकरूनी ॥ भेटावयासीयेतसे ॥ ८२ ॥ इतुकानिरो पसांगतांजाण ॥ तंवतेहीपावलेनलागतांक्षण ॥ मगहरिदासांसिकरूनिनमन ॥ देऊनिआलिंगनभेटले ॥ ८३ ॥ तुक यासह्मणतीक्षेत्रवासी ॥ आह्मींपातलोंदेशावरासी ॥ कींघरींलग्नवैशाखमासीं ॥ करणेंअसेपुत्राचें ॥८४॥ अवश्यह्मणो नितेवेळे ॥ गांवांतहरिदासासीआणिलें ॥ राहावयासिदेऊनिस्थळचांगलें ॥ सिधासाहित्यपाठविलें ॥८५॥ करूनि यांभोजन ॥ रात्रींकरितीहरिकीर्तन ॥ एकमासपर्यंतजाण ॥ होतसेआनंदयारीतीं ॥ ८६ ॥ मगग्रामवासियांभाविक लोकां ॥ आज्ञाकरीवैष्णवतुका ॥ आतांदेशावरकरूनिदेखा ॥ हरिदासांवाटेलावावें ॥ ८७ ॥ ब्राह्मणाचेकष्टघेऊन ॥ मगत्यांसिद्यावेंद्रव्यदान ॥ हेंतुह्मांसिवाटतेंभूषण ॥ परीषदरींपुंण्यपडेना ॥८८॥ परीनगरांतआहेतवस्तीकर ॥ नांद तातिलहानथोर ॥ त्यांचीशक्तिपाहूनिसाचार ॥ मागादेशावरसकळांसी ॥८९॥ ऐकोनितुकयाचीवाणी ॥ अवश्यह्मण तीतयेक्षणीं ॥ मगदऊतलेखणीपत्रआणोनी ॥ आसाम्यांमांडोनदीधल्या ॥१९०॥ उत्तममध्यमकनिष्ठजाण ॥ नगरांत नांदतअसतीजन ॥ तेंह्मणतीतुकयालागोन ॥ पत्रींअंकघालावा ॥९१॥ मगउत्तमावरीघालूनितूळ ॥ टाळीलिहिलीम ध्यमावर ॥ कनिष्ठावरीपकार ॥ लिहिलासत्वरतेसमयीं ॥९२॥ तेंदेखोनिग्रामवासी ॥ ह्मणतीहेंनयेआमुचेचित्तासी ॥ मगतुकाउत्तरदेततयांसी ॥ जेंयेईलचित्तासींतेंकरा ॥९३॥ त्याणींउल्हासधरूनिअंतरीं ॥ मुळूलिहिलेंउत्तमावरी ॥ उ दार्णुकेंआंखझडकरी ॥ मध्यमावरीटाकिला ॥९४॥ पकारहोताकनिष्ठावरी ॥ एकआंखघातलात्यावरी ॥ तुकयासिदा ऊनिसत्वरीं ॥ गांवकरीऊठले ॥९५॥ गांवांतजाऊनिसत्वर ॥ उकलोनिआणिलेंदेशांवर ॥ मुख्यजेह्मणवीतहोतेथोर ॥ ते

१ मुर्का, रुपया. २ आठ आणे. ३ चार आणे. ४ मन. ५ पांच रुपये. ६ तीन रुपये. ७ एक रुपया. ८ द्रव्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तुकयासिउत्तरबोलती ॥ ९६ ॥ पुढेंठेऊनिद्रव्यराशी ॥ ह्मणतीआह्मीयुक्तकेलीकैसी ॥ आतांदेशावरहरिदासासी ॥
आपुलेहातींसमर्पा ॥९७॥ ऐसेंबोलतांतेअवसरीं ॥ तुकयासिकळोंआलेंअंतरीं ॥ कींदातियांच्याचित्तांतरीं ॥ अहंकार
वैरीप्रकटला ॥ ९८ ॥ जैसीपक्कान्नांतपडिलीमक्षिका ॥ कींदुग्धामाजीलवणकणिका ॥ कींप्रेमळांमाजीलटिका ॥ कुटि
ळयेऊनबैसला ॥ ९९ ॥ कींतारुण्यदशेंतक्षयरोग ॥ कींविप्रसभेंतप्रकटलामांग ॥ नातरीविरक्तासिस्त्रीसंग ॥ कर्मयो
गेंजोडला ॥ २०० ॥ कींक्षेत्रपिकासीआलेंबहुत ॥ तोंटोळधाडपडलीअकस्मात ॥ कींपश्चिमधान्यावरीमार्गेश्वरांत ॥
तांबेराअवचितपडियेला ॥ १ ॥ नातरीगगनींवोळल्यापर्जन्यधारा ॥ तोंअकस्मातसुटलादक्षिणवारा ॥ कींपौर्णिमेचा
चंद्रउगवतांवरा ॥ तंवराहूप्रकटलात्याआड ॥ २ ॥ तेवींदानदेतेअवसरीं ॥ यासअभिमानपातलावैरी ॥ जेणेंहोययाची
बोहरी ॥ तैसीचपरीकरावी ॥ ३ ॥ मगलोकांसिह्मणेवैष्णवभक्त ॥ देशावरआणिलेंतुह्मीसमस्त ॥ तरीचुकलेंवांकलेंगां
वांत ॥ राहूंसर्वथानद्यावें ॥ ४ ॥ लोकह्मणतीतेवेळ ॥ गांवांतसाळीएकदुर्बळ ॥ तोनिंदकनष्टमहाखळ ॥ नाहींप्रेमळअं
तरीं ॥ ५ ॥ तोएकराहिलाअसेजाण ॥ इतरींदीधलेंशक्तीप्रमाण ॥ ऐसेंऐकोनिवचन ॥ भक्तप्रेमळबोलती ॥ ६ ॥ तु
ह्मीजाऊनित्याचेमंदिरीं ॥ माझानिरोपसांगासत्वरीं ॥ रुकाअधेलाकांहींतरी ॥ आणाधर्मार्थमागूनी ॥ ७ ॥ ऐकूनि
तुकयाचेंवचन ॥ आश्चर्यकरितीसकळजन ॥ मगसाळियाचेघरासिजाऊन ॥ अंगणींऊभेराहिले ॥ ८ ॥ परीतोकांहीं
चनबोलेवचनासी ॥ पाजणीकरीवेगेंसी ॥ तुह्मीकोणआलेतकासयासी ॥ उत्तरकोणासीकरीना ॥ ९ ॥ गांवकरीवि
स्मितहोऊन ॥ एकमेकांसिसांगतीखूण ॥ ह्मणतीतुकयाचेभिडेकरून ॥ मूर्खापासीपातलों ॥ २१० ॥ परीहाकांहीं
चनबोलेवचन ॥ मगबोलतेजाहलेसकळजन ॥ पंढरीचेहरिदासआलेजाण ॥ एकमासकीर्तनहोतसे ॥ ११ ॥ कांहीं

---

१ माशी. २ मिठाचा खडा. ३ पावसाळ्यानंतर पिकणारीं धान्यें. गहूं हरभरा इत्यादिकांवर मार्गशीर्ष महिन्यांत. ४ पुष्कळ यंडी. ५ आकाशांत. ६ निरसन, गर्वपरिहार.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

देशावरमागावयासी ॥ तुकयानेंपाठविलेंतुजपासी ॥ वचनेंऐकोनिऐसीं ॥ मूर्खमानसींसंतापला ॥ १२ ॥ ह्मणेतुकया
नेंमांडिलिबडबड ॥ तैंपासोनितुह्मांलागलेंवेड ॥ सांडोनिलौकिकिकचाड ॥ नाचतांउघडकीर्तनीं ॥ १३ ॥ आपुल्यासं
सारापाडूनितुटी ॥ आतांकांघेतसांमाझीपाठी ॥ घरींनाहींथाळावाटी ॥ मीतुह्मांसिशेवटींकायदेऊं ॥ १४ ॥ ऐकूनि
मूर्खाचेंवचन ॥ कांताबोलेत्यालागून ॥ थोरथोरलोकतुकयाचेंवचन ॥ आंगणींयेऊनउभेकीं ॥ १५ ॥ तुह्मीनिंदकप
रमखळ ॥ मुखेंनबोलाशब्दरसाळ ॥ बैसावयानिर्मळस्थळ ॥ तेंहींनमिळसर्वथा ॥ १६ ॥ आतांविवेककरूनिचित्तीं ॥
कांहींतरीद्यावेंयांप्रती ॥ ऐकूनिकांतेचीवचनोक्ती ॥ मूर्खचित्तींसंतापला ॥ १७ ॥ सक्रोधहोऊनिबोलेकाये ॥ एक
तांब्याघरांतआहे ॥ तोयांसदेऊनिलवलाहें ॥ वाटेलावीसत्वर ॥ १८ ॥ ऐकूनिभ्रतांराचेवचन ॥ कांतापावलीसमाधा
न ॥ मगउदकपात्रआणून ॥ त्याचेकरींदीधलें ॥ १९ ॥ त्याणेंदीधलेंडाव्याकरीं ॥ याणीलाभअनुभविलाअंतरीं ॥
तांब्याघेऊनियांकरीं ॥ निघालेझडकरीतेथूनी ॥२२०॥ आश्चर्यकरितातीसकळ ॥ ह्मणतीप्रसन्नजाहलाखळ ॥ दावा
ग्निहोयशीतळ ॥ कींशेरांसफळजेवींआलें ॥ २१ ॥ आजिशुष्ककाष्ठासअंकुरफुटला ॥ कींपाषाणासिघर्मदाटला ॥ कीं
राहूसोज्वळहोऊनिभला ॥ प्रकाशपडलाजगावरी ॥ २२ ॥ तैसेंचिघडोनिआलेंस्पष्ट ॥ जेंउदारत्वधरीहापरमनष्ट ॥ एक
ह्मणतीआपुलेंअदृष्ट ॥ सानुकूलहोतेंकीं ॥ २३ ॥ ऐसेंबोलोनिपरस्पर ॥ तुकयापासींआलेसत्वर ॥ पुढेंठेऊनिउदक
पात्र ॥ करितीनमस्कारतेधवां ॥२४॥ तेंदेखोनिवैष्णववीर ॥ लोकांसिबोलेप्रतिउत्तर ॥ तोसाळीआहेमोठाउदार ॥
दीधलेंदेशावरबहुतची ॥ २५ ॥ आपुलेकरेंघेऊनित्वरित ॥ ह्मणतीहेंआहेसुवर्णपात्र ॥ तुह्मासनकळलेंअणुमात्र ॥
परीक्षास्वतंत्रकळेना ॥ २६ ॥ लोकह्मणतीतयेवेळ ॥ हेंपितळेचेंपात्रसोज्वळ ॥ उजळोनिकेलेंअतिनिर्मळ ॥ कांचनाऐसें

१ लाज. २ स्त्री, ३ आवेशें. ४ दुष्ट. ५ तर्क. ६ सत्वर. ७ पति. ८ रानांत उत्पन्न होणारा अग्नि. ९ धंड, १० निवळीचें झाड. ११ सुकलेलें. १२ दगड. १३ दैव.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दिसतेंकीं ॥ २७ ॥ अग्नींततावूनिपाहतांजाण ॥ तंवतें आहेशुद्धसुवर्ण ॥ ऐसेंकौतुकदेखोन ॥ विस्मितमनसकळांचें
॥ २८ ॥ ह्मणतीअघटितसंतांचामहिमा ॥ पितळेचीदवडिलीकाळिमा ॥ अद्भुततुकयाचाभजनप्रेमा ॥ द्यावयाउपमान
सेकीं ॥ २९ ॥ मगहरिदासांसिबोलावून ॥ केलेंतयांचेंचरणक्षालन ॥ पुष्पहारगळांघालून ॥ दीधलींवस्त्रेंसकळांसी ॥५२॥
॥ २३० ॥ गावकरीह्मणतीदेशावरें ॥ आणिलाकराअंगिकार ॥ सकळकरितीनमस्कार ॥ अतिआदरेंकरूनी ॥ ३१ ॥
मगवैष्णवतुकाकायबोलत ॥ ग्रामवासीहेउदारबहुत ॥ याणींद्रव्यउकलोनित्वरित ॥ दीधलेंनिश्चिततुह्मांसी ॥ ३२ ॥
एकदुर्बळसाळीग्रामवासी ॥ परमशेठह्मणतीत्यासी ॥ त्याणेंसुवर्णपात्रतुह्मांसी ॥ मनोभावेंसीअर्पिलें ॥ ३३ ॥ हेंतुळसीद
ळअंगिकारून ॥ करावेंआपुलेपुत्राचेंलग्न ॥ ऐसेंबोलोनियांवचन ॥ वंदिलेचरणसद्भावें ॥ ३४ ॥ आह्मींएकउदारदातेज
नीं ॥ हाअभिमानहोताज्यांचेमनीं ॥ हेंकौतुकदेखोनिनयनीं ॥ तल्लीनहोऊनीराहिले ॥ ३५ ॥ हरिदाससंतोषमानू
निबहुत ॥ पंढरपुरासिगेलेत्वरित ॥ प्रेमळतुकाअतिविरक्त ॥ देहूग्रामासीपातला ॥ ३६ ॥ सांडोनियांसन्मानपूजा ॥
हृदयींचिंतीअधोक्षजा ॥ दीनअनाथआणिराजा ॥ सारिखेचिमानीदृष्टीसी ॥ ३७ ॥ एकेदिवसींप्रेमळभक्त ॥ किंचि
तहोतानिद्रित ॥ तोंदृष्टांतदेखिलासाक्षात ॥ तोपरिसाश्रोतेभाविकहो ॥ ३८ ॥ इंद्रायणीचेस्नानासजात ॥ तंवकाय
करीतपंढरीनाथ ॥ विप्राचावेषधरूनित्वरित ॥ तुकयासिअवचितभेटले ॥ ३९ ॥ ब्राह्मणदेखूनिदृष्टीसी ॥ साष्टांगनमस्का
रघातलातयासी ॥ मगतुकयाचेमस्तकींहृषीकेशी ॥ हस्तठेवितानिजकृपें ॥ २४० ॥ उपदेशदेतांचित्याअवसरा ॥ नम
स्कारकेलाद्विजवरा ॥ ह्मणेस्वामीयेऊनिमाझियाघरा ॥ भोजनकरानिजप्रीतीं ॥ ४१ ॥ त्यावरीब्राह्मणउत्तरदेत ॥ आ ॥ ८ ॥
ह्मासपावशेरपाहिजेघृत ॥ तेंदेशीलतरीनिश्चित ॥ येतोंत्वरितघरासी ॥ ४२ ॥ अवश्यह्मणूनितेअवसरीं ॥ विप्रासिध

१ आश्चर्यभरित. २ वर्गणीसंबंधी द्रव्य. ३ ठक. ४ चंद्रभागेच्या डोहांत. ५ नूप. ६ ब्राह्मण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रिलाआपुलेंकरीं ॥ सत्वरयेऊनिस्वमंदिरीं ॥ कांतेप्रतीबोलत ॥ ४३ ॥ ब्राह्मणक्षुधितउपवासी ॥ तरीसिधासाहित्यद्या
वेंत्यासी ॥ पावशेरघृतनित्यभोजनासी ॥ मनोभावेंसीअर्पावें ॥४४॥ ऐसेंबोलतांचिवचन ॥ कांताझालीक्रोधायमान ॥
ह्मणेकोठोनिआणिलाब्राह्मण ॥ घृतकोठूनम्यांद्यावें ॥ ४५ ॥ ऐसेंऐकूनिकठिणोत्तर ॥ अदृश्यझालेशार्ङ्गधर ॥ जोलीला
नाटकीसर्वेश्वर ॥ कौतुकदाखवीनिजभक्तांसी ॥ ४६ ॥ ऐसादेखोनिस्वप्नसंभ्रम ॥ जागृतीसआलेतुकाराम ॥ हृदयींअ
द्भुतदाटलेंप्रेम ॥ कौतुकनिरुपमदेखोनी ॥ ४७ ॥ ह्मणतीकृपाकेलीसद्गुरुनाथें ॥ परीसेवाघडलीनाहींमांतें ॥ मार्गींजा
तांगंगास्नानातें ॥ सांपडविलेंमजलागीं ॥४८॥ मस्तकींठेवूनियांकर ॥ घृतमागोनिपावशेर ॥ घरींकलहमांडिलाथोर ॥
गेलेसत्वरह्मणूनी ॥ ४९ ॥ केशवचैतन्यराघवचैतन्य ॥ सांगितलीमाळिकेचीखूण ॥ बाबाजीआपुलेंनामाभिधान ॥ बो
लिलेवचनसद्गुरू ॥२५०॥ आवडीचामंत्रझडकरी ॥ सांगितलारामकृष्णहरी ॥ जोप्रीतींकरूनित्रिपुरारी ॥ निरंतरींजप
तसे ॥५१॥ माघशुद्धदशमीसाचार ॥ पाहोनियांगुरुवार ॥ माझाकरूनिअंगिकार ॥ गेलेसत्वरसद्गुरू ॥५२॥ ऐसाविश्वा
सधरून ॥ प्रेमेंकरीहरिभजन ॥ रात्रींआनंदेंकरून ॥ करीतकीर्तननिजनिष्ठें ॥ ५३ ॥ नानापरीचेदृष्टांतअनेक ॥ रसा
ळकवित्वप्रसादिक ॥ श्रवणींऐकतांसभाग्यलोक ॥ होतीतल्लीनमानसीं ॥ ५४ ॥ ह्मणतीहानव्हेमानववीर ॥ केवळईश्व
रीचअवतार ॥ याचेनिमुखेंरुक्मिणीवर ॥ करीउद्धारजनांचा ॥ ५५ ॥ ऐसीप्रतिष्ठावाढतांजनीं ॥ दुरात्मेंसंतप्तजाहलेम
नीं ॥ ह्मणतीशास्त्रमार्गटाकोनी ॥ पाखंडवाणीबोलतसे ॥ ५६ ॥ कर्ममार्गसकळबुडवून ॥ भजनींलाविलेभाविकजन ॥
एकभक्तिमार्गावांचून ॥ नबोलेआनसर्वथा ॥ ५७ ॥ तुकयानेंकेलेंजेंकवित ॥ त्यावह्याबांधोनिवस्त्रांत ॥ उदकांतबुडवा
व्यात्वरित ॥ विचारनिश्चितदृढकेला ॥ ५८ ॥ जैसीगंडिकामूर्तीदेखोनी ॥ यवनउगेचिजळतीमनीं ॥ मगअंतरींकुमती

१ हस्त. २ घर. ३ स्त्री. ४ गुप्त. ५ मजकडून. ६ नाम. ७ शंकर. ८ दुष्ट अंतःकरणाचे लोक. ९ स्नानसंध्यादिक नित्य नैमित्तिक कर्म.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धरूनी ॥ टाकूंफोडोनीह्मणताती ॥ ५९ ॥ कींपिंजऱ्यांतशुकेंबैसोन ॥ स्वच्छंदेंकरीरामभजन ॥ तोशब्दकानींऐकून ॥
ससाणामनींसंतापे ॥२६०॥ नातरीव्रतकरितांएकादशी ॥ मान्यत्वपावलाअंबऋषी ॥ मगदुर्वाससंतप्तहोऊनिमानसीं ॥
पातलाछळणासीसक्रोधें ॥ ६१ ॥ तैशापरीतेदुर्जन ॥ प्रवेशलेतुकयाचेंसदन ॥ ह्मणतीतुवांपाखंडरचून ॥ लाविलेजन
भक्तीसी ॥ ६२ ॥ हेतुझीप्राकृतशुद्धवाणी ॥ सर्वथाऐकूंनयेश्रवणीं ॥ ऐसेंह्मणूनित्यादुर्जनीं ॥ पुस्तकेंहिरोनीघेतलीं
॥ ६३ ॥ मोटाबांधोनिसत्वरीं ॥ पाषाणघातलेत्यांभीतरीं ॥ नेऊनिइंद्रायणीचेतीरीं ॥ उदकामाझारीबुडविल्या ॥ ६४ ॥
ब्राह्मणह्मणतीतुकयालागून ॥ तेरादिवसांचाघातलापणं ॥ जरीकोरडेकाढील जगज्जीवन ॥ तरीमानूंप्रमाणयथार्थ
॥ ६५ ॥ ऐसेंबोलोनितेअवसरीं ॥ गेलेसत्वरआपुलेघरीं ॥ तुकयाचियाचित्तांतरीं ॥ विक्षेपफारवाढला ॥ ६६ ॥ जैसी
कांचेचीकुपीवोतिली ॥ तेअवचितफोडोनिटाकिली ॥ कांपद्मकूळाचीघडीकेली ॥ तेपावकेंजाळिलीअकस्मात ॥ ६७ ॥
नातरीबकुळाचावृक्षलागला ॥ तोअजापाळकेंतोडोनिटाकिला ॥ विक्षेपवाटेवनकरालां ॥ तैसेंतुकयालाजाहलेंकीं ॥
॥ ६८ ॥ कींनिर्जळवनींच्याविहिरीबुजवितां ॥ तळमळकरीकनवाळूदाता ॥ नातरीतुळसीवनबोकडेंखंडितां ॥ वैष्ण
वभक्तांविक्षेप ॥ ६९ ॥ कांषड्रसरांधिलेंपक्वान्न ॥ त्यासिअकस्माताशिवेश्वानें ॥ मगस्वयंपाकीणविक्षेपपावोन ॥
उद्विग्नमनींहोतसे ॥ २७० ॥ कींगारह्मणोनिअकस्मात ॥ मुक्ताफलटाकिलेंअग्नींत ॥ मगजोहरीआपुलेचित्तांत ॥ ह
ळहळकरितमानसीं ॥७१॥ तेवींवह्याबुडवितांदुर्जन ॥ तुकयाचेंविक्षेपपावलेंमन ॥ जाहलेंप्रेमाचेंखंडन ॥ अरिष्टदा
रुणदेखोनी ॥ ७२ ॥ मगदेउळांतयेऊनितेअवसरीं ॥ धरणेंघेतलेंमहाद्वारीं ॥ जैसीद्वारांतलीपायरी ॥ उठेंनेणेंचस ॥ १ ॥
वैथा ॥ ७३ ॥ ह्मणेअनाथनाथपंढरीराया ॥ मजहातींकष्टकरविलेवायां ॥ शेवटींअरिष्टउठवोनियां ॥ बुडविल्यावह्या

---

१ पोपट. २ आंत. ३ प्रतिज्ञा. ४ उंच वस्त्र. ५ अग्नीनें. ६ धनगरानें. ७ माळ्यास. ८ कुत्रा. ९ रत्नपारखी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

उदकांत ॥ ७४ ॥ तुवांस्वप्नींयेऊनिवनमाळी ॥ मजमतिमूढासिआज्ञाकेली ॥ जेनामदेवाचीबाकीराहिली ॥ तेबोलवि
लीप्रसादिक ॥ ७५ ॥ ऐसेंअसतांरुक्मिणीकांता ॥ तरीहेंअरिष्टवोढवलेंकांआतां ॥ बरेंजेंयेईलतुझियाचित्ता ॥ तेंपंढरी
नाथाकरावें ॥ ७६ ॥ ऐसेंह्मणोनितेअवसरीं ॥ रूपआठविलेंनिजअंतरीं ॥ मुखींमंत्ररामकृष्णहरी ॥ सप्रेमभरींज
पतसे ॥ ७७ ॥ नघेफलमूलअथवाअन्न ॥ नबोलेकोणासीप्रतिवचन ॥ सांडोनिदेहलोभआशाजाण ॥ उदकपानक
रीना ॥ ७८ ॥ हेंनिर्वाणदेखोनिजगज्जीवन ॥ बाळरूपसांवळेंधरिलेंसगुण ॥ तुकयाचेंकरावयासमाधान ॥ रुक्मि
णीरमणपातला ॥ ७९ ॥ मस्तकावरीठेवूनिअभयकर ॥ ह्मणेतुझेंस्वस्थअसोंदेअंतर ॥ अरिष्टजाहलेंजेंदुर्धर ॥ तें
मीशार्ङ्गधरनिवारितों ॥ २८० ॥ ऐसेंबोलोनितेवेळ ॥ अदृश्यजाहलातमालनीळ ॥ कींतुकयाचेंहृदयकमळ ॥ देखिलें
निर्मळबैसावया ॥ ८१ ॥ तेथेंचिअदृश्यहोऊनी ॥ सुरवांडलेचक्रपाणी ॥ पदसंधीचेनिरूपणीं ॥ मजलागोनिभास
तें ॥ ८२ ॥ ऐसेतेरादिवसलोटतांजाण ॥ पुस्तकेंपाहातीविचक्षण ॥ तोंअक्षरांलागींजीवनें ॥ आतळलेंनाहींसर्वथा
॥ ८३ ॥ ह्मणतीअन्यायघडलानेणतपण ॥ विष्णुभक्ताचेंकेलेंछळण ॥ परीतयाचासाहकारीजगज्जीवन ॥ अरिष्ट
दारुणनिरसिलें ॥ ८४ ॥ ऐसाअनुतापधरूनिअंतरीं ॥ सत्वरआलेमहाद्वारीं ॥ तुकयासिह्मणतीतेअवसरीं ॥ पावले
श्रीहरीतुजलागीं ॥ ८५ ॥ कोरडेकागदनिघालेजाण ॥ आतांपाहेदृष्टीउघडून ॥ ऐसेंह्मणोनिसकळजन ॥ करितीनम
नसाष्टांगीं ॥ ८६ ॥ ह्मणतीजयासिसाह्यरुक्मिणीपती ॥ तेथेंआमचाअंधायतोकिती ॥ अमृतकुपींतरोगशिरती ॥ हें
कल्पांतींघडेना ॥ ८७ ॥ नातरीभास्कराचियाघरा ॥ प्रवेशनव्हेचिअंधकारा ॥ कींचंद्रमंडळांतउबारा ॥ रिघोंनश
केजयारीतीं ॥ ८८ ॥ तेवींविष्णुभक्तावरीप्रयत्न ॥ करितांअरिष्टनचलेजाण ॥ ऐसेंपरस्परेंबोलोनिवचन ॥ नामस्मर

---

१ बुद्धिहीनास. २ वैराग्य. ३ मन. ४ श्रीविष्णु. ५ सुखी, समाधान पावले. ६ पाणी, उदक. ७ लागलें–स्पर्शलें नाहीं. ८ संकट. ९ पश्चात्ताप. १० विघ्न, नाश. ११ सूर्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णकरितातीं ॥ ८९ ॥ तुकयानेंनेत्रउघडोनी ॥ पुढेंपाहेविलोकूनी ॥ तोंकोरडयाचिवह्याब्राह्मणानीं ॥ देउळींआणूनिठे
विल्या ॥ २९० ॥ हेंकौतुकदृष्टीसिदेखोन ॥ चित्तींवाटलेंसमाधान ॥ जैसेंअंधासिनेत्रयेतांजाण ॥ उल्हासेमनतयाचें
॥ ९१ ॥ कींमुखींघालितांसुधारस ॥ मृतप्रेतउठोनबैसत ॥ तैसातुकयाचेमनींउल्हास ॥ ह्मणेपंढरीनिवासपावला
॥ ९२ ॥ बद्धांजलीजोडूनिमग ॥ स्वमुखेंबोलिलासातअभंग ॥ तोअनुपमबहुतप्रेमरंग ॥ वर्णितांनयेसर्वथा ॥ ९३ ॥ परी
किंचितअन्वययथानिगुतीं ॥ परिसाश्रवर्णींनिजप्रीतीं ॥ तुकयानेंलाविलींनेत्रपातीं ॥ सद्गदचित्तींहोऊनी ॥ ९४ ॥ ह्मणे
जयजयाजीश्रीविठ्ठला ॥ बहुतअन्यायमजघडला ॥ लागूनिलोकांचियाबोला ॥ भारघातलातुजवरी ॥ ९५ ॥ तुजके
लाबहुतशीण ॥ मीतंवअधमयातिहीन ॥ तेरादिवसझांकोनिनयन ॥ तुझ्याद्वारींबैसलों ॥ ९६ ॥ ताहानभुकेचेंकोडेंश्री
हरी ॥ तोहीभारघातलातुजवरी ॥ माझियाबैसोनहृदयमंदिरीं ॥ योगक्षेममुरारीत्वांकेला ॥ ९७ ॥ उदकींकोरडेरा
खिलेकागद ॥ चुकविलालौकिकअपवाद ॥ त्वांअनाथनाथेंआपुलेंबिरुद ॥ सांचकेलेंदयाळा ॥ ९८ ॥ बाळवेषधरूनि
निगुतीं ॥ मजभेटलासिरुक्मिणीपती ॥ समाधानकरूनिप्रीतीं ॥ अभयनिजहस्तेंदीधलें ॥ ९९ ॥ आतांकापोतमाझी
मान ॥ सुखेंपीडाकरोतदुर्जन ॥ परीकदापिसंकटतुजकारण ॥ आतांनघालींजाणसर्वथा ॥ ३०० ॥ मीतंवचांडाळदुष्ट
पतितँ ॥ एकदाचुकीपडलीयथार्थ ॥ उभेकरूनिउदकांत ॥ वह्याराखविल्यातुजहातीं ॥ १ ॥ समर्थासिघालावयाभा
र ॥ आपुल्यासनाहींअधिकार ॥ हेंसर्वथानेणेंचर्मीपामर ॥ विवेककविचारकळेना ॥ २ ॥ होऊनिगेलेंजेंश्रीपती ॥ तेगो
ष्टीपरतोनिनयेपुढती ॥ पुढेंतरीरुक्मिणीपती ॥ संकटतुजप्रतीघालिना ॥ ३ ॥ मानेवरीठेविलीनसतांसुरी ॥ घायन ॥१०॥
हाणितांपाठीवरी ॥ तोंम्यांउतावीळहोऊनिश्रीहरी ॥ आकांततुजवरीहाकेला ॥ ४ ॥ मजपासींआणिडोहाआंत ॥

१ आनंदे. २ अमृत. ३ दोन्हीं हस्त जोडून. ४ अर्थ. ५ बाणा, प्रतिज्ञा. ६ खरी. ७ पातकी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दोंठायींवांटलेंतुझेंचित्त ॥ दोनीचुकवूनियांआघात ॥ वाढविलीकीर्तलौकिकीं ॥ ५ ॥ तुजह्मणोंमायबापासमान ॥ परी तींस्वल्पासाठींघेऊंपाहातींप्राण ॥ स्यांतोंअघटितकेलेंजाण ॥ परीसात्यजगज्जीवनतूंएक ॥ ६ ॥ तूंकृपासागरचक्र पाणी ॥ तुजसमाननदेखोंत्रिभुवनीं ॥ स्तुतीकरावीप्रीतीकरूनी ॥ तरीकुंठितवाणीजाहलीकीं ॥ ७ ॥ तूंदिनबंधूदया ळ ॥ शशीपरीसअतिशीतळ ॥ माउलीपरीसस्नेहाळ ॥ येतींकल्लोळप्रेमाचे ॥ ८ ॥ तूंअनिर्वाच्यदेवाधिदेव ॥ उपमाद्याव यासिनाहींठाव ॥ सकळजीवांचाहीजीव ॥ निवालाशिवनामजपतां ॥ ९ ॥ महद्भूतेंपांचनिर्माण ॥ तींहींतुजपासोनिजा ण ॥ गोडह्मणूंअमृतासमान ॥ तरीतूंजगज्जीवनत्यांपरता ॥ ३१० ॥ आतांनबोलतांकांहीं ॥ उगाचिमाथाठवितोंपायीं ॥ अनंतअपराधविठाबाई ॥ क्षमाकरीतूंस्नेहाळे ॥ ११ ॥ मीअवगुणीअन्यायीफार ॥ कितीसांगोंवारंवार ॥ पुरेपुरेहा संसार ॥ चित्तस्थिरहोऊंनेदी ॥ १२ ॥ अनंतबुद्धीचेविकल्पजाण ॥ तरंगपालटतीक्षणक्षण ॥ संसर्गकरितांजाण ॥ तैंबद्धमनहोतसे ॥ १३ ॥ देवाधिदेवपंढरीनाथा ॥ सकळनिरसीमाझीचिंता ॥ कर्मजाळनिरसोनिअनंता ॥ हृदयमं दिरींअसावें ॥ १४ ॥ ऐशियारीतीतुकयान ॥ प्रेमेंआळविलाश्रीरुक्मिणीरमण ॥ मगअंतरगाभारांरिघोन ॥ दीधलें आलिंगनदेवासी ॥ १५ ॥ सगुणस्वरूपींगुंतलेलोचन ॥ मुखेंकरीतनामस्मरण ॥ पुढेंदेहासहिततुकारामजाण ॥ वैकुं ठभुवनपावला ॥ १६ ॥ तेकथासविस्तरल्याहावीग्रंथीं ॥ तोंहृदयस्थसांगेरुक्मिणीपती ॥ कींतुकारामअद्यापिस्थितीं ॥ आहेनिश्चितींइहलोकीं ॥ १७ ॥ निजनिष्ठजेकांप्रेमळभक्त ॥ तयांसिस्वप्नींदर्शनदेत ॥ जैसादत्तात्रेयअनसूयासुत ॥ स्वेच्छाविचरतभूमंडळीं ॥ १८ ॥ याचासंशयवाटेमनीं ॥ तरीसाक्षऐकिजेसंतसज्जनीं ॥ निळोबाचेस्वप्नींयेऊनी ॥ उप देशकेलानिजकृपें ॥ १९ ॥ जरीचित्तींशुद्धअसेलप्रेम ॥ त्यासिउपदेशदेतीतुकाराम ॥ तोजगद्गुरूनिरुपम ॥ अद्या

१ चंद्र. २ थंड. ३ लाटा. ४ पंचमहाभूतें, पृथिवी, आप (पाणी), तेज, वायु, आकाश. ५ दुर्गुणी, पापी. ६ लहरी, लाटा. ७ संबंध. ८ खाविला, पाजिला. ९ नेत्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पिअसेचिरंजीव[१] ॥ ३२० ॥ त्याणेंकृपाकरूनिएकांतीं ॥ ग्रंथलिहविलामाझेहातीं ॥ परीयेविषयींविचक्षण[२]श्रोतीं ॥ संशयचित्तींनधरावा ॥ २१ ॥ तोविश्वव्यापकचैतन्यघन ॥ सद्गुरुतुकारामआह्मांलागून ॥ महीपतितयाअनन्यशरण ॥ देहाभिमान[३]टाकोनी ॥ २२ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ द्विपंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ ३२३ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५२ ॥ ॥ ओव्या ॥ ३२३ ॥ छ ॥

१ चिरायु, जीवंत. २ ज्ञानी, चतुर. ३ गर्व.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः॥ ॥ श्रीत्रैलोक्यनाथायनमः॥ जयविश्वभूषणाविश्वंभरा॥ मायातीताजगदुद्धारा॥ सगुणस्वरू
पानिर्विकारा॥ सायुज्यउदाराजगद्गुरू॥ १॥ जयजयमायाचक्रचाळका॥ पीतांबरधारीवैकुंठनायका॥ प्रजापती
चेनिजजनका॥ वेदोद्धारकापांडुरंगा॥ २॥ वारणआणिअणुरेणूंत॥ तूंसारिखाचिअससीजगन्नाथ॥ सुरगणपुरंदर
निश्चित॥ सत्तेनेंवर्ततीतुझिया॥ ३॥ चंद्रसूर्यआकाशींधांवती॥ त्यांचीसूत्रदोरीतुझियाहातीं॥ जैसाजळमंडपींबा
हुल्यांप्रती॥ नाचवितोयुक्तीनिजकळें॥ ४॥ कांएकलाचिप्रभंजनकेवळ॥ हालवीतसेतरुवरसकळ॥ तैसालाघवीतूं
गोपाळ॥ ब्रह्मांडगोळहालविसी॥ ५॥ जेंजेंचराचरदिसतेंदृष्टी॥ तेंतुझ्यारोमरंध्रींजगजेठी॥ तोतूंपुंडलीकाचेपाठी॥
दोनहीकरकटींठेविले॥ ६॥ ब्रह्मादिकांपारनकळेजाण॥ तोतूंनिजभक्तांचेंपाळिसीवचन॥ नानापरीचींसंकटेंदाखवू
न॥ मगनिजांगेंधावणकरिसीतूं॥ ७॥ शेषशायीतूंगरुडध्वजा॥ लक्ष्मीइच्छीतुझियाचरणरजा॥ तोतूंउभाराहूनि
अधोक्षजा॥ घेसीलपूजादासांची॥८॥ योगीबैसलेवज्रासनीं॥ तरीलवकरीनयेसीत्यांचेध्यानीं॥ तोतूंप्रेमळभक्तांच्या
कीर्तनीं॥ निर्लज्जहोऊनिनाचसी॥ ९॥ त्यानिजभक्तांचींअघटितचरित्रें॥ तूंचवदविसीराजीवनेत्र॥ येरवींमीमति
मंदकरावयास्तोत्र॥ बुद्धिस्वतंत्रअसेना॥ १०॥ मागीलअध्यायींकथाअद्भुत॥ तुकयासिपावलेपंढरीनाथ॥ कोर
डेकागदउदकाआंत॥ तेरादिवसराहिले॥ ११॥ आतांसावधहोऊनिश्रोतीं॥ कथारसाळपरिसापुढती॥ असोंधा
मणगांवबालेघांटाप्रती॥ प्रसिद्धजाणतीसाधुसंत॥ १२॥ तेथीलपाटीलवैष्णवभला॥ प्रेमळभक्तमाणकोजीबोधला॥
शूद्रयातींतउपनामत्याला॥ जगतापऐसेंह्मणताती॥ १३॥ ममताईतयाचीनिजकांता॥ परमभाविकपतिव्रता॥
जेभ्रतारआज्ञेविणसर्वथा॥ नवर्त्तेवृथासंसारीं॥ १४॥ ज्येष्ठपुत्रअतिउदासी॥ यमाजीनामाभिधानत्यासी॥ तैसी

१ हत्ती. २ इंद्रादि देव. ३ वायु, वारा. ४ दोनही हात कमरेवर ठेऊन. ५ दृढासनीं, दृढ निश्चयानें. ६ आ[illegible]नाव. ७ स्त्री. ८ पति हेंच जीचें व्रत ती पतिव्रता.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चस्नुषासद्गुणराशी ॥ नामतियेसीभागीरथी ॥ १५ ॥ ऐसेचौघेजणएकचित्त ॥ प्रपंचींअसोनिअतिविरक्त ॥ हृदयीं
आठवोनिपंढरीनाथ ॥ भजनकरितनिशिंदिनीं ॥ १६ ॥ घरींधनधान्यअसेअपार ॥ महलमान्यताकारभार ॥ गा
यीवृषभनिरंतर ॥ गोठणभरूनअसतीपैं ॥ १७ ॥ पंधरादिवसींएकादशीसी ॥ जातअसेपंढरीसी ॥ नेमवारीधरि
लीऐसी ॥ बोधराजेंनिजनिष्ठा ॥ १८ ॥ द्वादशीपर्वकाळसुदिन ॥ करीब्राह्मणसंतर्पण ॥ दीनयाचकक्षुधितजाण ॥ वां
टीतअन्नत्यांलागीं ॥ १९ ॥ त्रयोदशीसउठोनलवलाहीं ॥ परतोनियावेंधामणगांवीं ॥ ऐसेबहुतदिवसलोटतांपाही ॥
तोंअवर्षणपडलेंदेशांत ॥ २० ॥ दुष्काळपडिलाअतिकठिण ॥ साहाशेरांचीजाहलीधारण ॥ द्रव्यदेऊनिविकतअ
न्न ॥ दुर्बळांकारणमिळेना ॥ २१ ॥ ऐसाकठीणकाळदेखतांदृष्टीं ॥ बोधल्यासकरुणाउपजलीपोटीं ॥ ह्मणेभूतमात्रींज
गजेठी ॥ आहेसर्वांघटींव्यापक ॥ २२ ॥ मगकांतेसिनेऊनिएकांतीं ॥ निजहितसांगेतिजप्रती ॥ ह्मणेभुकेलियांसिय
थाशक्ती ॥ अन्नोदकदेईजे ॥ २३ ॥ क्षुधार्थीयासिद्यावेंअन्न ॥ सुकल्याझाडासिघालावेंजीवन ॥ शीतकाळींवस्त्रेंअ
र्पितांजाण ॥ तरीअक्षयपुंण्यजोडतसे ॥ २४ ॥ प्रवासींरोगियांऔषधदेतां ॥ कींबुडत्यासिजळांतूनकाढितां ॥ कींदु
र्बळब्राह्मणाचेंलग्नकरितां ॥ तरीअक्षयपुंण्यजोडतसे ॥ २५ ॥ पावकेंजळतांविझविलेंघर ॥ कींअनाथप्रेतासअग्निसं
स्कार ॥ तृषाक्रांतासिपाजितांनीर ॥ तरीअक्षयपुण्यजोडतसे ॥ २६ ॥ निर्बळढोरासिकुरवाळणें ॥ कींपाशांतूनसा
वजसोडवणें ॥ याचकांसबोलतांनम्रवचनें ॥ तरीअक्षयपुंण्यजोडतसे ॥ २७ ॥ हेंसुकृतअसतांपदरींजाण ॥ तरी
सात्विकवैराग्यउपजेलतेण ॥ मगजोडतीश्रीरामचरण ॥ पळतीविघ्नेंविषयांचीं ॥ २८ ॥ येरजपतपेंउग्रकरिती ॥
तींफळभोगेंसुकृतेंविलयाजाती ॥ आणिपरोपकारजेसाधिती ॥ तयांसविरक्तीठसावे ॥ २९ ॥ यापरीबोधलाएकांतीं ॥

१ अहोरात्र, रात्रंदिवस. २ बैल. ३ ब्राह्मण भोजन. ४ दुष्काळ. ५ व्यापून रहाणारा. ६ थंडीच्या दिवसांत. ७ आगीन. ८ उदक. ९ पुंण्य. १० पुंण्यसांठा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिकवणदेतसेकांतेप्रती ॥ अवश्यह्मणोनितेसंती ॥ तैशाचरीतींवर्ततसे ॥ ३० ॥ करुणाधरूनसर्वांभूतीं ॥ दुष्काळींअ
न्नदानकरिती ॥ स्वदेशांतप्रकटलीकीर्ती ॥ याचकयेतीधांवूनी ॥ ३१ ॥ साखरेचेराशीवरदेखा ॥ गोळाहोतीमुंग्याम
क्षिका ॥ कींवृक्षच्छायेचियादेखोनिसुखा ॥ पांथयेतीधांवोनी ॥ ३२ ॥ नातरींडोंगराचियाऊदकापासी ॥ श्वापदेंयेती
निजप्रीतींसी ॥ तैवींबोधल्याचेमंदिरासी ॥ तृषार्तक्षुधार्तयेतीबहू ॥ ३३ ॥ अश्वावरीसामग्रीघालूनिबहुत ॥ पंढरीस
निघावेंदशमीआंत ॥ एकादशीसजाऊनितेथ ॥ स्नानकरितचंद्रभागेचें ॥ ३४ ॥ जातपुंडरीकाचेदर्शना ॥ हातींशोभे
टाळविणा ॥ घालूनिक्षेत्रप्रदक्षिणा ॥ करीगर्जनाहरिनामें ॥ ३५ ॥ सप्रेमभरींतेअवसरीं ॥ लोटांगणघालीमहाद्वारीं ॥
मगप्रवेशोनिराउळांतरीं ॥ स्वरूपदृष्टीभरींन्याहाळित ॥ ३६ ॥ देवासिदेऊनिआलिंगन ॥ सांगतआपुलेजीवींचीखू
ण ॥ जैसीकन्यासासुरवासिण ॥ गुजसांगतमातेसी ॥ ३७॥ मस्तकठेऊनिचरणावरी ॥ सभामंडपींकीर्तनकरी ॥ जा
गरणहोतप्रहरच्यारी ॥ स्वानंदगजरींतेधवां ॥ ३८ ॥ विप्राहातींस्वयंपाककरून ॥ क्षुधार्थीयांसिअर्पावेंअन्न ॥ मग
देवासिआज्ञामागून ॥ यावेंपरतोनगृहासी ॥ ४१ ॥ ऐसेलोटतांबहुदिनं ॥ पदरींचेंसरलेंधनधान्य ॥ मगअलंकारव
स्तामोडून ॥ करीअन्नदानयाचकां ॥ ४० ॥ गायीवृषभचाऱ्याविणपीडती ॥ ह्मणोनिवांटिलींलोकांप्रती ॥ निरुपा
धिहोऊनिऐशारीतीं ॥ भजनएकांतींकरितसे ॥ ४१ ॥ निजांगेंकष्टकरून ॥ मजूरीकरूनिमिळवावेंअन्न ॥ त्यांतही
अतिथीसंतोषवून ॥ कुटुंबरक्षणकरितसे ॥ ४२ ॥ ऐसीयेतांदरिद्रआपदा ॥ आपुलानिश्चयनसांडीकदा ॥ सद्भावेंआ
ळंवूनिगोविंदा ॥ गुणानुवादावर्णितसे ॥ ४३ ॥ ऐसीनिष्ठादेखोनिचित्तीं ॥ प्रसन्नजाहलेरुक्मिणीपती ॥ साक्षातदर्श
नएकांतीं ॥ बोधल्याप्रतींदेतसे ॥ ४४ ॥ एकचित्तींनसतांभावो ॥ सर्वथानभेटेदेवाधिदेवो ॥ प्रेमभक्तीविणपाहावो ॥

१ साध्वी, पतिव्रता. २ वाटसरू. ३ पाण्याच्या झऱ्याजवळ. ४ घोड्यावर. ५ मनांतील अभिप्राय. ६ दिवस. ७ बैल. ८ काळजीरहित. ९ प्रार्थून, स्तवून

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाणपणवावोकासया ॥ ४५ ॥ अंगींभरतांज्ञानाभिमान ॥ कदापिनठसेभोळेपण ॥ जैसातरुवरथोरवाढलाजाण ॥
तोलवेंनेणेंचीसर्वथा ॥ ४६ ॥ कींवृद्धलपावलाद्विजवर ॥ त्याचेमुखींनबैसेवेदाक्षर ॥ कींकोल्हाटीथोरवाढल्यावर ॥
त्याचेंअंगनलवेची ॥ ४७ ॥ कींअग्नीमाजीमडकेंभाजिती ॥ त्याचीपरतोनिनव्हेचिमाती ॥ नातरीजींबीजेंअग्नीनेंआ
हाळती ॥ तींअंकुरासिनयेतीसर्वथा ॥ ४८ ॥ तेवींजाणपणयेतांअंगासी ॥ भोळेपणनठसेचतयासी ॥ भावविश्वासन
सतांमानसीं ॥ हृषीकेशीआतुडेना ॥ ४९ ॥ ह्मणूनिसाधुसंतजन ॥ डावलोनिटाकितीज्ञानाभिमान ॥ जेवींहिवराचेवृ
क्षाखालून ॥ नजातीसज्ञानसर्वथा ॥ ५० ॥ असोसंतांचीवर्णितांस्थित ॥ पुढेंग्रंथवाढेलबहुत ॥ बोधल्याचीदेखोनभो
ळीभक्त ॥ पंढरीनाथभेटला ॥ ५१ ॥ एकेदिवसींहरिदिनीसी ॥ पंढरीसचालिलेयात्रेसी ॥ वाटखर्चीनाहींद्यावयासी ॥
मगकांतामानसींचिंतावली ॥ ५२ ॥ चंद्रभागेसिकरितांस्नाना ॥ ब्राह्मणांसिद्यावयानाहींदक्षिणा ॥ द्वादशीसविप्रां
सिभोजना ॥ कोठूनिद्यावेंनिजकांते ॥ ५३ ॥ तरींकाष्ठेंआणोनियांस्वकरीं ॥ विकीनपंढरीचेबाजारीं ॥ मगकुऱ्हाड
घेवोनिकरीं ॥ पंढरीससत्वरचालिले ॥ ५४ ॥ पायांसनमिळेपायतण ॥ वस्त्रेंचवाळेंअतिजीर्ण ॥ डोक्यासचिंध्याबां
धोन ॥ करीतभजनश्रीहरीचें ॥ ५५ ॥ ह्मणतीगेलेंघरीचेंसंपत्तिधन ॥ हेंबहुतवाटलेंसमाधान ॥ देवेंमायाजाळका
ढोन ॥ प्रपंचभानउडविलें ॥ ५६ ॥ जैसेंनितळोनिगेलियाअभ्राळ ॥ आकाशदिसेअतिनिर्मळ ॥ कींपूरवोहटोनिगे
लियातुंबळ ॥ गंगानिश्चळवाहातसे ॥ ५७ ॥ तेवींलयाजातांधनसंपत्ती ॥ बोधलानिश्चळजाहलाचित्तीं ॥ अंतरींहोऊ
नप्रेमभरित ॥ भजनकरीतचालिला ॥ ५८ ॥ सन्निधउरतांक्षेत्रपंढरी ॥ भाराभरकाष्ठेंघेतलींशिरीं ॥ तींसत्वरनेऊनिबा ॥ २ ॥
जारीं ॥ तीनपैशावरीदीधलीं ॥ ५९ ॥ चित्तींअनुतापधरून ॥ केलेंचंद्रभागेचेंस्नान ॥ प्रयोगसांगतांविप्राकारण ॥ द

१ ज्ञानाचा व्यर्थ अभिमान. २ वृक्ष. ३ भाजतात, पोळतात. ४ आकळत–सांपडत नाहीं. ५ सोडून. ६ बिबव्याचे. ७ कावळे. ८ शांत, निष्काळजी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

क्षिणादीधलीएकपैसा ॥ ६० ॥ एकपैसामोडूनतेवेळां ॥ घेतल्याखारकाबुकामाळा ॥ राउळाजाऊनिघनसांवळा ॥ भा
वेंपूजिलानिजप्रीतीं ॥६१॥ रात्रींऐकोनिहरिकीर्तन ॥ चारप्रहरकेलेंजागरण ॥ द्वादशीसकरोनियांस्नान ॥ उद्विग्नम
नबैसला ॥६२॥ ह्मणेविप्रासिशिधाद्यावयासी ॥ अनुकूलतानाहींआजिचेदिवसीं ॥ मागुतीतिरुकादेऊनिवाणियासी ॥
पिष्टअर्धशेरआणिलें ॥ ६३ ॥ तेंचवाळयांतबांधोनतेअवसरीं ॥ बैसलाचंद्रभागेचेतीरीं ॥ ह्मणेकोणहीद्विजवरयेईलज
री ॥ तरीसभाग्यअंतरींमीएक ॥ ६४ ॥ नाहींडाळतांदूळलवण ॥ कोणदुर्बळाचेंघेईलअन्न ॥ थोरथोरलोकयात्रेसिये
ऊन ॥ समाराधनाघालिती ॥ ६५ ॥ सांडूनियांदिव्यमंदिर ॥ खोपटांतनयेतीवस्तीकर ॥ कांपात्रींचेंटाकोनियांक्षी
रें ॥ ताकजेवणारनघेती ॥ ६६ ॥ तेवींथोरथोरटाकोनयजमान ॥ मजकडेकोणयेतलिब्राह्मण ॥ ऐसाचिंताक्रांतहोऊ
न ॥ करितभजनश्रीहरीचें ॥ ६७॥ बोधल्याचाभावनिर्मळ ॥ जाणोनियांभक्तवत्सल ॥ वृद्धब्राह्मणदीनदयाळ॥ जाह
लेतत्काळतेसमयीं ॥ ६८ ॥ हातींकाठीडोईसटोपी ॥ जीर्णवस्त्रनेसलेजगजेठी ॥ थरथरांकांपतउठाउठीं ॥ आलेवाळु
वंटींतेधवां ॥ ६९ ॥ बोधल्यासिह्मणेजगज्जीवन ॥ तूंआमुचायजमानपुरातन ॥ मीपंढरीक्षेत्रींराहून ॥ आशीर्वचनतु
जदेतों ॥ ७० ॥ आणिकउदंडअसतीद्विजवर ॥ त्यांचेयजमानथोरथोर ॥ मजदुर्बळालागींसाचार ॥ कोणीचपामरन
पुसती ॥ ७१ ॥ ह्मणोनिक्षुधिततहोऊनिपोटीं ॥ पातलोंबोधल्यातुझेभेटी ॥ कायसाहित्यअसेलजेंगांठीं ॥ तेंउठाउठी
मजद्यावें ॥ ७२॥ ऐकोनिविप्राचेंवचन ॥ चित्तींवाटलेंसमाधान ॥ ह्मणेमजपावलारुक्मिणीरमण ॥ आनंदघनकृपाळू
॥ ७३ ॥ मगचवाळेंयाचीगांठसोडूनिसत्वरीं ॥ पिष्टकाढिलेंतेअवसरीं ॥ घातलेंब्राह्मणाचेपदरीं ॥ परीसंकोचअंतरींवा
टला॥ ७४ ॥ ह्मणेस्वामीहेंकोरडेंपीठ ॥ द्यावयासिनाहींडाळमीठ॥ वचनऐकोनिवैकुंठपीठ॥ कायबोलततेधवां ॥ ७५ ॥

१ देवळांत. २ मीठ. ३ दूप. ४ फाटकें व जुनें. ५ पूर्वींचा. ६ आशीर्वाद. ७ बहुत. ८ खरोखर. ९ उपवासी. १० कांबळ. ११ पीठ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

समर्यीहोतेंजेंअनुकूळ ॥ तेंत्वांदीधलेंयेवेळ ॥ कासयासपाहिजेलवणडाळ ॥ ऐसेंघननीळह्मणतसे ॥७६॥ बोधल्याचेचि
त्तींआवडीबहुत ॥ कींब्राह्मणजेवावाद्दष्टींदेखत ॥ हेजीवींचीखूणपंढरीनाथ ॥ जाणताजाहलातेकाळीं ॥ ७७ ॥ मगह्मणे
रुक्मिणीकांत ॥ आमुचेंबिऱ्हाडदेऊळांत ॥ स्वयंपाककरावयातेथ ॥ स्थळहिरितेंदिसेना ॥७८॥ शुभ्रावेंचोनिदेशीलमा
तें ॥ तरीपानगेकरूनभक्षूंयेथें ॥ ऐकोनिबोधल्याच्याचित्तातें ॥ संतोषपरमवाटला ॥ ७९ ॥ ह्मणेजैसेंहोतेंमाझेमनीं ॥
तैसीचबोलिलाविप्रवाणी ॥ मगचवाळ्याचीवेंटीकरूनी ॥ शुभ्रावेंचोनीआणिल्या ॥ ८० ॥ स्नानकरोनिआलाब्राह्मण ॥
वोलेंवस्त्रनेसलाजीर्ण ॥ बोधल्यानेंयात्रेकऱ्यांपासोन ॥ कृशानुआणोनदीधला ॥ ८१ ॥ ज्याचेंऐश्वर्यदेखोनिडोळां ॥
लक्ष्मीजडलीचरणकमळा ॥ तोवैकुंठवासीघनसांवळा ॥ पानगेकरीतबैसला ॥ ८२ ॥ वेदोक्तमंत्रउच्चारूनी ॥ ज्या
सिअवदांनदेतीऋषिहवनीं ॥ तोनिजभक्तांचीआवडीदेखोनी ॥ पिष्टमळीतनिजकरें ॥ ८३ ॥ हारुक्मिणीसकळतांवृ
त्तांत ॥ कींस्वयंपाककरितीपंढरीनाथ ॥ मगतीवृद्धरूपधरोनित्वरित ॥ येतीजाहलीत्याठायां ॥ ८४ ॥ जैसादीपक
सूक्ष्मंहोतांजाण ॥ प्रकाशतैसाचदिसेमलिन ॥ कींवृक्षासियेतांपोखरण ॥ लतापिंगटहोताती ॥८५॥ कांमृदंगाऐसी
चउनटेध्वन ॥ कींपुष्पाऐसाचपरिमळजाण ॥ कींमेघाअंगिचपलांजाण ॥ शोभायमानचमकत ॥८६॥ नातरीचित्राऐ
साउमटेरंग ॥ कींप्रकृतीऐसेंचहोयअंग ॥ कांमुगाऐसीचजैसीशेंग ॥ झाडींअसतांवाढतसे ॥ ८७ ॥ कांऋतुऐसेंचआ
काशहोये ॥ कींबोधाऐसीचसंसरितापाहे ॥ तेवींभ्रताराऐसीचरुक्मिणमाये ॥ रूपेंनटलीतेधवां ॥ ८८ ॥ मुखांतनाहीं
तद्विजंपंक्ती ॥ कर्णीताटंकेंलखलखिती ॥ सौभाग्यभूषणेंविराजती ॥ कुंकुमललाटींलाविलें ॥ ८९ ॥ शुभ्रफाटकेंवस्त्र
जीर्ण ॥ काठीटेंकितस्थिरावोन ॥ मगवालवंटींयेऊन ॥ जगज्जीवनधुंडितसे ॥ ९० ॥ तोंवाळुवंटींथाळघालूनी ॥ पिष्टम ॥ ३ ॥

१ मीठ. २ गोवऱ्या. ३ जुनें. ४ अग्नि. ५ आंहुति. ६ आपुल्हेहातानी. ७ लहान. ८ वेली. ९ सुगंध, वास. १० वींज. ११ नदी. १२ दातांची बनिशी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ळीतसेचक्रपाणी ॥ हेंदेखोनिविश्वजननी ॥ हांसोनकायबोलतसे ॥ ९१ ॥ यजमानआलायात्रेसी ॥ एकलेचआलां त्याजपासी ॥ आह्मांसिटाकोनिमार्गेसी ॥ स्वयंपाकासीनिघालां ॥ ९२ ॥ रुक्मिणीह्मणेतेसमयीं ॥ मीस्वयंपाकार्थ पातलेंपाही ॥ मगस्नानकरोनिलवलाहीं ॥ बैसलीयेऊनसन्निध ॥ ९३ ॥ ह्मणेएकलेचकरूंपाहतांभोजन ॥ परीजेवा वयासआलीसुवासिण ॥ ऐकोनिबोधल्याचेंमन ॥ संतोषयुक्ततेधवां ॥ ९४ ॥ बोधलाविचारीस्वमनांत ॥ अन्नअसेकीं हेंकिंचित ॥ उभयतांकैसींजेवितीलयांत ॥ नकळेनिश्चितमजलागीं ॥ ९५ ॥ अनंतशक्तीचीस्वामिणीयेथ ॥ सकळसि द्धीवोळंगतीतेथ ॥ तिचेहातलागतांत्वरित ॥ आलीबरकतअन्नासी ॥ ९६ ॥ रांजणीबैसलीभागीरथी ॥ तरीतीआटे लकैशारीतीं ॥ कामधेनूचियागोठ्याप्रती ॥ चाऱ्यासितोटानयेकीं ॥ ९७ ॥ नातरीउर्वीचिलग्नांतजाण ॥ नऱ्हेस्थळी चीअडचण ॥ तेवींजेथेंबैसलीमातारुक्मिण ॥ तेथेंकिंचितन्यूननपडेची ॥ ९८ ॥ आतांपक्वान्नेंकरावींजर ॥ तरीबोध ल्याचेंदुखवेलअंतर ॥ ह्मणोनिपानगेंभाजिलेफार ॥ जेअमृताहूनसुरस ॥ ९९ ॥ तीनपात्रेंतत्काळवाढून ॥ निजभ क्तासिह्मणेजगज्जीवन ॥ तुह्मींहीआतांचउठोन ॥ प्रसादघ्यावायेपंक्तीं ॥ १०० ॥ येरूह्मणेद्विजवरा ॥ मीआतांचनजे वींसत्वरा ॥ तुह्मींउभयतांजेविल्यापुढांरा ॥ उच्छिष्टपात्रमजद्यावें ॥ १ ॥ अवश्यह्मणोनिहृषीकेशी ॥ मगसत्वरबैस लेभोजनासी ॥ तोंसुरवरयेवोनिआकाशीं ॥ कौतुकदृष्टीसीपाहाती ॥ २ ॥ इतरजनांच्यापडतांदृष्टी ॥ परस्परांबोल तातिगोष्टी ॥ ह्मणतीभक्तवत्सलजगजेठी ॥ प्रेमळापाठीलागतसे ॥ ३ ॥ आह्मींकरितोंनानाप्रयत्न ॥ परीकदांनकरी अमृतपान ॥ तोबोधल्याचीभक्तिदेखोन ॥ भक्षीकदन्ननिजप्रीतीं ॥ ४ ॥ ब्राह्मणसुवासिणजेवल्यावर ॥ बोधल्यासि दीधलेंउच्छिष्टपात्र ॥ निमिषंनलागतांशार्ङ्गधर ॥ अदृश्यजाहलेतेधवां ॥ ५ ॥ तेव्हांउमजलेंयाचेमनीं ॥ कींविप्रवेषें

---

१ वाढ, समृद्धी. २ पृथिवीचे. ३ जागेची कमताई. ४ कमी. ५ हृदय. ६ गोड. ७ नंतर, मग. ८ देव. ९ नासलेलें, कुजलेलें. १० क्षणमात्र. ११ गुप्त. १२ समजलें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चक्रपाणी ॥ माझेंसमाधानकरूनी ॥ गेलेऐसेंवाटतसे ॥ ६ ॥ पात्रींप्रसादहोताउरला ॥ तोनिजप्रीतीनेंभक्षीबोधला ॥
देउळासिजाऊनतेवेळां ॥ कायबोलिलादेवासी ॥ ७ ॥ ह्मणेभक्तवत्सलाजगज्जीवना ॥ आजिकदन्नआवडलेंतुझियाम
ना ॥ थोरथोरटाकूनिसमाराधना ॥ सांभाळिलेंदीनानिजकृपें ॥ ८ ॥ यावरीबोलेरुक्मिणीरमण ॥ द्विजांसिवाढिती
नानापक्वान्न ॥ तेथेंहीमीजातसेंजाण ॥ परीकोणीचभोजनननघालिती ॥ ९ ॥ बोधल्यासह्मणतीअधोक्षज ॥ उदईक
कौतुकदाखवीनतुज ॥ तोंएकासावकारेंसहज ॥ सहस्रभोजनमांडिलें ॥ ११० ॥ सर्वसाहित्यकरोनितेदिनीं ॥ रा
त्रींद्विजांसिसांगीतलींआमंत्रणीं ॥ सकळांचींनावेंपुसोनी ॥ पत्रींलिहोनींठविलीं ॥ ११ ॥ मगवाळुवंटींकनातदेऊ
नी ॥ स्वयंपाककेलादुसरेदिनीं ॥ विप्रांसिस्नानेंसांगतांत्यांनीं ॥ पात्रींयेऊनीबैसले ॥ १२ ॥ कागदींताळापाहतां
सहज ॥ तोंसहस्रांचीआलीबेरीज ॥ तंवबोधल्यासह्मणेअधोक्षज ॥ कौतुकतुजदाखवितों ॥ १३ ॥ मगआपणजा
हलावृद्धब्राह्मण ॥ वस्त्रनेसलाफाटकेंजीर्ण ॥ हातींकाठीजगज्जीवन ॥ थरथरांमानकांपवित ॥ १४ ॥ ऐसेंरूपधरोनि
पाही ॥ सत्वरचालिलेलवलाहीं ॥ बोधल्यासह्मणतीतयेसमयीं ॥ कौतुकपाहींदुरोनी ॥ १५ ॥ ब्राह्मणपंक्तीपासीजा
ण ॥ येऊनबोलतसेजगज्जीवन ॥ मीक्षुधितउपवासीब्राह्मण ॥ पक्वान्नभोजनइच्छितसें ॥ १६ ॥ तेह्मणतीपरतोनजायी
येथेंसमावेशहोतनाहीं ॥ वचनऐकोनशेषशायी ॥ कायबोलतीतेधवां ॥ १७ ॥ सहस्रब्राह्मणबैसलेदेख ॥ यांतएकनस
मायेकायआगांतुक ॥ ऐसेंबोलतांवैकुंठनायक ॥ सावकारबोलततेंऐका ॥ १८ ॥ आंवतिलेब्राह्मणअसतांजाण ॥ आगां
तुकाचेंकायकारण ॥ ऐसेयेतीलउदंडजन ॥ आह्मीकोठूनिअंन्नपुरवावें ॥ १९ ॥ मगबळेंचपात्रींउठाउठी ॥ जाऊनिब
सलेजगजेठी ॥ बोधलाकौतुकविलोकूनिदृष्टीं ॥ आश्चर्यपोटींकरीतसे ॥ १२० ॥ सावकारसेवकाससांगेदेखा ॥ ब्राह्म

१ तंबु ठोकून, उभारून. २ त्वरेनें. ३ शेषावर निजणारा ह्मणून शेषशायी, (विष्णु.) ४ नबोलाविता एकाएकीं आलेला. ५ बोलाविलेले.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णासबाहेरउचलोनिटाका ॥ तेव्हांक़ोणीचनकरितीविवेका ॥ वैकुंठनायकाउठविलें ॥ २१ ॥ कोणीधरिलेचरणहात ॥ कोणीशेंडीधरोनिवोढित ॥ ह्मणतीहाब्राह्मणलंडबहुत ॥ बळेंचबैसतोपात्रावरी ॥ २२ ॥ ऐसेंपरस्परेंबोलोनिवचन ॥ द्विजासिटाकिलेंभिरकावून ॥ पुढतीसरसावोनिजगज्जीवन ॥ उभेराहिलेतेधवां ॥ २३ ॥ तोंइकडेपात्रींवाढिलेंघृत ॥ पुरोहितेंसंकल्पसोडिलात्वरित ॥ मगआपोशनघेऊनिसमस्त ॥ द्विजबैसलेभोजना ॥ २४ ॥ हेंदेखोनिवैकुंठविहारी ॥ परतोनिचालिलेतेअवसरीं ॥ जैसासिद्धांपासोनित्रिपुरारी ॥ रुसोनिसत्वरनिघाला ॥ २५ ॥ कींकुंडीसांडोनिप्राणजात ॥ मगदेहासिवोढवेकल्पांत ॥ तेवींपाठमोराहोतांरुक्मिणीकांत ॥ विघ्नअद्भुतवोढवलें ॥ २६ ॥ अपारसुटलाप्रभंजन ॥ धुळीनेंकोंडोनिभरलेंगगन ॥ अन्नपात्रींमृत्तिकाभरोन ॥ गेलींउडोनचोंहींकडे ॥ २७ ॥ कनातमंडपसुटोनिपडले ॥ सकळद्विजवरउठोनिगेले ॥ हेंकौतुकबोधल्यासिदाखविलें ॥ आश्चर्यवाटलेंतयासी ॥ २८ ॥ एकविमुखहोतांजगज्जीवन ॥ उपवासीउठलेसकळब्राह्मण ॥ जैसेंमुळापासोनितोडितांजीवन ॥ मगशाखाकोठूनयेतील ॥ २९ ॥ कींवरमायमंटपांतूनिरुसोनिजाय ॥ तेथेंवऱ्हाडिणीजेवितीलकाय ॥ कींवत्सासिपान्हानदेतांगाय ॥ तरीघरधनीकायदोहतील ॥ १३० ॥ तेवींविप्रमुखेंभोक्ताघननीळ ॥ ज्यासिहृदयींध्यातोजाश्वनीळ ॥ तोविमुखहोतांदीनदयाळ ॥ विघ्नतत्काळवोढवलें ॥ ३१ ॥ बोधल्यासिह्मणेवैकुंठनाथ ॥ ऐसेचदांभिकलोकसमस्त ॥ तुझाशुद्धदेखोनभावार्थ ॥ कदन्नआवडतमजलागीं ॥ ३२ ॥ म्यांमोडोनदुर्योधनाच्यावचना ॥ विदुराच्यागृहींखादल्याकण्या ॥ द्रौपदीसतीचेभाजीच्यापाना ॥ आलोंपाहुणाअर्धरात्रीं ॥ ३३ ॥ गोपाळांचेंउच्छिष्टजाण ॥ म्यांखादलेंनिजप्रीतीन ॥ ऋषिपत्न्यांनींआणिलेंअन्न ॥ तेंआवडीकरोनभक्षितसें ॥ ३४ ॥ गोपाळचाळवूनिघालितीकवळ ॥ तेमजवाटतीअतिनिर्मळ ॥ ऐसेंबोलतांदी

१ विचार. २ तूप, अन्नशुद्धि. ३ शंकर. ४ देह. ५ वारा. ६ आकाश. ७ तंबु. ८ शंकर. ९ जागें करून. १० अन्न, ग्रास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नदयाळ ॥ भक्तप्रेमळसंतोषला ॥ ३५॥ बोधलाह्मणेजगज्जीवना ॥ तुझापारनकळेकवणा ॥ ऐशारीतींबोलोनिवचना ॥
मिठीचरणींघातली ॥३६॥ चोखामेळावैष्णवभक्तप्रेमळ ॥ त्याचेंघृतभक्षीतघननीळ ॥ भिल्लाटीचींउच्छिष्टफळेंसकळ ॥
प्रेमआवडीनेंखातसे ॥ ३७ ॥ मगदेवाचीआज्ञाघेवोनिपाही ॥ परतोनिचालिलेधामणगांवीं ॥ मार्गींचालतांलवलां
हीं ॥ तोंओसाडअरण्यलागलें ॥ ३८ ॥ क्षुधेतृषेनेंव्यापिलेंजाण ॥ जवळनदिसेपुरपट्टण ॥ निजदासांचेंअंतरजाणू
न ॥ जगज्जीवनपातले ॥ ३९ ॥ इच्छामात्रेंतयेवेळा ॥ वाटेसिनिर्माणकेलामळा ॥ जेदृष्टीनेंदेखतांडोळां ॥ विश्रांती
वाटेपथिकां ॥ १४० ॥ आपणबनकरहोऊनिप्रीतीं ॥ मोटहांकीवैकुंठपती ॥ माळीणहोऊनिरुक्मिणीसती ॥ वाटपाह
तीभक्तांची ॥ ४१ ॥ हेंबोधल्यानेंदृष्टींदेखोन ॥ मळयांतजावयासिनघेचमन ॥ शीतउष्णदुःखसुखसमान ॥ मानोनि
भजनकरीतसे ॥ ४२ ॥ मगपांटीतघालोनिताकभाकरी ॥ कंदमूळफळेंघेतलींबरीं ॥ लवंलाहींघेऊनमस्तकावरी ॥ रु
क्मिणीपुढारीयेतसे ॥ ४३ ॥ बोधल्यासिह्मणेतेवेळा ॥ आमचावंलोनिजातोसिमळा ॥ माळीवाटपाहातबैसला ॥ दु
रूनितुजलादेखोनी ॥ ४४ ॥ तूंपंढरीचावारकरी ॥ आमुचाआश्रमपवित्रकरी ॥ क्षुधांतृषाअसलीजरी ॥ तरीसंकोच
अंतरींनधरावा ॥ ४५ ॥ बोधलाविस्मितजाहलाचित्तीं ॥ ह्मणेयास्थळींकधींचनव्हतीवस्ती ॥ मगपरतोनिजाऊनिम
ळयाप्रती ॥ घेतलीविश्रांतीक्षणभरी ॥ ४६ ॥ कंदफळेंखाऊनिकांहीं ॥ सत्वरचालिलेधामणगांवीं ॥ परतोनिमागेंपा
हातांपाही ॥ तोंकोणीचनपडेदृष्टीसी ॥ ४७ ॥ ह्मणेमीक्षुधितजाहलोंबहुत ॥ ह्मणोनिमावरचिपंढरीनाथ ॥ मंदिरींजा
ऊनवृत्तांत ॥ कांतेप्रतीसांगतसे ॥ ४८ ॥ एकेदिवसींबोधराज ॥ शेतींराखणबैसलेसहज ॥ ध्यानांतआणोनिअधोक्ष ॥ ५ ॥
ज ॥ नामस्मरणकरीतसे ॥ ४९ ॥ ह्मणेचाडियावरीमूठधरितीजेव्हां ॥ विश्वभाग्येंपिकोह्मणेतेव्हां ॥ तरीआतांकास

१ तूप. २ बोरें. ३ त्वरेनें. ४ भूक व तहान. ५ शहर किंवा खेडेगांव. ६ वाटसरूस. ७ बागवान, माळी. ८ थंड. ९ जलदीनें १० पाहिल्या वांचून, सोडून. ११ भूक व तहान

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

यापक्षीउडवा ॥ त्यांचियाजीवादुःखवाटे ॥ १५० ॥ ज्याचेंअन्नअसेलयेथ ॥ तेसुखेंखावोतयाक्षेत्रांत ॥ सर्वांभूतींरुक्मि
णीकांत ॥ बोलिलेसंतपुरातन ॥ ५१ ॥ मस्तकींगोफणगुंडाळोन ॥ अनुतापेंकरीतनामस्मरण ॥ तोंपांटींतभाकरघा
लोन ॥ कांतापातलीसत्वर ॥ ५२ ॥ भोजनघालोनिबोधल्यासी ॥ ममतायीबोलिलीकायत्यासी ॥ तुह्मीहुरंडावांटि
तांयाचकासी ॥ तरीपुढेंगतिकैसीहोईल ॥ ५३ ॥ दिवाणाचाफिटलापाहिजेसारा ॥ धान्यलागतेंआपुलेउदरा ॥ ह्म
णोनिमाझीगोष्टीभ्रतारा ॥ चित्तींधराआजिएक ॥ ५४ ॥ आपुल्याहातेंकणसेंजाण ॥ द्यालतरीविठोबाचीचआण ॥
ऐसेंबोलेनियांवचन ॥ कांतागेलीमंदिरा ॥ ५५ ॥ तोंकीर्तनकरीतआनंदेंसी ॥ यात्राचालिलीपंढरीसी ॥ तेंबोधल्या
नेंदेखोनिदृष्टीसी ॥ आनंदमानसींवाटला ॥ ५६ ॥ मगमाळयाखालींउतरोनसत्वर ॥ घातलासाष्टांगनमस्कार ॥ तों
पुढेंचालतहोतेद्विजवर ॥ तेह्मणतीकोमळअंतरबहुयाचें ॥ ५७ ॥ ब्राह्मणह्मणेरेविष्णुभक्ता ॥ तूंदुष्काळींआमुचाअन्न
दाता ॥ जरीकणसेंचारदेसीलआतां ॥ तरीसंतोषक्षुधितामजहोय ॥ ५८ ॥ ऐकोनिद्विजवराचीवाणी ॥ करुणाउपज
लीत्याचेमनीं ॥ ह्मणेमजकांतेनेंआणघालूनी ॥ घरासिगेलीआतांची ॥ ५९ ॥ तरीतुह्मींजाऊनिक्षेत्रांत ॥ कणसेंन्या
वींआपुलेहातें ॥ ऐसीऐकतांचिमात ॥ विप्रचित्तांतसंतोषला ॥ १६० ॥ लगबगेंमोडितांतिअवसरीं ॥ तोंमागोनआ
लेयात्रेकरी ॥ त्यांणींद्विजवराचेकरीं ॥ कणसेंदेखिलींतिधवां ॥ ६१ ॥ मगविठ्ठलनामेंगर्जोनसत्वरीं ॥ बोधल्यासिह्म
णतीतेअवसरीं ॥ आह्मासिकणसेंदेशीलजरी ॥ तरीकृपाश्रीहरीकरीलतुज ॥ ६२ ॥ महर्घतापडलीअतिकाठिन ॥ ती
नपायल्यांचीजाहलीधारण ॥ येसमयींकरिशीलअन्नदान ॥ तरीअगणितपुण्यहोईल ॥ ६३ ॥ वचनऐकोनिबोधल्या
न ॥ चित्तींवाटलेंसमाधान ॥ ह्मणेधन्यआजिचासुदिन ॥ संतसज्जनभेटले ॥ ६४ ॥ मगयात्रेकऱ्यांसतेअवसरीं ॥

१ कोवळे जोंधळे. २ पोटास. ३ पति. ४ शपथ. ५ हृदय. मस्तक. डोळे. भाषण. मन. पाय. हात. मांड्या. हा साष्टांग नमस्कार असें ह्मणतात.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 ह्मणेकणसेंमोडाआपुलेकरीं ॥ मजशपतघालोनिझडकरी ॥ कांतामंदिरींगेलीअसे ॥ ६५ ॥ यात्राहोतीदोनशत ॥ क्षेत्रा
 मार्जाशिरलेत्वरित ॥ जोंधळालुटोनिकेलाफस्त ॥ मगनिघालेसमस्तबाहेरी ॥ ६६ ॥ गांवांतकळलावृत्तांत ॥ कींबोधल्यानें
लुटविलेंशेत ॥ ऐकोनिनरनारीसमस्त ॥ आश्चर्यकरितीमानसीं ॥ ६७ ॥ एकह्मणतीअतिउदार ॥ एकह्मणतीदिवाळखोर ॥
एकह्मणतीत्याचासंसार ॥ रुक्मिणीवरचालवितो ॥ ६८ ॥ पुत्रकांतागांजितीलह्मणोन ॥ गांवांतनयेचपरतोन ॥ ध्या
नांतआणोनिजगज्जीवन ॥ सप्रेमभजनकरीतसे ॥ ६९ ॥ तंवज्येष्ठपुत्रानेंवृत्तांतऐकोनी ॥ पाहावयासिआलातयेक्षणी
तोंथोंटच्यांतांटासकणसेंदेखोनी ॥ उद्वेगमनींवाटला ॥ १७० ॥ चिंताक्रांतबैसलातेथ ॥ पित्यासिकळलेंसमस्त ॥ एक
अभंगउपदेशतेथ ॥ केलाअसेपुत्रासी ॥ ७१ ॥ ह्मणेऐकबापाजीवाचेंलक्षण ॥ हेंव्यर्थचिधरितोसिकृपणपण ॥ जैसी
मधुमक्षिकाउपवासीराहून ॥ रससांचोनठेविती ॥ ७२ ॥ मगपारधीयेऊनएकवेळ ॥ झाडोनघेततेंमोहळ ॥ मगम
क्षिकाकरितीतळमळ ॥ अरण्यामाजीजाऊनीं ॥ ७३ ॥ तेवींकृपणताधरोनिपोटीं ॥ लोककरितीसंसाररहाटी ॥ म
गआलियानागवणीचीपटी ॥ देतीशेवटींधनधान्य ॥ ७४ ॥ आजिसत्पात्रींवेंचिलेंशेत ॥ आणितूंकांमनांतचिंताक्रां
त ॥ ऐसेंबोलतांप्रेमळभक्त ॥ अनुतापचित्तांतठसावला ॥ ७५ ॥ हरिणीच्यापाडसाकारणें ॥ शिकवणेंनलागतीजै
सींकिरणें ॥ कींविहंगमींच्यापिल्यांसजाणे ॥ उडतांकष्टनहोती ॥ ७६ ॥ नातरीमीनांचियापिलियां ॥ सांगडबांधणें
कासया ॥ तेवींयमाजीसअनुतापव्हावया ॥ सायासनाहींलागले ॥ ७७ ॥ बोधल्यासकरोनिसाष्टांगनमन ॥ घरासि
नेलेंहातींधरून ॥ मगममतायीससकलवर्तमान ॥ जाहलेंतैसेंसांगीतलें ॥ ७८ ॥ यात्रेकऱ्यांसिशेतवांटिलें ॥ ऐकोनिकां
तेसिसमाधानवाटलें ॥ ह्मणेसत्पात्रींअन्नवांटिलें ॥ हेंसुकृतफळलेंमागीलकीं ॥ ७९ ॥ वाटलेंपत्नीससमाधान ॥ परीनिंदा

१ स्त्री. २ तोंडलेल्या देंटांस. ३ खंती, दिलगिरी. ४ वागणूक, वर्तनक्रम. ५ पक्षिणी. ६ मत्स्यांच्या. ७ पूर्वजन्मींचें पुंण्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

करितीकुटिळपिशुन ॥ ह्मणतीदिवाणसाराकोठून ॥ देईलआतांकळेना ॥ १८० ॥ तंवगांवांतपटीमांडिलीजाण ॥ वायदा
लिहिलासातहोन ॥ गांवकरीसमांपत्रकरून ॥ कायबोलतीतेंऐका ॥ ८१ ॥ पदरींनसतांकांहींताकत ॥ बोधल्यानेंलुट
वूनटाकिलेंशेत ॥ हरिनामगर्जोनिदिवसरात ॥ टाळकुटितनिजप्रेमें ॥ ८२ ॥ तरीत्याचेआधींमागावेहोन ॥ मगआप
णदेऊंसकळजन ॥ ऐसाविचारदृढकरून ॥ पत्रलिहूनपाठविलें ॥ ८३ ॥ यांतअंतरकरीलकोणीदुसरा ॥ तरीबोधल्या
चात्याणेंद्यावासारा ॥ मगहवालदारपाठवूनत्याचियाघरा ॥ ह्मणेहोनसत्वरादेईजे ॥ ८४ ॥ तीनहोनमंदिरींहोतेजा
ण ॥ चारनमिळतीकरितांप्रयत्न ॥ तंवगांवांतएकनागावूब्राह्मणीण ॥ सावकारिणहोतीकीं ॥ ८५ ॥ प्रहररात्रलोट
ल्यावरी ॥ बोधराजगेलेतिचियाघरीं ॥ ह्मणेकलांतरघेऊनअगोदरी ॥ होनचारसत्वरींमजद्यावे ॥ ८६ ॥ अवश्यह्मणे
सावकारीण ॥ प्रातःकाळींदेईनहोन ॥ मगबोधराजसत्वरउठोन ॥ निजमंदिरापातला ॥ ८७ ॥ द्रव्याचीचरवींभरो
निमोठी ॥ ठेविलीहोतीभुईचेपोटीं ॥ तेउकरोनियांउठाउठी ॥ चारहोनत्यांतूनकाढिले ॥ ८८ ॥ दुसरेदिवसींगांवांत
तीसपरस्परेंकळलीमात ॥ कींयात्रेकऱ्यांहातींशेत ॥ लुटविलेंनिश्चिततयानें ॥ ८९ ॥ नागाऊह्मणेंआपुलेचित्तीं ॥ होन
दीधलेपरतोनिनयेती ॥ व्याजाचीलालुचधरिलीनिश्चितीं ॥ तरीमुद्दलचिबुडेलदिसताहे ॥ १९० ॥ भुसाचीआशाधरि
तांजाण ॥ तरीवृषभखाऊनजातीलकण ॥ कींताकाचेंभाजनकरितांरक्षण ॥ तंवदुग्धचिनासोनजाईल ॥ ९१ ॥ प्रत्य
क्षआर्हाणाबोलतीजन ॥ अदमणासाठींजातोमण ॥ टक्याचीआशाधरितांजाण ॥ तोंसगळाचहोनबुडतसे ॥ ९२ ॥ अ
सोदुसरेदिवसींबोधलायेऊन ॥ नागाऊपासीमागेहोन ॥ तीह्मणेएकाचाभरंसाधरून ॥ तुह्मांसिवचनदीधलें ॥ ९३ ॥
परीतोआतांह्मणतोनाहीं ॥ यासिउपावआपुलाकायी ॥ आणिकतोंधामणगांवींपाही ॥ सावकारकोणीनसेकीं ॥ ९४ ॥

१ निंदक, चहाडखोर. २ एकोप्यासंबंधी ठरावपत्र. ३ व्याज, नफा. ४ हांडा. ५ कोंडा. ६ बैल. ७ डेरा, मडकें. ८ झण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वचनऐकोनिप्रेमळभक्त ॥ घरासिउठोनिआलात्वरित ॥ मनींहोऊनिचिंताक्रांत ॥ कायबोलतकांतेसी ॥ ९५ ॥ साऱ्या
साठींअडविलेंफार ॥ कोठेंहोननमिळतीसाचार ॥ तरीमीराळेरासिजाऊनिसत्वर ॥ पाहातोंसावकारएखादा ॥ ९६ ॥
ऐसेंबोलोनिकांतेप्रती ॥ बोधराजनिघालेसत्वरगती ॥ मार्गींचालतांएकांतीं ॥ श्रीहरीचेंभजनकरीतसे ॥ ९७ ॥ गो
विंदागोपाळाश्रीपती ॥ जगदुद्धाराअमूर्तमूर्ती ॥ सगुणस्वरूपाअक्षयचित्तीं ॥ भजनप्रीतीअसोंदे ॥ ९८ ॥ तंवइकडे
गांवांतबोभाटजाहला ॥ ह्मणतीबोधलापळोनिगेला ॥ द्वारींप्यादायेवोनिबैसला ॥ दारवंठाबंदकेलातयानें ॥ ९९ ॥
गुरेंवासरेंतेअवसरीं ॥ कोंडूनटाकिलींघरच्याघरीं ॥ कृशानुउदकभीतरीं ॥ जाऊंनेदीचसर्वथा ॥ २०० ॥ ऐसादुर्ज
नींअपायकरितां ॥ करुणाउपजलीपंढरीनाथा ॥ ह्मणेसंकटपडलेंमाझियाभक्ता ॥ तरीकार्यआतांसाधावें ॥ १ ॥ त्याणें
लुटविलेंनसतेंशेत ॥ तरीकांहोताऐसाआकांत ॥ मगअंत्यजरूपधरूनित्वरित ॥ रुक्मिणीकांतपातले ॥ २ ॥ गांवींचा
होताविठामाहार ॥ तैसेचजाहलेशार्ङ्गधर ॥ सातहोनघेऊनसत्वर ॥ चावडीसनेऊनदीधले ॥ ३ ॥ जोहारमायबापऐ
कावचन ॥ माणकोजीपाटलानेंपाठविलेहोन ॥ मगचौगुल्यांपासींदेऊन ॥ जगज्जीवनपरतले ॥ ४ ॥ गांवकरीयाणीं
करोनिपटी ॥ पोतेंपाठविलेंउठाउठी ॥ ह्मणतीबोधल्यासयासंकटीं ॥ द्रव्यकोठोनीमिळालें ॥ ५ ॥ दुसरेदिवसींप्रेम
ळभक्त ॥ होनघेऊनआलात्वरित ॥ तंवबोभाटनाहींगांवांत ॥ दिवाणांतपोतेंसरलिया ॥ ६ ॥ चौगुलेकायबोलतीवच
न ॥ तुह्मीमाह्माराहातेंपाठविलेहोन ॥ तेआह्मीसत्वरघेऊन ॥ पोतेंपाठविलेंराजद्वारीं ॥ ७ ॥ कांतापुत्रांसिपुसतांपा
ही ॥ तींह्मणतीठाउकेंआह्मासिनाहीं ॥ विठचामाहारासिलवलाहीं ॥ बोलावूनपुसतसे ॥ ८ ॥ तोह्मणेमाझियाघरीं
अन्न ॥ एकादिवसाचेंनाहींजाण ॥ आणिमीतुमचासाराकोठून ॥ देईननेऊनचावडीसी ॥ ९ ॥ ऐसीऐकोनिवचनोक्ती ॥

१ पाहारा करणारा शिपाई. २ घरांत जाण्यायेण्याचा मार्ग, (दरवाजा.) ३ विस्तव. ४ घरांत. ५ अतिशूद्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बोधलाउमजलाआपुलेचित्तीं ॥ ह्मणेमाझेंकटदेखोनप्रीतीं ॥ रुक्मिणीपतिपावले ॥२१०॥ कंठजाहलासेसद्गदित ॥ नेत्रींअश्रुपातवाहत ॥ ह्मणेदीनदयाळअनाथनाथ ॥ शिणलेतकींमजलागीं ॥ ११ ॥ क्षीराब्धिवासापंढरीराया ॥ त्वां अंत्यजवेषधरिलाकासया ॥ म्यांतरीसोडूप्रपंचमाया ॥ तुझियापायांजडलोंकीं ॥ १२ ॥ तुझेभजनाचेंलागलेंवेड ॥ मजलाल्लोकांचीनाहींचाड ॥ नाशवंतहेंशरीरजड ॥ याचेंहीकोडेंनधरींमी ॥१३॥ आतांसगुणरूपधरोनित्वरित ॥ मज भेटदेईसाक्षात ॥ बोधल्याचाशुद्धदेखोनिहेत ॥ पंढरीनाथपावले ॥१४॥ देवासिभेटोनित्याअवसरा ॥ ह्मणेकोठूनदीधलाआमुचासारा ॥ ऐसेंपुसतांभक्तचतुर ॥ अनाथसोयराकायबोले ॥ १५ ॥ तूंराळेरासगेलियावर ॥ गांवकऱ्यांनींअडविलेंफार ॥ मगनागाऊचेहोनचार ॥ चोरोनियांआणिले ॥ १६ ॥ आणिघरचेतीनघालोनत्यांत ॥ चावडीसनेऊनदीधलेसात ॥ ऐसेंबोलतांपंढरीनाथ ॥ बोधलाहांसलातेधवां ॥ १७ ॥ ह्मणेदीनदयाळापंढरीराया ॥ गरीबाचेहोनघेतलेकासया ॥ आतांत्याजआणिलेकाढोनियां ॥ तेनेऊनितिजलादेतोंमी ॥ १८ ॥ ऐकोनिबोलेजगज्जीवन ॥ तूं जरीदेशीलतिचेहोननेऊन ॥ परीगुप्तआहेतियेचेंठेवण ॥ तेंमीउडवीनक्षणमात्रें ॥ १९ ॥ बोधलामिठीघालीपायीं ॥ ह्मणेसमर्थापुढेंउपायाहीं ॥ आणिककौतुकधामणगांवीं ॥ शेषशायीकरीतसे ॥ २२० ॥ हुरडावांटिलायात्रेकऱ्यांस ॥ त्याथोंटच्याताटांसआलींकणसं ॥ रितींपेवेंअसतीबहुतदिवस ॥ धान्येंसंपूर्णभरलींतीं ॥ २१ ॥ हेंकौतुकदृष्टीसदेखोन ॥ आश्चर्यकरितीसकळजन ॥ ह्मणतीबोधल्यासजगज्जीवन ॥ प्रसन्नजाहलावाटतसे ॥ २२ ॥ जोदीनदयाळरुक्मिणीकांत ॥ निजभक्तांचीवाढवीकीर्त ॥ महीपतीतयाचामुद्रांकित ॥ गुणवर्णितसंतांचे ॥ २३ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ त्रिपंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ अध्याय ॥ ५४ ॥ ओव्या ॥ २२४ ॥

१ आसव. २ सर. ३ माहार. ४ आवड. ५ इच्छा. ६ शेषावर निजणारा ह्मणून शेषशायी हें नांव (विष्णु.)

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीराधारमणायनमः ॥ जयजयविश्वव्यापकारुक्मिणीपती ॥ तूंचिमाझीधनसंपत्ती ॥ माता पिताबंधुनिश्चितीं ॥ तुजविणविश्रांतीअसेना ॥ १ ॥ तूंचिमाझेंअध्यात्मज्ञान ॥ तूंचिमाझेंश्रवणमनन ॥ तूंचिमाझेंगीर्वाणभाषण ॥ प्राकृतबोलणतूंचिमाझें ॥ २ ॥ तूंचिमाझीचातुर्यकळा ॥ वक्तावदविताघनसांवळा ॥ तूंचिमाझाप्रेमजिव्हाळा ॥ दीनदयाळाश्रीपती ॥ ३ ॥ तूंचिमाझाअचुकलेखक ॥ विशालबुद्धिवैकुंठनायक ॥ तूंचिमाझेंअक्षयसुख ॥ सद्गुरुतारकतूंचिमाझा ॥ ४ ॥ तूंचिमाझाप्रेमळश्रोता ॥ समर्यीवचनआठवदेता ॥ तुझीकृपाअसतांअनंता ॥ लोभममताबाधेना ॥ ५ ॥ तुवांकृपाकेलियाश्रीपती ॥ अज्ञानतेचिज्ञानीहोती ॥ जैसीतमेंदाटलियाराती ॥ उगवेगभस्तीअवचितां ॥ ६ ॥ मगअंधारचिहोयप्रकाशे ॥ तेथेंसंशयकोणताअसे ॥ तुझीकृपाहोतांतैसें ॥ अज्ञाननिरसेमुळींहूनी ॥ ७ ॥ नातरीलोहासपरीसझगटे ॥ मगत्याचीकाळिमाराहीलकोठें ॥ कींवोहळावरीगंगालोटे ॥ मगतोहोयपवित्रजैसा ॥ ८ ॥ तेवींतूंकृपादृष्टीजयातं ॥ अवलोकिसीलआपुलेमतं ॥ तरीत्याचीकीर्तीत्रिभुवनांत ॥ होईलनिश्चितनिरुपम ॥ ९ ॥ जेप्रेमळभक्तअतिविरक्त ॥ क्षणमात्रतुजनविसरत ॥ त्यासंतांचींचरित्रेंअघटित ॥ लिहिवीनिश्चितममहस्तें ॥ १० ॥ मागीलअध्ययाचेशेवटींजाण ॥ कौतुकदाखविजगज्जीवन ॥ रित्यापेंवांतधान्यघालून ॥ ठेविलींभरूनक्षणमात्रें ॥ ११ ॥ आणिशेतवांटिलेंयात्रेकर्‍यांस ॥ मगथोंटच्याताटांसिआलींकणसं ॥ हेंकौतुकदेखोनिविशेष ॥ आश्चर्यसर्वांसवाटलें ॥ १२ ॥ ह्मणतीबोधलाईश्वरअवतार ॥ यासनह्मणावेंप्राकृतनर ॥ आह्मीअज्ञानअतिपामर ॥ छळिलेंसर्वांसवाटलें ॥ ... चारतयासी ॥ १३ ॥ रितींपेवेंभरलींहोतीं ॥ बोधल्यानेंलुटविलींविप्रांहातीं ॥ जैसींमोगर्‍यासिपुष्पेंयेती ॥ तोविलासियांप्रतींदेतसे ॥ १४ ॥ कांकमळणींतमकरंदआलाजाण ॥ तोवांटोनिदेतीमिलिंदांकारण ॥ कींमेघामाजीसाचलेंजीवन ॥

१ संस्कृत. २ बोलणारा व बोलाविणारा. ३ अंधकारानें. ४ सूर्य. ५ लोखंडाला. ६ रिकाम्या. ७ प्रकृतीनें किंवा मायेनें वेष्टित मनुष्य. ८ खरोखर. ९ ब्राह्मण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तोंदेतरिचवोनपृथ्वीवरी ॥ १५ ॥ तेवींप्रसन्नहोऊनिहृषीकेशी ॥ धान्यदीधलेंबोधल्यासी ॥ तेणेंउदासहोऊनिमानसीं ॥
वांटिलेंविप्रांसींतत्काळ ॥ १६ ॥ थोंटच्याताटांसआलींकणसें ॥ तींपाहावयासयेतीमाणसें ॥ कीर्तीप्रकटलीदेशोदेशें ॥
ह्मणतीमहिमाविशेषसंतांचा ॥ १७ ॥ एकेदिवसींप्रेमळभक्त ॥ बैसलाहोताशेतराखित ॥ तोंहांसीकुणबीणअकस्मात ॥
चरणीलागतयेऊनी ॥ १८ ॥ ह्मणालहांसीकवणाचीकवण ॥ तरीसविस्तरऐकाअनुसंधान ॥ दोनकोशधामणगांवा
हून ॥ राळेरासग्रामअसे ॥ १९ ॥ तेथीलपाटीलमोकदमखरा ॥ तोबोधल्याचासखासासरा ॥ तोनिमोनगेलिया
मोक्षघरां ॥ ममताईमाहेराअंतरली ॥ २० ॥ बंधूदोघेहोतेदुर्बुद्धी ॥ तेसमाचारनघेतीकधीं ॥ जयांसिअहंकाराची
व्याधी ॥ जोडलीत्रिशुद्धीनिजकर्में ॥ २१ ॥ हांसीकुणबीणत्यांचेघरीं ॥ परमभाविकप्रेमळअंतरीं ॥ प्रपंचधंदासा
रितांकरीं ॥ भजनहरीचेंसर्वदा ॥ २२ ॥ राळेरासआणिधामणगांव ॥ दोहींचीएकवटआहेशींव ॥ मेरेसिशेतभक्त
वैष्णव ॥ धरिलेंहोतेंएकदा ॥ २३ ॥ राळेरासकरजेअभक्त ॥ त्यांचेंयांचेंशेजारींशेत ॥ त्यांणींहांसीकुणबीणस्वतंत्र ॥
शेतींराखणठेविली ॥ २४ ॥ माळावरीबैसोनिनित्य ॥ बोधलाहरीचेगुणवर्णित ॥ हांसीकुणबीणयेऊनितेथ ॥ श्रवण
करीतनिजप्रीतीं ॥ २५ ॥ तिणेंएकदादृढधरूनिपाय ॥ प्रेमळभक्तासिबोलेकाय ॥ जेणेंमाझेंसंसारींसार्थकहोय ॥
तैसाउपायसांगावा ॥ २६ ॥ ऐकोनिबोधलामानसींह्मण ॥ इचेंतंवशरीरपराधीन ॥ जपतपध्यानतीर्थाटनें ॥
नयेघडोनसर्वथा ॥ २७ ॥ दासीदासकांताजाण ॥ पराधीनसर्वदायांचेंजिण ॥ गाईवृषभअश्ववहन ॥ तयांसीसमा
नह्मणावी ॥ २८ ॥ दुष्कृताचावांटापरम ॥ ह्मणूनिहोतोयांचाजन्म ॥ कांहींएकनित्यनेम ॥ यांजकारणेंघडेना ॥ २९ ॥
आतांउगेंचधरितांमौन ॥ तरीइच्याप्रेमाचेंहोईलखंडन ॥ ऐसेंह्मणोनिवैष्णवजन ॥ कायबोलततेधवां ॥ ३० ॥ एकहां

१ मृत्यु पावल्यावर. २ वैकुंठास. ३ तीर्थयात्रा. ४ बायको. ५ बैल. ६ घोडा. ७ पातकांचा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सेमाझेंवचन ॥ तुवांआह्मांसिपुसिलेंसाधन ॥ तरीसंसारधंदाराहाटतांजाण ॥ करावेंचिंतनश्रीहरीचें ॥ ३१ ॥ आणिपं
धरादिवसींएकादशी ॥ तुवांराहावेंउपवासी ॥ निशाकाळींकीर्तनासी ॥ धांमणगांवासीयेईजे ॥ ३२ ॥ चारप्रहरजाह
लियाश्रवण ॥ प्रातःकाळींकरावेंगमन ॥ आपुल्याधन्यासिपुसोन ॥ चालवीनेमआपुला ॥ ३३ ॥ तरीतुझेंसार्थकहोई
लपाहे ॥ पांडुरंगाचेजोडतीलपाये ॥ सगुणस्वरूपाचीभेटहोये ॥ येथेंसंशयेनधरावा ॥ ३४ ॥ वचनऐकोनितेसमयीं ॥
हांसीनेंमिठीघातलीपायीं ॥ ह्मणेएकादशीसधांमणगांवीं ॥ येतजाईननिश्चित ॥ ३५ ॥ ज्यासिजोअधिकारनिश्चित ॥
तैसेंचसाधनसांगतीसंत ॥ जैसासद्वैद्यध्यानासिरोगआणित ॥ मगऔषधदेतत्यारीतीं ॥ ३६ ॥ कींनृपवैरभद्रींबैसोनि
जाणा ॥ अधिकारसांगतप्रधाना ॥ कींगृहचारिणीधरूनिशाहाणपणा ॥ वागवीतसुनाआपुल्या ॥ ३७ ॥ नातरीविवे
कीसावकारजाण ॥ उदीमपाहूनदेतसेऋण ॥ कींचतुरवक्तासभादेखोन ॥ करीतकीर्तनतैसेंची ॥ ३८ ॥ कांमृदुकठिण
पाषाणजाणती ॥ मगपाथरवटतैशाचटांक्याहाणिती ॥ तेवींआधींयोग्यतासंतपाहाती ॥ मगसाधनसांगतीतैसेंची
॥ ३९ ॥ असोबोधल्याचीवचनोक्ती ॥ हांसीनेंदृढधरिलीचित्तीं ॥ मगसंसारधंदाकरितांप्रीतीं ॥ नामस्मरणकरीतसे
॥ ४० ॥ हरिदिनींचेदिवसींउठोनिपाही ॥ कार्यकरावेंलवलाहीं ॥ मगधन्यासिपुसोनिधांमणगांवीं ॥ कीर्तनसमयीं
जातसे ॥ ४१ ॥ बोधल्याचीकथाप्रेमळबहुत ॥ अज्ञानासिकळेअर्न्वयार्थ ॥ भोंवरगांवींचेलोकसमस्त ॥ श्रवणासियेती
निजप्रीतीं ॥ ४२ ॥ नरनारीयेतीबहुतजन ॥ वाडयांतहोतसेअडचण ॥ मगचोहाटींउभाराहून ॥ सप्रेमकीर्तनकरीतसे
॥ ४३॥ दोनरांजणपाणीभरून ॥ हांसीठेवीतलोकांकारण ॥ आपुलेहातेंखरांटाघेऊन ॥ जागानिर्मळकरीतसे ॥ ४४॥
आकाशतेंचिमंडपाकार ॥ पृथ्वीहेंचिआसनथोर ॥ बोधल्याचाकीर्तनगजर ॥ ऐकोनिसुरवरआनंदती ॥ ४५॥ तंवएके

१ वर्तन करीत असतां. २ रात्रि. ३ राजा सिंहासनारूढ होऊन. ४ सासू, घरधनीन. ५ विचारी, शाहाणा. ६ कर्ज. ७ एकादशीचे दिवसीं. ८ शब्दशः अर्थ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दिनींहरिदिनीसी ॥ राळेरासकरकीर्तनासी ॥ येतअसतांग्रामापासी ॥ तंवडसलाएकासीमहासर्प ॥ ४६ ॥ तत्काळचि
झेंडूयेऊन ॥ तेथेंचत्याचागेलाप्राण ॥ समागमेंहोतेत्यांणींउचलून ॥ कीर्तनांतआणूनबैसविला ॥ ४७ ॥ एकमेकांसि
विचारकरिती ॥ कळोंनद्यावेंकवणाप्रती ॥ श्रीरामनामाचीबहुतख्याती ॥ बोधलालोकांसिसांगतसे ॥ ४८ ॥ ह्मणती
रामनामेंप्रल्हादभक्त ॥ टाकितांनजळेअग्निआंत ॥ विषतेंहीहोतेंअमृत ॥ ऐशीप्रचीतमानाची ॥ ४९ ॥ तरीत्याजव
रीनिमित्तठेवूंआपण ॥ कीर्तनांतगेलेयाचेप्राण ॥ हेंउठविसीलतरीसत्यजाण ॥ यथार्थमहिमाननामाचें ॥ ५० ॥ ऐसें
बोलोनितेदुर्मती ॥ उगेचनिवांतश्रवणकरिती ॥ तंवबोधराजसांगेलोकांप्रती ॥ अनुपमख्यातीनामाची ॥ ५१ ॥ ऐ
काऐकासकळजन ॥ नामफुकाचेंअतिपावनें ॥ गोडतरीअमृताहून ॥ मीप्रचीतपाहूनबोलतों ॥ ५२ ॥ तरीसकळींपि
टोनिटाळी ॥ विठ्ठलनामेंद्याआरोळी ॥ वचनऐकोनितेवेळीं ॥ श्रोतेगर्जतीनिजप्रेमें ॥ ५३ ॥ ज्याणींकीर्तनांतबसविलें
होतेंप्रेत ॥ तेबोधल्यासिकायबोलत ॥ आह्मापुढेंबैसलाहागृहस्थ ॥ नाहींउच्चारीतहरिनाम ॥ ५४ ॥ सर्पडसोनिपा
वलामृत्य ॥ हेंबोधल्यासनाहींश्रुत ॥ मगमृतप्रेतासप्रेमळभक्त ॥ कायबोलततेंऐका ॥ ५५ ॥ बापायेऊनिनरदेहा
स ॥ हरिभजनाचानकरीआळस ॥ आतांटाळियापिटोनिउल्हासें ॥ मुखेंनामघोषउच्चारीं ॥ ५६ ॥ बोधल्याचियाकी
र्तनांत ॥ लीलानाटकीपंढरीनाथ ॥ ऐकोनिनिजभक्ताचीमात ॥ विचारकरितमानसीं ॥ ५७ ॥ ह्मणेयाचेतंवगेलेआहे
तप्राण ॥ हेंश्रुतनाहींबोधल्याकारण ॥ नामउच्चारनकरितांयेण ॥ विक्षेपमनपावेलकीं ॥ ५८ ॥ मीसन्निधअसतांपां
डुरंग ॥ वितळोनिजाईलकीर्तनरंग ॥ मगयमधर्मासिरुक्मिणीरंग ॥ निजमुखेंसांगेतेधवां ॥ ५९ ॥ कीर्तनांतप्रेतबैसलें
जाण ॥ याचेसत्वरपरतवीप्राण ॥ ऐकोनिकृपासिंधूचेंवचन ॥ अवश्यह्मणेश्राद्धदेव ॥ ६० ॥ तोंप्रेतउठोनित्यावेळीं ॥

१ रक्ताची गुळणी, फेंस. २ मोक्षदायक. ३ साक्षात्कार, अनुभव. ४ माहीत. ५ आनंदाने. ६ त्रास. ७ जवळ. ८ मृत्यूस. ९ यमधर्म.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नामघोषेंपिटिलीटाळी ॥ बोधल्याचेचरणकमळीं ॥ मिठीघातलीतयानें ॥ ६१ ॥ मगत्याचेसांगातीउठोनित्वरित ॥ बोध
ल्याससांगतीवृत्तांत ॥ ऐसीश्रोतयानींऐकतांमात ॥ वाटलेंआश्चर्यसकळांसी ॥ ६२ ॥ जयजयकारेंपिटोनिटाळी ॥
आनंदलीभक्तमंडळी ॥ बोधल्याचेनेत्रकमळीं ॥ अश्रुपातलोटले ॥ ६३ ॥ ह्मणेदेवाधिदेवाभक्तवत्सला ॥ मजअना
थाचीपाळिसीलीला ॥ मजवृत्तांतअसताकळला ॥ तरीविक्षेपवाटलाअसताकीं ॥ ६४ ॥ जैसीमक्षिकाअन्नांतपडतां ॥
तीबाळकासिनसांगतांकाढीमाता ॥ तेवींआमुचाआघातरुक्मिणीकांता ॥ तूंनसांगतांनिवारिसी ॥ ६५ ॥ यापरीआ
ळंवूनिकमळापती ॥ मगउजळिलीमंगळारती ॥ ओंवाळूनिश्रीरुक्मिणीपती ॥ नमस्कारप्रीतींघातला ॥ ६६ ॥ धाम
णगांवींचेनारीनर ॥ ह्मणतीबोधलाईश्वरीअवतार ॥ करावयाजनाचाउद्धार ॥ आलासाचारमृत्युलोकीं ॥ ६७ ॥ प्रेत
उठविलेंकीर्तनांत ॥ हेंदृष्टीसदेखोनियांचरित ॥ हांसीचाप्रेमभावार्थ ॥ दिवसेंदिवसवाढला ॥ ६८ ॥ पंधरादिवसीं
धामणगांवांत ॥ येऊनिकीर्तनश्रवणकरित ॥ ऐसेंतीनवर्षेंपर्यंत ॥ लोटतांअरिष्टवोढवलें ॥ ६९ ॥ साधकींकरितांईश्व
रभजन ॥ त्यांजवळीयेतसेमहाविघ्न ॥ जेवींदुग्धेंभरूनिठेवितांभाजनें ॥ मार्जारलवंडूंपाहातसे ॥ ७० ॥ कुपथ्यापासीं
रोगसकळ ॥ कींदेहासअखंडजपतोकाळ ॥ कींयोगियासिसिद्धिनिश्चळ ॥ गोवूंपाहातीएकांतीं ॥ ७१ ॥ नातरीद्रव्या
पासींजपतोतस्कर ॥ कींश्वापदांसिधरूंपाहेव्याघ्र ॥ कींनिशापतीसीसमग्र ॥ राहूआडवायेऊंपाहे ॥ ७२ ॥ तेवींईश्वर
भक्तीकरितांजाण ॥ संचरूंपाहेअवचितविघ्न ॥ असोमागीलअनुसंधान ॥ परिसासज्जननिजप्रीतीं ॥ ७३ ॥ बोध
ल्याचाअनुग्रहघेतांजाण ॥ दासीसजाहलेंपूर्णज्ञान ॥ एकादशीसऐकोनिकीर्तन ॥ करीगमनएकांतीं ॥ ७४ ॥ नामीं
बैसलाविश्वास ॥ तोनिरंतरलागलानिदिध्यास ॥ ऐसींलोटलींतीनवर्षेंसावकाश ॥ तोंपातलेंभक्तीसमहाविघ्न ॥ ७५ ॥

---

१ वार्ता. २ प्राणी. ३ विघ्न. ४ प्रार्थनाकरून. ५ खरोखर. ६ संकट. ७ पात्र. ८ मांजर. ९ मृत्यु. १० चोर. ११ हरिण. डुकर. कुत्री. इत्यादि. प्राणी. १२ चंद्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ममताईचेबंधुदोघेजण ॥ विभक्तराहूंपाहातीजाण ॥ ह्मणोनिहांसीकुणबीण ॥ विकरींघातलीतयांनीं ॥ ७६ ॥ परस्प
रेंगांवांतजाहलेंश्रुत ॥ तिचेकर्णीप्रकटलीमात ॥ मगमानसींझालीचिंताक्रांत ॥ ह्मणेकर्मबळवंतमाझेंकीं ॥ ७७ ॥ मग
धंदासारूनिलवलाहीं ॥ सत्वरआलीधामणगावीं ॥ बोधल्याचेएकांतसमयीं ॥ चरणदोनीधरियेले ॥ ७८ ॥ कंठजा
हलासद्गदित ॥ नेत्रींवाहतीअश्रुपात ॥ हेअवस्थादेखोनिप्रेमळभक्त ॥ कायबोलततियेसी ॥ ७९ ॥ हांसेनवलवाटतें
चित्ता ॥ विपरीतदेखोनितुझीअवस्था ॥ कायउद्भवलीचित्तींचिंता ॥ तेतत्वतांमजसांगे ॥ ८० ॥ हांसीह्मणेगाबोधरा
या ॥ मायबापाजिवलगसखया ॥ आजपासोनितुझियापायां ॥ मीअंतरलेंनिश्चित ॥ ८१ ॥ धन्यानींविकरींघातलेंजा
ण ॥ गिऱ्हाईकहीआलेंदुरून ॥ आतांमाझेश्रवणींतुमचेंकीर्तन ॥ पडेलकोठूनस्वामिया ॥ ८२ ॥ बोधलाह्मणेऐकमाते
देहाचेंप्रारब्धअसेलजेथें ॥ जाणेलागेलनिश्चयेंतेथें ॥ तूंकासयाखंतींकरितेसी ॥ ८३ ॥ तरंगेसागराआतौतें ॥ तेवाहात
फिरतीसभोंवते ॥ परीजीवनाविणनाहींतते ॥ दृष्टीसदिसतेंसकळांच्या ॥ ८४ ॥ तेवींआनंदसागरश्रीपांडुरंग ॥ आ
पणजीवत्याचेतरंग ॥ ऐसेंजाणतूंअंतरंगें ॥ मगचित्तींवियोगबाधेना ॥ ८५ ॥ यावरीहांसीउत्तरदेत ॥ मीयासाठीं
नाहींरडत ॥ शिंवेशेजारींतुमचीसंगत ॥ तेमजनिश्चितींअंतरली ॥ ८६ ॥ इतुकेंबोलोनियांजाण ॥ तेथेंचपडलीमूर्च्छा
येऊन ॥ मागुतीदेहासिसांवरून ॥ गृहांतजाऊनबोलत ॥ ८७ ॥ ममताईह्मणेतेअवसरा ॥ तुमचेबंधूनींमजघातलें
विकरां ॥ ह्मणोनिआजिदुःखसागरा ॥ मीपडिलेंजननीये ॥ ८८ ॥ तरीतुह्मीउठेऊनिआपुलेघरीं ॥ द्रव्यघालात्याचेप
दरीं ॥ ऐसेंह्मणोनितेअवसरीं ॥ पायांवरीलोटली ॥ ८९ ॥ दासीचीअवस्थादेखोनिनयनीं ॥ करुणाउपजलीममता
ईचेमनीं ॥ ह्मणेकांहींतरीउपायकरूनी ॥ इजलागोनीसोडवावें ॥ ९० ॥ आपुल्यासिद्रव्यनमिळेजाण ॥ तरीधांमण

१ नशीब. २ काळजी. ३ लाटा. ४ उदक. ५ समुद्र. ६ लहरी. ७ मन. ८ समुद्र. ९ नेत्र.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गांवींविकावेंवतन ॥ परीअनाथासिसोडवण ॥ विचारमनींदृढकेला ॥ ९१ ॥ बोधराजयेऊनिमंदिरीं ॥ हांसीसअभयदीधलेंकरीं ॥ ह्मणेतूंगृहासजाईपुढारी ॥ मागूनिसत्वरींमीयेतों ॥ ९२ ॥ वचनऐकूनियांऐसें ॥ तिजलासमाधानझालेंकैसें ॥ जेवींमृतप्रेतावरीसायासें ॥ अमृतवर्षेजापरी ॥ ९३ ॥ कींवणवालागतांवर्षलाघन ॥ तेंविझोनिजायकृशान ॥ मगतरुवरांसिशीतळपण ॥ नवेपल्लवफुटती ॥ ९४ ॥ तेवींबोधल्याचेंअभयवचन ॥ ऐकूनिदासीसवाटलेंसमाधान ॥ मगराळेरासींउठोन ॥ गेलीअसेसत्वर ॥ ९५ ॥ मगबोधराजमागूनिजाऊनितेथ ॥ आपुल्यामेहुण्यांसिकायबोलत ॥ तुह्मीदासीसविकतांनिश्चित ॥ ऐकिलीमातंपरस्परें ॥ ९६ ॥ ऐसेंचित्तींअसेलजरी ॥ तरीहेद्यावीआमुचेघरीं ॥ मोलसांगालजेंनिर्धारीं ॥ तेंदेऊंसत्वरींपाठवूनी ॥ ९७ ॥ बोधल्याचेंवचनपडलांकांनीं ॥ दुर्बुद्धिसंतप्तझालेमनीं ॥ ह्मणतीआमुचेंमनुष्यतुमचेसदनीं ॥ आह्मीनदेऊंचसर्वथा ॥ ९८ ॥ शिवेशेजारींवतनदार ॥ पुरातनसोयरेनिर्धार ॥ आणिकाफुकटदेऊंपर ॥ नदेऊंसाचारतुह्मांसीं ॥ ९९ ॥ ऐकूनिअभिमानाचीमात ॥ निवांतराहिलाविष्णुभक्त ॥ हांसीआक्रंदतमंदिरांत ॥ ह्मणेकर्मविचित्रपैंमाझें ॥ १०० ॥ मगबोधराजह्मणेहांसीकारण ॥ सोयऱ्यांदेखतांबोलेवचन ॥ मीविठोबाचीविनंतीकरून ॥ तुजकारणआणवितों ॥ १ ॥ ऐसेंह्मणूनितेसमयीं ॥ परतूनिआलेधामणगांवीं ॥ कांतेपासीवृत्तांत सर्वही ॥ सांगीतलातेधवां ॥ २ ॥ इकडेराळेरासीपिशुनांसी ॥ परमभयउपजलेंमानसीं ॥ ह्मणेबोधलासांगोनिविठोबासी ॥ मारवीलहांसीसनिश्चयें ॥ ३ ॥ येथेंबोलोनिगेलापणं ॥ तेंकदापिनव्हेअसत्यवचन ॥ तरीआतांसत्वरग्राहिकआणोन ॥ इजकारणवोपावें ॥ ४ ॥ तोंपरग्रामींचेघेणार ॥ तेचिदिवसींआलेसत्वर ॥ हांसीआणितिचीकुमरं ॥ विकतघेतलीतयांनीं ॥ ५ ॥ पंचवीसहोनदेऊनिखरित ॥ लिहूनिघेतलेंखरेदीखत ॥ हांसीकुणबीणआक्रंदत ॥ ह्मणेपंढरीनाथ

१ मेघ, पर्जन्य. २ अग्नि. ३ वृक्ष. ४ अंकुर. ५ गोष्ट. ६ घरीं. ७ प्रतिज्ञाकरून. ८ कन्या.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नयेकीं ॥ ६ ॥ दीनदयाळापंढरीनाथा ॥ माझ्याधांवण्याधांवआतां ॥ सांडोनियांदेहममता ॥ प्राणत्वतांदेईनमी ॥७॥
॥ ४ ॥ बोधलासांगोनिगेलामज ॥ कींविठोबायेऊनिनेईलतुज ॥ तरीत्याचेंवचनअसत्यआज ॥ होईलऐसेंवाटतें ॥ ८ ॥ जा
णोनिदासांचेंमनोगतं ॥ तत्काळपंढरीनाथआलेतेथ ॥ विप्रवेषघेऊनित्वरित ॥ प्रकटलाअनंतत्याठायां ॥ ९ ॥ पिशुना ॥५४॥
चेअंगणीसहज ॥ उभेठाकलेअधोक्षज ॥ हांसिसिह्मणतीतुज ॥ बोधराजेंबोलाविलें ॥ ११० ॥ ऐसीऐकोनिविप्रवाणी ॥
दासीसहर्षवाटलामनीं ॥ तिणेंब्राह्मणाचेचरणीं ॥ मिठीघातलीनिजप्रेमें ॥ ११ ॥ कौतुकवर्तलेंअतिअद्भुत ॥ तेंसाद
रऐकाभाविकभक्त ॥ हांसीसहितपंढरीनाथ ॥ झालेगुप्ततेठायीं ॥ १२ ॥ हांसीचीकन्याहोतीधाकुटी ॥ तेहीपाठविली
वैकुंठीं ॥ सोयरेकौतुकदेखोनिदृष्टीं ॥ आश्चर्यकरितीतेधवां ॥ १३ ॥ ह्मणतीआश्चर्यजाहलेंमोठें ॥ कुडीसहितगेलीकोठें
गिऱ्हाईकह्मणतीप्रेक्तनखोटें ॥ आमुचेंदिसोनआलेंकीं ॥ १४ ॥ आह्मीग्रामींनेलीनसतांकुणबीण ॥ येथेंचअदृश्यजा
हलीजाण ॥ तरीपरतूनिद्यावेजीआमुचेहोन ॥ ऐसेंवचनबोलिले ॥ १५ ॥ पिशुनह्मणतीतेअवसरीं ॥ खरेदीखतदीधलें
करीं ॥ आतांलांझीआमुचेपदरीं ॥ राहिलानाहींसर्वथा ॥ १६ ॥ मूळआलाहोताजोब्राह्मण ॥ बोधल्याचेंनामसांगीतलें
त्यान ॥ तरीतुह्मीधामणगावांसजाऊन ॥ वादसांगणंतयासी ॥ १७ ॥ यावरीगिऱ्हाईककायबोलत ॥ परस्परेंआह्मी
ऐकिलीमातं ॥ कींबोधलातुझापासीविकत ॥ कुणबीणमागतहोताकीं ॥ १८ ॥ तुह्मीदीधलीनाहींत्याजला ॥ मगतो
जातेसमर्यींकायबोलिला ॥ कींविठोबायेऊनइजला ॥ घेऊनिजाईलनिश्चयें ॥ १९ ॥ तरीतैसेंचघडोनिआलेंपाहीं ॥
त्याकडेआमुचावादनाहीं ॥ तुह्मीहोनलवलाहीं ॥ टाकूनिद्यावेआमुचे ॥ १२० ॥ ऐसापरस्परेंजाणा ॥ वादलागला
तिघांजणां ॥ भक्तकैवारीपंढरीराणा ॥ चरित्रवाढवीदासांचें ॥ २१ ॥ आणिकचरित्रअद्भुतदेख ॥ सादरपरिसाभक्त ॥ ४ ॥

---

१ मनांतील भाव. २ चमत्कार. ३ देहासुद्धां. ४ दैंव. ५ दुष्ट, चहाडखोर. ६ वाद, वायदा. ७ खबर, वर्तमान.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भाविक ॥ धांमणगावांतअंत्यजएक ॥ असेचाळकबहुभाषीतो ॥ २२ ॥ तोबोधल्यासिह्मणेएकांतीं ॥ उपदेशद्यावा
जीमजप्रती ॥ तुमचेचरणींलागलीप्रीती ॥ ह्मणोनिविनंतीकरीतसें ॥ २३ ॥ ऐकूनिबोलेप्रेमळभक्त ॥ मीअनुग्रहको
णासिनाहींदेत ॥ जरीआज्ञाकरीलपंढरीनाथ ॥ तरीपुसेनत्यातंएकांतीं ॥ २४ ॥ मगध्यानींआणूनिवैकुंठनायक ॥
ह्मणेदेवाविनंतीऐकएक ॥ आपुलेग्रामींचाअनामिक ॥ दिसतोभाविकमजलागीं ॥ २५ ॥ तोबहुतदिवसमजविनवि
त ॥ ह्मणेमाझेमस्तकींठेवीहात ॥ जरीआज्ञादेसीलमजनिश्चित ॥ तरीअंगिकारत्याचाकरीनमी ॥ २६ ॥ ऐकूनिबो
धल्याचेंवचन ॥ कायबोलतीजगज्जीवन ॥ नीचयातीसउपदेशजाण ॥ सर्वथाआपणनद्यावा ॥ २७ ॥ जोअखंडअवि
श्वासीमनीं ॥ आणिअनास्थाधरीशास्त्रश्रवणीं ॥ तरीसद्गुरूनेंतयालागोनी ॥ अनुग्रहसर्वथानद्यावा ॥ २८ ॥ पुस्त
काचीफळश्रुतीपाहून ॥ कामनिककरीआवर्त्तन ॥ ऐशाशिष्यासिसद्गुरून ॥ उपदेशसर्वथानद्यावा ॥ २९ ॥ जोमनीं
धरूनिचावटी ॥ वाचकांसिखोदूनपुसेगोष्टी ॥ त्यासिसद्गुरूनेंकृपादृष्टीं ॥ पाहोंनयेचीसर्वथा ॥ १३० ॥ शिष्यअसावा
सज्ञानविरक्त ॥ नातरीभाविकप्रेमळभक्त ॥ ऐसेंबोधल्यासिरुक्मिणीकांत ॥ असेसांगतएकांतीं ॥ ३१ ॥ हातोंअना
मिकहीनयाती ॥ परमनष्टचांडाळकुमती ॥ हेंतुजसत्यनवाटेचित्तीं ॥ तरीपाहेप्रचीतीसत्वर ॥ ३२ ॥ तुझेखळयांती
लरासपूजा ॥ उदयीकआहेभक्तराजा ॥ अनामिकासबोलावूनतुझा ॥ वृषभमारवीत्याहातीं ॥ ३३ ॥ तयासिदाख
वीऐशीप्रीती ॥ हेंवृत्तनसांगेकोणाप्रती ॥ जरीहीगोष्टलोपलीतयाहातीं ॥ तरीउपदेशतयाप्रतीदेइजे ॥ ३४ ॥ बोध
लाह्मणेपंढरीनाथा ॥ मीहिंसाकर्मनकरींसर्वथा ॥ कासयावैलमारवावावृथा ॥ हेंमाझियाचित्तानयेकीं ॥ ३५ ॥ ऐ
कोनिह्मणेरुक्मिणीरमण ॥ माझीआज्ञातुजप्रमाण ॥ हिंसाकर्माचेंदूषण ॥ तुजकारणघडोंनेदीं ॥ ३६ ॥ दुसरेदिवसीं

१ अतिशूद्र. २ उपदेश. ३ बैल. ४ गुप्त राहिली तर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अनामिकयेऊन ॥ बोधल्याचेएकांतींधरीचरण ॥ ह्मणेअनुग्रहद्यावामजलागून ॥ कृपाकरूनयेसमर्यी ॥ ३७ ॥ माणको
जीह्मणेऐकमाहारा ॥ राशीवरकापीआमुचागोऱ्हा ॥ कोणासिकळोंनेदीचविचारा ॥ तरीसच्छिष्यखरातूंमाझा ॥ ३८ ॥
अवश्यह्मणोनितेअवसरीं ॥ अनामिकेंबैलवधिलाकरीं ॥ मांसरांधोनिआणिकेघरीं ॥ भातभाकरीकरविल्या ॥ ३९ ॥ रा
सपूजावयाबोधराज ॥ मेळविलेसोयरेगोत्रज ॥ मांसभाकरीदेतांसहज ॥ अद्भुतचोजवाटलेंत्यां ॥ ४० ॥ ह्मणतीबोधल्या
चीढांसळलीवृत्ती ॥ हिंसाकर्मकरितोपुढती ॥ अजांपुत्रमारूनिआजिचेरातीं ॥ मायवतांप्रीतींजेववीत ॥ ४१ ॥ परीवृष
भमारविलाऐसेंजाणा ॥ हाविचारठावानाहींकोणा ॥ जेऊनिआपुलालेसदना ॥ गेलेसत्वरतेधवां ॥ ४२ ॥ अनामिकास
ह्मणेबोधलाभक्त ॥ वृषभाचेंशिरिलपवीराशींत ॥ चर्मगांडीभुसाआंत ॥ कोणासिमातकळोंनेदी ॥ ४३ ॥ तोंअनामिकाचें
फुगलेंपोट ॥ ह्मणेकेव्हांहोईलआतांपहांट ॥ सांगेनलोकांसिहेगोष्ट ॥ ह्मणोनिवटवटकरीतसे ॥ ४४ ॥ इतक्यांतउग
वलादिनकर ॥ गावांतगेलादुराचार ॥ फेरीकरीएकसर ॥ मागेभाकरघरोघरीं ॥ ४५ ॥ रिघोनिकुणब्यांचेघरीं ॥ बैसेजा
ऊनित्यांशेजारीं ॥ तंवतेह्मणतीहोईदूरी ॥ कैसाभींतरींआलासी ॥ ४६ ॥ तंवतोतयांसिघालीवाद ॥ तुह्मांआह्मांतकाय
भेद ॥ बोधराजेंकालप्रसिद्ध ॥ वृषभमारिलाराशीवरी ॥ ४७ ॥ आणितुह्मींमांसभक्षिलेंसाचार ॥ आतांमजकांधरितांदू
र ॥ ऐसेचरीतींघरोघर ॥ सांगेसाचारलोकांसी ॥ ४८ ॥ गुणगुणउठलीगावांत ॥ ह्मणतीबोधल्यानेंकेलेंअनुचित ॥ तोह्म
णवीतसेहरिभक्त ॥ बाटविलेंगोतआपुलें ॥ ४९ ॥ एकह्मणतीहेअसत्यमात ॥ एकह्मणतीहेंयथार्थ ॥ बोधल्याचागोऱ्हांनि
श्चित ॥ नाहींदिसतगोठणीं ॥ १५० ॥ गोत्रजसोयरेहोऊनिगोळा ॥ एकांतींबैसोनिविचारकेला ॥ ह्मणतीपुसावेंबोधल्या
ला ॥ कींकैसेंआह्मांसीबाटविलें ॥ ५१ ॥ अनामिकासह्मणतीसकळजन ॥ मुद्दादाखविसीआह्मांकारणं ॥ तोह्मणेवृषभा

१ उपदेश. २ बैल. ३ आपल्या हातानें. ४ नवल, चमत्कार. ५ बोकड. ६ पुरून टाक. ७ सूर्य. ८ आंत. ९ करूं नये तें, अयोग्य. १० बैल.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चेंशिरकापून ॥ ठेविलेंलपवूनराशींत ॥ ५२ ॥ चर्मलपविलेंभुसाआंत ॥ चलातुह्मासिदाखवितोंत्वरित ॥ ऐकोनिदुर्जना
चीमात ॥ झालेसंतप्तसकळिक ॥ ५३ ॥ ह्मणतीजाऊनिसकळजण ॥ बोधल्याचाजीवेंघ्यावाप्राण ॥ मगराजापुसे
लआपणांकारण ॥ तरीपडेलनांगवणतेंदेऊ ॥५४॥ ऐसेंबोलोनिदुराचारी ॥ डांगाघेतल्याआपुलेकरीं ॥ बोधल्यापासी
त्वरीं ॥ येऊनउभेराहिले ॥ ५५ ॥ तंवत्याणेंलावूनिनेत्रपातीं ॥ हृदयींचिंतिलीश्रीविठ्ठलमूर्ती ॥ नामस्मरणएकांतीं ॥
करीतबैसलानिजप्रेमें ॥ ५६ ॥ लोकह्मणतीहोईसावध ॥ करावयासआलोंतुझावध ॥ ऐसाकैसारेतूंमैंद ॥ बाटविलेंप्र
सिद्धसकळांसी ॥५७॥ बोधलाह्मणेपंढरीनाथा ॥ ऐसियासंकटींपावेआतां ॥ तुजवांचूनिकृपावंता ॥ कोणरक्षितादीना
सी ॥ ५८ ॥ तंवतेह्मणतीदुराचार ॥ तुजआतांनपावेरुक्मिणीवर ॥ आह्मासिकापूनघातलेंढोर ॥ भ्रष्टाकारकेलाकीं
॥ ५९ ॥ अनामिकासिह्मणतीतेअवसरीं ॥ मुद्दाआणूनदावीसत्वरीं ॥ अवश्यह्मणोनिदुराचारी ॥ राशीभीतरींपाहात
से ॥ १६० ॥ वृषभाचेंशिरहोतेंत्यांत ॥ तेंबोकडाचेंकरीपंढरीनाथ ॥ तयाऐसेंचचर्मकरित ॥ देखिलेंअकस्मातकाढितां
॥ ६१ ॥ अनामिकेंतेंघेऊनहातीं ॥ अधोमुखपाहेतोदुर्मती ॥ ह्मणेम्यांवृषभमारिलानिश्चितीं ॥ विपरीतगतीहेजाह
ली ॥ ६२ ॥ गांवकरीबोधल्यासह्मणतीपाहे ॥ तुझागोऱ्हाजाहलाकाये ॥ तोंकौतुककरीपंढरीराये ॥ जेंनहोयेकोणा
सी ॥ ६३ ॥ वृषभकापिलाहोतादेखा ॥ तोसावधकेलापहिल्यासारिखा ॥ तेव्हांआश्चर्यवाटलेंलोकां ॥ ह्मणतीअना
मिकलटिकाची ॥ ६४ ॥ अंत्यजासिह्मणतीग्रामवासीजन ॥ तुझाचआह्मींघेऊंप्राण ॥ तुवांअसत्यघेऊनतुफान ॥ कर
विलेंछळणबोधल्याचें ॥ ६५ ॥ ऐकोनसकळांचीसक्रोधउक्ती ॥ थरथरांकांपेतोदुर्मती ॥ मगविष्णुभक्तासिलोटांगण
प्रीतीं ॥ अंत्यजघालीतेधवां ॥ ६६ ॥ ह्मणेमीअनंतअपराधीजाण ॥ हीनयातीचांडाळदुर्जन ॥ आतांअपराधक्षमाक

१ डोकें. २ दंड, शिक्षा. ३ सोटे, काठ्या. ४ गळफांस घालणारा, फांसेगार. ५ खालीं तोंड करून. ६ क्रोधयुक्त भाषण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रून ॥ माझेप्राणवांचवी ॥ ६७ ॥ ऐकूनिदुर्जनाचीवाणी ॥ करुणाउपजलीतयाचेमनीं ॥ मगग्रामवासीयांससांगेवच
नीं ॥ यासिकोणीनमारावें ॥ ६८ ॥ मगअहंताटाकूनिसमस्त ॥ बोधल्यासिघालीदंडवत ॥ चित्तींजाहलाअतिलज्जि
त ॥ अनुचितघडलेंसकळांसी ॥ ६९ ॥ तोंइकडेबोधल्यासिरुक्मिणीकांत ॥ ध्यानांतयेऊनिकायबोलत ॥ तुजसांगीत
लाम्यांगुह्यार्थ ॥ अनुभवेंप्रचीतआलीकीं ॥ १७० ॥ बोधलाह्मणेजगज्जीवना ॥ तुझापारनकळेकवणा ॥ ह्मणूनिमि
ठीघातलीचरणा ॥ वैकुंठराणाहांसतसे ॥ ७१ ॥ आणिकचरित्रअमोलिक ॥ सादरऐकाभक्तभाविक ॥ धामणगांवीं
चेसकळलोक ॥ देखतीकौतुकनानापरी ॥ ७२ ॥ ह्मणतीबोधलानव्हेमानवीनर ॥ परमज्ञानीअतिउदार ॥ केवळई
श्वरीअवतार ॥ केलाभवपारसकळांचा ॥ ७३ ॥ एकेदिवसींअवर्षणीं ॥ पर्जन्यनपडेचमेदिनीं ॥ ह्मणूनिधामणगांवीं
चीपेरणी ॥ अग्रधान्याचीराहिली ॥ ७४ ॥ आश्विनमासपर्यंतजाण ॥ पडिलेंहोतेंअवर्षण ॥ मगकार्तिकांतस्वातीचाप
र्जन्य ॥ अपारधनवर्षला ॥ ७५ ॥ बोधल्यानेंकाढोनिकर्ज ॥ पेरावयासिघेतलेंबीज ॥ गांवकरीकरूनिविरज ॥ चालि
लेकाजकरावया ॥ ७६ ॥ तोंदिंड्याचापताकाघेऊनिकरीं ॥ यात्राचालिलीपंढरपुरीं ॥ दृष्टीसदेखोनितेअवसरीं ॥ बोधरा
जअंतरींसंतोषला ॥ ७७ ॥ यात्रेकरीयांसदंडवत ॥ सद्भावेंसाष्टांगघालित ॥ ह्मणेआजिआमुचेंभाग्यऊर्जित ॥ ह्मणोनि
संतभेटले ॥ ७८ ॥ त्यासमारंभांतहोतेब्राह्मण ॥ तेबोधल्यासिबोलतिवचन ॥ तूंदुष्काळींकरितोसिअन्नदान ॥ आलोंह्म
णूनयाठायां ॥ ७९ ॥ ऐकूनिद्विजवरांचेंवचन ॥ ह्मणेआपुलेगृहींतोंनाहींधान्य ॥ आणिविमुखगेलियासंतसज्जन ॥ त
रीसखासिहानहोयकीं ॥ १८० ॥ मगबोलावूनिनिजपुत्रासी ॥ एकांतींविचारसांगेत्यासी ॥ कींहेंबीजनेऊनिघरासी ॥ ॥ ६ ॥
भोजनसंतांसींघालावें ॥ ८१ ॥ भूमीपीकदेतसेनिर्जीव ॥ मगसंततोंआहेसजीव ॥ यांचेउदरींबीजपेरितांसर्व ॥ काय
एकनव्हेसांगपां ॥ ८२ ॥ ऐसीपित्याचीवचनोक्ती ॥ ऐकोनियमाजीसंतोषेचित्तीं ॥ विरजेमिळालेहोतेशेतीं ॥ तेग्रामांत

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मागुतींपरतविले ॥ ८३ ॥ बीजहोतेंसवामण ॥ तेंदळोनियात्रेकऱ्यांसघातलेंअन्न ॥ कडूभोंपळयाचेंबीजघेऊन ॥ आपुल्या
शेतींपेरिलें ॥ ८४ ॥ ईश्वरकरणीअघटित ॥ तुंबिनीसिफळेंआलींबहुत ॥ ग्रामवासीलोकहांसत ॥ ह्मणतीविपरीतहेंकेलें
॥ ८५॥ यात्रेकऱ्यांसबीजघालोनियां ॥ कडूभोंपळेंपेरिलेंकासया ॥ तंवएककुटिळयेऊनियां ॥ कायबोलिलातेंऐका ॥८६॥
बोधलापाटीलगांवचाराजा ॥ आह्मीसकळतयाचीप्रजा ॥ आपुल्यासांडावयालौकिकिलाजा ॥ ऐसेंतयासीवाटतसे ॥
॥ ८७ ॥ एकएकघ्यावासकळांहातीं ॥ ह्मणोनिपेरिलेंआहेतशेतीं ॥ ऐकूनिदुर्जनांचीवचनोक्ती ॥ गदगदांहांसतीसकळ
जन ॥८८॥ ह्मणतीबोधल्याचेशेतींजाऊन ॥ कौतुकपाहूंअवघेजण ॥ कैसेंपीकआलेंसघन ॥ ऐसेंह्मणोनऊठिले ॥ ८९ ॥
क्षेत्रांतपाहातांतेवेळ ॥ तंवतुंबिनीसिबहुतआलींफळं ॥ एकभोंपळातोडूनितत्काळ ॥ फोडोनियांपाहाती ॥ १९० ॥
तेथेंनवलदेखिलेंअद्भुत ॥ उत्तमगहूंनिघालेत्यांत ॥ ह्मणतीईश्वरकरणीअघटित ॥ साश्चर्यचित्तसकळांचें ॥ ९१ ॥ ग्रा
मींचाहवालदारहोतातेथ ॥ ह्मणेराजासिसांगणेंलागेलहेमात ॥ तेणेंअविंधराजासित्वरित ॥ लिहूनवृत्तांतपाठविला ॥
॥ ९२ ॥ पत्रवाचितांचियवन ॥ ह्मणेकृत्रिमविद्याकेलीजाण ॥ मगढालाईतपांचजण ॥ धामणगांवांतपाठविले ॥
॥ ९३ ॥ त्याणींबोधल्यासिपुढेंघालून ॥ राजद्वारीनेलेंजाण ॥ अविंधेंपुसतांवर्तमान ॥ केलेंनिवेदनसकळिक ॥ ९४॥
सक्रोधहोऊनिराजापुसे ॥ भोंपळयांतगहूंआलेकैसे ॥ येरूह्मणेमजठाउकेंनसे ॥ पंढरीनिवासेंहेंकेलें ॥ ९५ ॥ ऐको
निनिजभक्ताचीवाणी ॥ विश्वासनवाटेत्यालागूनी ॥ जैसेंश्रीरामचरित्रऐकोनी ॥ पिशाचमनींजळताती ॥ ९६ ॥ कां
गीताशास्त्रवाचितांसंजयास ॥ त्याचाधृतराष्ट्रासिनाहींविश्वास ॥ तेवींबोधल्याचेशब्दअविंधास ॥ असत्यवाटलेतेध
वां ॥ ९७ ॥ ॥राजाबोलेक्रोधायमान ॥ माणकोजीबोधल्यासिकरावेंयवन ॥ मगभक्षावयामांसबोन ॥ तत्काळजाण
आणविलें ॥ ९८ ॥ बोधल्यासिबैसविलाभोजनासी ॥ तोंत्याच्याझाल्याफुलेंतुळसी ॥ राजाउठोनिवेगेंसी ॥ नमनबो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धल्यासीकरीतसे ॥ १९ ॥ ह्मणेजेंइच्छिलतुझेंमन ॥ तेंमजमागेसंपत्तिधन ॥ बोधल्याचेंकंटाळलेंमन ॥ चालिलाउठो
नसत्वर ॥ २०० ॥ राजयासह्मणेतेअवसरीं ॥ कांहींचइच्छानाहींअंतरीं ॥ कामधेनूबांधिलीअसतांघरीं ॥ मगदारोदा
रींकांजावें ॥ १ ॥ कल्पतरूअंगणींअसतांजाण ॥ मगकासयालावावेंसिंदीवन ॥ सांडोनिऐरावतवहन ॥ खरावरीबैस
णअनुचित ॥ २ ॥ आम्रवृक्षाचीसांडोनिछाया ॥ हिंवरातळींबैसावेंकासया ॥ कींनरदेहासिविटोनियां ॥ पशुजन्मवा
यांकांघ्यावा ॥ ३ ॥ सांडूनिबकुलसेवंती ॥ पुंगळवेलकांधरावीहातीं ॥ कींदुरावूनसंतसंगती ॥ निंदकासीप्रीतीकरूं
नये ॥ ४ ॥ कींहरिकीर्तनटाकोनियां ॥ डफगाणेंऐकावेंकासया ॥ दहींदूधगृहींअसोनियां ॥ तक्रासिवायांकांधुंडावें
॥ ५ ॥ जेपरमहंसदीक्षापावलेपरम ॥ तेसर्वथानकरितिगृहस्थाश्रम ॥ तेवींश्रीरामभजनींजडलियाप्रेम ॥ तेराजस
न्माननघेती ॥ ६ ॥ ऐसेंह्मणोनितेसमर्थी ॥ परतोनिआलेधामणगांवीं ॥ प्रेमळभक्तिअसोनिदेहीं ॥ अहंतानाहींतया
सी ॥ ७ ॥ नामरूपींजडलियाचित्त ॥ दासांसिनाठवेआह्मीभक्त ॥ तैशाचरीतींरुक्मिणीकांत ॥ देवपणत्यातेंकळेना ॥ ८ ॥
कनकाचामुगुटआणिपैंजण ॥ एकमुशींतआटलियाजाण ॥ मगत्यादोहींचेंनामाभिधान ॥ गेलेंहरपोनतत्काळ ॥ ९ ॥
तेवींपांडुरंगाचेंकरितांभजन ॥ बोधल्याचेंहरपोनगेलेंमीपण ॥ मगहृदयींधरूनिजगज्जीवन ॥ अद्वयभजनकरीतसे
॥ २१० ॥ एकसद्भावधरूनिअंतरीं ॥ धामणगांवींचिकेलीपंढरी ॥ चरित्रदाखवूनिनानापरी ॥ जडमूढउद्धरीनिजप्रेमें
॥ ११ ॥ पुढिलेअध्यायींकथाअद्भुत ॥ प्रेमळभक्तगणेशनाथ ॥ त्याचेंचरित्ररसाळबहुत ॥ तेंप्रेमळपरिसोतनिजप्रेमें ॥ १२ ॥
जोदीनदयाळरुक्मिणीकांत ॥ तोनिजकृपेंवदवीग्रंथार्थ ॥ महीपतितयाचाशरणांगत ॥ भजनकरितनिजप्रेमें ॥ १३ ॥ ॥ ७ ॥
स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ चतुःपंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ २१४ ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५४ ॥ ओव्या ॥ २१४ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri



CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीजगदीश्वरायनमः ॥ जयजयअचळाअव्ययाअविनाशा ॥ अनामाअरूपापरमपुरुषा ॥ ब्रह्मांडनायकाजगन्निवासा ॥ स्वानंदाधीशाश्रीहरी ॥ १ ॥ निजभक्तकरितीतुझेंस्मरण ॥ तुजलागींत्यांचेंनिदिध्यासन ॥ जैसेचातकआणिमेघजाण ॥ मैत्रीपणेंनांदती ॥ २ ॥ कींबाळमातेचीकरीखंती ॥ तिजलागींलोभतैशाचरीतीं ॥ तेवींप्रेमळभक्तांचीजैसीवृत्ती ॥ होसीरुक्मिणीपतित्यांसारिखा ॥ ३ ॥ कींपौर्णिमेचाचंद्रप्रकाशघन ॥ मनींउल्हासेसागरदेखोन ॥ तेवींनिजभक्तांचीकीर्तिऐकोन ॥ तूंजगज्जीवनसंतोषसी ॥ ४ ॥ भक्तींवर्णिलीतुझीस्तुती ॥ तुजहीआवडेत्यांचीकीर्ती ॥ ह्मणोनिचरित्रेंमजहातीं ॥ भक्तविजयग्रंथींलेहविलीं ॥ ५ ॥ मागीलअध्यायाचेअंतींनिश्चित ॥ बोधराजेअविंधांसदाविलीप्रचीत ॥ मगटाकूनियांधनसंपत्त ॥ हरिभजनींप्रीतलाविली ॥ ६ ॥ आतांसज्ञानविवेकीअतिविरक्त ॥ सद्गुरूउपासकगणेशनाथ ॥ त्यांचेंचरित्रअतिअद्भुत ॥ ऐकानिजभक्तभाविकहो ॥ ७ ॥ बालेघाटप्रांतींजाण ॥ सारसीउज्जनीनगरेंदोन ॥ तेथेंजयाचेंअधिष्ठान ॥ सप्रेमकीर्तनकरितसे ॥ ८ ॥ सैलीमुद्राकानींअसती ॥ वस्त्रकौपीननेसेप्रीतीं ॥ याविरहितकांहींउपाधिनिश्चितीं ॥ नावडेचित्तींतयाचे ॥ ९ ॥ दिवसाराहूनअरण्यांत ॥ एकांतींश्रीहरीचेंभजनकरित ॥ रात्रींनगरांतप्रेमभरित ॥ गुणानुवादवर्णीतसे ॥ १० ॥ नावडेकवणाचासन्मान ॥ लौकिकपूजादांभिकभजन ॥ नावडेवस्त्रसंपत्तिधन ॥ मिष्टान्नभोजननावडे ॥ ११ ॥ तंवशिवाजीराजापंढरीसी ॥ यात्रेसआलाएकेदिवसीं ॥ ऐकूनिगणेशनाथाचेकीर्तीसी ॥ आलाभेटीसीनृपवर ॥ १२ ॥ करूनियांसाष्टांगनमन ॥ श्रवणकरीतबैसलाकीर्तन ॥ गणेशनाथाचेंविशालज्ञान ॥ कवित्वबोलणंप्रसादिक ॥ १३ ॥ नानापरीचेदृष्टांतदेऊन ॥ अभंगरचीजैसेबाण ॥ तेणेंश्रोतयांचेश्रवण ॥ सुखपावतीअपार ॥ १४ ॥ तंवशयनकरावयाआपणातें ॥ पलंगकरविलानृपनाथें ॥ ह्मणेप्रथमदि

---

१ न चळणारा, न ढळणारा, व नाश न पावणारा. २ नामरूपा वेगळा. ३ आचरण, भावना. ४ यवनास. ५ विचारशील. ६ राहाणें, वास. ७ लंगोटा. ८ शिवाजी राजा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वर्सींगणेशनाथ ॥ निजवावानिश्चितयावरी ॥ १५ ॥ मगकरजोडोनिह्मणेस्वामी ॥ एकरात्रक्रमावीआमुचेआश्रमीं ॥
तल्पककरविलानूतनआह्मीं ॥ ह्मणोनिचरणींलागला ॥ १६ ॥ पाहूनिनृपवराचाआदर ॥ नाथासिसंकटपडिलेंथोर ॥
जैसाहरिणीसिनेऊंह्मणतांव्याघ्र ॥ भयेंअंतरकांपेतियेचें ॥ १७ ॥ संकटजाणोनितेवेळ ॥ अवश्यह्मणेवैराग्यशीळ ॥ म
गखडेवेंचोनिएकओंजळ ॥ पदरींबांधिलेतेधवां ॥ १८ ॥ देखोनिनृपवरपुसेतया ॥ कंकरवेंचोनिघेतलेकासया ॥ येरू
उत्तरदेततया ॥ गणतीध्यावयानामांची ॥ १९ ॥ शिबिकेंतबैसवोनितेअवसरीं ॥ राजाघेऊनगेलाबिढारीं ॥ सुमनशे
जरचोनिवरी ॥ गणेशनाथासिनिजविलें ॥ २० ॥ त्रयोदशगुणीकरूनविडे ॥ तबकींठेविलेतयापुढें ॥ समयालावूनि
अतिनिवाडें ॥ टाकिलेपडदेचहूंकडे ॥ २१ ॥ नानापरीचेपरिमळनिश्चितीं ॥ उपचारविलासभोगसंपत्ती ॥ ठेवूनियां
तेथेंनृपती ॥ बाहेरआलासत्वर ॥ २२ ॥ तोस्पर्शविषयदेखोनिनेत्रीं ॥ अनुतापवाटलासकळगात्रीं ॥ जैसाकांद्विजअ
ग्निहोत्री ॥ यवनमंदिरींकोंडिला ॥ २३ ॥ कींव्याघ्रेंजितांचिधरूनगाये ॥ आपुलेजाळींतघेऊनजाये ॥ तेजैशीलिवकर
निघोंपाहे ॥ धरूनभयेमानसीं ॥ २४ ॥ नातरीकाननींहूनिआणिलेंहरिण ॥ राजमंदिरींबांधिलेंजाण ॥ मगतेंमान
सींइच्छितपूर्ण ॥ जाईनसूटोनकधींमी ॥ २५ ॥ कींघृतांतजीवंतधरोनिमासा ॥ घालितांतळमळकरीजैसा ॥ राजाचाभो
गउपचारतैसा ॥ गणेशनाथासीवाटला ॥ २६ ॥ कींनूतनरावांपिंजऱ्यांतघातला ॥ मगचारापाणीनरुचेत्याला ॥ ते
वींतल्पकावरीविरक्तभला ॥ कंटाळलातेरीतीं ॥ २७ ॥ सांगातेंघेतलेहोतेकंकर ॥ तेपसरूनिटाकिलेपलंगावर ॥ त्यांज
वरीनिजलेघटिकाच्यार ॥ तंवउदयासिदिनकरपातला ॥ २८ ॥ दर्शनासिआलाझडकरी ॥ तोंखडेआंथरलेपलंगाव
री ॥ विस्मितहोऊनिनिजअंतरीं ॥ नमस्कारकरीसाष्टांग ॥ २९ ॥ नाथासिपुसेजोडोनिकर ॥ तंवतेदेतीप्रत्युत्तर ॥ शय

१ पलंग. २ चित्त, मन. ३ खडे, दगड. ४ पालखींत. ५ फुलांची. ६ पश्चात्ताप. ७ जीवंत. ८ वनांतून. ९ तुपांत. १० पोपट. ११ सूर्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नकरितांपलंगावर ॥ निद्राअघोरलागेलकीं ॥ ३० ॥ तुझाहेतव्हावयापूर्ण ॥ खडेपसरूनकेलेंशयन ॥ जरीसुखदीध लेंजीवाकारण ॥ तरीपुढेंदुःखभोगणेंतितुकेंची ॥ ३१ ॥ जैसीखरूजखाजवितांपाही ॥ परमसुखवाटेतेसमयीं ॥ मग खाजनिघोनिगेल्यादेहीं ॥ सौख्यकांहींपडेना ॥ ३२ ॥ नातरीभोजनकरितांगोडवाटे ॥ परीवमनकरितांजीवकष्टे ॥ तेवींशयनसुखआधींगोमटें ॥ मगपरिणामींखोटेंदेहासी ॥ ३३ ॥ कांबचनागआधींमधुरलागत ॥ परीखाणारप्राणां सिमुकत ॥ तेवींविषयभोगितांभयसत्य ॥ जाणानिश्चितनृपनाथा ॥ ३४ ॥ ऐसेंऐकतांचिवचन ॥ अनुतापजाहलारा जयाकारण ॥ ह्मणेआजपासूनमीपलंगींशयन ॥ नकरींजाणसर्वथा ॥ ३५ ॥ निश्चयकरूनिनिजमानसीं ॥ तल्पक अर्पिलाब्राह्मणासीं ॥ संतसंगाचीमहिमाऐसी ॥ ब्रह्मादिकांसिअगम्य ॥ ३६ ॥ गणेशनाथाचीऐसीस्थित ॥ तीन्हीं अवस्थांतवैराग्यभरित ॥ वस्तीनकरीचग्रामांत ॥ हिंडेअरण्यांतसर्वदा ॥ ३७ ॥ स्वदेशांतकीर्तनहोतांजाण ॥ दर्शना येतीभाविकजन ॥ नित्यअनुग्रहएकालागून ॥ स्वइच्छेनदेतसे ॥ ३८ ॥ मस्तकींहस्तपडतांजाण ॥ शिष्याचेंउडेप्रपं चभान ॥ तोसंसारधंदाटाकून ॥ रानोरानहिंडतसे ॥ ३९ ॥ तोखळअथवादुराचार ॥ निंदकअथवासज्ञाननर ॥ परी नाथाचाशिरींपडलियाकर ॥ अपारवैराग्यहोयतया ॥ ४० ॥ ऐसाएकसंवत्सरजंवलोट ॥ तंवशिष्यझालेतीनशेंसाठ ॥ लंगोटबंदवैराग्येंउद्भट ॥ आत्मज्ञानस्पष्टपावले ॥ ४१ ॥ पुरींपैठणींलोकबोलती ॥ जेकांयाचाउपदेशघेती ॥ त्यांचीत त्काळउडोनप्रपंचभ्रांती ॥ मागेंहिंडतीसद्गुरूचे ॥ ४२ ॥ एकह्मणतीचेटकीदारुण ॥ एकह्मणतीघालितोमोहन ॥ एक ह्मणतीआत्मज्ञान ॥ ठसावलेंसंपूर्णतयासी ॥ ४३ ॥ एकह्मणतीहास्वयेंपांडुरंग ॥ एकह्मणतीहेंअत्यंतढोंग ॥ एकह्म णतीत्याचासंग ॥ करितांभवभंगहोतसे ॥ ४४ ॥ एकह्मणतीत्याचेदर्शना ॥ इतःपरजाऊंनयावेंकोणा ॥ एकह्मणती

१ चांगलें वाटतें. २ पश्चात्ताप. ३ पलंग. ४ उपदेश. ५ दुष्ट, निंदक. ६ संसारदुःखाचा नाश.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

होणारचुकेना ॥ प्राक्तनींअसेलजेंकांहीं ॥ ४५ ॥ एकह्मणतीत्याचीभेटी ॥ घेऊनसांगोंच्यारगोष्टी ॥ कींवहुतांचेजी
वांचीकरूनिसांटि ॥ पडलीतुटीसंसारा ॥ ४६ ॥ ऐसेंह्मणोनिएकेदिवसीं ॥ आलेनाथाचेदर्शनासी ॥ तोंहेआम्रवृक्षा
चेछायेसी ॥ बैसलेहोतेध्यानस्थ ॥ ४७ ॥ मानसपूजाझालियात्वरित ॥ गणेशनाथपाहेभोंवत ॥ कींशिष्यबोलावूनि
येथ ॥ मस्तकींहस्तठेवावा ॥ ४८ ॥ तंवउभेठाकूनितेवेळ ॥ कायबोलतीनिंदकखळ ॥ तुह्मींशिष्यकरूनिभोळसाळ ॥
आपुल्यामागेंलाविले ॥ ४९ ॥ बहुतांचेसंसाराकेलीतुटी ॥ ह्मणोनिलोकहोतातिकष्टी ॥ आतांआह्मींसांगतोंएकगो
ष्टी ॥ तरीत्याचिरांहटींवर्तावें ॥ ५० ॥ तुह्मीसंतआत्मज्ञानी ॥ दृष्टीसिसारिख्याचारीखाणीं ॥ तरीझाडासिउपदेश
आजपासोनी ॥ करीतजावानिजरूपें ॥ ५१ ॥ अवश्यह्मणोनितयेक्षणीं ॥ तत्काळकौतुकदाखविलेंनयनीं ॥ जेंमृत्युंलो
कींनानासाधनीं ॥ नयेघडोनीसर्वथा ॥ ५२ ॥ चूतवृक्षजुनाटहोतातेथ ॥ त्यासिउपदेशदेऊनित्वरित ॥ मस्तकींठेऊनियां
हस्त ॥ तारकमंत्रसांगीतला ॥ ५३ ॥ ऐसेंदृष्टीसदेखोन ॥ कायबोलतीतेविचक्षण ॥ मनुष्यांसिअनुग्रहसांगतांजाण ॥
जेप्रपंचभानटाकिती ॥ ५४ ॥ हाउपदेशठसावलावृक्षासी ॥ हेंकैसेंअनुभवेलआह्मांसी ॥ तरीचमत्कारदाऊनियांनि
जरूपेंसी ॥ संशयनिरसीसकळांचा ॥ ५५ ॥ तंवभाकरभाजीयाजकारण ॥ नैवेद्यासिआणिलीहोतीकवण ॥ गणेश
नाथेंतेउचलोन ॥ आपुलेकरींघेतली ॥ ५६ ॥ उपदेशदीधलाज्यावृक्षाकारण ॥ तयासिकायबोलिलावचन॥ हादेवा
चाप्रसादमुखपसरून ॥ प्रीतीकरूनभक्षीकां ॥ ५७ ॥ ऐसेंबोलतांसद्गुरुनाथ ॥ तंवअद्भुतकौतुकवर्तलेंतेथ ॥ झाडाचें
खोडअकस्मात ॥ उकललेंसर्वांदेखतां ॥ ५८ ॥ त्यामाजीभाकरघालितांदेख ॥ मिळोनिगेलेंपहिल्याचसारिख ॥ देखो
निआश्चर्यकरितीलोक ॥ तन्मयसकळिकझालेकीं ॥ ५९ ॥ गणेशनाथासितेवेळ ॥ नमस्कारकरितीविचक्षणखळ ॥ ह्म

१ नसिबीं, दैवांत. २ संगती. ३ रीतीनें. ४ जरायुज, स्वेदज, अंडज व उद्भिज, ह्या खाणी. ५ पृथ्वीवर. ६ आंब्याचा वृक्ष. ७ उपदेश देतां. ८ तटस्थ, आश्चर्यमय. ९ दुष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रतींतुजऐसाभक्तप्रेमळ ॥ सज्ञाननिर्मळनसेची ॥ ६० ॥ आह्मीअहंकारधरूनिमना ॥ व्यर्थचिकेलीतुमचीछळणा ॥
ऐशारीतींबोलोनिवचना ॥ आपुल्यासदनींतेगेले ॥ ६१ ॥ एकेंदिवसींगणेशनाथ ॥ अरण्यामाजीकीर्तनकरित ॥ श्र
वणासिआलेसज्ञानपंडित ॥ आणिवैष्णवभक्तविवेकी ॥ ६२ ॥ वैदिकशास्त्रज्ञआणिभाविक ॥ अठरावर्णांचेमिळालेलो
क ॥ कीर्तनप्रेमाचेंनिजसुख ॥ पाहावयासीपातले ॥ ६३ ॥ टाळविणेंमृदंगवाजत ॥ नामघोषगजरहोत ॥ नादेंअंबर
भरूनितेथ ॥ कोंदोनिगेलेंतेधवां ॥ ६४ ॥ तंववरतेकरूनिहात ॥ पताकाकरवीगणेशनाथ ॥ हेंदेखोनिसज्ञानपंडित ॥
कायबोलततेंऐका ॥ ६५ ॥ तूंतरभरांडीजातीचाहीन ॥ आह्मीतोंब्राह्मणउंचवर्ण ॥ कीर्तनींटाळयातुझेवचनेंकरून ॥
नपिटूंजाणसर्वथा ॥ ६६ ॥ यावरीगणेशनाथउत्तरदेत ॥ ह्मणेताडाचावृक्षउंचबहुत ॥ परीत्याचीछायाउपयोगींनिश्चि
त ॥ नाहींपडतकोणाचे ॥ ६७ ॥ तेवींअठरावर्णांमाजीनिपुण ॥ विप्रतंववरिष्ठपूज्यमान ॥ परीकीर्तनाचेउपयोगींजा
ण ॥ तुमचेकरनपडती ॥ ६८ ॥ तरीआतांस्वस्थकरूनिमन ॥ उगेंचतुह्मीकरावेंश्रवण ॥ टाळियावाजवितीलपाषाण ॥
तुमचेकृपेनस्वामिया ॥ ६९ ॥ ऐसेंबोलतांवैराग्यशील ॥ तोंनवलवर्तलेंदेखतीसकळ ॥ दगडगोटेहोतेमाळयावर ॥ ते
एकाएकींउठिलेंपैं ॥ ७० ॥ जैशाकरंताळियावाजतीदेख ॥ तैसेलागतीएकासीएक ॥ ऐसेंदेखोनियांकौतुक ॥ तटस्थ
लोकपह्याती ॥ ७१ ॥ ह्मणतीहेंकौतुकअभिनवें ॥ दगडांसिकैसाआणिलाजीव ॥ गणेशनाथाचाअनुपमभाव ॥ नक
ळेमार्वइंद्रादिकां ॥ ७२ ॥ मगचित्तींअनुतापधरून ॥ टाळयावाजवितीसकळब्राह्मण ॥ गणेशनाथाचेंसमाधान ॥ जाह
लेंइतुकेनतेधवां ॥ ७३ ॥ तोंमध्यान्हाआलागंभस्ती ॥ मगउजळिलीमंगळारती ॥ खिरापतघेऊनिनिश्चिती ॥ सद
नाप्रतीलोकगेले ॥ ७४ ॥ आह्मीअहंकारधरून ॥ व्यर्थकेलेंयाचेंछळण ॥ ऐशापरींवचनेंबोलून ॥ वाखाणितीगणेश

१ गर्व. २ घरीं. ३ आकाश. ४ गुरव. ५ वाजवणार नाहीं. ६ हातांच्या. ७ नवीन, अपूर्व. ८ माया, कपट. ९ सूर्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाथा ॥ ७५ ॥ गणेशनाथप्रेमळभक्त ॥ त्यासिवरदेतीपंढरीनाथ ॥ उज्जनीआणिशारशांत ॥ यात्राभरतअद्यापी ॥
॥ ७६ ॥ संतमहंतवैष्णवप्रेमळ ॥ चमत्कारजागृतअसेतेंस्थळ ॥ निजभक्तांचीकीर्तिचिरकाळ ॥ दीनदयाळवाढवितो
॥ ७७ ॥ आतांनलिंपेचिजोविषयंकर्दमीं ॥ परमभाविकजोकेशवस्वामी ॥ तयाचेंचरित्रमनोधर्मीं ॥ ऐकातुह्मीभाविक
हो ॥ ७८ ॥ स्वेच्छाहिंडतांदेशावरी ॥ एकदागेलेविजापुरीं ॥ हरिदिनीसिसप्रेमभरीं ॥ कीर्तनमांडिलेंचोहटां ॥ ७९ ॥
केशवस्वामीचीऐकोनिस्थित ॥ श्रवणासिआलेलोकबहुत ॥ वैदिकविप्रआणिपंडित ॥ संतमहंतविरक्तही ॥ ८० ॥ अ
ठरावर्णांचेनारीनर ॥ जाणतेनेणतेलहानथोर ॥ दाटीजाहलीबहुफार ॥ भरूनिबाजारनिघाला ॥ ८१ ॥ हिलालजळ
तीसभोंवते ॥ टाळमृदंगघोषतेथें ॥ केशवस्वामीसप्रेमचित्तें ॥ आनंदेंनाचतकीर्तनीं ॥ ८२ ॥ तंवशिष्यहोतावृद्धब्रा
ह्मण ॥ तयाप्रतीकायबोलतवचन ॥ आजिएकादशीव्रतगहन ॥ उपोषणसकळांसी ॥ ८३ ॥ तरीतूंवाणियाचेगृ
हासिजायी ॥ सुंठसाकरघेऊनियेई ॥ तेचिखिरापतजातेसमयीं ॥ लोकांसिदेयीप्रसाद ॥ ८४ ॥ ऐशीआज्ञाहोतांचिल
रित ॥ ब्राह्मणगेलाबाजारांत ॥ वाणियाचेदुकानींजात ॥ तंवतोनिद्रितहोताकीं ॥ ८५ ॥ ह्मकामारूनिसावधकेला ॥
ह्मणेसुंठसाकरदेईमजला ॥ अवश्यह्मणूनिवाणीउठिला ॥ तोंअंधारपडलादुकानांत ॥ ॥ ८६ ॥ सुंठचांचपोनिजंवपा
हात ॥ तंवबचनागाचेंलागलेंपोत ॥ सातशेरमोजूनिदीधलीत्वरित ॥ पडलीभ्रांतमानसीं ॥ ८७ ॥ साकरतितुकीचदे
ऊन ॥ वाणीतयासिबोलेप्रतिवचन ॥ माझापुत्रहाटागेलाह्मणून ॥ कीर्तनासियेणनजाहलें ॥ ८८ ॥ माणसेंमिळालीं
असतीलफार ॥ सुंठनपुरेएवढीसाचार ॥ ह्मणूनिआणिकओंजळभर ॥ अधिकटाकिलीतयानें ॥ ८९ ॥ जैसेंअभयदे ॥ ३ ॥
ऊनघातलादर्प ॥ कींप्रार्थनाह्मणोनिअपशब्दअमुप ॥ कींपुष्पहारह्मणूनिमहासर्प ॥ कंठींघातलानकळतां ॥ ९० ॥

१ विषयरूप. चिखलांत. २ चवाठ्यावर. ३ दिवट्या, मशाली. ४ बाजारास. ५ भीति.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कींअनुष्ठानह्मणोनिप्रयोगकेला ॥ कींऔषधह्मणोनिरोगदीधला ॥ कींमेघह्मणोनिअग्निलाविला ॥ काननींजेसानकळ
तां ॥ ९१ ॥ तैसेंचवाणियानेंकेलें ॥ सुंठह्मणोनिविषदीधलें ॥ निद्रालस्येंफारव्यापिलें ॥ समजलेंनाहींतयासी ॥ ९२ ॥
घेणारास हीनकळेकांहीं ॥ मगबिऱ्हाडासिआलालवलाहीं ॥ आडकित्यानेंतेसमयीं ॥ तुकडेकरूनींठेविले ॥ ९३ ॥ हा
नकळतांवोढवलाआघात ॥ हेंजाणोनिपंढरीनाथ ॥ ह्मणेश्रोतेभक्षितीलखिरापत ॥ मगमोठाअनर्थहोईलकीं ॥ ९४ ॥
एकादशीचाउपवासजाण ॥ बचनागखातांपावतीमरण ॥ मगपुढेंमाझेंकीर्तनश्रवण ॥ कोणीनकरितीलसर्वथा ॥ ९५ ॥
आणिनिजभक्तांच्यावचनास ॥ कोणीनधरितीलविश्वास ॥ मगमागीलकीर्तिमाझीसुरस ॥ असत्यजनासवाटेलकीं
॥ ९६ ॥ ऐसेंह्मणोनिपंढरीनाथ ॥ ह्मणेआजिचाटाळावाअनर्थ ॥ मगबचनागाचेंविषसमस्त ॥ शोषूनघेतलेंतेधवां ॥
॥ ९७ ॥ विषाचेंअमृतकेलेंजाण ॥ जेंसेवितांसौख्यदासांकारण ॥ जेंणेजन्ममरणाचेंहोयखंडन ॥ तेंजगज्जीवनकरीत
से ॥ ९८ ॥ इकडेकीर्तनामाजीकेशवभक्त ॥ प्रेमानंदेंगातनाचत ॥ टाळयांपिटोनिहातोहात ॥ गुणवर्णितश्रीहरीचे
॥ ९९ ॥ च्यारिप्रहरजाहलेंकीर्तन ॥ वोवाळिलारुक्मिणीरमण ॥ बचनागाचीखिरापतजाण ॥ सकळांकारणवांटिली
॥ १०० ॥ हरिप्रसादह्मणोनिनिश्चितीं ॥ पदरींबांधोनिठेविती ॥ तेथेंचभक्षोनिकितेकजाती ॥ सदनाप्रतीआपुल्या ॥
॥ १ ॥ इकडेउदयायेतांवासरमणी ॥ दुकानींजागाजाहलावाणी ॥ तोंबचनागाचेंपोतेंनयनीं ॥ पुढेंअकस्मातदेखिलें
॥ २ ॥ ह्मणेअनर्थजाहलाथोर ॥ आतांकायकरावाविचार ॥ सुंठह्मणोनिसाचार ॥ बचनागचीदीधला ॥ ३ ॥ साधुसंत
प्रेमळभक्त ॥ आलेअसतीलकीर्तनांत ॥ तेसकळपावलेअसतीलमृत्य ॥ मजवरीनिमित्तआलेंकीं ॥ ४ ॥ नगरांतकळ
तांवर्तमान ॥ कोणरक्षीलमजलागून ॥ मृत्युपावल्यावरीजाण ॥ रौरवभोगणलागेलकीं ॥ ५ ॥ तरीयालोकींपरलोकीं

१ नाश, लोप. २ नरकवास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निश्चितीं ॥ मीकानकोंडाजाह्लोंदुर्मती ॥ मजऐसापातकीनिश्चितीं ॥ नाहींत्रिजगतींसर्वथा ॥ ६ ॥ चतुष्पदांमाजी
निंद्यजनीं ॥ खरसूकरजातीचेदोनी ॥ मीअवगुणीतयाहूनी ॥ यापरीवाणीअनुतापला ॥ ७ ॥ तरीआतांकासयावा
गवावेंजिण ॥ विहिरींतघालूनद्यावाप्राण ॥ ऐसामनींनिश्चयकरून ॥ दुकानटाकोनानिघाला ॥ ८ ॥ समाचारघेतांन
गरांत ॥ तंवकोणीचनाहींपावलेमृत्य ॥ कानदेऊनिउगाचिऐकत ॥ तोंकोणीरडतदिसेना ॥ ९ ॥ परस्परेंपुसेलोकांसी ॥
गेलेहोतेतकायहरिकथेसी ॥ खिरापतअसलीतुह्मांपासी ॥ तरीप्रसादआह्मांसींदेईजे ॥ ११० ॥ तेह्मणतीआह्मांसिनि
राहार ॥ रात्रीसवांटिलीसुंठसाकर ॥ तेथेंचितेभक्षोनिसत्वर ॥ सदनासिआलोंआपुले ॥ ११ ॥ यावरीवाणीबोलेत्यांसी ॥
कालचेंनिश्चक्रतुह्मांसी ॥ पोटांतहोतअसेलकासाविसी ॥ तरीभोजनवेगेंसीकरावें ॥ १२ ॥ तेह्मणतीदंडकआह्मांप्रती ॥
तुजऐसेनहोंअन्नार्थी ॥ उपवासीराहावयाआणीकराती ॥ सामर्थ्यचित्तींवागवितों ॥ १३ ॥ ऐसेंऐकूनिउत्तर ॥ पररूप
रेंघेतलासमाचार ॥ मगश्मशानभूमीससत्वर ॥ जाऊनियांपाहिलें ॥ १४ ॥ तंवएकहींप्रेतनादिसेतेथ ॥ मगवाणिया
सचमत्कारवाटत ॥ ह्मणेअरिष्टनिरसीपंढरीनाथ ॥ चुकविलेआघातबहुतांचे ॥ १५ ॥ तोंइकडेकेशवस्वामीस्नानकरूनी ॥
धातुमूर्तीपाहेविलोकूनी ॥ तंवकाळिमादेखिलीतयालागूनी ॥ मगविस्मयमनींवाटला ॥ १६ ॥ जैसेंचंद्रासिलागतां
ग्रहण ॥ तोतत्काळहोयतेजहीन ॥ तैशारीतींरुक्मिणीरमण ॥ नीळवर्णदिसतोकीं ॥ १७ ॥ हेंदेखोनिकेशवभक्त ॥ आ
श्चर्यकरितीमनांत ॥ ह्मणेमूर्तीहोतीलखलखित ॥ आजिकाळिमाअद्भुतजडलीकां ॥ १८ ॥ हेंनवलऐकोनिसाचार ॥
पाहावयासिआलेनारीनर ॥ तोंवाणीयेऊनिसत्वर ॥ केशवस्वामीसीबोलतसे ॥ १९ ॥ सुंठपाहतांअंधारांत ॥ बचना
गाचेंपोतेंहातालागत ॥ सातशेरमोजूनिनिश्चित ॥ आपुल्याहातंदिधलेंम्या ॥ १२० ॥ तेंअरिष्टनिरासिलेंपंढरीनाथें ॥ ४ ॥

१ गर्दभ. २ डुकर. ३ पश्चात्ताप पावला. ४ चाल, सवय. ५ भुकेनें पीडित. ६ श्यामवर्ण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वांचविलेंसकळश्रोतयांतें ॥ याअपराधाचेंप्रायश्चित्तमातें ॥ सांगावरितेंस्वामिया ॥ २१ ॥ केशवस्वामीऐकूनिमात ॥
नेत्रींप्रेमाश्रुलोटलेवरित ॥ कंठजाहलासद्गदित ॥ कायबोलतदेवासी ॥ २२ ॥ जयजयदीनदयाळेविठ्ठले ॥ आजिचें
निमित्तथोरटाळिलें ॥ आपुलेंबिरुदसत्यकेलें ॥ दासांसिरक्षिलेंनिजकृपें ॥ २३ ॥ बचनागाचेंविषदारुण ॥ तुजलागीं
चढलेंनीलवर्ण ॥ वांचवूनिबहुतांचेप्राण ॥ आपणश्यामवर्णजाहलेती ॥ २४ ॥ तुझेंनामजपतांप्रऱ्हादभक्त ॥ महावि
षाचेंजाहलेंअमृत ॥ आणिबचनागाचेंविषकिंचित ॥ तेंआजिबाधतकैशारीतीं ॥ २५ ॥ तूंसर्वांवरिष्ठदेवाधिदेव ॥ भज
नकरितांनिवालाशिव ॥ आणिबचनागेंआजिकेलाउपद्रव ॥ हाचिनवलांवश्रीविठ्ठला ॥ २६ ॥ निजांगेंतुडविलाकालि
यासहज ॥ तैंबाधककाहींनजाहलेंतुज ॥ आणिबचनागेंकाळिमाआणिलीआज ॥ हेंनवलचोजश्रीहरी ॥ २७ ॥ मा
हाविषेंभरूनिस्तन ॥ पूतनेनेंपाजिलेंतुजलागून ॥ तयाहूनिबचनागकठिन ॥ जाहलेतिनीळवर्णयासाठीं ॥ २८ ॥ आ
जिअमृतासचिआलेंमरण ॥ कींअंधारेंग्रासिलेंसूर्यालागून ॥ कींभागीरथीपापेंकरून ॥ जाहलीमलिनसर्वांगीं ॥ २९ ॥
कींपृथ्वीसजाहलातृणाचाभार ॥ कींपर्वतासिभिऊनपळालेंवज्र ॥ कींधुळीनेंमळोनिगेलेंअंबर ॥ तैसाविचारघडलाकीं
॥ १३० ॥ नातरीचंद्रमंडलासिजाहलाउबारा ॥ कींक्षुधालागलीक्षीरसमुद्रा ॥ पिशाचबाधापार्वतीवरा ॥ जाहलीऐ
सेंवाटतसे ॥ ३१ ॥ नातरीदरिद्रेंपीडिलाकुबेर ॥ कींविधीचेंअसत्यजाहलेंउत्तर ॥ कींतेजेंलोपूनिगेलेंअंबर ॥ तैसेंदि
सोनआलेंकीं ॥ ३२ ॥ हेंइतकेंघडेलगोविंदा ॥ परीतुजनव्हेचिविषबाधा ॥ तरीवाढवावयादासांचीमर्यादा ॥ लीलास
गुणदाखविसी ॥ ३३ ॥ तूंअजअजितपंढरीनाथा ॥ कळिकाळाचाहीनियंता ॥ तरीकृपाकरूनिअनाथनाथा ॥ होईमा
गुतासोज्वळ ॥ ३४ ॥ ऐसीऐकूनियांस्तुती ॥ संतोषलेरुक्मिणीपती ॥ लखलखितधातूचीमूर्ती ॥ दिसोंलागलीतेधवां

१ नागा. २ चमत्कार. ३ अद्भुत. ४ गवताचा. ५ इंद्राचें शस्त्र. ६ आकाश. ७ शंकरास. ८ ब्रह्मदेवाचें वचन. ९ जन्मरहित.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ३५ ॥ हें दृष्टीस देखोनि कौतुक ॥ आश्चर्य करिती सकळ लोक ॥ ह्मणती कीर्तना परीस साधन आणिक ॥ नाहीं सर्वथा कलियुगीं ॥ ३६ ॥ वाणियासि अनुताप जाहला पूर्ण ॥ सांडिलें सकळ प्रपंचभान ॥ केशवस्वामीचे संगतीनें जाण ॥ करी श्रवण हरिकथा ॥ ३७ ॥ आणिक चरित्र रसाळ वाणी ॥ श्रोतीं सादर ऐकावें श्रवणीं ॥ गोमाई आवा विधवा ब्राह्मणी ॥ पंढरपुरासी चालिली ॥ ३८ ॥ परम दुर्बळ अतिदीन ॥ भक्षावयासि न मिळे अन्न ॥ वस्त्र नेसली फाटकें जीर्ण ॥ मागे कोरान्न घरोघरीं ॥ ३९ ॥ गुळस[1]ऱ्यापासी आली सत्वर ॥ तंव चंद्रभागेसि चालिला पूर ॥ मानसीं जाहली चिंतातुर ॥ ह्मणे कोण उतार करील मज ॥ १४० ॥ मग आषाढशुद्ध दशमीसी ॥ यात्रा राहिली उपवासी ॥ गोमाई ह्मणे कोळियासी ॥ न्यावें मज लापैल तीरा ॥ ४१ ॥ यात्रा मिळाली असे बहुत ॥ थोर थोर लोक भाग्यवंत ॥ उताऱ्यांसि द्रव्य देऊनि त्वरित ॥ जाती नावेंत बैसोनीं ॥ ४२ ॥ गोमाई जवळ धांवूनि जात ॥ तों लोटोनि टाकिली उदकांत ॥ वस्त्र भिजतां रडत रडत ॥ मागुती येत बाहेरी ॥ ४३ ॥ दीर्घस्वरें करी रुदन ॥ आतां पैल तीरीं नेईल कोण ॥ तारू ह्मणती पैसा देऊन ॥ जायी उतरून ह्मातारे ॥ ४४ ॥ गोमाई त्यांस देत उत्तर ॥ पीठ देतें ओंजळभर ॥ हें घेऊनियां सत्वर ॥ भिंवरा पार करावें ॥ ४५ ॥ पैसा न मिळे मजप्रती ॥ ऐसें सांगे नानारीतीं ॥ परी दया[2]नुपजे तयांचे चित्तीं ॥ कठिन दुर्मती क्षेत्रींचे ॥ ४६ ॥ सकळ यात्रा उतरून गेली ॥ गोमाई राहिली ऐल तीरीं ॥ कांहीं उपाय न सुचे अंतरीं ॥ मग रुदन करी एकलीच ॥ ४७ ॥ ह्मणे मज न भेटे रुक्मिणीवर ॥ व्यर्थचि पडिली येरझार ॥ क्षेत्रवासी लोक कठिण फार ॥ द्रवेंना अंतर कोणाचें ॥ ४८ ॥ ऐसें जाणोनि पंढरीनाथ ॥ कोळियाचें रूप धरूनि त्वरित ॥ जवळ सांगडी दीननाथ ॥ घेते झाले तेधवां ॥ ४९ ॥ गोमाई जवळ जाऊनि श्रीहरी ॥ काय बोलती ते अवसरीं ॥ तुज जाणें असेल पैल तीरीं ॥ तरी ऊठ त्वरा करी ह्मातारे ॥ १५० ॥ ती ह्मणे बापा मी दुर्बळ ॥

---

१ जुनें. २ दया येत नाहीं.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

द्रव्यद्यावयासिनाहींजवळ ॥ तरीपीठघेऊनिओंजळभर ॥ नेशीलतरयेईनमी ॥ ५१ ॥ यावरीह्मणेशेषशायी ॥ मीको
णापासूनघेतनाहीं ॥ रंजल्यागांजल्यासपाही ॥ मीलवलाहींउतरीतसें ॥ ५२ ॥ याजसाठींचदिवसबहुत ॥ राहिलोंअसें
पंढरपुरांत ॥ ऐसीऐकूनियांमात ॥ गोमाईचित्तांतसंतोषली ॥ ५३ ॥ ह्मणेतारुंवावचनऐक ॥ रात्रझालीसेप्रहरएक ॥ दु
सरेंवस्त्रनाहींआणिक ॥ नेसावयासीमजलागीं ॥ ५४ ॥ यावरीबोलेपंढरीनाथ ॥ भिजोंनदेतांहस्तपादसहित ॥ खांद्या
वरीबैसवूनिनिश्चित ॥ नेतोंलवलाहींपैलतीरा ॥ ५५ ॥ ऐसेंह्मणूनिदीनदयाळ ॥ गोमाईसिउचलिलेंतेवेळ ॥ लोटलें
नसतांएकपळ ॥ नेलेंतत्काळपैलतीरा ॥ ५६ ॥ गोमाईतारुवासिकायबोले ॥ तुझेंअंगकैसेंनाहींभिजलें ॥ मजपैलती
रींबैसविलें ॥ हेंअद्भुतजाहलेंनवलकीं ॥ ५७ ॥ यावरीह्मणेचक्रपाणी ॥ मीतैसाउतान्यानव्हेअडाणी ॥ भवसिंधुदासां
लागुनी ॥ कोरड्याचिपारपाववितों ॥ ५८ ॥ गोमाईह्मणेतेअवसरीं ॥ तुवांउपकारकेलामाझेशिरीं ॥ तरीपीठदेतेंओंज
ळभरी ॥ हेंघेईपदरींआपुल्या ॥ ५९ ॥ यावरीदेवबोलिलेकायी ॥ मीकोणापासूनिघेतनाहीं ॥ याचेपानगेकरूनिपा
ही ॥ द्वादशीसघालीद्विजवरां ॥ १६० ॥ ऐसेंबोलोनिजगज्जीवन ॥ अदृश्यजाहलेंनलागतांक्षण ॥ मगमहाद्वारासि
जाऊन ॥ घेतलेंदर्शनदेवाचें ॥ ६१ ॥ एकादशीसऐकोनिकीर्तन ॥ केलेंचंद्रभागेचेंस्नान ॥ तेंपीठपदरींबांधून ॥ वाळुवं
टांतबैसली ॥ ६२ ॥ ह्मणेआजिपर्वकाळद्वादशी ॥ सिधाद्यावाब्राह्मणासी ॥ तरीडाळमीठमजपासी ॥ द्यावयापदरींनसे
कीं ॥ ६३ ॥ कोणीब्राह्मणपडेलदृष्टीं ॥ तयासिमधुरसांगेनगुजगोष्टी ॥ मजवरीकरूनकृपादृष्टी ॥ मूठभरपीठघ्यावेंस्वा
मिया ॥ ६४ ॥ परिकोणीचजवळनयेब्राह्मण ॥ ह्मणतीमुळींचजाहलाअपशकुन ॥ आजकैसाभेटेलयजमान ॥ झालें
दर्शनयाविधवेचें ॥ ६५ ॥ टाकूनिगूळतांदुळघृतें ॥ पीठकोणघेतसेपदरांत ॥ ऐसेंबोलोनिविप्रसमस्त ॥ जवळनयेत

१ गोष्ट. २ नावाड्या. ३ अन्नसामुग्री. ४ तूप. ५ ब्राह्मण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कोणीही ॥ ६६ ॥ गोमाईह्मणेपंढरीनाथा ॥ कायउपायकरूंआतां ॥ द्वादशीसविप्रनमिळतां ॥ अन्नसर्वथानघेईमी ॥
॥ ६७ ॥ ऐसासदृढदेखोनिभाव ॥ तत्काळपावलापंढरीराव ॥ वृद्धब्राह्मणदेवाधिदेव ॥ होऊनिआलातेसमयीं ॥ ६८ ॥ गो
माईसह्मणेतेवेळ ॥ आजिद्वादशीपर्वकाळ ॥ आणिमीब्राह्मणअतिदुर्बळ ॥ आलोंतत्काळतुजपाशीं ॥ ६९ ॥ पानग्याचेंपीठ
असेलजरी ॥ तरीसद्भावेंघालावेंमाझेपदरीं ॥ ऐसेंबोलतांचश्रीहरी ॥ संतोषअंतरींवाटला ॥ १७० ॥ पुढतीबोलेद्विजव
र ॥ मजलाकोठेंचनाहींथार ॥ देउळींघेतलेंबिढार ॥ क्षुधातुरजाहलोंकीं ॥ ७१ ॥ जरीपानगेभाजोनिदेशीलयेथ ॥
तरीभोजनकरीनसंतोषचित्त ॥ ऐसेंबोलतांपंढरीनाथ ॥ गोमाईचित्तांतसंतोषली ॥ ७२ ॥ मगशुभ्रांवेंचोनिनिजांगें ॥
स्नानकरूनिभाजिलेपानगे ॥ तेआवडीकरूनपांडुरंगें ॥ खातीलगबगेंनिजप्रीतीं ॥ ७३ ॥ तोंइतक्यांतवृद्धरूपधरू
नी ॥ जवळीआलीमातारुक्मिणी ॥ ह्मणेएकलेचयेऊनिचक्रपाणी ॥ बैसलेभोजनींनकळतां ॥ ७४ ॥ ब्राह्मणह्मणेगो
माईकारणं ॥ आतांसुवासिनीसिघालीभोजन ॥ तुझेंचिभाग्यसफळजाण ॥ घडलेंमेहुणअनायासें ॥ ७५ ॥ दोनपान
ग्यांचेंपीठहोत ॥ परीतयासिआलीबरकत ॥ रुक्मिणीआणिपंढरीनाथ ॥ गोमाईसहितजेविलीं ॥ ७६ ॥ मुखशुद्धीघेऊ
नितुळसीदळ ॥ अदृश्यजाहलेदीनदयाळ ॥ आणिकचरित्रबहुरसाळ ॥ परिसाप्रेमळभाविकहो ॥ ७७ ॥ लतिबशाहमु
सलमान ॥ परमभाविकवैष्णवजन ॥ गीताभागवतकरीश्रवण ॥ श्रीरामभजनअहर्निशीं ॥ ७८ ॥ सांडोनिआपुलाय
वनधर्म ॥ कीर्तनींलाविलेंअद्भुतप्रेम ॥ अर्चनपूजानित्यनेम ॥ करीतनिःसीमआवडी ॥ ७९ ॥ मगसकळयवनमिळून ॥
रायासिसांगतीवर्तमान ॥ कींलतिबशाहश्रीरामभजन ॥ करीतसेअहर्निशीं ॥ १८० ॥ अविंधराजाअविवेकीबहुत ॥ ॥ ६ ॥
तेणेंछळणासिपाठविलेदूत ॥ कींलतिबशाहाचाआश्रमत्वरित ॥ लुटोनिफस्तकरावा ॥ ८१ ॥ राजआज्ञाहोतांचिदेख ॥

१ शेंगाच्या गोवऱ्या. २ समृद्धि, वाढ. ३ अहोरात्र, रात्रंदिव. ४ सेवा. ५ यवन बादशहा. ६ अविचारी.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्काळधांवलेसकळसेवक ॥ परीतयाचेदर्शनेंशांतिसुख ॥ पावलेसकळिकतेसमयीं ॥ ८२ ॥ अनुतापजाहलात्यांचेचि
त्ता ॥ ह्मणतीराजसेवानकरावीआतां ॥ श्रवणकरितीभगवद्गीता ॥ तथेंचनिरंतरअसावें ॥ ८३ ॥ राजाविस्मितमनक
रून ॥ ह्मणेकोणीचनयेतीपरतोन ॥ तरीआपणचिनिजांगेंजाऊन ॥ करूंछळणतयाचें ॥ ८४ ॥ बादशाहयेतोछळणे
लागूनी ॥ हावृत्तांतकळलायाचेमनीं ॥ मगभागवताचेंपुस्तककाढोनी ॥ वृंदावनींबैसला ॥ ८५ ॥ भोंवतेप्रेमळभावि
कसज्जन ॥ श्रवणकरितीआवडीकरून ॥ तंवइतक्यांतअविंधराजालवरेंकरून ॥ बैसलायेऊनत्याठायीं ॥ ८६ ॥ सभों
वतेंपाहेतेवेळ ॥ तोंसारवूनकेलेंस्थळनिर्मळ ॥ भोंवतीसुगंधपुष्पपरिमळ ॥ मध्येंतुळसीवृंदावन ॥ ८७ ॥ चुनेगच्चीनि
तळकेल्याभिंती ॥ त्याजवरीचित्रेंलिहिलींनिगुती ॥ दशावतारांच्याआकृती ॥ काढिल्याअसतीतयावरी ॥ ८८ ॥ आ
णिकतीर्थेंक्षेत्रेंपुरी ॥ लिहिलींअसतीतयावरी ॥ वैकुंठकैलासकाढोनिकुसरीं ॥ रंगकरारीदीधला ॥ ८९ ॥ ऐसेंस्थळदे
खोन ॥ अविंधजाहलासेक्रोधायमान ॥ मगछळणाचाउपक्रम ॥ काढिताजाहलातेधवां ॥ १९० ॥ राधिकाकृष्णवृंदाव
नीं ॥ लिहिलींहोतींचितान्यांनीं ॥ राधेनेंहातींविडाघेऊनी ॥ देतसेवदनींकृष्णाचे ॥ ९१ ॥ लतिबशाहासीराजाबोलत ॥
हींउभयतांलिहिलींकोणयेथ ॥ तेंमजसांगावेंजीवरित ॥ ऐसेंबोलतसक्रोधें ॥ ९२ ॥ लतिबशाहबोलेवचन ॥ तींराधि
काकृष्णदोघेंजण ॥ तिचेहातींकायह्मणोन ॥ रायेंपुसिलेंतयासी ॥ ९३ ॥ विष्णुभक्तसांगेतयाप्रती ॥ विडाकरोनिकृ
ष्णासिदेती ॥ ऐसीऐकोनिवचनोक्ती ॥ अविंधचित्तींसंतापला ॥ ९४ ॥ मगह्मणेराधिकाविडादेत ॥ तरीतुझाकृष्णकां
नाहींखात ॥ ऐसीऐकतांचिमात ॥ प्रेमळभक्तऊठिला ॥ ९५ ॥ मगदोनीकरजोडूनियांजाणा ॥ कृष्णजीसभाकीतक
रुणा ॥ भक्तकैवारियाजगन्मोहना ॥ ऐकविज्ञापनाएकमाझी ॥ ९६ ॥ विडाघेऊनसद्भावेंसी ॥ राधिकाउभीतुझापा

१ कृतकर्माचा पश्चात्ताप. २ श्रीविष्णूचे दहा अवतार, मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, आणि कलंकी. ३ मोठ्या कुशलतेनें. ४ आरंभ. ५ गोष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सी ॥ तरीकृपाकरोनिहृषीकेशी ॥ निजमुखींघेयीकां ॥ १७ ॥ निजभक्ताचासप्रेमभाव ॥ देखोनितुष्टलादेवाधिदेव ॥ कौतुकदाखविलेंअपूर्व ॥ मायालाघवकरोनियां ॥ १८ ॥ कृष्णाचेंचित्रहोतेंलिहिलें ॥ त्याणेंतत्काळमुखपसरिलें ॥ राधिकेनेंविडातेवेळे ॥ मुखींचातलालवलाहीं ॥ १९ ॥ तेथेंसाक्षठेविलीकोणती ॥ विडाहोताराधिकेचेहातीं ॥ तोहिरवा रंगअवचितीं ॥ पुसोनगेलातेधवां ॥ २०० ॥ ऐसेंकौतुकदेखोन ॥ ऊतिबशाहासिकेलेंनमन ॥ ह्मणेधन्यतुझेंशुद्धभजन ॥ म्यांव्यर्थछळणकेलेंकीं ॥ १ ॥ ऐसेंह्मणोनतयाअवसरा ॥ राजागेलाआपुलेघरा ॥ निजभक्ताच्याकैवारा ॥ आलेआकाराश्रीपती ॥ २ ॥ अनंतभक्तअनंतचरित्र ॥ अनंतअवताराराजीवनेत्र ॥ महीपतित्याचाशरणागत ॥ गुणवर्णितकीर्तनीं ॥ ३ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ पंचपंचाशत्तमाध्याय रसाळहा ॥ २०४ ॥ ॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५५ ॥ ॥ ओव्या ॥ २०४ ॥ ॥ ७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीदीननाथायनमः ॥ जयवैकुंठवासीमनमोहना ॥ क्षीराब्धितनयेच्याप्राणजीवना ॥ अविनाशाकल्पद्रुमा ॥ पुरुषोत्तमापांडुरंगा ॥ १ ॥ कृष्णविष्णूसदाशिवा ॥ सकळजीवांचातूंविसांवा ॥ करुणाकरादेवाधिदेवा ॥ निजसौख्यठेवातूंएक ॥ २ ॥ तूंनिराधारीयांसिआधार ॥ प्राक्तनहीनांसिअतिउदार ॥ भक्तांसछळितांदुराचार ॥ निजांगेंकैवारतूंघेसी ॥ ३ ॥ तूंनिःसंगाचाअससीसंग ॥ निरपेक्षाच्यालागसीमाग ॥ भजनींप्रेमदेऊनिअभंग ॥ करिसीभवभंगदासांचा ॥ ४ ॥ तूंअनाथनाथदीनाचापाहुणा ॥ निर्बळासदेसीअभयदाना ॥ मूढमतीमीजगज्जीवना ॥ तरीग्रंथरचनाबोलवी ॥ ५ ॥ मागीलअध्यायाचेअंतीं ॥ लतिबशाहासिछळितांनृपती ॥ चित्रींचीलेपेंसजीवहोती ॥ सप्रेमभक्तीदेखोनी ॥ ६ ॥ आतांवैष्णवांमाजीनिधडावीर ॥ जोवैराग्यमंडपाचास्तंभथोर ॥ तोनिजभक्तसंतोबापवार ॥ चरित्रसादरपरिसात्याचें ॥ ७ ॥ घरींअश्वगजधनसंपता ॥ रायापासीअसेमान्यता ॥ एकतुकयाचेंकीर्तनऐकतां ॥ अनुतापचित्ताजाहला ॥ ८ ॥ ह्मणेमिथ्यासंसारमायाभ्रांत ॥ नरदेहतोहीनाशवंत ॥ आतांआपणकासयाव्यर्थ ॥ आयुष्यवायांदवडावें ॥ ९ ॥ संगतीससेनाहोतीकांहीं ॥ तेजवळबोलावूनिलवलाहीं ॥ शिंवंदीवारूनटाकिलीपाही ॥ ह्मणे आपुलालेठायींतुह्मींजावें ॥ १० ॥ मगबोलावूनद्विजांप्रती ॥ जवळीलसर्वलुटविलीसंपत्ती ॥ अश्वगजरथब्राह्मणांप्रती ॥ वांटोनियांटाकिले ॥ ११ ॥ चारहातवस्त्रफाटकेंजीर्ण ॥ तेंआपणकेलेंपरिधान ॥ उपाधिरहितहोऊन ॥ नामस्मरण करितसे ॥ १२ ॥ रांजणगांवसांडसांचें ॥ तेथेंअधिष्ठानहोतेंत्याचें ॥ वैराग्यठसावंतांचसाचें ॥ निर्लज्जनाचेकीर्तनीं ॥ १३ ॥ भीमरथीमुळामुठेचेसंगमाला ॥ त्याअरण्यांतबेटावरीजाऊनबैसला ॥ जैसापिंजऱ्यातूंनिशुकनिघाला ॥ जाऊनबैसलावृक्षावरी ॥ १४ ॥ जैसाभ्रमरलोभेंभुलत ॥ गुंतलाहोताकमळणीआंत ॥ कठिणमनकरूनिनिश्चित ॥ बा

१ लक्ष्मी. २ निर्दैव्यांचा साहाकारी. ३ हत्ती घोडेवगैरे दौलत. ४ पगार. ५ निःकाळजी. ६ पोपट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हेरनिघतअनुतापें ॥ १५ ॥ कांबहुतांदिवसांचाभुजंगअसे ॥ तोकांतटाकितांसतेजदिसे ॥ प्रपंचमायात्यजितांतैसें ॥
संतोबाबावासवाटलें ॥ १६ ॥ हावृत्तांतगावांतजाहलाश्रुत ॥ ऐकोनिलोकआश्चर्यकरित ॥ मातालोभेंआक्रंदत ॥ ह्मणे
कैसेंविपरीतजाहलें ॥ १७ ॥ सेनासंपत्तिलुटवूनिपाहीं ॥ पुत्रतोंजाहलाविदेही ॥ वडिलांचानावलौकिकपाहीं ॥ आतां
पिशुनतेहीहांसतील ॥ १८ ॥ मगसुनेसशिबिकेंतबैसवून ॥ लेववीलींअलंकारभूषणं ॥ ह्मणेतरुणस्त्रीसदृष्टींदेखोन ॥
येईलपरतोनप्रपंचीं ॥ १९ ॥ बेटावरीत्याशिवालयांत ॥ संताजीएकांतींस्मरणकरित ॥ तंवकांताबैसोनशिबिकेंत ॥
आलीअकस्मातत्याठायीं ॥ २० ॥ नेत्रउघडोनिकांतेसबोलत ॥ ह्मणेतूंकासयाआलीसयेथ ॥ आतांपरतोनिजाय
त्वरित ॥ उत्तरबहुतनबोलतां ॥ २१ ॥ पत्नीह्मणेतेअवसरीं ॥ मीतुह्मांपासूनिनव्हेंचिदूरी ॥ जळचरांहिउदधींसमां
डिलेंजरी ॥ तरीमगगतिदुसरीत्यांनाहीं ॥ २२ ॥ वृक्षाचेमुळींसालजडली ॥ कींसुवर्णांअंगींकांतिलागली ॥ तेकरीन
ह्मणतांवेगळाली ॥ वायांचबोलीअसत्य ॥ २३ ॥ तेवींपतिव्रताभर्त्याकारण ॥ टाकोनिजातांगतिकोण ॥ ऐकूनिकांते
चेंवचन ॥ संतोबाप्रतिवचनदेतसे ॥ २४ ॥ माझीतोंऐसीउदासवृत्ती ॥ तुजवस्त्रेंअलंकारबहुतअसती ॥ कांताह्मणतां
तुजप्रती ॥ लाजचित्तींवाटेना ॥ २५ ॥ जरीमनकरणेंअसेलकठिण ॥ तरीयाचकादेयींवस्त्रभूषण ॥ नाहींतरीसत्वर
उठोन ॥ आटोपीसदनआपुलें ॥ २६ ॥ ऐसीऐकोनिवचनोक्ती ॥ अनुतापजाहलाकांतेप्रती ॥ मगअलंकारसकळआपु
लेहातीं ॥ काढोनियांटाकिले ॥२७॥ दिव्यवस्त्रेंपरिधानहोतीं ॥ तींफेडूनटाकिलींझाडावरुतीं ॥ तेणेंचिंध्यादेवीप्रती ॥ सं
तोषचित्तींवाटला ॥ २८ ॥ संताजीपासींधोतरहोतं ॥ तेंअर्धफाडोनिदीधलेंतीतं ॥ उभयतांउदासहोऊनतेथ ॥ स्मरण
करीतबैसलीं ॥ २९ ॥ तोंप्रदीप्तजाहलाजठराग्न ॥ क्षुधेनेंव्याकुळजाहलाप्राण ॥ मगकांतेप्रतिबोलेवचन ॥ भिक्षेसजा

---

१ सर्प. २ पिल्यांमध्यें. ३ वैराग्यशील. ४ दुर्जन. ५ पालखींत. ६ बायको. ७ समुद्र. ८ परिणाम. ९ घर. १० नेसलेलीं. ११ भूक.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

णनगरांत ॥ ३० ॥ सालोमालोच्यापारगावांत ॥ सोयरेमित्रइष्टबहुत ॥ तरीआतांनिर्लज्जहोऊनितेथ ॥ जावेंत्वरित
त्याठाया ॥ ३१ ॥ ममतालावूंनिबोलतीजन ॥ तयासिनदेईप्रतिवचन ॥ आणिसगळीभाकरदेईलकोण ॥ तरीपदरीं
नघेणंसर्वथा ॥ ३२ ॥ अवश्यह्मणोनिप्राणनाथा ॥ सत्वरनिघालीपतिव्रता ॥ सांडोनिलौकिकलज्जाममता ॥ पारगां
वांतप्रवेशली ॥ ३३ ॥ भिक्षामागतांघरोघरीं ॥ कायबोलतीनरनारी ॥ सुकृतंकेलेंजन्मांतरीं ॥ तेंवैराग्यअंतरींठसाव
लें ॥ ३४ ॥ घरोघरींजाऊनित्वरित ॥ हरिविठ्ठलशब्दबोलत ॥ नयेचभिक्षाइतुक्यांत ॥ तरीजातपुढेंलगबगें ॥ ३५ ॥
तोंआपुलेननणदेचेघरीं ॥ अकस्मातगेलीतेअवसरीं ॥ हरिविठ्ठलह्मणोनिद्वारीं ॥ सादंघातलातेधवां ॥ ३६ ॥ तोंसंता
जीचीबहिणसाक्षात ॥ तेबाहेरधांवोनिआलीत्वरित ॥ गळांमिठीघालोनिरडत ॥ कायबोलतनिजमोहें ॥ ३७ ॥ ह्मणे
वहिनीतूंअतिसुकुमार ॥ लावण्यगुणेंअतिगंभीर ॥ परीएकाएकींचईश्वर ॥ कैसाक्षोभलाकळेना ॥ ३८ ॥ बैसलीहो
तीसशिबिकेंत ॥ आतांखडेरुततअसतीलबहुत ॥ टाकूनिभूषणेंलखलखित ॥ उदासवृत्तीधरिलीकां ॥ ३९ ॥ भर्जरी
वस्त्रेंत्यजोनजाण ॥ आतांनेसलीसफाटकेंजीर्ण ॥ सांडूनिघरचींपक्कान्न ॥ मागतीसकोरान्नघरोघरीं ॥ ४० ॥ मगदोन
रोटचाआणोनित्वरित ॥ त्यामाजीघातलेंसेगूळघृत ॥ आग्रहकरूनझोळींत ॥ तिणेंअकस्मातटाकिल्या ॥४१॥ देखो
निसंताजीचीकांतां ॥ ह्मणेइतुकेंअन्नकासयादेतां ॥ वृत्तांतकळतांप्राणनाथा ॥ क्षोभतीलतत्वतामजवरी ॥ ४२ ॥ येरी
सद्गदितहोऊनी ॥ ह्मणेमीमायेनेंदेतसेंसाजणी ॥ तरीआतांआश्रमासिजाऊनी ॥ बैसाभोजनींउभयतां ॥ ४३ ॥ तिणें
आपुलीशपथघालितां ॥ परतलीबंधूचीनिजकांता ॥ बेटांतयेऊनपतिव्रता ॥ ह्मणेभोजनप्राणनाथाकरावें ॥ ४४ ॥ भि
क्षामागोनिआणिलीहोती ॥ तेझोळीपुढेंठेविलीनिगुती ॥ तोंसगळयारोटचाअवचितीं ॥ दृष्टीसपडल्यातेधवां ॥ ४५ ॥

१ पुरुष व बायका. २ पुंण्य. ३ पूर्वजन्मीं. ४ अंतःकरण. ५ हाक. ६ पालखी. ७ जुनें. ८ सुकी भिक्षा. ९ तूप. १० स्त्री. ११ संताजीची बहीण.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हें देखोनि वैराग्यशीळ ॥ कांते सपुसे तेवेळ ॥ तिणें वृत्तांत सकळ ॥ सांगितला तयासी ॥ ४६ ॥ अनुतापें कांतेसि बोले का
यी ॥ परतोनि पारगांवास जायी ॥ जेथोनि मिष्टान्न आणिलें सपाही ॥ ज्याचें त्यास देई परतोन ॥ ४७ ॥ हें नायकसी ज
री वचन ॥ तरी सर्वथा मी न करीं भोजन ॥ देखोनि भ्रताराचें निर्वाण ॥ गेली परतोन त्याठायां ॥ ४८ ॥ नणदेसि वृत्तांत
सांगूनी ॥ भिंवरेपासी आली परतोनी ॥ तों अस्तमाना गेला तरणी ॥ काहूरें गगनीं दाटलें ॥ ४९ ॥ उगमीं पर्जन्य पड
ला फार ॥ तों अकस्मात सरितेसि आला पूर ॥ मनीं जाहली चिंतातुर ॥ ह्मणे कैसा विचार करावा ॥ ५० ॥ देवगुरू अथवा
भ्रतार ॥ ते पैलतीरीं राहिले दूर ॥ इकडे अंतरला संसार ॥ कर्म दुस्तर बळवंत कीं ॥ ५१ ॥ पदरीं सुकृत नसतां देवा ॥ भ्र
ताराची न घडे सेवा ॥ आतां धांव पाव गा केशवा ॥ ह्मणोनियां धांवा करीतसे ॥ ५२ ॥ ऐसें संकट देखोनि तेथ ॥ तत्काळ पा
वले पंढरीनाथ ॥ तारूचे रूपें दीननाथ ॥ काय बोलत तियेसी ॥ ५३ ॥ ह्मणे तूं कां बैसली सचिंतातुर ॥ पैलतीरीं असे संतो
बा पवार ॥ तेथवरं जाणें असेल जर ॥ तरी मी देतों उतार करूनी ॥ ५४ ॥ यावरी संतोबाची पत्नी ॥ काय बोले तारुवा लागू
नी ॥ मी तुझी धर्माची भगिनी ॥ तरी देयीं उतरोनि सत्वर ॥ ५५ ॥ ऐसें ऐकूनि श्रीहरी ॥ तिजला बैसविलें खांद्यावरी ॥ नि
मिष न लागतां पैलतीरीं ॥ नेऊनियां ठेविलें ॥ ५६ ॥ दुरूनि दाखवी पंढरीनाथ ॥ पैल संतोबा दिसत ॥ ऐसें वदोनि रुक्मि
णीकांत ॥ जाहले गुप्त तेठायीं ॥ ५७ ॥ भ्रतारापासी जातां त्वरित ॥ सांगितला सकळ वृत्तांत ॥ ह्मणे तुज भेटला वैकुंठना
थ ॥ आणि माझा कां अंत पाहातसे ॥ ५८ ॥ तरी न होतां श्रीहरिदर्शन ॥ मी सर्वथा न सेवीं अन्न ॥ ऐसा निश्चयें केला प
ण ॥ सत्य जाण निजकांते ॥ ५९ ॥ दुसरे दिवसीं पारगावांत ॥ एक वाणी होता भाविक भक्त ॥ तयासि स्वप्नीं पंढरीनाथ ॥
आज्ञा करीत तें ऐका ॥ ६० ॥ आपुले घरीं पक्कान्नें करून ॥ संतोबासि घालीं भोजन ॥ तुझे पदरीं सुकृत जाण ॥ ह्मणोनि द

---

१ रागानें. २ शेवटचें कठिनोत्तर. ३ सूर्य. ४ काळोखी, अंधकार. ५ नदीचे उगमाजवळच्या प्रदेशांत. ६ नदीस. ७ पुण्य. ८ नावाड्याचें रूप धरून. ९ भक्तिमान. १० पुण्य.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

र्शनदीधलेंम्या ॥ ६१ ॥ चमत्कारदेखोनिअद्भुत ॥ वाणीतत्काळजाहलाजागृत ॥ घरींपक्वान्नेंकरूनित्वरित ॥ घेऊनि
जातसंतोबापासी ॥ ६२ ॥ सांगीतलासकळवृत्तांत ॥ ह्मणेमजआज्ञापीपंढरीनाथ ॥ भोजनकरावेंजीत्वरित ॥ ह्मणो
निलागतचरणासी ॥ ६३ ॥ यावरीसंतोबाभक्त ॥ ह्मणेतुजभेटलारुक्मिणीकांत ॥ आणिमाझेपदरींकायदुरितें ॥ ह्म
णोनिअंतपाहातसे ॥ ६४ ॥ तरीनहोतांश्रीहरीचेंदर्शन ॥ मीनसेवींकदापिअन्न ॥ ऐसानिश्चयदेखोन ॥ वाणीपरतो
नचालिला ॥ ६५ ॥ कलियुगींअन्नमयप्राणह्मणत ॥ परीत्याचानिश्चयअघटित ॥ अंतरजाणोनिरुक्मिणीकांत ॥
भेटलेसाक्षातयेऊनी ॥ ६६ ॥ यावरीरांजणगांवांत ॥ संतोबानित्यभिक्षेसिजात ॥ तेथेंएकब्राह्मणहोताअभक्त ॥
तोअखंडभांडतकांतेसी ॥ ६७ ॥ आपणचिकाढूनिकुरापत ॥ कलहकरितनित्यनित्य ॥ कांताजरीकांहींउत्तरदेत ॥
तरीभयघालिततियेसी ॥ ६८ ॥ ह्मणेसंतोबापवाराऐसा ॥ मीवैरागीहोईनतैसा ॥ मगतुझीहोईलदुर्दशा ॥ मीसंसार
आशाटाकीन ॥ ६९ ॥ ऐसेंबाह्यात्कारेंबोलोनिदावित ॥ ब्राह्मणकांताउगीचराहात ॥ जैसाकोल्हाटीशस्त्रझाडीत ॥ अं
गींशूरत्वनसतांची ॥ ७० ॥ कींअंगींनसतांगर्भच्छाया ॥ वंध्याडोहळेसांगतसेवाया ॥ कींपर्जन्याविणेंमेघाचीछाया ॥
गर्जनावायांआकाशीं ॥ ७१ ॥ कींह्रदयावरीनसतांकुचॉकुनी ॥ हिंजडेस्त्रियांचाआकारदाविती ॥ नातरीछत्रसिंहास
ननसतांहातीं ॥ बहुरूपीहोतीनृपवर ॥ ७२ ॥ तेवींचित्तींनसतांशांतिविरक्ती ॥ जेवैराग्याच्यागोष्टीसांगती ॥ त्यां
सिप्रपंचींनापरमार्थी ॥ नाहींगतीदोहींकडे ॥ ७३ ॥ असोआतांतोब्राह्मणपाहे ॥ कांतेसिअखंडदाखवीभये ॥ येरी
चिंताक्रांतहोये ॥ उगीचराहेतेसमयीं ॥ ७४ ॥ तोंएकेदिवसींसंतोबाभक्त ॥ अंगणींभिक्षेसिआलेत्वरित ॥ तिणेसाकं
ल्येंवृत्तांत ॥ तयाजवळींसांगीतला ॥ ७५ ॥ ह्मणेस्वामीघरधनीपिसा ॥ होईनह्मणेतुह्माऐसा ॥ यासउपायकरावाकें

१ पाप. २ ह्रदय. ३ कज्या, भांडण. ४ स्तन. ५ नपुंसक असून स्त्रीचा वेष धारण करणार. ६ एकंदर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सा " सांगालतैंसाऐकेनमी ॥ ७६ ॥ विष्णुभक्तउत्तरदेतीतिसी ॥ तोजेव्हांभांडणकरीलतुजसीं ॥ मगटाकीसांडदेऊनि
तयासी ॥ पाठवींमजपासीसत्वर ॥७७॥ मगकांहींमंत्रोपदेशसांगोन ॥ करूनदेईनतुजस्वाधीन ॥ जैसादर्वेशीमाकडा
कारण ॥ हिंडेघेऊनघरोघरीं ॥ ७८ ॥ अवश्यह्मणोनितयेक्षणीं ॥ ब्राह्मणकांतालागलीचरणीं ॥ संतोबाभिक्षाघेऊनी ॥ ॥९६॥
गेलेआश्रमींआपुल्या ॥ ७९ ॥ तोंनिमेषनलोटतांचिसत्वर ॥ बाहेरूनिआलातिचाभ्रतार ॥ ह्मणेस्वयंपाकासिकांलावि
लाउशीर ॥ क्षुधातुरमीजाहलों ॥ ८० ॥ मीसंसाराचात्यागकरितों ॥ संतोबापंवाराऐसाहोतों ॥ मगचित्तासियेईलते
थेंजातों ॥ वादंघालितऐशारीतीं ॥ ८१ ॥ कांतादेतप्रत्युत्तर ॥ आतांकासयाकरितांउशीर ॥ जैसाजाहलासंतोबापंवार
होईसत्वरत्याऐसा ॥ ८२ ॥ ऐकोनिपत्नीचेंवचन ॥ विचारींपडलातोब्राह्मण ॥ ह्मणेआंताकासयाठेवावेंजिण ॥ सक्रोध
मनजाहला ॥८३॥ धोत्रेंताब्याघेऊनसत्वर ॥ लवलाहें गेलाबेटावर ॥ संतोबासीबोलेप्रत्युत्तर ॥ टाकूनिसंसारमीआलों
॥ ८४ ॥मीतुह्माऐसाजाहलोंनिश्चितीं ॥ आतांकदांपिनसोडींतुमचीसंगती ॥ अनुग्रहकरूनमजप्रती ॥ लावापरमार्थी
आपुलया ॥ ८५ ॥ अवश्यह्मणेविष्णुभक्त ॥ आह्मांअनायासेंलाधलीसंगत ॥ तुजऐसावैरागीविरक्त ॥ नाहींदिसतत्रि
भुवनीं ॥ ८६ ॥ आतांभोंपळाघेऊनिआपुल्याहातं ॥ उदकआणूनिदेयीमातं ॥ वस्त्रपागोटेंठेवींयेथ ॥ तस्करबहुत
जपताती ॥ ८७ ॥ अवश्यह्मणोनिउठाउठी ॥ ब्राह्मणगेलासरितेकांठी ॥ क्षुधाबहुतलागलीपोटीं ॥ ह्मणोनिकष्टीहो
तसे ॥ ८८ ॥ तोंमागेंवस्त्रेंफाडोनिसत्वरीं ॥ चिंध्याघातल्याबोरांटीवरी ॥ तांब्याझोंकिलाडोहाभीतरीं ॥ तोंब्राह्मणस
त्वरींपातला ॥ ८९ ॥ संतोबाह्मणेत्याकारण ॥ परिधानकरीआडबंदकौपीनं ॥ ब्राह्मणेंसंकोचमनहोऊन ॥ धोतरफे
डोनटाकिलें ॥ ९० ॥ मगनेसोनियांलंगोटी ॥ विष्णुभक्तासिपुसेगोष्टी ॥ क्षुधाबहुतलागलीपोटीं ॥ प्राणकंठींधरिला ॥ ३ ॥

१ जा ह्मणून सांग. २ धाक, भिति. ३ उपदेश. ४ चोर. ५ नदीवर. ६ बोरवृक्षावर. ७ लंगोटा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्यां ॥ ९१ ॥ मगनेपतींतरटेंतोडोनिलवरित ॥ कांतेसहबैसलेखात ॥ ब्राह्मणह्मणेहेंकडूबहुत ॥ नाहींभावतमजलागीं ॥ ९२ ॥ संतोबाउत्तरदेततया ॥ आतांरसनाविषयपाहिजेकासया ॥ तुवांसर्वत्यागकरूनियां ॥ आलासिलवलाह्या मजपासीं ॥ ९३ ॥ तरीकांहींशीतळदेतोंतुजकारण ॥ तेणेंचकरीक्षुधाहरण ॥ ऐकोनिसंतोबाचेंवचन ॥ संतोषयुक्तजाहला ॥ ९४ ॥ मगनिंबतोडोनिआपुल्याहातं ॥ सुखेंखातबैसलातेथ ॥ विप्रह्मणेमाझेंसंचित ॥ बरवेंदिसतनाहींकीं ॥ ९५ ॥ खाऊनवोल्याकोरड्याभाकरी ॥ सुखेंहोतोंआपुलेघरीं ॥ परीमाझीबुद्धिअघोरी ॥ प्रपंचमाघारींटाकिला ॥ ९६ ॥ स्फुंदोनिहळूचकरीरुदन ॥ ह्मणेआतांउपायकरावाकवण ॥ शीतलागेअंगासिदारुण ॥ पोटींक्षुधेनपीडिलें ॥९७॥ अंतरींचीअवस्थाजाणोनिऐसी ॥ संतोबापुसोंलागलेत्यासी ॥ तूंसंसारींहोऊनिउदासी ॥ कशास्तवआलासीया ठायां ॥९८॥ येरूह्मणेफुटलेंप्राक्तन ॥ वायांचिकांतेसिकेलेंभांडण ॥ मगउदासहोऊनिमन ॥ तुह्मापासीपातलों ॥९९॥ तोंतुमचीसंगतबहुतकठिन ॥ वस्त्रेंहीटाकिलींफाडोन ॥ आतांघरासिजावयापरतोन ॥ तरीलज्जामनींवाटत ॥ १०० ॥ तथापिरात्रींगेलोंपाही ॥ तरींकांतायेऊंदेणारनाहीं ॥ ह्मणेललंगोटबंदगोसांवी ॥ कोणआलाकळेना ॥ १०१ ॥ ऐकोनिह्मणेविष्णुभक्त ॥ तूंकातेसिअखंडह्मणत ॥ कींसंतोबासारिखाविरक्त ॥ होऊनिअरण्यांतजाईनमी ॥ २ ॥ ऐसेंआजपासोनिह्मणसीलजरी ॥ तरीशपथवाहेयेअवसरीं ॥ मगतुजलानेऊनघालितोंघरीं ॥ कोणासिबाहेरीनकळतां ॥ ३ ॥ येरूतत्काळधरीचरण ॥ ह्मणेजरीमीकांतेसिकरीनभांडण ॥ तरीमाझीजिव्हाजाईलझडोन ॥ वाहातिसेंआणदेवाची ॥ ४ ॥ मगरात्रींउठोनिसंतोबाभक्त ॥ द्विजाचेघरासिगेलात्वरित ॥ त्याचेकांतेसिवृत्तांत ॥ कायसांगतएकांतीं ॥५॥ आह्मीमंत्रदीक्षादेऊन ॥ भ्रतारकेलातुझेस्वाधीन ॥ आतांचिदेतोंपाठवून ॥ तरीतयासिभांडणनकरावें ॥ ६ ॥ लंगोटीनें

---

१ निर्जिव, वाळलेलीं कांडी. २ आवडत. ३ जिभेस चव. ४ थंडी. ५ दैव, कपाळ. ६ गळून.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सूनयेईलयेथें ॥ तरीवस्त्रसत्वरींदेयीत्यातें ॥ ऐशीऐकूनियांमात ॥ संतोषेचित्ततियेचें ॥ ७ ॥ इतुकेंसांगोनितेवेळा ॥ पर
तोनिआलाआपुल्यास्थळा ॥ ब्राह्मणातेंवृत्तांतसांगीतला ॥ आतांजावेंवहिलाघरासी ॥ ८ ॥ जरीकांतेसिकलहकरिसी
लकांहीं ॥ तरीमजऐसावाईटनाहीं ॥ येरूमस्तकठेवूनिपायीं ॥ निघेलवलाहींसत्वर ॥ ९ ॥ गांवांतप्रवेशलाअंधारांत ॥
ह्मणेकोणीदेखेलअकस्मात ॥ ह्मणेब्राह्मणांसकळतांवृत्तांत ॥ घालितीलवाळितमजलागीं ॥ १० ॥ यास्तवलगबगेंभेणें
भेणें ॥ प्रवेशलाआपुलेंसदन ॥ तैंपासोनिकांतेसीभांडण ॥ नकरीजाणसर्वथा ॥ ११ ॥ यावरीसंतोबाआषाढमासीं ॥ पंढ
रीसिचालिलायात्रेसी ॥ जैसीकन्याजातांमाहेरासी ॥ उल्हासमानसींतियेच्या ॥ १२ ॥ तैशारीतींवैष्णवभक्त ॥ सप्रेमभ
रींगातनाचत ॥ समागमेंयात्राबहुत ॥ दोनसहस्त्रमिळाली ॥ १३ ॥ आषाढशुद्धदशमीससत्वरा ॥ वारकरीआलेनरसिंह
पुरा ॥ जेथेंएकवटनीराभिंवरा ॥ संगमजाहलादोहींचा ॥ १४ ॥ आषाढमासपर्जन्यकाळ ॥ नदीसपुरआलातुंबळ ॥
पात्रटाकूनिचालिलेंजळ ॥ देखोनिसकळचिंतावले ॥ १५ ॥ ह्मणतीआजिनहोतांनदीपार ॥ उदयीकनाटोपेपंढरपुर ॥
एकादशीसरुक्मिणीवर ॥ दर्शननेदीचसर्वथा ॥ १६ ॥ ऐसेंह्मणोनितेअवसरीं ॥ यात्रासर्वआलीऐलतीरीं ॥ ह्मणतीएक
नावअसतीजरी ॥ तरीउतरूनजातोंसत्वर ॥ १७ ॥ हेंदेखोनिसंतोबाभक्त ॥ आपुलेमनींविचारकरित ॥ ह्मणेदेहाचीआ
स्थाधरितांनिश्चित ॥ तरीकैसाभगवंतभेटेल ॥ १८ ॥ तरीतारितामारिताश्रीहरी ॥ ऐसानिश्चयकरूनिअंतरीं ॥ उदकीं
प्रवेशोनिसत्वरीं ॥ चरणेंचालींचालिले ॥ १९ ॥ विष्णुभक्तभाविकप्रेमळ ॥ तयासिबुडवूंनशकेजळ ॥ पोटऱ्याइतुकेंचकेवळ
उदकजाहलेंतयासी ॥ २० ॥ विणाघेऊनितेअवसरीं ॥ संतोबानामस्मरणकरी ॥ सरितेवरूनिझडकरी ॥ जातेजाहलेते
धवां ॥ २१ ॥ हेंनवलपाहतांतेसमयीं ॥ सकळयात्रेकरूबोलतीकायी ॥ आह्मांसांडोनियेथेंपाही ॥ जातांकैसेपैलतीरा ॥

१ पहिल्यानें. २ भीत भीत. ३ मिलाफ. ४ मोठा. ५ आशा. ६ पायांनें. ७ नदीवरून.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ २२ ॥ आपणकेवळईश्वरमूर्ती ॥ ह्मणूनिआलोंतुमचेसंगतीं ॥ परीप्राक्तनाचीविचित्रगती ॥ नाहींसंचितींआमुच्या
॥ २३ ॥ अनुपममहिमाऐकिलाबरा ॥ ह्मणवोनिचालिलोंपंढरपुरा ॥ आतांपरतोनिमाघारां ॥ जातोंआह्मींसकळिक
॥ २४ ॥ ऐकोनियात्रेकऱ्यांचीमात ॥ उभेठाकलेजळाआंत ॥ मगउभारूनियांहात ॥ कायबोलततेऐका ॥ २५ ॥ स
कळवर्णांचेनारीनर ॥ चतुष्पदआणिलहानथोर ॥ कांहींचनकरितांविचार ॥ यावेंसत्वरमजमागें ॥ २६ ॥ भयनधरा
वेंचित्तांत ॥ तुह्मांसितारीलपंढरीनाथ ॥ ऐसीऐकूनियांमात ॥ संतोषेचित्तसकळांचें ॥२७॥ ह्मणतीसंतोबाचालिलेपंढरी
सी ॥ घोंटचाइतुकेंचिउदकजाहलेंत्यांसी ॥ आपणजाऊंतयासरसीं ॥ ऐसेंह्मणतीएकमेकां ॥२८॥ अश्वावरीवोझींघा
लून ॥ यात्राउठिलीनलागतांक्षण ॥ एकापुढेंएककरितीगमन ॥ सरितेजवळीपातले ॥ २९ ॥ हेंजाणूनिपंढरीनाथ ॥
विचारकरीचित्तांत ॥ नदीसपूरआलाबहुत ॥ बुडतीलसमस्तजळामाजी ॥ १३० ॥ संतोबातरलानामधारक ॥ तरी
त्याजऐसेनाहींसकळलोक ॥ जेवींकाष्ठह्मणोनिपाषाणदेख ॥ उदकींटाकितांबुडतीलकीं ॥ ३१ ॥ आपणनकरितांयां
चेंधांवण ॥ तरीभक्ताचेंहोईलअसत्यवचन ॥ यात्राजळांतबुडतांजाण ॥ तरीघेतीलदर्शनकोणमाझें ॥ ३२ ॥ आणिमा
गीलसंतांचेंवचन ॥ असत्यमानितीलविचक्षण ॥ ऐसेंह्मणोनिजगज्जीवन ॥ कायकरितेजाहले ॥ ३३ ॥ पाठीवरया
त्राउतरावीसर्व ॥ ह्मणोनिकांसवजाहलेदेवाधिदेव ॥ ज्याचेनिआधारेंसकळजीव ॥ ब्रह्मांडामाजीराहटती ॥ ३४ ॥
नदीचेंपात्ररुंदहोत ॥ तेवढेजाहलेरुक्मिणीकांत ॥ निजदासांचेजगन्नाथ ॥ चुकवीआघातनानापरी ॥ ३५ ॥ ब्रह्मादि
कांपूज्यजगजेठी ॥ ज्यासिअंतरींजपतोधूर्जटी ॥ तेणेंयात्रेकऱ्यांसिदीधलीपाठी ॥ हेअपूर्वगोष्टीमजवाटे ॥ ३६ ॥ अ
सोइकडेनारीनर ॥ अठरावर्णांचेलहानथोर ॥ करीतहरिनामाचागजर ॥ एकदाचिसत्वरचालिले ॥ ३७ ॥ अश्ववृषभ

१ करुणावचन,गोष्ट. २ वागताल. ३ शंकर. ४ घोडा. ५ बैल.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

भआणिखरं ॥ वोझेंघालोनितयांवर ॥ वैष्णवकरितकीर्तनगजर ॥ उदकामाजीप्रवेशले ॥ ३८ ॥ तोंघोंटचाइतुकेंच
लागलेंपाणी ॥ सकळांसिआश्चर्यवाटलेंमनीं ॥ ह्मणतीआपणउगेचकोंडोनी ॥ राहिलोंहोतोंअलीकडे ॥ ३९ ॥ एक
आनंदेंटाळयापिटिती ॥ ह्मणतीधन्यसंतांचीसंगती ॥ संतोषमानूनिऐशारीतीं ॥ पैलतीरींउतरले ॥ १४० ॥ परीकू
र्मरूपधरूनितारिलेंदेवें ॥ हेंनपडेचिकोणाप्रतिठावें ॥ विचित्रमायेनेंसकळजीव ॥ मोहभ्रमांतपाडिले ॥ ४१ ॥ मग
यात्रेसहितवैष्णवभक्त ॥ पंढरपुरासिगेलेत्वरित ॥ स्नानकरूनिचंद्रभागेंत ॥ कीर्तनकरीतसप्रेमें ॥ ४२ ॥ माहाद्वारा
सिजाऊन ॥ सकळघालितीलोटांगण ॥ देवासिदेऊनिआलिंगन ॥ वंदिलेचरणसद्भावें ॥ ४३ ॥ संतोबाह्मणेगाश्रीह
री ॥ तूंभक्तांरक्षिसीनानापरी ॥ तुझीकीर्तिवर्णितांबरी ॥ शेषाचीवैखरीशिणलीकीं ॥ ४४ ॥ कांसवरूपधरूनिदेवा ॥
पाठीवरतारिलेंजडजीवां ॥ आतांमजचरणींठावद्यावा ॥ ऐसेंसंतोबाविनवित ॥ ४५ ॥ ऐसेंऐकोनिदीनदयाळ ॥ ह्मां
सोंलागलेतयेवेळ ॥ ह्मणेतूंमाझाभक्तप्रेमळ ॥ राहेसर्वकाळमजपासीं ॥ ४६ ॥ आणिककथारसाळपुढती ॥ सादरऐ
किजेसभाग्यश्रोतीं ॥ निळोबाचीदेखोनिभक्ती ॥ पावलेश्रीपतीत्यालागीं ॥ ४७ ॥ ज्याच्यातुकारामयेऊनिस्वप्नीं ॥
उपदेशदिधलाकृपाकरूनी ॥ त्याचेंचरित्ररसाळवाणी ॥ ऐकाश्रवणींभाविकहो ॥ ४८ ॥ नेणेंमानदांभिकपण ॥ सद्भा
वेंकरीहरिकीर्तन ॥ पुरातनसंतांचींवचनेंबोलून ॥ संतचरित्रेंवर्णावीं ॥ ४९ ॥ मुलेंलेंकुरेंसर्वअसती ॥ परिमीमाझीहीं
नाठवेचित्तीं ॥ सहजमिळेलजेंअयाचितवृत्तीं ॥ त्यांतहीअतिथीपुजावा ॥ १५० ॥ तंवकोणेएकेदिवसींजाण ॥ घरीं
मांडिलेंकन्येचेंलग्न ॥ सोयरेदांभिकअभक्तपूर्ण ॥ घरींसामग्रीनसेकिंचित ॥ ५१ ॥ कांताह्मणेतयाप्रती ॥ तुमचीऐ
सीउदासवृत्ती ॥ शेवटींपिशुनांतहोईलफजिती ॥ ऐसेंमजप्रतिभासतसे ॥ ५२ ॥ ऐसेंजाणोनियांजगज्जीवन ॥ आ

१ गर्दभ. २ कासवरूप. ३ चतुर्विध वाचेंतील चौथी वाचा. ४ न मागतां. ५ दुर्जन; निंदक लोकांमध्यें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पणजाहलेंवृद्धब्राह्मण ॥ वस्त्रफाटकेंनेसोनिजीर्ण ॥ आलेसत्वरत्याठाया ॥ ५३ ॥ दुसरेंउपवस्त्रखांद्यावरी ॥ किंचित सामग्रीत्याचेपदरीं ॥ निळोबासीतिअवसरीं ॥ येऊनिकायबोलत ॥ ५४ ॥ मीनिर्मळब्राह्मणआहेंदीन ॥ सामग्रीकिंचितआलोंघेऊन ॥ तयाचास्वयंपाककरून ॥ घालावेंभोजनमजलागीं ॥ ५५ ॥ विप्रासिनमनकरूनियां ॥ ह्मणे तुमचीसामग्रीपाहिजेकासया ॥ आतांदेवासिनैवेद्यदावूनियां ॥ प्रसादध्यावाएथेंची ॥ ५६ ॥ यावरीकायबोलेश्री हरी ॥ आमचीइच्छामिष्टान्नावरी ॥ तरीपूर्णगर्भांकरूनिसत्वरीं ॥ भोजनपोटभरीघालावें ॥ ५७ ॥ निळोबाकांतेंसिसांगतपाही ॥ ब्राह्मणाचीसामग्रीठेवी ॥ आणिस्वयंपाककरूनियेसमयीं ॥ भोजनलवलाहींघालावें ॥ ५८ ॥ अवश्यह्मणोनितेअवसरीं ॥ सिधाघेतलाआपुलेपदरीं ॥ ह्मणेहेतोंकिंचितसामग्री ॥ कैसापोटभरीजेविशितूं ॥ ५९ ॥ यावरीह्मणेरुक्मिणीकांत ॥ हेटाकीलग्नाचियेसामग्रींत ॥ आणितूंआपुलेंघेऊनिलारित ॥ मजक्षुधितासीतृप्तकरी ॥ १६० ॥ आणिमाझेंसाहित्यनाहींघेत ॥ तरीमीसर्वथानजेवींयेथ ॥ वचनऐकोनिप्रेमळभक्त ॥ कायबोलतकांतेसी ॥ ६१ ॥ एकाब्राह्मणाकारण ॥ भोजनघालितांसंकटकोण ॥ आतांसत्वरस्वयंपाककरून ॥ करीसमाधानविप्राचें ॥ ६२ ॥ मग ह्मणेरुक्मिणीकांत ॥ स्वयंपाकाशिंउशीरहोईलबहुत ॥ तरीअन्ननिपजलेंप्रस्तुत ॥ तेंभक्षूंत्वरितनिजप्रीतीं ॥ ६३ ॥ तेव्हांनिजभक्ताचेपंक्तीस ॥ प्रीतीनेंजेविलेजगन्निवास ॥ रात्रींबैसूनियांस्वस्थमानस ॥ निळोबाबावासबोलती ॥ ६४ ॥ उदयीकतुमचेघरींलग्न ॥ उदकआणावयासिनाहींब्राह्मण ॥ जरिठेवालमजकारण ॥ तरीमिष्टान्नभोजनकरीनमी ॥ ६५ ॥ आणिईश्वरप्रीत्यर्थतुमचेरांजणीं ॥ घालीनच्यारघागरीपाणी ॥ अवश्यह्मणोनितयेक्षणीं ॥ निळोबाचरणीं लागला ॥ ६६ ॥ दुसरेदिवसींप्रातःकाळीं ॥ सत्वरउठोनिवनमाळी ॥ कोणासिनकळतांतेवेळीं ॥ सडासंमार्जनपैंकेलें

१ जउर. २ शीघ्र, सत्वर. ३ घर झाडून सारवून स्वच्छ.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ६७ ॥ तोंवऱ्हाडीघेऊनपांचशत ॥ वरबापआलाअकस्मात ॥ सीमांतपूजाकरूनिलरित ॥ जांनवसांतराहिले ॥ ६८ ॥
साहित्यासिआलेजगज्जीवन ॥ ह्मणोनिसर्वथानपडेचिउण ॥ कल्पतरूचेछायेसिबैसतांजाण ॥ तरींउपवासीकोण
राहील ॥ ६९ ॥ भांस्करघरींआलापाहुणा ॥ तरीअंधारसर्वथापडेना ॥ गंगास्वयमेवबैसलीरांजणा ॥ तरीतों
उणेंजीवनानव्हेकीं ॥ १७० ॥ मेघचिनिजांगेंघालीसडा ॥ मगराहीलजागाकैसाकोरडा ॥ कींगजवदनेंघालोनि
दीधलाधडा ॥ तरीविद्यार्थीवेडानव्हेकीं ॥ ७१ ॥ विधांतयानेंचदीधलेंसुंदरपण ॥ तेथेंसामुद्रिकांतनयेचिउण ॥ ना
तरीसरस्वतीनेंकेलेंलेखन ॥ तेथेंनचुकेव्यंजनसर्वथा ॥ ७२ ॥ तेवींलग्नाआलेहृषीकेशी ॥ तरीउणेंनपडेसाहित्यासी ॥
कावडीघेऊनिखांद्यासी ॥ उदकतांतडीशीवाहतसे ॥ ७३ ॥ ब्राह्मणशिधाटाकिलाकोठींत ॥ तेणेंतेसामग्रीजाहलीबहु
त ॥ पांचशेंमनुष्यनित्यजेवित ॥ परीतेनसरेसर्वथा ॥ ७४ ॥ कामाचीहोतांआडांडी ॥ सामग्रीदेतअतितांतडी ॥ उ
च्छिष्टेंकाढूनिलवडसर्वंडी ॥ अंगणझाडीअतिवेगें ॥ ७५ ॥ जेवित्यापदार्थपडतांन्यून ॥ आणोनिवाढीजगज्जीवन ॥ सो
यऱ्यांसविनवीकरजोडून ॥ कींस्वस्थभोजनकरावें ॥ ७६ ॥ निळोबाआश्चर्यकरिमनांतून ॥ ह्मणेहाब्राह्मणफारसज्ज
न ॥ सर्वस्वींनिभावलेंप्रयोजन ॥ पडोंनेदीउणंसर्वथा ॥ ७७ ॥ मगह्मणेप्रेमळभक्त ॥ तुह्मीकार्यासिपडलांबहुत ॥ त
रीआपुलेंनामाभिधाननिश्चित ॥ सांगावेंत्वरितआह्मासी ॥ ७८ ॥ यावरीह्मणेजगज्जीवन ॥ विठोबामाझेंनामाभिधा
न ॥ च्यारीदिवसमिष्टान्नभोजन ॥ यथेच्छजेविलोंतुमचेघरीं ॥ ७९ ॥ निळोबाविचारीमानसीं ॥ कींयाचाउपकारन
फिटेमजसी ॥ परीएकवस्त्रजातेसमर्पीयासी ॥ मनोभावेंसीअर्पावें ॥ १८० ॥ असोविप्रवेषघेऊनितयाचेघरीं ॥ पां
चदिवसहोतेश्रीहरी ॥ निजांगेंकष्टनानापरी ॥ भक्तांघरींकरीतसे ॥ ८१ ॥ वऱ्हाडबोळवूनसाहावेदिवसीं ॥ निळोबा ॥ ६ ॥

१ ठोजारघरांत. २ सूर्य. ३ स्वतः, प्रत्यक्ष. ४ ब्रह्मदेवानें. ५ धांदल. ६ कौतुकानें. ७ श्रमकार्य. ८ उपयोगीं.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आलेमंदिरासी ॥ तयासवेंचहृषीकेशी ॥ घरासिआलेतेधवां ॥ ८२ ॥ देवघरांतसवेंदेखतगेले ॥ निमिषनलागतांअ
दृश्यजाहले ॥ निळोबाह्मणेविठोबासर्वंहिलें ॥ पाचारावेंयेसमर्थी ॥ ८३ ॥ कोराशेलाघेऊनित्वरित ॥ ह्मणेत्यासिपां
घरवूंएवढेंवस्त्र ॥ विठोबाह्मणोनिहाकामारित ॥ तोंराजीवनेत्रदिसेना ॥ ८४ ॥ इतुक्यांतसमजलेचित्तांत ॥ ह्मणेम्यां
कष्टविलापंढरीनाथ ॥ जळोयाप्रपंचाचीसंगत ॥ घडलेंविपरीतआजिबहु ॥ ८५ ॥ मगस्वप्नांतयेऊनिरुक्मिणीवर ॥
निळोबाचेमस्तकींठेविलाकर ॥ कींमीकटावरीठेऊनिकर ॥ राहेंनिरंतरतुजपासी ॥ ८६ ॥ त्याचेभक्तीस्तवश्रीहरी ॥
अद्यापिआहेतपिंपळनेरीं ॥ फाल्गुनवद्यद्वितीयेसिनिर्धारीं ॥ महोत्साहगजरींहोतसे ॥ ८७ ॥ आणिकएकचरित्र
साळगहन ॥ धारुरकरउद्धवचिद्घन ॥ तेसप्रेमकरितांकीर्तन ॥ देशावरासीचालिले ॥ ८८ ॥ जयांचींपदपदांतरेंबहु
त ॥ अनुभवरसिकजडावअद्भुत ॥ प्रेमळविरक्तभाविकभक्त ॥ भजनींरतजाहलाअसे ॥ ८९ ॥ तंवएकदांचैत्रशुद्धप्र
तिपदेसी ॥ अकस्मातआलेबेदरासी ॥ नगरांतकीर्तनतयेदिवसीं ॥ प्रेमोल्हासींमांडिलें ॥ १९० ॥ श्रवणासिआलेस
ज्ञानपंडित ॥ इतरयातीचेभाविकभक्त ॥ कीर्तनऐकोनिसप्रेमभरित ॥ रिझलेंचित्ततयांचें ॥ ९१ ॥ माळलावावीनग
रांत ॥ तोंउद्धवतयांसिकायबोलत ॥ श्रीरामजयंतीकरितांत्वरित ॥ जाणेंलागतधारुरा ॥ ९२ ॥ लोकह्मणतीत्याअव
सरा ॥ रामनवमीयेथेंचिकरा ॥ सकळांचाहेतदेखोनिबरा ॥ अवश्यह्मणतीतयांसी ॥ ९३ ॥ मगप्रशस्तवाडापाहूनित्व
रित ॥ मंडपउभारिलातेथ ॥ सत्वरकरूनितयाआंत ॥ अयोध्यानाथबैसविले ॥ ९४ ॥ हरिदासवैष्णवबोलावून ॥ नित्य
करीतहरिकीर्तन ॥ नानापरीचींपक्वान्नेंकरून ॥ ब्राह्मणसंतर्पणकरीतसे ॥ ९५ ॥ एकदादिंडचापताकाघेऊनिसत्वर ॥
मिरवतचालिलेवैष्णववीर ॥ पुढेंवाजंत्र्यांचागजर ॥ उल्हासथोरमांडिला ॥ ९६ ॥ सप्रेमभरेंहरिदासगाती ॥ तोंमशिदीमा

१ पाहिल्यानें. २ हात कमरेवर ठेवून. ३ चांगला, सोईवार. ४ श्रीराम. ५ भोजन.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जीयवनकुमती ॥ बैसलेहोतेसहजस्थितीं ॥ तेकायबोलतीएकमेकां ॥ १७॥ उद्धवचिद्घनहरिदासनाना ॥ बोलावूनिमांडिलाकुफराणा ॥ तरीआपणशेणमारकरूनिजाणा ॥ करूंविटंबनासकळांची ॥१८॥ तेव्हांयवनांचेंप्राबल्यबहुत ॥ कोणीनपाहेन्यायनीत ॥ शहरींगुंडेउन्मत्तबहुत ॥ बैसलेपांचशततेठायीं ॥ १९ ॥ असोहरिदाससांगतनाचत ॥ पुढेंवाद्यांचागजरहोत ॥ मसिदीपुढेंमिरवत ॥ आलेअकस्माततेथवां ॥ २०० ॥ तोंतेटवाळधांवलेसत्वरगतीं ॥ वैष्णवांसिशेणमारकरिती ॥ पताकाहिरूनघेतल्याकिती ॥ वैष्णवांसिताडितीनिजहस्तें ॥ १ ॥ विण्याच्यातोडोनिटाकिल्यातारा ॥ मृदंगफोडिलेतयाअवसरा ॥ विक्षेपसकळांचेअंतरा ॥ मगहरिदासघरापातले ॥ २ ॥ शिष्यसंप्रदायीयेऊनित्वरित ॥ उद्धवचिद्घनासिगांगतीवृत्तांत ॥ ऐसीऐकतांचिमात ॥ विक्षेपचित्तांतवाटला ॥ ३ ॥ जैसेंदुग्धामाजीपडेलवण ॥ मगनासोनिजायनलागतांक्षण ॥ पक्कान्नासिशिवलेंश्वान ॥ मगस्वयंपाकीणतळमळी ॥ ४ ॥ कींवधुवरेंबैसलींभोजनाकारण ॥ तंवदीपविझविलापतंगान ॥ वरमायेचेंविक्षेपेमन ॥ तैसेंचिवाटलेंतयासी ॥ ५ ॥ नातरीग्रासघेतांक्षुधितासीं ॥ मुखांतअकस्मातगेलीमाशी ॥ तेवींअविंधींछळितांहरिदासांसी ॥ उद्धवचिद्घनासीवाटलें ॥ ६ ॥ मगमखरापासीजाऊनतत्वतां ॥ ह्मणेजयजयाजीरघुनाथा ॥ हेंनव्हतेंयेततुझियाचित्ता ॥ तरीअह्मांहास्यवृथाकांकेला ॥ ७ ॥ तूंविश्वात्माजानकीवरू ॥ वसविसीसर्वांचेंअंतरू ॥ मीकासयाआतांखेदकरूं ॥ केलाअनादरूसंतांचा ॥ ८ ॥ मगरघुनाथाचीमूर्तीउचलोनी ॥ देव्हाऱ्यामाजीठेविलीतयेक्षणीं ॥ मखरटाकिलेंमोडोनी ॥ मंडपसोडोनीठेविला ॥ ९ ॥ हरिदासांसिकरूननमन ॥ करितबैसलेश्रीरामभजन ॥ तंवमारुतिजाहलेक्रोधायमान ॥ ह्मणेबेदरघालीनपालथें ॥ २१० ॥ माझास्वामीश्रीरघुनाथ ॥ त्याचाउत्साहकरितीभक्त ॥ त्यावैष्णवांसिगांजिलेंयेथ ॥ तरीजिणेंव्यर्थपैंमाझें

१ टवाळखोर. २ मीठ. ३ यवनांनीं.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ११ ॥ मगमशिदीवरीअंजनीसुत ॥ उभाठाकलाजाऊनित्वरित ॥ टवाळगुंडेपांचशत ॥ बैसलेहोतेत्याखालीं ॥ १२ ॥
धरूनिमशिदीचीभिंती ॥ निजकरेंहालवितांमारुती ॥ जवळफकिराचीझोंपडीहोती ॥ तेणेंअवचितींदेखिलें ॥ १३ ॥
तोफकीरहोतापरमज्ञानी ॥ सत्वरउमजलाआपुलेमनीं ॥ रामभक्तांसिछळिलेंह्मणोनी ॥ मारुतिक्षोभोनीपातला ॥ १४ ॥
मगजोडूनियांबद्धांजली ॥ हनुमंतासिह्मणेतेवेळीं ॥ माझीझोंपडीआहेखालीं ॥ तरींहेवांचविलीपाहिजे ॥ १५ ॥ गोष्टी
ऐकोनियांऐसी ॥ टवाळह्मणतीएकमेकांसी ॥ पिसेंलागलेंफकीरासी ॥ बोलतोकोणासीकळेना ॥ १६ ॥ तोह्मणेएक
वानरयेऊन ॥ मसीदपाडूंपाहेजाण ॥ तरीआतांउठोन ॥ पळाबाहेरसत्वर ॥ १७ ॥ गुंडेबोलतीतयेसंधीं ॥ मसीदआ
हेचिरेबंदी ॥ वानराचेपित्यासित्रिशुद्धी ॥ नपडेचिजाणसर्वथा ॥ १८ ॥ ऐसीऐकतांचिमात ॥ परमक्षोभलाश्रीरामदू
त ॥ निमिषनलागतांअकस्मात ॥ मसीदपाडूनटाकिली ॥ १९ ॥ जाहलाएकचिहाहाकार ॥ ह्मणतीअघटितजाहलेंथो
र ॥ यवनबादशापासिसत्वर ॥ जाऊनिकोणीसांगती ॥ २२० ॥ कींमसीदपाडिलीअकस्मात ॥ गुंडेमरूनिगेलेबहुत ॥
तोंत्याचेपोटींशूळअकस्मात ॥ उठिलालोळतगडबडां ॥ २१ ॥ तोंज्याफकीरानेंदेखिलावानर ॥ तोअविंधासिजाऊनि
सांगेसत्वर ॥ कींउद्धवचिद्घनभक्तथोर ॥ छळिलेंसाचारतयासी ॥ २२ ॥ टवाळांनींकेलाशेणमार ॥ तेणेंक्षोभलामारु
तिवानर ॥ मनांतकरूनियांनिकरें ॥ मसीदसत्वरपाडिली ॥ २३ ॥ ऐसीवार्त्ताऐकून ॥ भयाभीतजाहलातोयवन ॥
मगउद्धवचिद्घनाचेचरण ॥ येऊनिवंदिलेसद्भावें ॥ २४ ॥ रौप्यमुद्रासहस्त्रवरी ॥ आणूनिठेविल्यापायांवरी ॥ ह्मणे
आपुलामहोत्साहसुखरूपकरी ॥ संकोचअंतरींनधरितां ॥ २५ ॥ तुमचेंछळणकेलेंज्याणीं ॥ तेतत्काळगेलेमृत्युसदनीं ॥
आतांमारुतीसिप्रार्थूनी ॥ आह्मांलागोनीवांचवी ॥ २६ ॥ नगरवासीहोऊनिगोळा ॥ तत्काळमंडपउभाकेला ॥ मखर

---

१ मारुति. २ टवाळखोर. ३ संतापून. ४ यवन लोकांस. ५ आवेश आणून. ६ रुप्याचें मुख्य नाणें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शृंगारूनितयेवेळा ॥ जानकीवराबैसविलें ॥ २७ ॥ टाळमृदंगघेऊनिप्रीतीं ॥ वैष्णवआनंदेंगातीनाचती ॥ द्वादशी पावेतोंमहोत्साहप्रीतीं ॥ केलामागुतीउल्हासें ॥ २८ ॥ साधुसंतांचाद्वेषकरी ॥ तयासिदुःखजन्मभरी ॥ विघ्नेंयेती नानापरी ॥ तयाचेघरींशोधित ॥ २९ ॥ श्रीविठ्ठलाचेचरणआठवितां ॥ सर्वविघ्नेंजातीदूरपंथा ॥ शरीरांतीलरोगव्य था ॥ जायनिघोनतेकाळीं ॥ २३० ॥ असोत्रयोदशीसकरूनिललित ॥ सकळगौरविलेहरिभक्त ॥ भजनप्रसादमही पतितेथ ॥ मागेंउचितसंतांसी ॥ २३१ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेलजगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ षट्पंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ २३२ ॥ ॥ अध्याय ॥ ५६ ॥ ॥ ओंव्या ॥ २३२ ॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥ ४ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीक्षीराब्धिवासायनमः ॥ जयजयक्षीराब्धिवासामेघश्यामा ॥ अनंतरूपाअनंतनामा ॥
अनंतअवतारापुरुषोत्तमा ॥ निगमासिमहिमानकळेतुझा ॥ १ ॥ जयजयवैकुंठविलासिया ॥ गुणसमुद्राकरुणालया ॥
चरणींमहिमाजाणोनियां ॥ समुद्रतनयातल्लीन ॥ २ ॥ जयगोकुलवासाघननीलवर्णा ॥ गोरसचोरामनमोहना ॥ म
थुरावासियाकंसमर्दना ॥ धर्मस्थापनाश्रीहरी ॥ ३ ॥ जयद्वारकावासीगरुडध्वजा ॥ लीलानाटकीअधोक्षजा ॥ अनु
पमस्वरूपमहिमातुझा ॥ भीमकात्मजाएकजाणे ॥ ४ ॥ जयजयभीमातीरनिवासिया ॥ पुंडरीकवरदानिया ॥ भक्तां
सिअभयदेऊनियां ॥ करिसीछायाकृपेची ॥ ५ ॥ त्वांअघटितकेलेंरुक्मिणीपती ॥ ग्रंथलिहिविलामूढाहातीं ॥ मशं
काअभयदेऊनिप्रीतीं ॥ मेरुत्याहातींउचलविला ॥ ६ ॥ मिळवूनियांरीसवानर ॥ त्यांहातींघेवविलेंलंकानगर ॥ कीं
ज्ञानदेवेंदेऊनिरेडियावर ॥ श्रुतिसाचारवदविल्या ॥ ७ ॥ कींपरिसेंआपुलादेऊनिगुण ॥ लोहाचेंकेलेंशुद्धकांचन ॥
कींगंगेनेंआपुलेंपवित्रपण ॥ वोहळासिअर्पणकेलेंकीं ॥ ८ ॥ नातरीकस्तूरीनेंआपुलसंगतीदेखा ॥ ताजव्यांतजोख
विलीमृत्तिका ॥ तेवींमाझींवचनेंवैकुंठनायका ॥ ग्रंथींलिहिवीकांनिजकृपें ॥ ९ ॥ तूंसर्वांवरिष्ठअधोक्षजा ॥ प्रीतीनेंक
रितोसिनिजभक्तपूजा ॥ नानाउपचारमांडितांवोजां ॥ करितांलाजानयेशीतूं ॥ १० ॥ निजभक्तगातीतुझींस्तोत्रं ॥
तुजआवडतीत्यांचींचरित्रं ॥ मजपुढेंकरूननिमित्तमात्र ॥ वक्तास्वतंत्रतूंएक ॥ ११ ॥ आतांसावधानहोइजेश्रोतां ॥
शिवराध्यायासिआलीकथा ॥ जैसेंकांदधिमंथनकरितां ॥ तोंनवनीतअवचितांदेखिलें ॥ १२ ॥ नातरीचूतवृक्षासि
घालितांपाणी ॥ तोंअमृतफळदेखिलेंनयनीं ॥ कांपदकघडिलेंरत्नकोंदणीं ॥ तेंकंठींयेऊनिपडियेलें ॥ १३ ॥ कांपा
कनिष्पत्तीचीकरितांखटपट ॥ तंवअकस्मातलाभेपक्वान्नताट ॥ कींक्षेत्रींकरितांकष्ट ॥ पीकघनवटआलेंकीं ॥ १४ ॥

---

१ विष्णु. २ वेदांस. ३ लक्ष्मी. ४ रुक्मिणी. ५ म्हैसास. ६ वेद. ७ बोलविलेस. ८ सोनें. ९ माती. १० रीतीनें. ११ श्रेवटच्या. १२ लेणी. १३ आम्रवृक्षास.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नातरीपंढरीसउत्साहजाहला ॥ मगपौर्णिमेसमांडिलागोपाळकाला ॥ तैसाशेवटीलअध्यायमजला ॥ आहेभासलात्या
रीतीं ॥ १५ ॥ अनंतसंतांच्याकथागहन ॥ संख्यामोजितांअध्यायछप्पन्न ॥ कींछप्पन्नदेशींचींमहारत्नेंजाण ॥ स
तेजपणेंलखलखिती ॥ १६ ॥ कींछप्पन्नभाषांचाअन्वय ॥ तोहाग्रंथभक्तविजय ॥ श्रवणेंचभाविकपावतीजय ॥ हें
सांगूंकायनिजमुखें ॥ १७ ॥ कींछप्पन्नदेशींचींशस्त्रेंतीक्ष्ण ॥ क्षमाकाळिकाहातींघेऊन ॥ क्रोधमहिषावरीचढोन ॥
आलीऐसेंवाटतसे ॥ १८ ॥ कींछप्पन्नदेशींच्यासरितांथोर ॥ प्रेमरसाचेंघेऊनिनीरें ॥ श्रीपांडुरंगआनंदसागर ॥
त्यासिधुंडितीनिजप्रीतीं ॥ १९ ॥ कींछप्पन्नदेशींचेनृपराज ॥ घेऊनहातींविजयध्वज ॥ ममतेचेंपरचक्रउडवूनिसह
ज ॥ भक्तंसायुज्यभोगिती ॥ २० ॥ याछप्पन्नांवरिष्ठशिरोमणी ॥ हासत्तावन्नावापरिसाकानीं ॥ जैसेंजेवणाशेवटींप्रीतीक
रूनी ॥ दध्योदनघेतीश्रीमंत ॥ २१ ॥ मागीलअध्यायाचेअंतींजाण ॥ यवनानींछळिलेउद्धवचिद्घन ॥ मगमारुतीनें
चमत्कारदाखवून ॥ महोत्साहपूर्णकरविला ॥ २२ ॥ आतांविसोबासराफप्रेमळभक्त ॥ पंढरीक्षेत्रींहोताराहात ॥ देव
घेवसावकारीकरित ॥ असोनिविरक्तसंसारीं ॥ २३ ॥ चौघेपुत्रआणिकांता ॥ तेसदाअनुकूलपतिव्रता ॥ खतारव
चननमोडीसर्वथा ॥ काळकठिणपडतांही ॥ २४ ॥ प्रपंचधंदाकरितांजाण ॥ विसोबाअसत्यनबोलेवचन ॥ क्षुधार्थी
यांसिघालावेंअन्न ॥ करूनिसन्मानआदरें ॥ २५ ॥ तोंखरंपडपडिलेंअतिकठिण ॥ दोनपायल्यांचीजाहलीधार
ण ॥ ब्राह्मणक्षुधातुरहोऊन ॥ सदनींयेऊनबैसती ॥ २६ ॥ दुष्काळींकारितांअन्नदान ॥ धनधान्यगेलेंसरोन ॥
तथापियाचकांकारण ॥ दातयाचेंजीवनकळेना ॥ २७ ॥ मातेचेंदुग्धनिःशेषआटे ॥ तरीबाळकस्तनासिझगटे ॥ कीं ॥ १ ॥
प्रजेनेंभरिलेउदंडतोटे ॥ तरीराजासिखोटेंवाटतसे ॥ २८ ॥ बापसदैवकींदुर्बळा ॥ हेंसर्वथानेणवेलबाळकाला ॥ तेवीं

१ मुक्ति. २ नद्या. ३ उदक. ४ सायुज्य मुक्तीचें स्थान. ५ स्त्री. ६ दुर्भिक्ष, दुष्काळ. ७ गरीब.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दातयाचेंदुःखयाचकांला ॥ अंतरींसर्वथाकळेना ॥ २९ ॥ विसोबाचियासदनाप्रती ॥ येऊनबैसतीअन्नार्थी ॥ तित
क्यांसहीयथाशक्ती ॥ भोजनघालितीनिजसत्वें ॥ ३० ॥ कोठेंहातनचालतांजाण ॥ मोडिलेअलंकारआणिभूषण ॥
मगथोरथोरभांडींविकून ॥ घालीभोजनयाचकां ॥ ३१ ॥ टाकोनियांलौकिकममता ॥ टाकोनिसंसाराचीचिंता ॥
सांडोनिनिजदेहाचीआस्था ॥ पंढरीनाथाध्यातसे ॥ ३२ ॥ क्षुधितांसिद्यावयानाहींअन्न ॥ ग्रामांतकोणीनदेतीउसण ॥
ह्मणतीविसोबासावकारीबुडवून ॥ दिवालावूनबैसला ॥ ३३ ॥ एकह्मणतीअज्ञाननिश्चित ॥ तयासिनकळेआपुलेंहि
त ॥ प्रपंचकरूनिपरमार्थ ॥ सज्ञानसाधितीविवेकें ॥ ३४ ॥ आतांविसोबासिजेपातेंजती ॥ त्यांचीहीऐशीहोईलगती ॥
नरनारीबोलतीयेणेंरीतीं ॥ निंदाकरितीसकळिक ॥ ३५ ॥ एकह्मणतीसंचितखोटें ॥ धनधान्यआटलेंजेथिच्याते
थें ॥ अन्नघालितांयात्रेकऱ्यांतें ॥ आळसयातेंनयेचकीं ॥ ३६ ॥ असोकासेगांवांतहोतापठाण ॥ तयासिनकळेहेंवर्तमा
न ॥ त्यापासूनिकर्जघेऊन ॥ क्षुधितांसअन्नघालीतसे ॥ ३७ ॥ द्रव्यअखंडघेऊनियेत ॥ गणतीजाहलीशतेंसात ॥
दुहोतरारोखालिहूनत्वरित ॥ दीधलानिश्चिततयासी ॥ ३८ ॥ तंवएकरामपुरीबावासिद्धपुरुष ॥ तेयात्रेसिआलेपं
ढरीस ॥ विसोबाचेसत्वपाहावयास ॥ सोंगकुश्चळघेतलें ॥ ३९ ॥ ह्मणेत्याचीकैसीआहेस्थिती ॥ समविषमपाहणेंभू
तीं ॥ कींसारिखीचकरुणासर्वांप्रती ॥ हेंआपणनिश्चितींपाहावें ॥ ४० ॥ मोरींतीलदुर्गंधकर्दमघेतला ॥ तोआपुलेअं
गासिलाविला ॥ माजांसिचिंध्यांचाकडदोराबांधिला ॥ लंगोटीनेसलाअमंगळ ॥ ४१ ॥ जेवावयासिपाहिजेपात्र ॥ ह्म
णोनिहातींघेतलेंखापर ॥ यामिनीलोटलीएकप्रहर ॥ आलेसत्वरमंदिरा ॥ ४२ ॥ वेडियासारिखीमारूनिहाक ॥ ह्म
णेमाझेपोटींलागलीभूक ॥ वचनऐकोनिसम्यक ॥ विसोबाबाहेरपातले ॥ ४३ ॥ वोळखिलेनसतांमहापुरुष ॥ ह्मणे

---

१ लोभ, आशा. २ निंदितात, विश्वास करितील. ३ दैव. ४ घाणेरें. ५ चिखल. ६ कमरेस. ७ रात्र. ८ चांगलें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्वामीकृपाकेलीविशेष ॥ तरीभोजनकरूनिसावकाश ॥ जावेंआश्रमासआपुल्या ॥ ४४ ॥ मगअन्नपात्रठेवूनिसत्वर ॥
आपणबैसलेत्यासमोर ॥ तोंअंगासकर्दमलागलाफार ॥ दुर्गंधिथोरसुटलीसे ॥ ४५ ॥ उष्णउदककरूनत्वरितें ॥ त्या
सिधूतलेंआपुलेहातें ॥ मगअंगपुसोनिस्वस्थचित्तें ॥ दुसरीकौपीननेसविली ॥ ४६ ॥ गंधाक्षताअर्चनसोहळा ॥ तुळ
सीमाळाघातल्यागळां ॥ भोजनघालोनित्याजला ॥ नमस्कारकेलासाष्टांग ॥ ४७ ॥ तुळसीदळमुखशुद्धीसी ॥ देऊ
निबोळविलेंअतीतासी ॥ रामपुरीविचारीमानसीं ॥ ह्मणेआत्मज्ञानयासीठसावलें ॥ ४८ ॥ व्याघ्रगायीआणिवृश्चि
क ॥ यांवरीसारिखाभावदेख ॥ धुंडोनिपाहातांपरीक्षक ॥ तरीविरळाएकभेटेलकीं ॥ ४९ ॥ कींराजाआणिदरिद्री ॥
दोहींचासन्मानसारिखाचकरी ॥ शोधूनिपाहतांपृथ्वीवरी ॥ बहुयापरीनसतीकीं ॥ ५० ॥ परद्रव्यआणिपरस्त्रीजा
ण ॥ दृष्टीसलेखींजैसेंवमन ॥ धुंडाळोनियांत्रिभुवन ॥ पाहतांबहुतनसतीकीं ॥ ५१ ॥ अनाथयाचकआणिब्राह्मण ॥
दोहींचेंसारिखेंकरीपूजन ॥ त्याचेगृहींरुक्मिणीरमण ॥ रात्रदिवसतिष्ठतसे ॥ ५२ ॥ विसोबाचीऐशीवृत्ती ॥ ह्मणूनि
पूजिलेंमजप्रती ॥ ऐसेंसमजोनिआपुलेचित्तीं ॥ आश्रमाप्रतीतिगेले ॥ ५३ ॥ तंवकासेगांवींच्यापठाणाकारण ॥ वृत्तांत
सांगेजाऊनिदुर्जन ॥ कींविसोबादिवाळेंकाढून ॥ दिवालावूनबैसला ॥ ५४ ॥ तरीतुवांजाऊनिऐशासमयीं ॥ आपुलें
द्रव्यमागूनघेयी ॥ मगतोपंढरीसलवलाहीं ॥ येऊनिकायबोलिला ॥ ५५ ॥ विसोबासिह्मणेतेअवसरीं ॥ माझेंद्रव्यदे
झडकरी ॥ नाहींतरीतुझ्याद्वारीं ॥ धरणेंबैसतोंयेवेळे ॥ ५६ ॥ ऐशीबोलोनियांमातें ॥ चिंतावलाप्रेमळभक्त ॥ ह्मणेद्या
वयाऐवजनाहींदिसत ॥ कैसीमातकरावी ॥ ५७ ॥ मगधैर्यधरूनिनिजमानसीं ॥ कायबोलेसावकारासी ॥ आजपा
सूनिसातवेदिवसीं ॥ द्रव्यतुह्मासीपाठवीन ॥ ५८ ॥ तोह्मणेब्राह्मणाविश्वासनाहींमातं ॥ तरीकोणीसाक्षीठेवीयेथ ॥ म

१ लंगोटी. २ पाव. ३ विंचू. ४ ओक. ५ गोष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गमिळवूनिचवघांगृहस्थातं ॥ वायदासांगतत्यांपासी ॥ ५९ ॥ गृहस्थपठाणासिसांगतीबुद्धी ॥ विसोबाअसत्यनबोले कधीं ॥ सातवेदिवसींआधीं ॥ द्रव्यपाठवूनीदेईल ॥ ६० ॥ ऐसेंऐकूनिउत्तर ॥ तेथूनिउठिलासावकार ॥ ह्मणेगोष्टि समजूनिदूरवर ॥ आमचालांझावारावा ॥ ६१ ॥ ऐसेंह्मणूनितेसमयीं ॥ पठाणगेलाकासेगांवीं ॥ ह्मणेवायदापुरतांल वलाहीं ॥ द्रव्यघेईनक्षणमात्रें ॥ ६२ ॥ असोसाहादिवसलोटलियावर ॥ विसोबामानसींचिंतातुर ॥ ह्मणेवाटपाहील सावकार ॥ कैसाविचारकरावा ॥ ६३ ॥ असत्यबोलिलोंनव्हतोंगोष्टी ॥ तीआतांप्राक्तनींआलीशेवटीं ॥ ऐसाउद्वेग करीपोटीं ॥ विवेकंदृष्टीकरूनियां ॥ ६४ ॥ करीतबैसलादेवपूजन ॥ परीकदापिस्वस्थनव्हेमन ॥ ऋणंकन्याचेंलाग लेंध्यान ॥ चंचलपणआवरेना ॥ ६५ ॥ ऐसेंसंकटदेखोन ॥ कायकरीतरुक्मिणीरमण ॥ विसोबाचागुमास्तापुरातन ॥ त्याचेंस्वरूपधरियेलें ॥ ६६ ॥ मुद्दलसातशतेंद्रव्यहोतं ॥ तेंव्याजसुद्धांघेऊनिपंढरीनाथ ॥ कासेगांवींजाऊनितरित ॥ पठाणासीबोलततेधवां ॥ ६७ ॥ मीविसोबाचागुमास्तापुरातन ॥ विदितअसेंकींतुह्मांकारण ॥ तुमचावायदापुरलाह्मणो न ॥ मजह्मयेथेंपाठविलें ॥ ६८ ॥ तरीव्याजमुद्दलहिशेबकरूनी ॥ द्रव्यघ्यावेंतुह्मींमोजूनी ॥ ऐसेंबोलतांचक्रपाणी ॥ सावकारमनींविस्मित ॥ ६९ ॥ मगपठाणपुसेब्राह्मणाला ॥ द्रव्यमिळतनवतेंत्याजला ॥ आणिककोणसावकारपाहि ला ॥ आश्चर्यआह्मांलावाटतसे ॥ ७० ॥ यावरीबोलेरुक्मिणीपती ॥ विसोबाचीसात्विकवृत्ती ॥ असत्यनबोलेचकल्पां तीं ॥ निश्चयचित्तींअसोंद्या ॥ ७१ ॥ सन्निधबैसोनिजगज्जीवन ॥ रोखाआणविलात्यापासून ॥ ह्मणेचवघेगृहस्थबो लावून ॥ हिशेबकरूनघेईंकां ॥ ७२ ॥ साक्षठेऊनिगांवींच्यालोकां ॥ खराकरूनिदीधलापैका ॥ त्यापासूनिघेऊनि रोखा ॥ निजभक्तसखाकायकरी ॥ ७३ ॥ सत्वरयेऊनिपंढरपुरीं ॥ गेलाविसोबाचेघरीं ॥ किंचितरोखाफाडोनिशिरीं

---

१ मुद्दल. २ लज्जा. ३ दैव. ४ विचार. ५ देणेंदाराचें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पुस्तकाभींतरीं बांधिला ॥ ७४ ॥ गीतेचीपोथीसोडोनिपाहात ॥ तों आपुलेनावाचें देखिलें खत ॥ हस्ताक्षरवोळखितां
त्वरित ॥ विसोबाविस्मितमानसीं ॥ ७५ ॥ ह्मणेयाचें वारिलें नसतां ऋण ॥ रोखाकोणी आणिला फाडोन ॥ कांतापु
त्रांसिवर्तमान ॥ पुसतेजाहलेतेधवां ॥ ७६ ॥ फाटक्याखतासिदेऊनिथिगळ ॥ मागुतीं जोडिलें तत्काळ ॥ ह्मणे ज्याचें त्या
सयेवेळ ॥ नेऊनिद्यावें आतांची ॥ ७७ ॥ ऐसें ह्मणूनि भाविकभक्त ॥ कासेगांवीं गेले त्वरित ॥ तंव पठाण भेटला बाजारां
त ॥ ह्मणे काय निमित्त आलेती ॥ ७८ ॥ तुमचा गुमास्ता पुरातन ॥ आज प्रातःकाळीं आला त्वरें करून ॥ व्याजसुद्धां द्रव्य
देऊन ॥ रोखा घेऊन गेला कीं ॥ ७९ ॥ विसोबाचित्तीं जाहले विस्मित ॥ ह्मणे मज लातों हें नाहीं श्रुत ॥ परी रोखा आजि पु
स्तकांत ॥ अकस्मात देखिला ॥ ८० ॥ द्रव्य तंव नाहीं द्यावयासी ॥ आणि खतही आलें आह्मांपासी ॥ ह्मणोनि लवला हें
तुह्मांपासी ॥ सांगावयासी पातलों ॥ ८१ ॥ ऐसें बोलतां प्रेमळभक्त ॥ सावकार ह्मणे असत्य मात ॥ ऋण वारिलें ज्यां देख
त ॥ ते बोलावूनि त्वरित आणिले ॥ ८२ ॥ तेहीं तैसीच सांगती गोष्टी ॥ मग आश्चर्य वाटलें याचे पोटीं ॥ मग परतोनियां उठा
उठी ॥ पंढरीक्षेत्रासी पातला ॥ ८३ ॥ आपुला गुमास्ता बोलावून ॥ वर्तमान पुसिलें त्यालागून ॥ कैसें तुवां आमुचें वारिलें
ऋण ॥ यथार्थ सांगण मजपासी ॥ ८४ ॥ तो ह्मणे पांडुरंगाची शपथ ॥ मज अणुमात्र नाहीं श्रुत ॥ ऐसी ऐकतां चिमात ॥
नेत्रीं अश्रुपात वाहाती ॥ ८५ ॥ ह्मणे कृपासागर राजगजेठी ॥ मजसाठीं तूं जाहलासि कष्टी ॥ देवाचे चरणीं घातली मिठी ॥
सद्गदपोटीं होऊनियां ॥ ८६ ॥ विसोबासि ह्मणे रुक्मिणीकांत ॥ सकलक्षेत्रीं प्रकटली मात ॥ नरनारी आश्चर्य करित ॥
देखतां प्रचीत दृष्टीसी ॥ ८७ ॥ संकटीं पडतां भक्त प्रेमळ ॥ त्यासि तत्काळ पावे घननीळ ॥ न विचारितां काळवेळ ॥ दीनद
याळ कृपाळू ॥ ८८ ॥ मागें कृतीं त्रेतीं द्वापारांत ॥ देवाचे अवतार साक्षात होत ॥ भक्तांसि रक्षी भगवंत ॥ हें नवल कोणतं

१ पुस्तकांत. २ कारभारी. ३ कर्ज. ४ गोष्ट.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ह्मणतसां ॥ ८९ ॥ आणिकलियुगींप्रत्यक्षपाषाणमूर्ती ॥ बौद्धरूपेंअसतांश्रीपती ॥ जनासिदाखवूनिनानाप्रचीती ॥ वाढविलीकीर्तिसंतांची ॥ ९० ॥ परीतिहींयुगांपरीसकलियुगअधिक ॥ ऐसेंभागवतींबोलिलेशुक ॥ येथेंऔटघटिकांतवैकुंठनायक ॥ भेटतसेदेखनिजभक्तां ॥ ९१ ॥ परीएकचिआहेअडथळा ॥ भक्तपाहिजेभाविकभोळा ॥ जोविकल्पजाळींनाहींपडला ॥ तयासिपावतोभगवंत ॥ ९२ ॥ होयनहोयह्मणूनिअंतरीं ॥ दुश्चितपणेंजोसेवाकरी ॥ तरीतोआपुल्याहितासिहोऊनिवैरी ॥ अंतरलादूरिहरिचरणा ॥ ९३ ॥ मानसींइच्छीरुक्मिणीकांत ॥ कींसंकटींपडावेमाझेभक्त ॥ मगमीउडीघालूनित्वरित ॥ अद्भुतकीर्तिवाढवीन ॥ ९४ ॥ जैसातारुबैसोनिसरितेकांठीं ॥ ह्मणेबुडतांपडावामाझेदृष्टीं ॥ मगमीउडीघालूनिउठाउठी ॥ काढीनसंकटींतयासी ॥ ९५ ॥ कींदानशीळघालीनअन्नसत्र ॥ रात्रदिवसहेंचिइच्छित ॥ ह्मणेमजपासींआलियाक्षुधित ॥ करीनतृप्तत्यालागीं ॥ ९६ ॥ नातरीसद्वैद्याचेवाटेंचित्ता ॥ कांहींराजयासिव्हावीव्यथा ॥ मगऔषधदेऊनिनिजस्वार्था ॥ रोगसर्वथादवडीन ॥ ९७ ॥ कींसज्ञानवक्तयांचेमनीं ॥ संशयघेऊनिपुसावेंकोणी ॥ मगनानापरीच्यादृष्टांतवचनीं ॥ आशंकाफेडूनीटाकीन ॥ ९८ ॥ तेवींजर्घनींठेऊनिदोनीकर ॥ मानसींइच्छीरुक्मिणीवर ॥ कींभक्तानींघालोनिमजवरीभार ॥ अघटितविचारकरावा ॥ ९९ ॥ मगपावूनमीतयांप्रती ॥ जगींअद्भुतवाढवीनकीर्ती ॥ हेंसर्वदाचिंतीतश्रीपती ॥ परीकोणीनकरितीअधीर ॥ १०० ॥ ज्याणींसोडोनिआशापाश ॥ सांडिलीनाशवंतदेहाचीआस ॥ त्यानिजभक्तांच्याकथासुरस ॥ ऐकिल्यासावकाशसज्जनीं ॥ १ ॥ आतांग्रंथारंभजाहलाजेथून ॥ याचेपुढतींकरावेंमनन ॥ आधींगणेशसरस्वतीवंदून ॥ सद्गुरुचरणआठविले ॥ २ ॥ कलियुगींदोषजाहलेबहुत ॥ हेंक्षिरसागरींजाहलेंश्रुत ॥ मगभक्तांसिसांगेलक्ष्मीकांत ॥ अवतारघ्यावेमृत्युलोकीं ॥ ३ ॥ ना

१ मौन धरून. २ साडेतीन. ३ संशय. ४ नदी. ५ आपल्या लाभाकरितां. ६ कमरेवर.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ममहिमाप्रकटकरून ॥ भजनींलावासकळजन ॥ हेंप्रथमाध्यायींनिरूपण ॥ केलेंश्रवणसकळिकीं ॥ ४ ॥ तस्करींछ
ळिलेंजयदेवाकारण ॥ पद्मावतीचेगेलेप्राण ॥ प्रेतउठविलेंजगज्जीवन ॥ हेंनिरूपणदुसऱ्यांत ॥ ५ ॥ पाषाणनंदीजेवि
लाअन्न ॥ प्रेतउठविलेंआशीर्वादेंकरून ॥ तुळसीदासासिरघुनंदनं ॥ तृतीयाध्यायींभेटले ॥ ६ ॥ शिंपल्यांतसांपड
लानामाभक्त ॥ दामशेटीआनंदलाबहुत ॥ गोणाईसीसंवादलेपंढरीनाथ ॥ हेंचौथ्यांतनिरूपण ॥ ७ ॥ अयोनिसंभवभक्त
कबीर ॥ मोमिनागृहींवाढलाथोर ॥ शेलाविणोनिशार्ङ्गधर ॥ केलासत्वरधीरनिजकृपें ॥ ८ ॥ संतांसाठींकेलीचोरी ॥ कमा
लवधिलाआपुलेकरीं ॥ नृपैंवरेंघातलासुळावरी ॥ साधूनींझडकरींउठविला ॥ ९ ॥ अंगणींमिळालावैष्णवमेळा ॥ तेव्हांकबी
रासिअयोध्यानाथपावला ॥ अगणितकबीरआपणजाहला ॥ सप्तमाध्यायसंपलायेथून ॥ ११० ॥ निवृत्तिसोपानज्ञाने
श्वर ॥ यतीचिपोटींजाहलेअवतार ॥ त्यांसवाँळीतघालितीद्विजवर ॥ हेकथासुंदरआठव्यांत ॥ ११ ॥ नवमाध्यायींप्र
सिद्ध ॥ रेडियामुखींबोलविलेवेद ॥ पितरजेवविलेमंत्रशब्दें ॥ हेलीलाअगाधदाखविली ॥ १२ ॥ ज्ञानदेवेंपंढरीहूनी ॥
नामयासिनेलेंतीर्थाटनीं ॥ हस्तँनापुरींहरिकीर्तनीं ॥ गाईउठविलीदशमात ॥ १३ ॥ कबीरकांतासत्वशीळमोठी ॥ वाणि
यासिअनुतापजाहलापोटीं ॥ नामदेवआलेत्याचियेभेटी ॥ एकादशांतगोष्टीहेजाहली ॥ १४ ॥ मारवाडांततृषेनेंपीडिलें ॥
तैंकूपांतीलउदकवरआलें ॥ नागनाथींदेवालयफिरविलें ॥ हेंद्वादशांतजाहलेंनिरूपण ॥ १५ ॥ त्रयोदशअध्यायींमाघव
द्यांत ॥ नामयासवेंजेविलेपंढरीनाथ ॥ म्हणोनिद्विजांनींवाळित ॥ घातलेंनकळतदेवासी ॥ १६ ॥ निजभक्तबहुआव
डतीमज ॥ हेंरुक्मिणीससांगतीअधोक्षज ॥ सत्यभामेनेंनारदासीगुज ॥ चतुर्दशाध्यायींपुसिलें ॥ १७ ॥ धरूनिचतुर्भु
जरूपसगुण ॥ द्विजांसिसाक्षातदीधलेंदर्शन ॥ ज्ञानदेवासिनिरँविलेंजाण ॥ हेंचनिरूपणपंचदशाध्यायीं ॥ १८ ॥ देवसांव

१ राम. २ राजानें. ३ जातिबहिष्कृत. ४ दिल्लींत. ५ पश्चात्ताप. ६ विहिरींतील. ७ भेटविलें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्याचेभेटीसगेला ॥ उदरचिरूनलपविलेंत्याला ॥ हेंकौतुकदाखवूनिनामयाला ॥ कूर्मदासाभेटलाषोडशाध्यायीं ॥ १९ ॥
गोऱ्याकुंभारानेंतुडविलेंबाळकासी ॥ कीर्तनांतपावलेहृषीकेशी ॥ थोंटेहातफुटलेत्यासी ॥ बाळकजननीसीदीधलें ॥ १२० ॥
मांजरींचींपिलींघातलींआव्यांत ॥ तयांसिरक्षीपंढरीनाथ ॥ राकाकुंभारासिवैराग्यअद्भुत ॥ चरित्रेंसत्राव्यांतहींजाह
लीं ॥ २१ ॥ अठरावेअध्यायींकथाअद्भुत ॥ नामयाहांसलेसकळसंत ॥ मगविसोबागुरुपंढरीनाथें ॥ करूनिदीधलात्या
लागीं ॥ २२ ॥ आणिहातलावितांचनामयास ॥ वाळूचेतत्काळजाहलेपरीस ॥ हेंकौतुकपरशाभागवतास ॥ दावूनिअनुग्र
हदीधला ॥ २३ ॥ एकुणिसाव्यांतकथाऐसी ॥ हवालदारेंछळिलेंजगमित्रासी ॥ मगव्याघ्ररूपेंयेऊनहृषीकेशी ॥ कौतु
कजनासीदाखविलें ॥ २४ ॥ जोग्यासअनुतापजाहलाथोर ॥ वृषभलावूनिदंडविलेंशरीर ॥ तयासिभेटलाशार्ङ्गधर ॥ अ
भयवरदीधला ॥ २५ ॥ द्वैतभेदशंकरहरी ॥ ऐसेंमानीसोनारनरहरी ॥ त्यासिएकरूपेंभेटलामुरारी ॥ विसाव्यांतपरी
हेजाहली ॥ २६ ॥ एकविसाव्यांतकथाअद्भुत ॥ जनीसवेंदळीपंढरीनाथ ॥ तिचेअभंगस्वकरेंलिहित ॥ देखोनिसंत
हांसले ॥ २७ ॥ शंकरेंपार्वतीसउपदेशकेला ॥ तोमत्स्याचेपोटींमत्स्येंद्रजाहला ॥ विभूतीचागोरक्षभला ॥ उकरडचां
तजन्मलानिजलीलें ॥ २८ ॥ चांगदेवेंव्याघ्राचेंवहनकेलें ॥ मगज्ञानदेवेंभिंतीसिचालविलें ॥ विश्रांतवटाखालींभेटले ॥
बाविसाव्यांतचरित्रहें ॥ २९ ॥ तेविसाव्यांतचोखामेळाआख्यान ॥ आणिजीवातलादोघेब्राह्मण ॥ कबीराचेशिष्यजाहले
ह्मणून ॥ स्वयातीनवाळिले ॥ १३० ॥ चोविसाव्यांतपद्मनाभाचीकथा ॥ व्याधिनिरसिलीश्रीरामह्मणतां ॥ कबीरा
नेंवाणियासिविकिलीकांता ॥ ऐसीवार्तानिरूपिली ॥ ३१ ॥ चर्मांतशालग्रामघातलाकिमर्थ ॥ ब्राह्मणेंछळिलारोहिदा
सभक्त ॥ मगउदरींदाखविलेंयज्ञोपवीत ॥ पंचविसाव्यांतचरित्रहें ॥ ३२ ॥ सव्विसाव्यांतपिपाजीन ॥ अनुतापेंरा

१ ज्ञानोपदेश. २ बैल. ३ बहिष्कृत केलें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ज्यदीधलेंटाकून ॥ द्वारकेहूनियेतांचरामकृष्ण ॥ उपदेशव्याघ्रासीदीधला ॥ ३३ ॥ नरसीमेहेत्याचेंचरित्रथोर ॥ ति
सापावेतोंअध्यायच्यार ॥ तयासिभेटोनिश्रीशंकर ॥ रासमंडळदाखविलें ॥ ३४ ॥ त्याच्यापुत्राचेंकरूनिलग्न ॥ हुंडी
भरीजगज्जीवन ॥ कन्येचेंहोतांवोंटभरण ॥ वस्त्रेंभूषणेंपुरविलीं ॥ ३५ ॥ रामदासाचीभक्तिदेखोनी ॥ डांकुरासिआलेच
क्रपाणी ॥ एकतिसाव्यांतचरित्रसज्जनीं ॥ हेंचिवर्तलेंजाणिजे ॥ ३६ ॥ बत्तिसाव्यांतमथुरेचीमूर्ती ॥ हरिद्वारींआलीचा
लोनिरातीं ॥ तेहतिसाव्यांतसूरदासाप्रती ॥ मथुरेसिश्रीपतीभेटले ॥३७॥ चवतिसाव्यांतकथासुंदर ॥ सेनान्हावीजाह
लारुक्मिणीवर ॥ डोयीकरूनिशार्ङ्गधर ॥ भुलविलानृपवरनिजलीलें ॥ ३८ ॥ पास्तिसाव्यांतकथाअद्भुत ॥ नृपवरेंतो
डविलाआपुलाहस्त ॥ मगप्रसन्नहोऊनिजगन्नाथ ॥ केलापूर्ववततैसाची ॥३९॥ कर्माबाईचीदेखोनिभक्ती ॥ तिजसवेंजे
विलीपाषाणमूर्ती ॥ स्वप्नहोतांचपुजाऱ्यांप्रती ॥ आश्चर्यचित्तींवाटलें ॥१४०॥ छत्तिसाव्यांतकथादोन ॥ सूरदासभक्तम
दनमोहन ॥ जनजसवंताउदकींबुडवितांजाण ॥ श्रीरघुनंदनेंउचलिला ॥४१॥ सततिसाव्यांतकथासुंदर ॥ प्रेमळभक्तर
सिकमुरार ॥ त्याणेंवारणासिउपदेशकरूनिसत्वर ॥ भुलविलानृपवरक्षणमात्रें ॥४२॥ मिराबाईप्रेमळभक्त ॥ तीसविषाचें
जाहलेंअमृत ॥ अडतिसाव्यांतहेंचरित्र ॥ कथिलेंअसेभाविकहो ॥४३॥ कानोपात्रेसभेटलेपंढरीनाथ ॥ हेकथाएकुणचा
ळिसाव्यांत ॥ चाळिसाव्यांतदामाजीपंतभक्त ॥ रुक्मिणीकांतेंरक्षिला ॥४४॥ एकेचाळिसाव्यांतमृत्युंजयाचीख्याती ॥
लिंगेंवोकविलीश्वानाहातीं ॥ बेचाळिसाव्यांतअश्वधरूनिहातीं ॥ भानुदासासीश्रीपतीभेटले ॥४५॥ त्रेचाळिसाव्यांतवि
द्यानगरासिदेवगेले ॥ मगपंढरीलागींभानुदासघेऊनिआले ॥ शूळासिअकस्मातपल्लवफुटले ॥ हेंचरित्रपरिसिलेंसज्जनीं ॥ ५ ॥
॥४६॥चव्वेचाळिसाव्यांतबहिरंभटाप्रती ॥ नागनाथेंजन्मदीधलामागुती ॥ करूनित्याचीसंशयनिवृत्ती ॥ आत्मज्ञानप्रा

१ रामानें. २ हत्तीस. ३ कुत्रा. ४ घोडा.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

र्पीपैंकेली ॥ ४७॥ पंचेचाळिसाव्यांतएकनाथआख्यान ॥ जनार्दनासिगेलेशरण ॥ त्यासश्रीदत्तदर्शन ॥ करूनिप्रसाददी
धला ॥ ४८ ॥ शेचाळिसाव्यांतब्राह्मणवेषें ॥ सेवाकेलीद्वारकाधीशें ॥ मगलोटलियाद्वादशवरुषें ॥ एकनाथासीश्रुतजाहलें
॥ ४९ ॥ साक्षातअवतारमारुतीचाजाण ॥ रामदासपळालेपडद्याआडून ॥ मगपंढरीसिरुक्मिणीरमण ॥ रामरूपध
रूनिभेटले ॥ १५० ॥ अठ्ठेचाळिसाव्यांतकथाऐसी ॥ वैराग्यजाहलेंतुकयासी ॥ कीर्तनांतयेऊनिहृषीकेशी ॥ परचक्रा
सीवारिलें ॥ ५१ ॥ एकुणपन्नासाव्यांतऐशीरीतीं ॥ उपदेशकेलाकांतेप्रती ॥ गृहलुटविलेंविप्रांहातीं ॥ उदारवृत्तिध
रियेली ॥ ५२ ॥ पन्नासाव्यांतकथासुरस ॥ तुकयाचेपाठीवरमारिलाऊंस ॥ मगपत्रलिहूनिकरुणारस ॥ पंढरीसपाठ
विलें ॥ ५३ ॥ निंबराजाच्याखांद्यावरी ॥ कीर्तनांतउभेराहिलेहरी ॥ एकावन्नाव्यांतऐशियापरी ॥ कथाचतुरींजाणिजे
॥ ५४ ॥ हिंलालत्लागूनिमंडपजळत ॥ शेखमहंमदासिजाहलेंश्रुत ॥ कोरड्याचवद्याऊदकांत ॥ बावन्नाव्यांतनिघाल्या
॥ ५५ ॥ बोधल्यानेंलुटविलेंशेत ॥ सारादेतपंढरीनाथ ॥ थोंटच्यातांटांसिकणसेंबहुत ॥ त्रेपन्नाव्यांतआणिलींकीं ॥ ५६ ॥
कीर्तनांतउठविलेंप्रेत ॥ हांसीकुणबिणजाहलीगुप्त ॥ अंत्यजासकेलेंफजीत ॥ चौपन्नाव्यांतकथाहे ॥ ५७ ॥ पंचावन्नांव्यां
तचरित्रेंच्यार ॥ श्रोतींऐकिलींअसतीलसादर ॥ गणेशनाथेंतरुवेर ॥ उपदेशिलानिजकृपें ॥ ५८ ॥ आणिकेशवस्वामी
च्याकीर्तनांत ॥ बचनागखातांवांचलेभक्त ॥ गोमाईसिउतरूनिपंढरीनाथ ॥ पानगेंप्रीतीनेंखादले ॥ ५९ ॥ लतिब
शाहाचाभावदेखिला ॥ चित्रानेंतत्काळविडाघेतला ॥ यवनराजाचरणींलागला ॥ मगमंदिरासिगेलासत्वर ॥ १६० ॥
छप्पन्नाव्यांतकथाअपूर्व ॥ संतोबापंवाराचादेखोनिभाव ॥ कूर्महोऊनिदेवाधिदेव ॥ यात्रासर्वउतरिली ॥ ६१ ॥ निळो
बाचेलग्नींसाहित्यकेलें ॥ बेदरींमारुतीनेंमसदीसपाडिलें ॥ उद्धवचिद्घनासिसाहित्यकेलें ॥ छप्पन्नाव्यांतवर्तलेंचरित्र

---

१ महार, २ वृक्ष, ३ बचनाग या नामें विष,

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हें ॥ ६२ ॥ विसोबासराफभाविकपूर्ण ॥ त्याचेंसत्तावन्नाव्यांतवारिलेंॠण ॥ हें तोंप्रस्तुतअनुसंधान ॥ केलेंश्रवणसक
ळिकीं ॥ ६३ ॥ हेछप्पन्नदेशींचेराजहंस ॥ भक्तकथाघेऊनिमुक्ताघोंस ॥ सत्तावन्नावासरोवरमानस ॥ एथेंक्रीडावया
सएकवटले ॥ ६४ ॥ प्रपंचआणिपरमार्थदोनी ॥ एकवटलेंहोतेंपयपाणी ॥ मगविवेकेंचंचूसिखोऊनी ॥ क्षीरचिनिव
डूनीघेतलें ॥ ६५ ॥ हींछप्पन्नरत्नेंअमूल्यचोखट ॥ सत्तावन्नावासुवर्णतगँट ॥ कोंदणींबैसवूनिएकवट ॥ वैकुंठपीठपूजि
ला ॥ ६६ ॥ निष्कामभक्तआणिप्रेमळ ॥ ह्यातुळसीमंजिऱ्याकोमळ ॥ यांचीगुंफोनियांमाळ ॥ दीनदयाळपूजिला ॥
॥ ६७॥ कींछप्पन्नदेशींचेपाषाणनिर्मळ ॥ सत्तावन्नावाउत्तमस्थळ ॥ तेथेंरचोनियांचेंदेऊळ ॥ आंतघननीळबैसविला ॥
॥ ६८ ॥ आणिकसंतवैष्णवमहंत ॥ भक्तप्रकटजाहलेबहुत ॥ तेमोकळींसुमनेंघेऊनिनिश्चित ॥ पुष्पांजळीअर्पावी ॥
॥ ६९ ॥ भर्तृहरीजालंधर ॥ सदानंदशंकराचार्य ॥ गोपीचंदराजाउदार ॥ नरसिंहनागरविवेकी ॥ १७० ॥ हिरासिं
गवाणीगुर्जर ॥ मलुकदासगंगकवीश्वर ॥ चर्पटीचौरंगीभक्तथोर ॥ शार्ङ्गधरवशकेला ॥ ७१ ॥ धनाजाटबाजीदखा
न ॥ बावाआणिनानकसदन ॥ नरसिंहभारतीनारायण ॥ अच्युताश्रमविवेकी ॥ ७२ ॥ हळसीअवघडमुधयाभक्त ॥
मुकुंदराजजगविख्यात ॥ जेणेंविवेकसिंधुअध्यात्मग्रंथ ॥ निजबुद्धींरचियेला ॥ ७३ ॥ कृष्णंभटयाज्ञवल्की ॥ कृष्णदा
समुद्गलविवेकी ॥ कान्हयाहरिदासनामापाठकी ॥ हेप्रसिद्धलोकींनिजभक्त ॥ ७४ ॥ लोलिंबराजचांदबोधला ॥ शे
खफरीदप्रसिद्धभला ॥ शेखहुसेनसर्वांगेंळा ॥ हेभक्तदेवालाआवडती ॥ ७५ ॥ नरहरिजयराममालोपंत ॥ नरसिंह
सरस्वतीप्रेमळभक्त ॥ महामुद्गलभटजगविख्यात ॥ जानकीकांतवशकेला ॥ ७६ ॥ एकलिंगमैराळसिद्ध ॥ सुमतिक ॥ ६ ॥
मळाकुरप्रसिद्ध ॥ रेणुकानंदआनंदकंद ॥ लीलाअगाधजयाची ॥ ७७ ॥ श्रीपतिआणिदासोपंत ॥ माधवदासजग

१ देणें, कर्ज. २ दूध. ३ विचाररूप. ४ कोंदण, आच्छादन. ५ अधिक. ६ राम.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विख्यात ॥ प्रऱ्हादबडवेबापूजीपंत ॥ हेदेवासिबहुतआवडते ॥ ७८ ॥ गोसांवीनंदनस्वामीवामन ॥ गिरिबाईचि न्मयनंदन ॥ बस्वलिंगाचेंऐकूनिकीर्तन ॥ जगज्जीवनसंतोषे ॥ ७९ ॥ अंतोबाआणिभगवंतभट ॥ विठ्ठलपुरंदरएकनिष्ठ मैनावतीचींदिखोनिनिकट ॥ वैकुंठपीठसंतोषले ॥ १८० ॥ लालुनखोजीपरमानंद ॥ दादुपिंजारीपूर्णानंद ॥ बहिणाबा ईचाप्रेमछंद ॥ नाचेगोविंदकीर्तनीं ॥ ८१ ॥ हरिविजयरामविजयसार ॥ पांडवप्रतापग्रंथथोर ॥ तोश्रीधरस्वामीनाझ रेकर ॥ पंढरपुरनिवासी ॥ ८२ ॥ शिवरामगोसांवीपैठणकर ॥ नारायणनिंबयाचाकुमर ॥ त्याचाऐकोनिकीर्तनग जर ॥ रुक्मिणीवरसंतोषे ॥ ८३ ॥ तुकयाचाबंधूकान्हयाजाण ॥ धाकुटाकुमरनारायण ॥ जेणेंकांतेचात्यागकरून ॥ केलें गमनद्वारकेसी ॥ ८४ ॥ बोधल्याचानातुभगवंतबावा ॥ तैसाचिपैठणकरनऱ्होबाबावा ॥ ज्याचाकीर्तनींअखंडहेवा ॥ गाइ लेंदेवानिजप्रेमें ॥ ८५ ॥ आनंदतनयप्रसिद्धजनी ॥ रघुपतिशेषपूर्णज्ञानी ॥ जयाचेंकीर्तनऐकोनिकानीं ॥ झालेज्ञानी अतिमूढ ॥ ८६ ॥ शेंदुरवादियांतसाचार ॥ मध्वमुनीश्वरभक्तथोर ॥ जोपद्यरचनींअतिचतुर ॥ शार्ङ्गधरवशकेला ॥ ॥ ८७ ॥ शंकरजीबावाशिउरकर ॥ ज्याचाकीर्तनगजरथोर ॥ सिद्धांतज्ञानीअतिउदार ॥ पाखांडीयांवरपंचानन ॥ ॥ ८८ ॥ अमृतरायभक्तप्रेमळ ॥ ज्याचेंकविबअतिरसाळ ॥ श्रवणींऐकतीनिंदकखळ ॥ द्रवतीतत्काळनिजप्रेमें ॥ ८९ ॥ ऐसेसंतप्रेमळजनीं ॥ जेईश्वरकृपेचेवरदानी ॥ तयांचियानिजचरणीं ॥ नमननमाझेंसाष्टांग ॥ १९० ॥ मोरेश्वरबावातां बवेकर ॥ जोभागवतधर्मीअतितत्पर ॥ त्याचेचरणींवारंवार ॥ नमननमाझेंसाष्टांग ॥ ९१ ॥ जेएकनिष्ठाधरूनिअंतरीं ॥ झा लेपंढरीचेवारकरी ॥ त्यांप्रेमळभक्तांचेचरणावरी ॥ नमननमाझेंसाष्टांग ॥ ९२ ॥ धरूनिसप्रेमउल्हास ॥ ज्यांणींपंढरीसि केलावास ॥ त्याक्षेत्रवासियांनिजभक्तांस ॥ नमननमाझेंसाष्टांग ॥ ९३ ॥ आणिकहीपुढेंवैष्णवभक्त ॥ गुप्तप्रकटहोणारबहु

---

१ स्त्री. २ सदोदित. ३ शेंदुर नामें गांव. ४ गोड. ५ दुष्ट. ६ मनांमध्यें.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त ॥ त्यांचेचरणींभावार्थ ॥ माझाप्रणिपातसाष्टांगं ॥ ९४ ॥ असंख्यईश्वराच्याविभूती ॥ गणतीघेतांनपुरेमती ॥ जेवींपर्ज
न्याच्याधारापडतांक्षितीं ॥ त्यानमोजवतीसर्वथा ॥ ९५ ॥ पृथ्वीवरीअंकुरउडलेदेख ॥ त्यांचासर्वथानव्हेचिलेख ॥
कींसागरींच्यालहरीअनेक ॥ धरावालेखकोठवरी ॥ ९६ ॥ जोलीलानाटकीरुक्मिणीकांत ॥ आपणचिजाहलादेवभ
क्त ॥ तयांसीचपाहतांसकळसंत ॥ आलेदृष्टीअनायासें ॥ ९७ ॥ घेतांसागराचेंदर्शन ॥ सकळसरितांचेंदेखिलेंजीव
न ॥ कांभास्करासिकरितांनमन ॥ सकलकिरणदेखिले ॥ ९८ ॥ अश्वत्थासिप्रदक्षिणाकरितांदेखा ॥ तरीत्यांतच
आल्यासकळशाखा ॥ तेवींनिजभक्तांवैकुंठनायका ॥ द्वैतसर्वथानसेकीं ॥ ९९ ॥ गोडीआणिसाकरजैसी ॥ निवडि
तांनयेचतुरासी ॥ तेवींनिजभक्तआणिभीमातीरवासी ॥ एकचिमानसींजाणिजे ॥ २०० ॥ यादोहींचेकृपेंकरून ॥ भ
क्तविजयजाहलानिर्माण ॥ श्रोतृयांचेमनोरथपूर्ण ॥ श्रवणमात्रेंहोतीलकीं ॥ २०१ ॥ जेभक्तचरित्रेंअखंडगात ॥ त
यांसिज्ञानहोईलअद्भुत ॥ कृपाकरूनिपंढरीनाथ ॥ भेटेलनिश्चितत्यालागीं ॥ २ ॥ ग्रंथसंग्रहकरितांघरीं ॥ तरीविघ्नें
नयेतीत्याचेमंदिरीं ॥ भोंवतेंसुदर्शनघिरटीकरी ॥ निश्चयअंतरींअसोंद्या ॥ ३ ॥ याग्रंथामाजीहेंचिकथन ॥ कींभ
क्तांसिपावलाजगज्जीवन ॥ ह्मणोनिश्रोतयांवक्तयांकारण ॥ रुक्मिणीरमणरक्षिता ॥ ४ ॥ कलियुगींचींचरित्रेंऐको
नी ॥ सामान्यनह्मणावींविचक्षणीं ॥ कृतत्रेताद्वापरालागूनी ॥ थोरथोरमुनीगातील ॥ ५ ॥ कलीचाप्रारंभहोतांचिल
रित ॥ सुरवरआनंदलेबहुत ॥ कींआठघटिकाकरितांएकाग्रचित्त ॥ वैकुंठनाथभेटेलकीं ॥ ६ ॥ तंवनारदमुनीनेंकौ
तुककेलें ॥ जिव्हाशिश्नहातींधरिलें ॥ सकळदेवांसिआश्चर्यवाटलें ॥ मगपुसतेजाहलेतयासी ॥ ७ ॥ यावरीबोलेब्र ॥ ७ ॥
ह्मसुत ॥ हेदोनीनावरतीकलियुगांत ॥ सुरवरींऐकतांहेमात ॥ चिंताक्रांतमानसीं ॥ ८ ॥ मगनारदसांगेतयांप्रती ॥

१ उरस्थळ, मस्तक, नेत्र, वाणी, मन, पाद, हस्त, जानु, याप्रकारें साष्टांग नमस्कार होतो. २ अवतार. ३ पृथ्वीवर. ४ लाटा. ५ नद्यांचें उदक. ६ सूर्यास. ७ पिंपळास ८ पांडुरंग.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कलियुगींवैष्णवभक्तजेहोती ॥ त्यांचींचरित्रेंजेऐकती ॥ त्यांसिवैकुंठपतीभेटेल ॥ ९ ॥ ऐसेंबोलतांब्रह्मनंदन ॥ विबुध
आनंदलेसंपूर्ण ॥ ह्मणतीहेंस्वल्पसाधन ॥ आह्मांकारणमानलें ॥ २१० ॥ ह्मणोनिमहर्षिआणिइंद्रादिकांसी ॥ भ
क्तचरित्रेंपावनतयांसी ॥ विचक्षणींवचनेंऐकूनिऐसीं ॥ विकल्पमानसींनधरावा ॥ ११ ॥ जैसीआज्ञाकेलीरुक्मिणी
वरें ॥ तितुकींचग्रंथींलिहिलींअक्षरें ॥ जैसावाजविणारफुंकितोवारें ॥ तैसींचवाजंतरेंवाजती ॥ १२ ॥ क्षेत्रांतबीजपे
रिलेंजाण ॥ अंकुरयेणेंजीवनाधीन ॥ कींजळमंटपीयाचेंनाचणेंजाण ॥ कळसूत्राधीनअसेकीं ॥ १३ ॥ तेवींभक्तविज
यग्रंथीं ॥ बुद्धीचादाताश्रीरुक्मिणीपती ॥ तेणेंउजळोनियांमाझीमती ॥ ग्रंथनिजयुक्तींलिहविला ॥ १४ ॥ शकेसोळा
शेंचव्ऱ्यायशी ॥ चित्रभानुनामसंवत्सरासी ॥ वैशाखवद्यद्वादशीसी ॥ ग्रंथसिद्धीसीपावविला ॥ १५ ॥ प्रवरेपासूनि
दक्षिणेस ॥ ताहाराबादगांवपांचकोश ॥ भक्तविजयअतिसुरस ॥ झालाअसेतेठायीं ॥ १६ ॥ शेवटीलविनवणीआ
तां ॥ माझीऐकेगापंढरीनाथा ॥ तूंचिश्रोताआणिवक्ता ॥ ग्रंथरक्षितानिजकृपें ॥ १७ ॥ तूंअखिलअविनाशजगद्गुरू
मायातीतसर्वेश्वरू ॥ निराधारीयांसिआधारू ॥ करिसीभवपारूदासांसी ॥ १८ ॥ भक्तांनींजैसीघेतलीआळ ॥ ती
तूंपुरविसीतत्काळ ॥ त्यांचेंप्रेमदेखोनिनिर्मळ ॥ हृदयकमळींवसविलें ॥ १९ ॥ कोणासिदीधलेंआत्मज्ञान ॥ कोणी
मागीतलेंसायुज्यसदन ॥ माझेंहेंचिइच्छितसेमन ॥ जेगुणवर्णींनहरीचे ॥ २२० ॥ कोणीबैसलेवज्रासनीं ॥ कोणी
बैसलेवैकुंठभुवनीं ॥ मीनिजदासांचेकीर्तनीं ॥ झालोंरतसप्रेमें ॥ २१ ॥ अविटआवडीधरूनिचित्तीं ॥ तुझियादासां
चीवर्णिलीस्तुती ॥ हेंचिउचितमहीपती ॥ मागेनिजप्रीतींनिरंतर ॥ २२ ॥ स्वस्तिश्रीभक्तविजयग्रंथ ॥ ऐकतांतुष्टेल
जगन्नाथ ॥ प्रेमळऐकाभाविकभक्त ॥ सप्तपंचाशत्तमाध्यायरसाळहा ॥ २२३ ॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीम
जगदीश्वरार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ५७ ॥ ॥ ओंव्या ॥ २२३ ॥ ॥ इतिश्रीभक्तविजयग्रंथः समाप्तः ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हा ग्रंथ मुंबईत मेशर्स गोपाळ नारायण आणि कंपनी यांच्याकरितां एशियाटीक छापखान्यांत रामचंद्र कृष्ण पिंगे बेरेरकर याणीं छापून प्रसिद्ध केला. मिति पौष शुद्ध १२ शनिवार, शके १८०४ ता० २० जानेवारी सन १८८३.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri